म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक

पुस्तकाचें नांव

सन

काव्य

॥ श्री ॥

# श्रीमयूरकविकृत

( १ )

## भीष्मपर्व.

| पृष्ठ. | ओं. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. | ओं. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | कांचि | कोटि | ५० | ११ | तथा पिहित² | तथापि हित |
| १२ | १२ | वरा | नरा | ७७ | १४ | मांगावें | सांगावें |
| १३ | ६ | गहिवरलै | माहिवरले | ७८ | १० | कापूनि | कापुनि |
| २१ | २ | कारतो | करितो | ७९ | १३ | दुस्कराहि | दुष्करहि |
| ५० | १० | पिहित | पिहित² | ८३ | १९ | ये | वे |

"श्रीहरिवरदा" छापखान्यांत छापिलें.

मुंबई.

॥ श्री ॥

# श्रीमयूरकविकृत

भारतांतर्गत

# द्रोणपर्व.

बाबाजी अनंत तेंडुलकर,

यांनीं आपल्या

"श्रीहरिवरदा" छापखान्यांत छापिलें.

मुंबई.

१८९१.

# भारत.

## ( द्रोणपर्वांतील आर्या )

## अध्याय १.

योधवरतातपतनें अनुदिन धृतराष्ट्र होय कष्टी तें ॥
किति वर्णावें विजनीं अंध रडे हारवूनि यष्टीतें ॥ १ ॥
योगीश्वरसा साक्षात् जो पाहे सर्व संजय[१] ज्ञानी ॥
तो ये पुरासि चिंतित जें गावें पादकंज यज्ञानीं ॥ २ ॥
शिबिराहुनि आलों मी संजय नमितों असें वदे त्यातें ॥
नृप वृत्त पुसे सांगे गावल्गणि[१] कर्ण चित्त दे त्यातें ॥ ३ ॥
भीष्म पडतांचि गेले सर्वांचेही पळांत आवांके[२] ॥
नसतां धुरंधर वृषभ बाळ वृष भरें करूनि आ वांके ॥ ४ ॥
कुरुकटका आठवला कर्ण महासंकटीं गजा हरिसा ॥
देउनि दर्शन वदला तो जें तें सर्व सांगतों परिसा ॥ ५ ॥
देवव्रतेंचि केली सत्य असाधारणा प्रतिज्ञा ती ॥
आहे क्षम भाराच्या कोण असा धारणाप्रति ज्ञाती ॥ ६ ॥
रविरुचिचें[३] तीमागें संपादे स्वल्प काज वातीस ॥
विसरविल काय तेज प्रकट करुनि अल्प काजवा तीस ॥ ७ ॥
भीष्माच्या पतनाची चित्तांत धरूं नको व्यथा राया ॥
कुरुगुरुपुढें समर्थ न सुरगुरु[४] तोही न काव्य थाराया ॥ ८ ॥

१ संजय. २ धरग्यास. ३ सूर्यकान्तीचें. ४ शुक्र.

प्रार्थुनि अभिषेकावा देइल वर होय सुरतरुचि राज्या ॥
वरितिल देवी जाणति सर्व कला विविध सुरतरुचिरा ज्या ९
कुरुराज ह्मणे गुरुजी सेनापति शत्रुबलविरामा व्हा ॥
तुमची आम्हां पळवू अहितमदां जेंवि पळवि रामाव्हा॥१०॥
द्रोण ह्मणे सेनापति होतों ह्मणतोसि जरि परि स्पष्ट ॥
धृष्टद्युम्नासि न मी वधिन, करीन त्वदर्थ बहु कष्ट ॥११॥
मी समर पांडवांसीं करिन हरिन अरिनराधिपतिकटकें ॥
भट केंवि टिकेल इतर गरुड निरखिजेल काय गा चटकें १२
मज गुरुसीं गुरुवत्सल पांडव रण न करितील उत्साहें ॥
येईलचि तच्चित्तीं कीं होइल सज्जनांत कुत्सा हें ॥ १३ ॥
ऐसें वदोनि कुरु-गुरु विधिनें अभिषेक करुनि घे राया ॥
त्यासि न शकले पांडव- भट कोटिहि धैर्य धरुनि घेराया १४
गुरु-रथ-वेग असह्यचि झाला त्या विष्णु-पत्ररथ-वेगा ॥
केला पांच दिवस बहु युद्ध-चमत्कार तो न कथवे गा॥१५॥
धृष्टद्युम्नें वधिला अन्यायें सकळ सैन्य हळहळतें ॥
गुरु-मरण तसें देतें जैसें दे मोह दैन्य हळहळ तें ॥ १६ ॥
धृतराष्ट्र विलाप करी बहु-आपण आपणासि निंदुनि घे॥
स्मृति हरपे करपेचि, न तन्नयनांतूनि अश्रुबिंदु निघे ॥१७॥
सूता जो वाढविला स्वपराक्रमसाच विप्र मत्तातें ॥
धृष्टद्युम्नें वधिला हें वाटे साच विप्रमत्तातें ॥ १८ ॥

---

१ शत्रुसैन्याच्या नाशार्थ. २ नांव. ३ शत्रूच्या गर्वाला. ४ परशुरामाचें नांव. ५ चिमणीनें. ६ पक्षी (गरुड). ७ अतिउन्मत्ताला.

# द्रोणपर्व.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. | पृष्ठ. | ओ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२ | करुकटका | कुरुकटका | १०६ | ८ | प्रख | प्रखर |
| ४ | १५ | ज्या | जा | १०६ | १९ | मागे | मार्गे |
| ४ | १६ | राज्या | राजा | १०७ | १ | युद्धानुष्टानें | युद्धानुष्ठानें |
| ९ | १३ | उगार | उगारे | १०८ | १९ | मर्नी | मनीं |
| ९ | १६ | वरि | वीर | १०९ | १९ | अर्जना | अर्जुना |
| १९ | ६ | वाटावया | वाटावया | १११ | १८ | यज्ञभंडप | यज्ञमंडप |
| १९ | ७ | उठला | उलटा | १११ | ११ | श्रीमत् | श्रीमत् |
| २४ | ३ | होइल | होईल | ११२ | ९ | हाटक | हाटकें |
| २९ | १४ | यर्थी | यूर्थी | ११२ | १३ | वधिला | वधिला |
| २८ | १६ | फल | फुल | ११२ | १७ | नरां | नरा |
| ३१ | ६ | आले | झाले | ११४ | ९ | मृत्युसाध्वसा | मृत्युसाध्वसा |
| ३२ | १० | सत्याची | सत्यचि | ११९ | १३ | धन | वन |
| ३२ | १३ | करुसैन्यांत | कुरुसैन्यांत | १२१ | १ | पळवीन | पळवीन |
| ३३ | ३ | साधुगजन | साधुगंजन | १२२ | १७ | गदाधाली | गदाघाली |
| ४२ | ९ | आव खी | आवरवी | १२४ | ११ | दरुनि | दुरुनि |
| ४५ | ५ | याग्य | योग्य | १२५ | ३ | वा | बा |
| ५० | १ | मोजलि | मोजील | १२६ | १६ | लीलि करूनि | लीलेकरूनि |
| ५२ | ८ | त | तें | १२७ | १३ | झाली | झाली |
| ५६ | १ | असें | असें वहु | १२९ | १४ | सवे | सवे |
| ५६ | ६ | देहा | दे हा | १३० | १० | वात | वात |
| ६५ | १८ | अमद | अगद | १३१ | ४ | अच्छादिति | आच्छादिति |
| ६७ | १८ | लोहाच | लोहाचा | १५६ | १८ | सना | सेना |
| ७१ | १४ | यद्वा [रूची | यद्वा [तरूची | १५७ | २० | कुंभार | कुंभार |
| ७८ | २२ | कोटकरल्पत- | कोटर-कल्प- | १७६ | ४ | अश्वत्था मा | अश्वत्थामा |
| ८६ | २० | प्राम्र | आम्र | १८४ | १० | संध्यादिक | संध्याधिक |
| ८८ | १९ | चालविला | चालविला | १८८ | २१ | हामुनीची | महामुनीची |
| १०१ | १७ | पुरवाया | पुरवाया | १९३ | ९ | पळलास | पळालास |
| १०५ | २० | डाल | ढाल | २०० | १ | मरुत | मरुत् |

| पृ. | ओ. | अशुद्ध. | शुद्ध. | पृ. | ओ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१३ | २२ | विदुयुत्संबंधी | विद्युत्संबंधी | २४८ | २२ | लल्या | लेल्या |
| २१४ | २२ | मुद्रास | समुद्रास | २४९ | २ | शीष्य | शिष्य |
| २२७ | २१ | तपलेल्या | तापलेल्या | २६२ | १४ | शक्तिही | शक्तिहि |
| २४५ | २२ | गुरूकडन | गुरूकडून | | | | |

आज्ञापावे आपण भीष्म-द्रोणांतक स्वयें देवा ॥
हे वासवाहि जिंकुनि करितिल तुमची रणांगणीं सेवा १८ ॥
धर्म ह्मणे इयाल्क[१] हो प्रसवावे सद्यशौर्थ सुत तातें ॥
सत्पुत्रींहि करावें जेणें होईल कीर्ति सुतता तें ॥ १९ ॥
धृष्टद्युम्ना माझे तूं कीं तो स्कंद-देव[२] सेनानी ॥
पावावा जय अस्मत्- सेनांनीं जेंवि देव-सेनांनीं ॥ २० ॥
बा तूं द्रोणांतक हो भीष्मांतक हो त्वदग्रज[३] शिखंडी ॥
मधु[४]-नाशक जेंवि हरि स्मर[५]-नाशक जेंवि देव शशिखंडी[६] २१॥
ते बोलिले जसें तूं इच्छिसि, होइल तसेंचि राया तें ॥
बहु हर्षसील विजयें वृद्ध जसा औरसें चिरायांतें[७] ॥ २२ ॥
रचिला दुसरे दिवशीं व्यूह क्रौंचारुणाख्य[८] धर्मानें ॥
गरुड-व्यूह श्रीमत्- भीष्मानें परमशुद्धकर्मानें ॥ २३ ॥
तें भीष्माऽर्जुन-युद्ध स्तविलें सुर-सिद्ध-वर-समूहांनीं ॥
केल्या असकृत् रवि-रुचि हानि न केवळ तिहीं चमू-हानी २४
तच्छर-पटलें बहुधा लोपे प्रकटे सहस्र-भानु घडी ॥
उघडी पहावयास्तव जाणों लज्जेस्तव स्व भा नुघडी॥ २५॥
वृद्ध तरुण भीष्माऽर्जुन परि न रणीं न्यून आधिक ते गमले॥
सम लेखेंपि[९] तयांतें जाणुनि तद्भुज-पराक्रमीं रमले ॥ २६ ॥
भीष्म स्तनांतरीं[१०] श्री- शौरि-शरीरीं शिताग्र[११] शर हाणी ॥

---

१ अतिविस्तृत. २ कार्तिकस्वामी. ३ तुझा वडील भाऊ. ४ मधुदैत्य. ५ मदन. ६ शशिखंड=चंद्रशकल मस्तकीं ज्याच्या, तो, शंकर. ७ फार दिवसांनीं झालेला. ८ क्रौंचारुण नांवाचा. ९ देवांनीं. १० हृदयांत. ११ तीक्ष्ण अग्र ज्यांचें ते.

न्हाणी क्षतजें कोपें  आणी तैं पार्थ लोचनीं पाणी ॥ २७ ॥
नारायण अजित जसा  अजित तसाचि त्रिविष्टपीं नर तो ॥
रसनेसि ह्मणेल कवण  सुकवि तदुत्कर्ष-वर्णनीं न रतो॥ २८॥
तात तुझा तेजस्वी  मृत्युंजयसाचि होय अजित रणीं ॥
संवोधनप्रसंगीं  यासि ह्मणेलचि सभेंत 'अजि'तरणी॥२९॥
जें सोडिति शस्त्र ह्मणे  प्रेक्षक-सुर-नर-मदासि संपा तें ॥
कंपातें भीष्माऽर्जुन  देती अचळेंसि शस्त्र-संपातें॥ ३० ॥
प्रेक्षक-जनांत एकाहि  एकाचेंही लवेंचि ना पातें ॥
प्राण-हराहि सुमनोहर  कोणा वदवेल युद्ध बापा तें॥ ३१ ॥
धृष्टद्युम्न द्रोण-  प्राण हराया प्रयत्न मात्र करी ॥
परि तो परिभव पावे  होय कसा सिंह-विजय-पात्र करी३२॥
झाला विरथ परि न तो  भ्याला कांहीं तशाहि उर्वरितें ॥
गुरु-शर-वृष्टि निवारित  होता चर्मेंचि मात्र उर्वरितें॥ ३३॥
वारी नियतिच वारिल  कुरु-गुरुच्या काय सायका ढाल ॥
हेंचि तुह्मी साधु रसिक  या दुग्धांतील साय काढाल॥ ३४॥
तो भीमसेन सोडुनि  गुरुवरि शर सात सोडवी राया ॥
जाणों ते सप्तर्षी  ह्मणती यश रक्ष सोड वीरा या ॥ ३५ ॥
इतुक्यांत वृद्ध आले  द्रुपद विराटहि करावया समरा ॥
सांप्रति जाय ह्मणाया  जाणों सार्थक करावयास मरा॥३६॥
दुर्मद काळासि जसा  लंघाया विश्व-नायका लिंगा ॥
प्ररां भीमासि तसा  लंघाया भरत-राय कालिंगा ॥ ३७ ॥

१ त्रैलोक्यांत. २ पृथ्वीला. ३ मोठ्या शत्रूला. ४ ढाल. ५ शेष राहिलेलें.

कालिंग-मथन करितां सकळांसहि भीम रुद्रसा गमला ॥
श्रमला न लक्ष-मथनीं कथवे बहु युद्ध विस्तरें न मला ॥ ३८ ॥
शिरतां कलिंग-कटकीं धरुनि करीं तो महा-भुज गदेतें ॥
देता झाला भय जें भेक-कुळाला महा-भुजग दे तें ॥ ३९ ॥
धृष्टद्युम्न तयाला धांवुनि झाला सहाय सहसेन[1] ॥
चित्तांत ह्मणे रुद्राचि हा या प्रभुला कधींहि न हसेन ॥ ४० ॥
स्वरथीं वाहून ह्मणे मेले कालिंग सर्व बा हेर ॥
या मांस-कर्दमाच्या जावें आह्मी निघोनि बाहेर ॥ ४१ ॥
सात्यकि भेटुनि शतदां जय जय ऐसें सुखें वदे त्यातें ॥
आपण निवोनि निववी पुष्कळ त्याही सुखेंवें देत्यातें[2] ॥ ४२ ॥
मग मथिले द्रौणीचे द्रुपद-सुतें करुनि आहवा[3] वाजी ॥
त्यासि स्व-रथीं घेउनि शल्य ह्मणे हा न राहवावा जी ॥ ४३ ॥
मारामार करिति मग कृप शल्य द्रौणि हे तिघे त्यातें ॥
विपिनीं वृक एकातें जेंवि स्ववधार्थ हेति घेत्यातें ॥ ४४ ॥
करितो भवि ताप-त्रय वारुनि जन जेंवि कंजनाभाचा[4] ॥
करि तेंवि पार्षत-रिपु-[5] त्रय वारुनि लोक-रंजना भाचा ॥ ४५ ॥
त्या अभिमन्युवरि उठे लक्ष्मण नंदन सुयोधनाचा हो ॥
सुर अप्सरांसि वदले दोघेही हे सुयोध नाचा हो ॥ ४६ ॥
घे साधु साधु ह्मणउनि खंडुनि त्या जिष्णु-सूनुचापातें[6] ॥
वदले कौरव आतां होतो हत जिष्णु सूनुच्या पातें ॥ ४७ ॥
सज्ज करुनि इतर धनु भ्राताही कोपला परावासा ॥

---

१ सैन्य बरोबर ज्याच्या तो. २ दृढालिंगन. ३ युद्धाला. ४ विष्णूचा ५ द्रुपदपुत्रावर चाल करणाऱ्या तिघांस. ६ अभिमन्यूच्या धनुष्याला.

शोकीं बुडवूं पाहे स्वावंसा पर जसा परावासा ॥ ४८ ॥
जेणें कुरवाळावें लाग ज्ञात्यासि तो विदाराया ॥
सांगों काय तुज तुझ्या पौत्राचें युद्ध कोविदा राया ॥ ४९॥
बंधूसि बंधु पाहे माराया लावकासि लावकसा ॥
लाविसि परा सकृत् तरि बोल नृपा आपणासि लाव कसा ५०
अन्योन्यांसि विदारिति ते खरतर-नखर-सिंह-शावकसे ॥
लावकसे न ह्मणावे तेजःसंपन्न मूर्त पावकसे ॥ ५१ ॥
होय सहाय सुयोधन- राय स्वबळासमेत तनयाला ॥
स्व-युगीं कलि काल जसा पुत्रस्नेहें करूनि अनयाला ५२॥
होय सहाय हरि जसा स्वसमर्था तो स्व-नाममंत्रास ॥
पार्थ-सुतासि तसा ज्या कोणापासुनि नसेचि संत्रास ॥५३॥
दैत्यांत प्रऱ्हादचि गावा इतर न सुरापि गावे गा ॥
भीष्म कुरूंत तसा हर होय परच मू-सुरापगा-वेगा ॥५४ ॥
मानवली न सुरलता दुर्गाहि विजय,धनुष्य-वल्लीला ॥
दिसतो मनुष्यसा जरि तरिहि न याची मनुष्यवल्लीला५५॥
शतकोटिप्रति योजी जो मेरुप्रभृति-शिखरि-तापार्थ ॥
शतकोटिगुणें तदधिक गमला शर-निकर-विखरिता पार्थ ५६
अभिमुख झाले होते जे ने ते पावलेचि पर मरण ॥
श्रीराम-राक्षसांचा तो कीं हा एक होय परम रण ॥५७ ॥

---

१ आपल्या वराला. २ शत्रूच्या वराला. ३ ज्ञात्या. ४ एकवार. ५ तीक्ष्ण नखें ज्यांचीं, अशा सिंहाच्या पेल्यांसारखे. ६ मद्यप्राशन करणारे, दैत्य. ७ शत्रुसेना हीच गंगा, तिच्या ओघाला. ८ वज्र. ९ पर्वत.

सूं सणणण सणणणणणण वाजति शर-निकर कार्य[1]-हानिकर
वद्ले सुर मुनि कारतां नररूपें रुद्र काय हा निकरे[2] ॥५८॥
शरधी-जलधी[3] फुटले कीं दैवें पाश एकदा तुटले ॥
कीं काल-व्याल[4] करटि- घोटक-भट-भेक[5] खावया सुटले ॥५९॥
कवि योजुनि उपमा गर्ज- हर[6]-नर-शरततिस वाहुटळ लाजो ॥
अतुलबल[7] न कां गिर-गल- कलहींहि[8] न विजयबाहु टळला जो ॥
देवासुरा[9]ऽऽहव न बहु त्या कौरव-पांडवाऽऽहवाहून[10] ॥
शोणित[11]-नदींत गेले सभट[12] रथ-द्विरद[13]-वाहे[14] वाहून ॥ ६१ ॥
त्वत्तात स्मित करुनि द्रोणासि ह्मणे धनुष्य उतरा हो ॥
शिबिरासि चला फिरवा दुर्योधन-वत्स पांडुसुत राहो ॥६२॥
मेल्या फार पळाल्या उरल्या दिसतात विप्रभा[15] सेना ॥
तिकडे पुरे ह्मणेसा नर जेंवि कलींत विप्र भासेना ॥ ६३ ॥
केला अरि-जन विजयें जैसा तो काम अच्छवि[16] भवानें[17] ॥
बहुधा समर्चिला[18] बहु- जन्म श्रीराम अच्छ-विभवानें[19] ॥६४॥
अस्तासि भानु गेला जावें आपणहि काय राहुन गा ॥

---

१ शरीरनाशक. २ प्रलय. ३ भाते हेच समुद्र. ४ कालरूपी सर्प. ५ हत्ती, घोडे, योद्धे हेच बेडूक. ६ गजांचें हरण करणाऱ्या अर्जुनाच्या बाण परंपरेला. ७ निरुपम शक्ति ज्याची, तो. ८ शंकराशीं झालेल्या युद्धांत. ९ देवदैत्यांचें युद्ध. १० कौरवपांडवांच्या युद्धाहून. ११ रक्तनदींत. १२ वीरांसह १३ हत्ती. १४ घोडे. १५ तेजोहीन. १६ निस्तेज. १७ शंकरानें. १८ पूजिला. १९ ज्याचें ऐश्वर्य निर्मल आहे त्या अर्जुनानें.

रिक्तचि, गिळितांहि सकळ निर्जर-निलयां त्रिकायं राहु नगां[3]॥ ६५ ॥
करिता झाला दुसरे दिवशीं ऐसें वदोनि अवहार[4]॥
जो सर्वज्ञ-सभेच्या कंठींचा अतुल विमल नवहार ॥ ६६ ॥

# अध्याय ४.

## तृतीयदिनयुद्ध.

तिसरे दिवशीं राया भीमानें अतितरोग्र[5]-कोपानें ॥
दुर्योधन नृप मूर्छित केला भेदुनि उरांत रोपानें[6] ॥ १ ॥
सूत ह्मणे भीमाच्या हरिच्या गजसा न हा निमो[7] हातें ॥
पळवूनि करी त्याच्या यत्न-शतें शीघ्र हानि मोहातें ॥ २ ॥
सावध होउनि राजा भीष्मासि ह्मणे अहो पितामहजी ॥
झाली भवत्प्रतिज्ञा काय जना दे सुधा पितां मह[8] जी ॥ ३ ॥
असतां तुह्मी पति पृथा- पुत्र मर्थिति या मदीय-पृतनेतें[9] ॥
नवल ज्वलदनलाचें[10] सर्वस्वें बल हरूनि घृत नेतें ॥ ४ ॥
जिकडे वपु तिकडे मन युक्त न शोभेल अन्यथा नातें ॥
पायें अनन्यें[11] लोटुनि लावावें काय अन्य थानातें ॥ ५ ॥
हांसुनि पृथुल-जलज-दल-[12] निभ-शुभ-नयनें सलीलें[13] फिरवून ॥

---

१ देवांचें स्थानभूत अशा २ देहरहित. ३ पर्वताला, मेरूला. ४ युद्धसमाप्ति. ५ अतिभयंकर. ६ बाणानें. ७ मरो. ८ उत्सव. ९. माझ्या सेनेला. १० प्रज्वालित अग्नीचें. ११ स्वकीय. १२ विशालकमलदलवत्नेत्रें. १३ लीलेनें.

पाहुनि सुयोधनाऽनन शांतनव वदे स्वकोप जिरवून ॥ ६ ॥
राया भलतेंचि वदसि पथ्य हित स्व-गुरु-वच न आइकसी ॥
अन्य असोत, वदेल स्वसुताप्रति अहितवचन आइ कसी॥७॥
युद्धीं अजेय पांडव वज्रधरा सामरांहि असि वाणी ॥
आह्मीं शतदां कथिली परि तुज ती लागलीच असिवाणी॥८॥
कैसा जिंकावा हो करुनि बळें आहवा युवा जीनें ॥
वा जिंकिला कधीं तरि जवनें तरुणेंहि वायु वाजीनें ॥९ ॥
मी आजि साग्रजानुज- शक्र-सुताचें करीन वारण गा॥
बहु हेंहि, पदभारिंहि जरि सारील अनव-करी नवा रणगा॥१०
असि करुनियां प्रतिज्ञा विष्णुपदी-नंदनें अति त्वरितें ॥
पांडव-चमू-पतीचें मथुनि चमू पाडिलें पतित्व रितें ॥११॥
वीरां न ओढवे गुण तूणींच्या सायका न कर पावे ॥
भीष्म ग्रीष्म-रविच मग तत्तेजें कार्य कां न करपावे॥१२॥
दिसतें तेजोमडंल जेंवि जवें फिरवितां अलातातें ॥
तेंवि रथातें फिरवुनि केलें जंव दाविला भला तातें ॥१३॥
जिकडे जिकडे पळती तिकडे तिकडे महाजवन तो वा ॥
बहु हाय हाय ह्मणती प्राकृत,बुध हंत हा, यवन तोबा॥ १४

---

१ दुर्योधनाचें मुख. २ इंद्राला. ३ देवसहिताला. ४ खड्गाप्रमाणें. ५ युद्धाला. ६ तरुण. ७ वृद्धानें. ८ वेगवानानें. ९ घोड्यानें. १० ज्येष्ठकनिष्ठबंधूंसह. ११ अर्जुनाचें. १२ निवारण. १३ वृद्ध गज. १४ तरुण अश्व. १५रणांत आलेल्या ( गजाला.) १६ विष्णुपदी=गंगा. १७ भात्यांतील. १८ देह.१९ कोलितास. २० वेग. २१ मोठा वेगवान.

सर्वग[1] सहस्ररूपी देव जसा देखिला गुरु-पद-रतें ॥
भीष्म तसाचि परजनें जें भगवद्दर[2] करी कुरुप-दर[3] तें॥१५॥
गरुडहि अहीस न तसा न कारिकुळाला[4]हि तेंवि हरि खपवी
दुर्योधनासि जैसा दे भीष्म न हरिस तेंवि हरिखं[5] पवी॥१६॥
धर्म-कटक खांडववन, भीष्म विजय,विजय तोचि हरि गमला
शर दव[6] रक्त ज्वाला रूपक याहूनि होय बहु न मला॥१७॥
पार्थ ह्मणे श्रीकृष्णा वारावें काय यास कटकांहीं ॥
हूं हाक हाक धाक स्वजनांत उरो न यासकट कांहीं ॥१८॥
देव ह्मणे वैस वरा दृढ धर बळकट धनुष्यवल्लीला ॥
रथ भिडवितों रथासीं आजि न वरवी मनुष्यवल्लीला॥१९॥
ऐसें वदोनि हांकी अजितं[7] प्रेमलकलाजित[8] रथातें ॥
नसता दासाजित प्रभु करिता सारथ्य कां इतरथा[9] तें ॥२०॥
पडतांचि गांठि झाले समर-चमत्कार फार न वदवती ॥
लिहितां सरस्वतीच्या सरतिल शत कलशसदृश[10] नवं[11] दवती॥२१॥
छिन्न प्रथम त्यागुनि जें सज्य करी नंदीज[12] तो धनु तें ॥
दुसरेंहि खंडिलें हो श्रीकृष्णशंखें[13] समस्त-योधनुतें[14] ॥ २२॥
भीष्म प्रसन्न होउनि करि बहु बीभत्सु-वर्णना[15] तुंडें[16] ॥
बा केलें तुच्छ तुवां सद्रत्नांबरं[17] सुवर्ण नातुंडें ॥ २३ ॥

---

१ सर्वव्यापी. २ श्रीकृष्णाचा शंख. ३ भीष्माचा शंख. ४ गजसमूहाला. ५ हर्ष. ६ वणवा. ७ श्रीकृष्ण. ८ भक्तिमान जनाच्या कलांनीं जिंकिलेला. ९ अन्यथा. १० घागरीसारख्या. ११ नवीन. १२ भीष्म. १३ अर्जुनानें. १४ सर्ववीरांनीं स्तविलेल्यानें. १५ अर्जुनस्तुतीला. १६ तोंडानें. १७ उत्तमरत्न व उत्तमवस्त्र.

वत्सा भला भला जय- पद नारायणसखा नरा हो रे ॥
कीर्ति-फळीं किमपि उणें करितां या रण-मखा न राहो रे २४
गर्जोनि ह्मणे वत्सा विजया वीरा भला भला बा हूं ॥
बाहूंसि तुझ्या बळ हो भलत्या वीरासि काय मी बाहूं २५॥
आणूं नकोचि चित्तीं वत्सा होइल दहांत कुत्सा हें ॥
जेंवि त्रिजगद्गुरुसीं तेंवि करीं शुद्ध युद्ध उत्साहें ॥ २६ ॥
ऐसें वदोनि हांसुनि सुनिपुण गुण तिसरियासि तो चढवी ॥
स्वमुखें सरहस्य जया राम धनुर्वेद आदरें पढवी ॥ २७ ॥
पार्थरथीं तो खर-तर- शर निज-धर्मींच दृष्टि दे वर्षे ॥
मुनि पुसति त्या नगींची ती कीं बहु हीच वृष्टि देवर्षे॥२८॥
वाटे तुमचा उरविल कृष्णाचे जीव न स्थविर तात ॥
दिसले शरांत ते नग कल्पांऽबुधि-जीवनस्थ विरतात॥२९॥
शांतनव सिंह गमला पळतां नर-रथहि तो पळ ससाच ॥
ससख प्रभुहि वसंतीं बहु फुलला होय हा पळस साच॥३०॥
जों जों हाणी खर शर तो रिपु-यवस-दव तारकोपाया ॥
तों तों लागे हळु हळु कमळाधव सदवतार कोपाया ॥३१ ॥
मृदु पार्थ, उग्र केवळ भीष्म, विजयवीर्यमत्त पाहून ॥
देव ह्मणे शैनेया याचें तप फार मत्तपाहून ॥ ३२ ॥

१ जयाचें स्थान. २ शंकराशीं. ३ गोवर्धनपर्वतावरील. ४ वृद्ध. ५ पर्वत ६ प्रलयकालच्या समुद्रोदकांतील. ७ फुललेला. ८ शत्रुरूप तृणास वणवा. ९ तारक उपाय ज्याचे, तो. १० लक्ष्मीपति. ११ सत्=साधुजन, यांकरितां अवतार ज्याचा, तो. १२ जय आणि शक्ति यांनीं मत्त. १३ हे सात्यके.

किति हा, करीं सुदर्शन　धरिं तों भीतील सर्व,कां मग या ॥
साक्षाद्विष्णुपदाहुनि　पूर्ण करिल काय सर्व काम गया॥३३॥
आइकिला दुर्योधन-　सम खळ रे यादवा, नळाला जो ॥
तापद, तो कलि तुच्छ　क्षणभा[1]नल या द्वानला लाजो ३४ ॥
सकुळा गजा बहु बरें　ह्मणवितसे हा सुरोपमें[2] दवस्थां[3] ॥
करितो कसी पहा हे　हाणुनि मर्मी सुरोपॅ[4] मदवस्था ॥ ३५ ॥
मारिन भीष्म द्रोण　प्रथम, मग वधीन मी खलशत रणीं
मूढें[5] धरिले माझ्या　हे जैसे सिंधुच्या कलश तरणीं ॥ ३६॥
गुरुपूरीं[7] जेंवि गर्जी[8]　स्वात्मापत्य[9] न तसी अजा[10] तारी ॥ ॥
मर्दुनि ससहाय खळ　स्वपदीं बसवीन मी अजातारी[11] ॥ ३७ ॥
ऐसें वदोनि केलीं　नयनें जैसीं नवीन कोकनदें[12] ॥
देवें कांपविले बहु　गर्जोनि जसे तटस्थ[13] लोक नदें ॥ ३८ ॥
जो मातृस्नेहाचा　चित्तीं स्नेहें निजें विसर घाली ॥
तो भीष्मावरी कोपे　स्वमधुहरां[14]उपर जेंवि सरघाऽ[15]ली ॥ ३९ ॥
चक्र करीं धरुनि रथा-　खालीं टाकुनि उडीस जंव धांवे ॥
वाटे या सिंहानें　सर्वहि भीष्मादि ते गज वधावे ॥ ४० ॥
भारें लवे प्रतिपदीं　भू, शेष धरूं शके न लवलीला[16] ॥

---

१ क्षणभा ( क्षणभर तेज जीचें ती वीज ) २ देवासारखा ( अर्जुन ) ३ वणव्यांतील ( गजाला ) ४ तीक्ष्ण बाण. ५ मूर्ख ( दुर्योधनानें. ) ६ हे भीष्मादिवीर. ७ महापूरांत. ८ हत्तीण. ९ आपण व आपलें अपत्य. १० बकरी. ११ धर्मराज. १२ रक्त-कमलें. १३ तीरावरील. १४ आपलें मधु हरणाऱ्यावर. १५ मधुमक्षिकापंक्ति. १६ वांकलेलीला.

भीष्माच्या मात्र मनीं तीं प्रभुची दे न भीति लव लीला४१॥
प्रभुची परम-खलासहि देत नसे ताप शोक लव लीला ॥
हें ठावें ज्यास, तशा धाकेल कशास तो कलवलीला॥ ४२
कोपे जें विश्वंभर शंभर उत्पात भूमि-कंपादी ॥
गडबडले सुर मुनि तैं अर्जुन-सन्मित्र-कार्य संपादी ॥ ४३ ॥
धांउनि यत्नें धरि परि ओढुनि ने त्याभि देव ओढकसा ॥
जाणों ह्मणे भुजबळें पाहों जरि ओढतोसि ओढ कसा॥४४॥
कर जोडुनि भीष्म ह्मणे येतां मारावयासि या हो या ॥
हा सत्य-संध केला मुक्तहि, साधूंसि गावया होया ॥४५ ॥
केला उभा सिताईवें चरणीं घालुनि मिठी पदीं दशमीं ॥
प्रभु तत्व असें कळवी कीं प्रेमबळेंचि पद-नता वश मी ४६॥
पाय धरुनि पार्थ ह्मणे सागुनि धन-काय जीपति ज्ञाते ॥
बहु जपले, तद्गुरुनीं त्यागावी काय जी प्रतिज्ञा ते ॥ ४७॥
या दासाकरवींच क्षिप्र तुह्मी या यशास करवाल ॥
नखहि नको ज्या कार्या त्या काढावा कशास करवाल ४८
सारथ्य काय थोडें हें या करवींच कार्य करवा हो ॥
न नदीज-वधीं माझ्या मूर्ध-स्पर्शींच आर्य-कर वाहो ॥ ४९॥
चक्र क्रोध त्यागुनि रश्मि धरा नीट चालवा वाजी ॥

---

१ भयाचा लेश. २ श्रीकृष्णाच्या भारानें वांकवून टाकिलेल्या पृथ्वीस. ३ ओढणाऱ्यासारखा. ४ सत्य प्रतिज्ञा ज्याची, तो. ५ अर्जुनानें. ६ द्रव्य आणि देह. ७ खड्ग. ८ मस्तकाला स्पर्श करण्याविषयीं.

बहु हेंचि बोल माझा हा न धरुनि वीट चालवावा जी॥ ५०॥
यापरि हित प्रिय पृथा- पुत्रोक्त अमान्य कां करील हरी ॥
सन्मित्रोक्ति करी जें अमृत-नदाची न तें करी लहरी ॥५१॥
परतें परम-पुरुष मग मित्र-रथीं वाजवी दरां, राहो ॥
कौरव-भट-भीति-कथन, होय सुरांतहि महा दरारा हो॥५२ ॥
कोपोनि कौरवांवरि सर्वांचा मद रणांत उतराया ॥
त्वरित महेंद्रास्त्रातें योजी हो जी महेंद्रसुत राया ॥ ५३ ॥
बहु काय वदों राया तिसऱ्या दिवसाचिया चरम-यामीं ॥
भूमितळा मांसमया देखत होतों नभा शरमया मी ॥ ५४॥
त्या अस्त्रें सप्तशत द्विपं वधिले दशसहस्त्र रथ मथिले ॥
ऐसे त्या युद्धांचे फार चमत्कार संजयें कथिले ॥ ५५ ॥

# अध्याय ५.

## चतुर्थदिनयुद्ध.

चवथे दिनीं नदीचा- सुतं पार्थ-रथस्थ विश्वघटकातें ॥
गांठी आराधाया रण-यज्ञें करुनि सिद्ध कटकातें ॥ १ ॥
तों अभिमन्यु ज्येष्ठ- श्रेष्ठांही विद्ध करि लहान पण ॥
सुर ह्मणति कां जगत्त्रय जिंकुनियां सिद्ध करिल हा न पणं२
वारी सर्वांत पुढें होऊनि तुमचा पिताचि पणतूतें ॥
जाणों ह्मणे करिसि वहु कौतुक लागेल दृष्टि पण तूतें॥ ३॥

१ शंखाला. २ कौरववीरांस भय वाटलें असें सांगणें. ३ शेवटच्या ह्म० चवथ्या प्रहरीं. ४ गज. ५ भीष्म. ६ प्रतिज्ञा.

भीष्म ह्मणे नर दावा, तोंवि ह्मणे पार्थ शांतनव दावा ॥
अन्यत्र शांत तो परि कोणीहि रणांत शांत न वदावा ॥४॥
घाली तो पार्थासीं गांठि रणीं सर्वशस्त्र-विद्धरसा[1] ॥
किति तत्सेना कंपें कंपित करि सर्व शस्त्रविद्ध[2] रसा[3] ॥ ५ ॥
विजयाधिक भीष्माचा परिहरितां सायकां कडा[4]सा तो ॥
सूक्ष्माहि रवि-करांहुनि बहुत तमा काय कांकडा खातो॥ ६॥
कितिक ह्मणति दावावी प्रळयनटाच्या[5] पुढें किति नटें भा[6] ॥
न नदीज हरिसखासम, मेरूच्च[7]हि भास्करासम न टेंभा ॥७॥
गंगेसि पृथेसि किति स्तविती जे जाणती बुध न्याया ॥
किति संत बोलिले कीं दोघींहि त्रिभुवनीं सुधन्या या ॥८॥
हें युद्ध होत असतां दितिदनुतनुजांसवें[9] जसा बलहा[10] ॥
खलें[11] हानिकर सुभद्रा- सुत करि शल्यादिकांसवें कलहा॥९॥
द्रोणात्मजादिकांसहि सौभद्र रणांगणांत आटेना ॥
वाटे नागांमध्यें[12] हरि-शिशु ज्या तिळहि धाक वाटेना॥ १०॥
सरहस्य अर्जुनासम सर्व धनुर्वेद पाठ वीरा ज्या ॥
त्यावरि दुर्योधन बल पंचविससहस्र पाठवी राजा ॥ ११ ॥
ठावेंचि बहु न देती पितृमातुलें[13]-सम-बला रिपु त्रास ॥
तदपि स्नेहें धांवे रक्षाया तो खलारि[14] पुत्रास ॥ १२ ॥

---

१ सर्व शस्त्रें जाणणाऱ्या शंकरासारखा. २ शस्त्रांनीं दिलेली. ३ पृथ्वी. ४ वेग. ५ प्रलयकालीं नाचणाऱ्या शंकरापुढें. ६ तेज. ७ मेरुपर्वताएवढा उंच. ८ मशाली इ० ९ दैत्यदानवांबरोबर. १० इन्द्र. ११ दुष्टजननाशक. १२ गजांमध्यें. १३ पिता ( अर्जुन ) व मातुल ( श्रीकृष्ण ) यांसारखें बल ज्याचें त्याला. १४ दुष्टांचा शत्रु अर्जुन.

ते वेढिले चमूंनीं जेंवि मदें केसरी गज-घटांनीं ॥
कीं पूर्वपश्चिमांऽम्बुधि शोषाया वेष्टिले बहु घटांनीं ॥ १३
धृष्टद्युम्न प्रेक्षुनि ते धांवे घेउनि स्वसेनेतें ॥
निस्तेज करी अखिल जें केलें शापुनि स्वसेनें तें ॥ १४
केलीं कृप-कृतवर्म- प्रमुख-बलें पार्षतें पराभूतें ॥
तीं त्या पाहूं न शकति जेंवि नृहरि-मंत्र-जप-परा भूतें॥ १५॥
शल्यसुत महारथ मग वधिला द्रुपदात्मजें महातेजा ॥ ॥
स्मरले सुर देवीहतँ- महिषास गदाहता पहाते ज्या ॥१६ ॥
वृद्ध ह्मणे रे संजय मज न परोत्कर्ष परिसवे, चावे॥
कर्णा अहिसा, हा हा मद्भट बहु त्यांहि परिस वेचावे॥१७॥
मत्सुत जय-वांछेला सुमत जसा कांतसंग रामेला ॥
आह्मांकडील जो भट ह्मणसी तो करुनि संगरा मेला॥१८॥
न सुचे उपाय जो जो मज्जन रण-यज्ञ-दक्ष तो खचला ॥
अन्योन्य मंदसु ह्मणती जावें,जाण्यांत लक्ष तो खचला १९
सहज स्वहित बहु घडे कृष्णा, लवहि न मला उपाय-शतें॥
जें अमृतरसा येतें येइल बा काय गा तुपा यश तें ॥ २०॥
मत्प्रत्ययासि आलें विदुर कवि भविष्य कथित होता तें ॥

---

१ गजसमूहांनीं. २ घागरींनीं. ३ बहिणीनें (द्रौपदीनें). ४ कृपाचार्य,कृतवर्मा इत्यादिकांचीं सैन्यें. ५ धृष्टद्युम्नानें.६ नारसिंहाचा मंत्र जपण्यांत तत्पर असाला. ७ देवीनें मारिलेल्या महिषासुराला. ८ गदेनें मारिलेल्या शल्यपुत्राला. ९ रणरूप स्वधर्माविषयीं तत्पर. १० माझे प्राण.

पुत्रहितार्थ करावा जो केला म्यां[१] यत्न तो तातें ॥ २१॥
संजय ह्मणे स्वकांच्या परिणामीं उक्ति बहु असारा ज्या ॥
त्यांसि न भुलतासि,तुझा कां होता घात हा असा राजा॥२२
शोकाब्धि दूर आहे निर्गता आलासि वा परिसरा या ॥
ये॰हांचि व्याकुळ कां स्व-पर-जन-क्षय-कथा परिस राया २३
पार्षत समरीं वदला शल्या धृत-पुत्र-नाशे[३] कोपाया ॥
मग ते करिते झाले अन्योन्य-प्राण-नाशकोपाया ॥ २४ ॥
होते बहु परि रक्षी सत्वर अभिमन्यु पार्षता[४] राया ॥
राम-यशोग्रंथ-शतीं क्षम जीवां जेंवि आर्ष तारा या ॥ २५ ॥
मद्रपतीसीं भिडतां अद्भुत-सामर्थ्य कंज-नाभा[७]चा ॥
करिता झाला युद्ध- प्रेक्षक-जन-चित्त रंजना भाचा॥
शल्याचे कैवारी भ्राते दुर्योधनादि दश होते ॥
त्यांवरि उठतां गमला सुबुभुक्षु व्याघ्र भीम, शश हो ते२७॥
भीमापुढें गजाऽयुत[८] केलें टाळावया स्वघाताते ॥
गमलें यूथ[९] हरिपुढें पाठविलें यूथपें[१०]चि ताता तें ॥ २८ ॥
जाय लयासि गजायुत तें ज्याचें तोहि मागध रणीं हो ॥
जो भीम गदा-भर-धर सिद्ध सुखें तो हिमांग-धरणीं[११] हो२९॥
सर्व-गजघ्न-वृकोदर- वीर-गदा-भीरु अभ्रमु[१२] रडेल॥

---

१ नुकताच. २ आसमंताद्भागाला. ३धरिला पुत्रनाशाबद्दल कोप ज्यानें तो. ४ धृष्टद्युम्नाला. ५ रामयशाचे ग्रंथ ( रामायणें )६ ऋषि ( वाल्मीकि ) प्रणीत. ७ श्रीकृष्णाचा. ८ दशसहस्र गज. ९ गजसमूह. १० गजेंद्रानें. ११ हिमालयाच्या धारणाविषयीं.१२ ऐरावताची स्त्री.

भीमावरि दिगिभ-शतहि न श्वसनावरिहि अभ्र मुरडेल ३०॥
गज दशसहस्र वधितां भीम-भुजांला नसे लवायास ॥
आग्रह करिति अशाच्या चरणीं त्वत्सुत कसे लवायास ३१॥
सर्वाहि चमू प्रेषी राजा भीम-क्षयार्थ कत्यासी ॥
तीतें मर्दूनि करी हर्षें तो रुद्रसाचि नृत्यासी ॥ ३२ ॥
घेती पार्षत सात्यकि अभिमन्यु द्रौपदेय हे पश तें ॥
भीमार्थ प्राणहि ज्यां त्याज्य कथावीं कशास हेयशतें ३३
तों सौमदत्ति सात्यकि वारिति अन्योन्य सैन्य शैवाला ॥
दे शैव वैष्णवाला कीं वैष्णव जेविं दैन्य शैवाला ॥ ३४॥
धांवे कुरुपति कीं तो कौरव त्या यादवें न मारावा ॥
त्यावरि भीम उठे हो करुनि शिवासिंहसत्तमारावा ॥ ३५ ॥
वेधी बहु बाणांहीं भीमास तसेंचि त्या विशोकास ॥
धनुसहि तों पवनें ह्मणे हूं घाल खलांतका शिशो कास ३६
भीम धनु च्छेदी तों दुर्योधन अन्य चाप सिद्ध करी ॥
वेधी मर्मीच पडे मूर्छित तो जेंवि सिंह-विद्ध करी ॥ ३७ ॥
तों झांकुनि बाणांहीं त्वत्तनया विजयसुतपुरोगम जे ॥
ते ह्मणती साधुपुढें दाविसि मरणार्थ खल-गुरो गमजे॥ ३८॥

१ शंभर दिग्गज. २ वायूवर. ३ टाकण्यास योग्य शेंकडो पदार्थ. ४ भूरिश्रवा. ५ सैन्यरूप शैवाळाला. ६ भवानीच्या सिंहोत्तमाच्यासारख्या गर्जनेला. ७ वायु. ८ हे वत्सा, भीमा. ९ अभिमन्युप्रमुख. १० गुहेमध्यें निजलेला.

इतुक्यांत भीम उठला क्षुधित गुहांसुप्त सिंहसा राया ॥
त्वत्सुत-गज-मद होतां साह्य सकल दिग्गिभमदहि साराया ३९
धाराधर जेंवि नगा झांकी सोडूनि भीम शर भावा ॥
त्या तो भी जैसा गज भीतो सिंहासि सिंह शरभा वा ४०॥
शल्यहि पळे सुयोधन- साचि समर्पूनि सर्व शर भाच्या ॥
साच्या दृष्टि-पुढें अरि न टिकेलचि जेंवि सिंह शरभाच्या ४१
सांपडले भीमाला त्वत्सुत मृग जेंवि आठ वाघाला ॥
दैवासि आठवा कीं स्वाघाला हा न आठवा घाला ॥ ४२ ॥
भीष्म ह्मणे भीम धरा ह्याचि तुह्मी सर्व वीर तरमुंडी ॥
दुर्धर योग धराया जैसी देतात धीर-तर मुंडी ॥ ४३ ॥
भीमावरि भगदत्त स्वगजा परिभूतहिमनगा ढकली ॥
मोहीं तन्मन जैसें साधूचें पूतहि मन गाढ कली ॥ ४४ ॥
तो झांकी भीमातें असमय पाथोद जेंवि तरणीतें ॥
आढ्य कुलीन-जनाचें दावी औदार्य जें वितरणीं तें ॥४५॥
भगदत्तवाह वात्यां ऐरावत-कारि-कुळींच जनन गजा ॥
सौभद्रप्रमुखांतें घन वदले पाहणार जन नग ज्या ॥ ४६ ॥
पावे कुसुमित-किंशुकें- घन-वन-पिहिताऽद्रिपाल-सादृश्य ॥
भीमाऽश्रितासि झाला मार्कंडेयास कालसा दृश्य ॥ ४७ ॥
जेंवि सुकविगण झांकुनि दृष्टि कराया सकंप शिर कांविला॥

१ गुहेमध्यें निजलेला. २ मेघ. ३ स्वपातकाला. ४ तुटून पडणें. ५ हिमालयाचा पराभव ज्यानें केला तो. ६ पवित्र. ७ मेघ. ८ दानामध्यें. ९ वाहन. १० वाहुटळ. ११ पुष्पित पळसाच्या निबिड वनानें आच्छादित अशा हिमालयाचें सादृश्य.

शिकवी मारुतिला[1] भग- दत्तें हृदयांत बाण शिरकविला[2] ४८
सिंधुजला कुंभजसा[3] जो शत्रुबळासि दक्ष साराया ॥
तो धांवला घटोत्कच दिव्य निधानस्थ-यक्षसा[4] राया॥४९॥
माया-रचितैरावत— दिङ्-नागारूढ[5] तो पलाशी[6] मन ॥
बहु कांपविता झाला तैसें न कधींहि कोपला शमन[7]॥५०॥
तैसेचि वामन-महा— पद्मांजन-नाम दिक्करि-तिलकसे[8] ॥
सांवरिहि खचर[9], ते मग भगदत्तातें न धिक्करितिल कसे॥५१॥
आपणचि आपणास व्यसनीं गोंवी सदंतकरतेजा[10] ॥
पावेल जय कसा तो पीडिति हो वीस दंतकर[11] ते जा॥५२॥
स्वगजांसहि भी तो गज मारित येतां चहूंकडुन चवघे ॥
अहि-दष्ट-भ्रांत पुरुष[12] जैसा मानी गहूं कडु न चव घे ॥५३॥
भ्रमला पळावयासहि नच तो भगदत्त-सिंधुर[13] क्षमला[14] ॥
जाणों हाहि ह्मणे हरि तूंचि दया-शक्ति-सिंधु रक्ष मला॥
जाणुनि भगदत्त-गज- व्यसनासि तयाचियाचि हाकांनीं ॥
भीष्म द्रोणासि ह्मणे आला कीं आर्त-शब्द हा कानीं॥५५॥

---

१ वायुपुत्र भीम यास. २ शिरकविलेला. ३ अगस्तिऋषि जसा. ४ द्रव्याच्या ठेव्यावर बसलेल्या यक्षासारखा. ५ कपटानें केलेला ऐरावतनामा दिग्गज, त्यावर बसलेला. ६ मांसाहारी राक्षस घटोत्कच. ७ यम. ८ वामन, महापद्म, अंजन या नांवाचे दिग्गजश्रेष्ठ, त्यांसारखे. ९ आकाशगामी देव. १० साधूंचा अंत करणारें तेज ज्याचें, तो, ११ चार दिग्गजांचे सोळा दंत व चार शुंडा मिळून वीस दंतकर. १२ सर्पानें चाविलेला व त्यामुळें भ्रम पावलेला. १३ गज. १४ समर्थ झाला.

बहुधा भिडतो ऐरा- वत-गत [1]हृत-विश्वरूप-गळें बलहा ॥
भगदत्ताचा करितो होउनि गजराज आर्त गलबल हा॥५६॥
रक्षावा प्राग्ज्योतिष[3] ऐसें बोलोनि वृद्ध तंव[4]कानें ॥
ते कांहीं गेले जों ओळखिला यातु[5]-शब्द तंव कानें ॥५७॥
वृद्ध ह्मणे गा द्रोणा अनृत न झालों करूनि पण तुंडें॥
शक्र नव्हे युद्ध तुमुल करिजेतें आमुच्याचि पणतुंडें ॥५८॥
भीमतनूज घटोत्कच राक्षस न धरील आमुची भीड ॥
कीं तात धर्म ह्मणतो वत्सा किति नित्य पुससि हूं भीड॥५९॥
सरले तीन प्रहरहि उरला अवकाश अल्प चरमा[7] या ॥
होइल घटोत्कचाची माया जसि शेष[8]-तल्प-चर-माया॥६० ॥
झालों सर्वहि सक्षत समरशतीं श्रांत-वाहन[9] भ्रमलों ॥
परतों चला स्वशिबिरा जाऊं पाहूं उद्यां, बहु श्रमलों ६१॥
ऐसा करुनि विचार द्रोणासह शीघ्र तव पिता परते ॥
कुरुकटकाला बहु-भय देती गर्जूनि सिंहसे पर[10] ते ॥ ६२ ॥

# अध्याय ६.

## पंचमदिनयुद्ध.

१ छेदिला आहे विश्वरूप ब्राह्मणाचा गळा ज्यानें तो. २इन्द्र. ३ हें देशाचें नांव आहे. परंतु येथें त्या देशाचा राजा समजावा. ४ आवेशानें. ५ राक्षसाचा शब्द. ६ तोंडानें. ७ शेवटच्या प्रहराला. ८ शेषसर्परूप शय्येवर गमन करणारा श्रीविष्णु, त्याची माया. ९ श्रमलीं वाहनें ज्यांचीं, ते. १० शत्रु.

भूप ह्मणे हित-मंत्र न  कानांत क्ष्वेडरस[1] न ओता हे ॥
ऐसें विदुर मज जसें  सांगत होता तसेंच होताहे ॥ १ ॥
हत-शेषें[2] मदपत्यें  पळतीलचि जेंवि पाडसें दूर ॥
पावेल श्रीच्याशीं  ज्येष्ठेचा[3] कोंवि पाडें सेंदूर ॥ २ ॥
असतां द्रोणहि भीष्महि  कटकें होतात कां पराभूतें ॥
केला असेल भीमें  व्यूह जसा बाळ कांपरा भूतें ॥ ३ ॥
मज सांग संजया ते  ज्या सामर्थ्यें[4] रणीं न भंगातितें ॥
करिते झाले काय सु-  मणि-मंत्रौषधि-रसज्ञ-संगाति तें ॥ ४॥
संजय ह्मणे कृतैक— श्रित-सर्व-स्वर्द्रु-शौरि-संगतिही[5] ॥
कां जी करिजेल इतर  मणिमंत्रौषधिरसज्ञसंग तिहीं ॥ ५ ॥
धर्मेंचि तरति पांडव  बुडति अधर्मेंचि सर्व कौरव हो ॥
पौरव हो सुकृतें जय  कुकृतें क्षय हा प्रसिद्ध रौरव हो॥६॥
ऐसेंचि पुसे त्वत्सुत  त्यासि वृथा श्रम तथापि ताराया ॥
सज्जनशिरोमणि तुझा  सांगे ऐसी कथा पिता राया ॥ ७ ॥
मंदर-शिखरीं सामर[6]  चतुरानन देव एकदा राहे ॥
वाहे स्वनिल[7] अकस्मात्  दिव्य-विमानासि तो नभीं पाहे ॥८॥
सर्वांच्याहि ललाटीं  ज्याचें सर्वज्ञ पाणि-कंज लिही ॥
जय जय ह्मणे उठे तो  प्रभु जोडी क्षिप्र चार अंजलिही९॥
देवहि तसेंचि करिती  परि पाहों न शकतीच तेजातें ॥
बहु विनयें विधि विनवी  होतांचि अदृश्य पुसति ते ज्यातें

---

१ विषरस. २ मारून शेष राहिलेलीं. ३ आकाबाईचा. ४ योग्यता. ५ केली आहे एकाच सर्व आश्रितांच्या कल्पवृक्षाची ह्म० श्रीकृष्णाची संगति ज्यांहीं. ६ देवासहित. ७उत्तम वायु.

विधि वदला सुर हो तें पुसतां तरि सांगतोंचि या परिसा॥
परि सावध व्हा लागो शुचिं व्हाया हृदय-लोह या परिसा॥
तें ब्रह्म पावलों ज्या सद्गुरु[१]-नाभ्यंबुजांत जनना मी॥
त्याचि प्रभुच्या पावति पुरुषार्थ समस्त सुज्ञ जन नामीं १२॥
वदलों प्रभुप्रति असें दिधला विश्वंभरा[२] भरोसा जो ॥
तो सत्य असो असुर- क्षतजें[३] विश्वंभरा[४] भरो साजो ॥१३॥
भू-भर-नाशास्तव अव- तार जगन्नायका मनावरि घे ॥
सिंधूत परहिताधिक धरुनि मनीं काय काम नाव रिघे १४॥
वदला प्रसन्न-वदनें प्रभु कीं प्रकटेन सोम-सन्तानीं ॥
बहुमानिजेल माझा सुयशोनिधि जेंवि सोम[६] संतांनीं ॥१५॥
होइन वसुदेव-तनुज मी नारायण वरीन नरतेतें ॥
स्वयशःश्रोत्यांचें मन अन्यत्र पळहि करीन न रते तें १६॥
होतिल शीघ्रचि सर्वहि सदाहित दितिसुत सदानवं[७] असून ॥
आर्ताऽवन न करिन कां प्रभु मी भुजबल सदा नव असून[८] १७
सेत्वाश्रित[९] न ह्मणेलचि कोणी कोणाहि देववा नावा ॥
विपदुत्तारक भक्तें हा एकचि वासुदेव वानावा ॥ १८ ॥
यापरि सुरांसि सांगे विधि जे गुरु आपणासि दे वर हो ॥
देवं-रहो-वृत्त[१०] असें तोचि प्रभु रेवतीष्ट-देवर[११] हो ॥ १९ ॥

---

१ सद्गुरूच्या नाभिकमळांत. २ हे विश्वपालका. ३ रक्तानें. ४ पृथ्वी. ५ चंद्रवंशांत. ६ चन्द्र. ७ दानवसहित. ८ असु-ऊनह्म० प्राणहीन. ९ सेतु-आश्रित. १० देवांचें एकांतांतील वृत्त. ११ रेवतीचा प्रिय दीर.

हें देवरहस्य मला　प्रिय ह्मणउनि जामदग्न्य आयकवी ॥
नारद मार्कंडेय　व्यासहि वदतील अनृत काय कवी ॥२०॥
कंसांतक नारायण　नर अर्जुन हे अजेय विश्वास ॥
हें तुज कथिलें शतदां　परि मद्वचनीं तुझा न विश्वास २१॥
हा श्रीकृष्ण प्रभु ज्या　पक्षीं तेथें समस्त कल्याण ॥
याचा प्रसाद होतां　सिंहीं घालील शशहि पल्याण ॥ २२॥
नरनारायण-शस्त्र-ज्वलनीं कुल इच्छितोसि वैराया ॥
दुर्योधना खरा तूं　राक्षस, न करील अन्य वैरा या ॥ २३॥
सुजनासि विभीषणता　रुचते कुजनासि तुज दशाननता ॥
अनतां जना शिवे रे　संसारीं ओखटी दशा न नता ॥२४॥
सम-सत्य-प्रिय-हित हें　गुरु-वच गणिलें खलें विषम राया ॥
केलें हिमट मुख जणों　पाजित होता बळें विष मराया२५॥
प्रावृट्-प्रिय-भेकांच्या　कां न गमे सुरभि मानसा गर गा ॥
क्षुद्र नदी जसि धरिती　तसि न धरी दुरभिमान सागरगा२६॥
कालापुढें स्वदनयें　ओगरिलें स्वकुळ ताट कळलें कीं ॥ ॥
कां बसलासि उगा जा　नृप-मंडल सर्व ताटकळलें कीं ॥२७॥
असि शयनाज्ञा होतां　जाय निजाया तुझा तनय नमुनी ॥
भीष्महि शयनीं पहुडे　जैसा मीलित सुजात नयन मुनी॥२८॥

---

१ परशुराम. २ खोगीर. ३ बिभीषणत्व ४ रावणत्व. ५ अनम्राला. ६ वाईट. ७ पावसाळा प्रिय ज्यांस त्या बेडकांना. ८ सागरास मिळणारी.

राया भीष्माला जें सुख इतरां-तें दुराप गा स्वापें ॥
आत्मस्थिति निववी जसि तसि तृष्णासि न सुरापगा स्त्वापें२९
पंचम दिवशीं रचिला मकरव्यूह त्रिमार्गगा-तनयें ॥
श्येनव्यूह सिताश्वें लोकमतें, मन्मतें तुझ्या अनयें ॥ ३० ॥
देवव्रतें महास्त्रें योजुनियां मोहितां स्वकटकातें ॥
'हूं हय पितामहावरि हांक' ह्मणे पार्थ विश्वघटकातें ॥३१॥
कुरुपति ह्मणे गुरूप्रति भीष्म तुह्मी घ्याल जरि मनावर हो
जिंकाल काल-बलहीं नाहीं कांहीं तुह्मां अनावर हो॥ ३२॥
जाणति सर्वहि तुमची छात्रीं पुत्रीं समान सुदया तें ॥
पावो प्रताप-रवि पर- मंदेहातें मथूनि उदयातें ॥ ३३ ॥
सात्यकिसमक्ष पांडव-कटक द्रोणें शरव्रजें मथिलें॥
द्रवलें जसें द्रवावें तत्काळ हुताश-तापितें कथिलें ॥ ३४ ॥
शैनेयेंहि दृष्टि पुढें येतां केला पळांत जिगाजिग जी ॥
राहेल कसी कौस्तुभ- मणिपाशीं माणिकांत झिगझिग जी
तें भीम ह्मणे भीतें अन्यें विसरुनि नया न राखावें ॥
या ब्रह्मराक्षसें परि मज-देखत तों न या नरा खावें ॥ ३६ ॥
गुरु-शिष्य खरे कोणी ह्मणती कोणीहि तें सुजन लटिके ॥
त्या गुरु-कलह-कलिपुढें श्रीभीमाचाचि तो भुज-नल टिके३७
तों भीष्म धांवला कीं हरितचि आला समस्त विप्र-भया ॥
अभिमन्यु ह्मणे कृष्णा- तनुजातें तात हो न विभ्रम या३८ ॥

---

१ निद्रेनें. २ मधुर उदकानें. ३ त्रिमार्गगा-गंगा. ४ भीष्मानें. ५ विश्व निर्माण करणाऱ्या श्रीकृष्णाला. ६ शत्रुरूप मंदेह(दैत्यविशेष.) ७ सात्यकि.

इतुक्यांत शिखंडी ये कीं पावावे परिश्रम न भाचे ॥
उल्कांऽश्रुपात कथिती,कवि शून्य ह्मणति, परि श्रम नभाचे ३९
तो भीष्मातें गांठी जैसा पाथोद पर्वतातें हो ॥
तुमच्या मानियलें तें स्त्रीचेष्टांचेंचि पर्व तातें हो ॥ ४० ॥
स्त्री-पूर्व ह्मणुनि भीष्मचि न, तया परि सर्व मानवे शस्त्री ॥
त्यजिली जाणों यतिनें धृत-मोहन-गर्व मानवेश-स्त्री ॥४१॥
केली शुकाप्त-बोधें हर्त-दर्पा रुचिर-विग्रहा रंभा ॥
तसि भीष्माप्त-द्रोणें अंबा कृत-सुचिर-विग्रहारंभा ॥ ४२ ॥
भीष्माकडे सुयोधन सकटक ये पार्षतास पळवाया ॥
धांवुनि पार्थ ह्मणे व्हा माझ्या रोपांतपांत पळवा या ४३॥
कौरवसमूह येतां चालुनियां कृष्ण-सारथि गळाला ॥
हरि-भय-दीर्ण, नभ करिल धड लावुनि कृष्णसार थिगळाला
हे भासले, करिति रण इच्छुनि सुर दैत्य दानव सुधेतें॥
कीं प्रलय-जलद देती वृष्टि करुनि शैत्य-दान वसुधेतें॥ ४५॥
भीष्म-श्वेताश्वांचा निरुपम मज वाटला तडाखा तो ॥

---

१ पतनशील तारे हेच अश्रु. २ मेघ. ३ धरिला मोहनगुणाचा गर्व जिनें ती. ४ राजस्त्री. ५ शुकाचा बोध ह्म० आत्मज्ञान, त्यानें ६ गर्वरहित. ७ सुन्दर शरीराची. ८ शिखंडीच्या रूपानें आलेली अंबा. ९ केला, फार वेळ युद्धाचा उद्योग जिनें,ती. १०शिखंडीला. ११ बाणरूप तापांत. १२ पातेरा. १३ अर्जुन. १४ सिंहभयानें भेदरलेला. १५.काळवीट.

कीं ब्रह्मगोल वाटे विशिखांहीं दाटला तद्वां खातो ॥ ४६ ॥
कुरु-बल-नलिन-वनातें भीम-गज निकार आठवी रगडी ॥
पाठविला काळानें जाणों थापटुनि पाठ वीर गडी ॥ ४७ ॥
मर्मी शर हाणुनि धनु तोडुनि भीष्मचि तया दटावी हो ॥
श्वश्रूपुढें स्नुषा, गुरु- शक्तिपुढें शक्ति, नच नटावी हो ४८
सात्यकिच्या सूतातें वसवी छेदूनि मस्तक विमानीं ॥
वांचविला भगवत्प्रिय शैनेय असें समस्त कवि मानी॥४९॥
घेऊनि रथ पळाले भीष्म-शर-त्रस्त वातसे वाजी ॥
घडली तयांसि पतिची चुकवुनि तो प्राण-घात सेवा जी ५०
गुरु-पुत्र अर्जुनावरि धांवुनि हाणी उरांत सायक सा ॥
नायक साधूंचा तो न ह्मणेल तशा रणांत हाय कसा॥५१॥
गुरुसुत गुरु-सम,परि निज-धर्म ह्मणुनि करुनि कठिन मन कांहीं
कनकांहीं पूजावा तो पूजियला व्रणार्तिजनकांहीं ॥ ५२ ॥
खंडी चापातें कीं न तया अयशःप्रदासि विप्र भजो ॥
मित्रें पदार्थ मित्रा न धरूं द्यावा करील विस्रंभ जो ॥ ५३ ॥
पुच्छच्छेदें अहिसा चापच्छेदेंकरूनि बहु खवळे ॥
तो गुरु-पदाऽभिमानें ऋषि-वर-तेजोघ्न जेविं नहुस वळे ५४॥

---

१ बाणांहीं. २ चीर,भेग. ३ अपकार. ४ व्रणेंकरून होणाऱ्या पीडेचे जनक जे बाण, त्यांनीं. ५ अपयश देणाऱ्या ( धनुष्यास). ६ तेजोहीन. ७ गुरुपुत्र गुरु होय, अशा न्यायानें प्राप्त झालेल्या गुरुपदाच्या अभिमानानें. ८ऋषिश्रेष्ठांची तेजोहानि करणारा.

सजुनि धनु दुजें, सोडी[1] विशिखांची विप्र समहिमा[1] नवती[2]॥
गमली करील पार्था सह भस्म क्षिप्र समहि[3] मानवती॥८५॥
जगदीश्वरासहि ह्मणे न कसें? हे तूंहि विशिखँ सप्तति[4] घे॥
त्रिजगद्रसनोत्थानल-[5] सम गमले ते प्रकोप-तप्त[6] तिघे॥८६॥
तो निज-गुरु-सुत ह्मणुनि न दे परिभव, दे तयास कावि टाळा
सांगे जना असें यश रक्षा बहु कोप करुनि न विटाळा ८७॥
प्रार्थुनि देवासि ह्मणे तो पार्थ अहो दयानद पिटाळा॥
यद्यपि नयेचि देऊं द्यावा या गुरु-सुता तदपि टाळा॥८८॥
द्रौणिप्रति सोडुनि तो कोंडी कौरवबलासि शर-भवनीं॥
भिडले रणांगणीं मग दुर्योधन भीम जेविं शरभ वनीं८९॥
अभिमन्यु सुयोधन-सुत लक्ष्मणँ-मुख विरथ करुनि बहु मळवी
नलवीर-भीत[8] कलिला तद्विधिसा[9] प्रबल कुप तया पळवी९०॥
भट दश सहस्र उठले जे आज्ञा-कर[10] सुयोधनाचे हो॥
त्या हरिणांसि हरि तसा मर्दुनि सात्यकि सुयोध नाचे हो९१
भूरिश्रवा तयाचे लीला-लेशें वधी दश सुत रणीं॥
तच्छक्ति तारुनि श्रित घे जैसी सागरीं यश सुतरणी९२॥

---

१ सम् अ-हिमा ह्म० अत्युष्ण. अतितीव्र. २ नव्वद.
३ पृथ्वीसह. ४ सत्तर बाण. ५ त्रिलोकीस ग्रासणाऱ्या शंकरा-
पासून उत्पन्न झालेल्या अग्नीसारखे. ६ क्रोधानें संतप्त ७
लक्ष्मणादि. ८ नळराजाला भ्यालेला. ९ नळाचे दैवासारखा. १०
आज्ञेंत वागणारे.

पुत्र घ्न-रथासीं रथ भिडवी सात्यकि पळांत आवेशें ॥
भट त्यासि निवाराया शकले न जसे रवीस आवेशें॥६३॥
हय सूत मथुनि झाले ते यदु-कुरु-वंश-नलिन-रवि पत्ती ॥
राया असीच समरीं इच्छिति शुचि नर न मलिं नर विपत्ती६४
देतील मान-धन ते पद मागें खड्ग-चर्म-पाणि कसें ॥
व्यसनीं तेज न सोडी कुलज-हृदय पावकांत माणिकसें॥६५॥
घे भीम सात्यकीस स्वरथीं कीं शत्रु-वश सुयोधन हो ॥
तैसेंचि सौमदत्तिस जोडाया शुद्ध यश सुयोधन हो ॥६६ ॥
सूतें कथिलें पंचम- दिवसींचें अतुल युद्ध रायास ॥
कविनेंहि आपणास व्यसन-निर्घि-भवांत उद्धरायास॥६७॥

## अध्याय ७.

### षष्ठदिनयुद्ध.

षष्ठ-दिनीं धर्म रची जो व्यूह, परांसि तो खग मकर ॥
होय श्रितांसि जैसा देणारा अभय तोख राम-कर ॥ १ ॥
त्या अनुसरोनि धर्म- द्वेष-दुरभिमानें-वश-कुजाततें ॥
रचिला क्रौंच व्यूह व्यर्थ महा-पाडितें तुजा तातें ॥ २ ॥
द्रोणासि भीम गांठी प्रथम रणीं भीष्म जेंवि रामास ॥
पावे जन प्रतापें त्या तदिषुग्रीष्मजें विरामास ॥ ३ ॥

---

१ कुंभारांच्या मडकीं भाजावयाच्या भट्ट्या. २ पादचारी वीर. ३ मलिन. ४ ढालतरवार हातीं ज्यांच्या, ते मानधन मागें पद कसें देतील? ५ भूरिश्रव्याला. ६ दुःखाचा केवळ सागर अशा संसारांत ७ धर्मद्वेषाच्या दुरभिमानास वश झालेल्या नीचास-दुर्योधनास. ८ ९ त्याच्या बाणरूप ग्रीष्मापासून झालेल्या तापानें.

गुरु-सूत[1]-मथन करितां बहु भीम-शरांसि मानवे शमनें[2] ॥
होतां स्वयें स्वसारथि गुरुसहि लोकेश[3]-मानवेश-मन ॥ ४ ॥
मर्दी शत्रुचमूला शौर्य-मदें बहुत मातलीला जो ॥
तो शक्रहि लाजे मग कुरु-गुरुला कां न मातली लाजो॥५॥
कां जी रडतां स्मरतें कीं विदुर-हितोक्त आयकाना तें ॥
येणार पुढें पुष्कळ आलें आतांचि काय काना तें ॥ ६ ॥
गुरुसि त्यजुनि व्यूहीं भीम त्रिपुरीं जसा हर-शर भरे ॥
भट बदले आला धृत- राष्ट्र-सुत-हरि-प्रभाहर[4] शरभ रे॥ ७॥
स्वत्सुत ह्मणति धरावा न जगेचि पिपीलिकांत अहि तरणा॥
जालीं मृगसा आला व्यूहीं हा आयतांचि अहित रणा ॥८॥
कौरव-भट-लक्ष तया जैसें सिंहासि न करिलक्ष[5] तरे ॥
भीम ह्मणे त्यासि गदा हे गगनालाचि न करिल क्षत रे॥९॥
त्यजुनि स्वरथ गदाधर वीर वृकोदर करी कदन राजा ॥
होय प्राप्त विमदपण त्या होता शक्तिचा मद नरा जा॥१० ॥
कोणाचेंहि न चाले कांहीं त्या प्रलयकाल-रुद्रसमीं॥
गणिता झालों पाहुनि तें युद्ध तदन्य सर्व उद्रसँ मी ॥ ११॥
धृष्टद्युम्न व्यूहीं साह्यार्थ शिरे ह्मणे अहा यास ॥
काय ह्मणावें करितो त्यजुनि सहायास दुःसहायास ॥ १२ ॥
दूर ध्वजासि पाहुनि ओळखुनि स्यंदनासि आटोपी ॥

१ द्रोणसारथीचें हनन. २ यम. ३ लोकेश=दिक्पाल. मानवेश=राजे. ४ धृतराष्ट्रपुत्र हेच सिंह, त्यांची प्रभा हरणारा. ५ लक्ष हत्ती. ६ ज्याला. ७ भीरस. ८ दुःसह श्रम.

तो न दिसे जो ह्मणता स्वगदेला शत्रु-सिंधु आटो पां॥१३॥
पाहुनि सूतासि रथीं गर्हिवरुनि ह्मणे अहो विशोक मला ॥
कमलाकरप्रियरहित[1] अरुण तसाचि प्रकार हा गमला॥१४॥
कोठें तो, ज्या शक्रा कांपति होउनि सुयोध-नगं[2] दीन॥
ज्यांसि ह्मणे न मुखें परि चित्तें मानी सुयोधन गदीनें[3] ॥१५॥
वदला विशोक एथें स्थापुनि मजला गदोसि धरुनि करीं ॥
शिरला कौरव-कटकीं जैसा झंझा-समीर तरु-निकरीं ॥१६॥
धृष्टद्युम्न ह्मणे 'तरि जातों स्वसख्याकडेचि कां परतूं॥
विषयीं कैसा देहीं शिरतां अयशोभयोत्थ[4] कांप रतूं"१७॥
यापरि वदोनि धांवे देखत देखत गदा-हत-गजांतें ॥
गमले ते नग, न निघे सोसुनि कुलिशोत्थं[5] दाह तग[6] ज्यांतें१८
अवलोकिला वृकोदर कुरु-कटकीं सागरांत मंदरसा ॥
सुज्ञ अधिक वीराख्या, अमृताख्या मानितात मंद रसा॥१९॥
क्षिप्र रथावरि वाहुनि बाहु निवविले सख्यास भेटोन ॥
गमला[7] शमला न मला सर्वांसहि दव दवांत पेटोन ॥ २० ॥
भ्रात्यांसि ह्मणे कुरुपति बद्ध करुनि ह्मणवितों अरिस हाय॥
झाला खळा खळ गदा नित्यदिवास्वापसा[8] परिसहाय[9] ॥२१ ॥
दुष्टा धृष्टद्युम्ना माराचि चहूंकडूनि कोंडा हो ॥

---

१ कमलवनाचा प्रिय सूर्य, तेणेंकरून रहित. २ उत्तम वीर हेच पर्वत. ३ गदाधरश्रेष्ठ. ४ अयशापासून जें भय, त्यापासून उत्पन्न झालेला. ५ वज्रोत्पन्न. ६ टिकाव. ७ रोगाला. ८ नित्य दिवसा झोंप. ९ मदत.

कण हाचि शस्त्र-शूर्पी उरला पांचाळ-संघ कोंडा हो ॥ २२ ॥
वर्षति धृष्टद्युम्नीं त्वत्सुत ह्मणवे न त्यां अघनं[१] राजा ॥
परि कंपद नच झाले जैसे यम-भट नसे अघ नरा जा ॥२३॥
मोही प्रमोहनास्त्रें पांचाळ न लावितांहि घटिकेतें ॥
पहिलें व्यसनिं धन तसें त्वन्नंदन-देह-भान न टिके तें॥ २४॥
स्वभ्रात्यांसह केवळ तो पांडुकुमार-नग-नद[२] भ्रमला ॥
तद्धृदयाहुनि गमलें साभ्रामारात्रिगगन[३] दभ्रं[४] मला ॥ २५ ॥

हाहाकार परिसुनि द्रोण, द्रुपदादि शीघ्र भंगूनी ॥
धांवे जेंवि विनविला कांतारीं करुण अंधपंगूनीं ॥ २६ ॥
विनिवारी प्रज्ञास्त्रें गुरु,शिष्य-ज्ञान-बळ-विनाशास्त्र ॥
धन काय? काय तेंही जें स्वजन-व्यसन पळविना शास्त्र॥२७
त्वत्सुत सावध होउनि धांवति पार्षत वृकोदर दमाया ॥
प्रकटिति शर-वृष्टि तसी असुर सुरांवरि जसी दरद[५] माया२८
तों धर्म ह्मणे ज्यां घ्या भीमाचा, मथुनि अरि, समाचार ॥
ते त्यांसि ह्मणति दावा शशसम हो या न हरि-समा[६] चार[७]२९
सौभद्रप्रमुखांनीं कुरु-सेना जेंवि वायुनीं तरणी ॥
कीं कामविकारांनीं कांपविली कामिनी नवी तरणी[८] ॥३०॥
कैकेयरथीं भीमा स्थापुनि तुमच्या सुतांसि सोडून ॥
धांवे धृष्टद्युम्न द्रोणावरि शर गुणासि जोडून ॥ ३१ ॥
गांठी प्राण हराया पात्यातें स्पर्श जों न करि पातें॥

---

१ नव्हत जे मेघ,ते. २ पाण्डुपुत्र हेच पर्वत, त्यांवरील नद. ३ स-अभ्र-अमाइ० मेघाच्छादित अमावास्येच्या रात्रीचें आकाश. ४ अल्प. ५ भयदायक. ६ सिंहासारख्याला. ७ चेष्टा. ८ नौका.

त्वत्सुत सांडुनि गुरुतें त्यजुनि मृग जसा मृगेंद्र करि-पातें ३२
करितां विरथ विशस्त्र त्रिदश ह्मणति कां न नागविल याला॥
न्यावाचि गुरुक्षोभें शिष्य, खगेंद्रेंहि नाग, विलयाला॥ ३३॥
त्या संकटांत त्यातें दे अभिमन्यूच एक थारा हो ॥
परिसा भीम-सुयोधन- कृत-कलह-कथाचि, हे कथा राहो ३४
गमले भ्राते खातो वाघचि वासून वदन वाघाला ॥
सर्वस्वनाश जेणें तो याहुन कोण वद नवा घाला ॥ ३५ ॥
अन्योन्य देत होते सुरसे कीं मोह कंप दानवसे ॥
त्यांत प्रीति ब्रह्म- घ्नांत जसी तिलहि संपदा न वसे॥ ३६॥
सौभद्रादि-रथांच्या न सहाति त्वत्तनूज पळ वेगा ॥
पळतां मागें लागे भीम मग पदहि तयां न पळवे गा ॥ ३७ ॥
देते झाले वीर सु- भद्रा-कृष्णा-कुमार मारा जा ॥
त्यां पाहूनि असावे ऐसे ह्मणती उमा रमा राजा ॥ ३८ ॥
वातें घनसा अर्जुन- शर-निकरें विसकटे कटक-बंध ॥
जाणों सन्मरण-महा- लाभें बहु नाचले भट-कबंध ॥ ३९ ॥
अर्जुन तुमच्या खपवी असुरांच्या जेंवि शक्र सैन्यातें ॥
त्याच्या भीष्म बला दे देवांच्या जेंवि वृत्र दैन्यातें ॥४० ॥

---

१ गजेंद्राला. २ द्रोणानें धृष्टद्युम्नाला विरथ विशस्त्र केलें असतां. ३ असे पुत्र असावे. ४ सैन्यरचना. ५ वीरांचीं धडें.

धांवे दिनावसानीं   धरुनि मनीं भीम-मथन-कामातें ॥
जो मानी[1] ह्मणतो यम-   पुर-पथ हित,साम-पथ न कामातें ४१
भीम ह्मणे ये मंदा   तुज मी मारीन भारतापसदा ॥
खल-जनकें पावावा   वाढुनि गुरु-शोक-भार-ताप सदा॥४२॥
जरि न पळसील मारिन   आतां तुज, शत्रु तूं, न भाउ, खळा
उखळा धर्मासि[2] ह्मणसि   तरि ह्मणसिल बालिशा नभा उखळा
तुज वांचवील विधिहि न   वर द्याया जरिहि तप नव रचील॥
किति लोकप शनि कवि गुरु   बुध मंगळ चंद्र तपन वरचील ॥
वपु न बहुत पोषावें   यशचि सदा खाय ज्या न कीनाश[3] ॥
बुध होउं दे प्रतिज्ञा-   नाश न अज[4] जेंवि जानकी-नाश॥४५॥
ऐसें आधीं मर्मीं   ताडी अतिताप-जनक-वचनांहीं ॥
मग इषुहीं, ज्यां न फुटे   ऐसें कोठेंहि घनं[5] कवच नाहीं॥ ४६॥
चाप च्छत्र ध्वज रथ   खंडी मारी तुरंग सूत रणीं ॥
पाहोंहि न दे पसरुनि   शर-किरण[6]-सहस्र भीम भूतरणी[7]॥४७॥
रोप शिरोनि शरीरीं   न वसति, जैसे सुविप्र कुग्रामीं ॥
उग्रा मी त्या तेजा   स्मरलों जें बाणकोटिमुग्रामीं[8] ॥ ४८॥
पळवी कृप नृपतीतें   होय जयद्रथहि आडवा राया ॥
अमतां आयु न हो कां   क्षम पळ जलधीस आड[9] वाराया ४९

१ दुराग्रही दुर्योधन. २ आणखीही. ३ काळ. ४ अजन्मा(रामचंद्र.) ५ निबीड. ६ बाण हेच सहस्त्र किरण. ७ पृथ्वीवरील सूर्य ८ कोटिमुक् ३० कोटिशः बाण सोडणाऱ्या रामाचेठायीं. ९ विहीर.

ह्मणतों बक-शत्रुपुढें झाला जयलाभ सिंधु-राजाला[1]॥
जरि कावि ह्मणते मच्चा सिंह-पुरःस्थाहि[2] सिंधुरा[3] जाला ॥५०
परते सुरासुरगणां- दर करुनि दरिद्र शांतनव सांजे॥
तेही, पावत आले व्हाया षडराति शांत नवसां जे ॥ ५१ ॥

# अध्याय ८.

## सप्तमदिनयुद्ध.

भीष्मासि ह्मणे राजा व्हावी ऐसी रणांत मदवस्था॥
झाला मला सुदुःसह हा ऐसा होय ताप न दवस्थां ॥ १ ॥
शिरला भीम व्यूहीं जेंवि अज-कुलांत लांडगा शिरतो ॥
दैवेंचि रक्षिलें मज कापित होताचि दांडगा शिर तो ॥ २॥
या तुमच्या पावाव्या दुर्बल-सेना-समान वध सेना ॥
हें झाल्या कां स्वर्गीं जोडुनि एनांसिं मानव धसेना ॥ ३ ॥
साधालचि लीलेनें कार्य तुह्मी घ्याल जरि मनावर तें ॥
आवरिलें अंतर-रिपु- बल बाह्य कसें तुह्मां अनावर तें ४॥
भीष्म ह्मणे हा वेड्या मंदेंचि रणांत आंग राखावें ॥
घ्यावें अपयश,टाकुनि यश,अमृत त्यजुनि कां गरा खावें ५॥
धर्मासि कोण जिंकिल अनुकूल तपोऽब्धि-विप्र सर्व तया ॥
हे जरि सहाय असते हांसुनि ह्मणते हरीसिं पर्वत या ॥ ६॥
या वृद्धें तुजपाशीं बा शतदा मारिल्याचि हाका या ॥

१ जयद्रथाला. २ सिंहापुढें स्थित झालेल्या. ३ गजाला. ४ देव-दैत्यांचा युद्धाविषयीं उत्साह. ५ भिकारी. ६ कामादि सहा शत्रु. ७ माझी दशा. ८ वणव्यांत सांपडलेल्यास. ९ बोकडांच्या समूहांत. १० पापाला. ११ विषाला. १२ इन्द्राला.

किंबहुना त्यजिल यथा- शक्ति भिडोनि त्वदर्थ हा काया॥७॥
बोले, ऐसे लावूं न शकें कोणीहि दोष धीरा ज्या॥
राजासि विशल्य करी देवुनि इलुसीचें[1] ओषधी राजा ॥ ८॥
सप्तम दिवसीं व्यूह त्वत्तातें मंडलाव्हें[2] नव रचिला ॥
आठविलें भवदन्ना[3] मग गुणदोषा मनांत न वरचिलां[4] ॥ ९ ॥
धर्में रचिला वज्र- व्यूह विदारावया अरि, नगांतें[5] ॥
मग तुमुळ युद्ध झालें देवा जें श्रुत तुला करिन गा तें ॥ १०॥
झालीं युद्धें शतशः सर्व-प्रेक्षक-मनोहरें सरसें ॥
होय रणांगण रक्तो- त्पल[6]-वन-चित-पद्मराग-भू-सरसें ॥ ११ ॥
करिती त्रिगर्त[7]-पति-भट शर-पटलें केतुसह रथा पिहित॥
ते यद्यपि परम अहित मानी श्रीकृष्ण-सख तथा पिहितं१२
उडवी शर-पटलासह पार्थ सुशर्म्या त्रिगर्तपातें जी[10] ॥
होय अवस्था त्याची ती अंधा रात्रिं गर्त[11]-पातें जी ॥१३॥
शर-पटलांतूनि निघे घन-पटलांतूनि अर्यमा[13] साच ॥
रिपु[14]-वाहिनींत तरतां भासे तो वीरवर्य मासाच ॥ १४ ॥
पळतां ह्मणे सुशर्म- प्रमुख नृपांला सुयोधन रहा रे ॥
कां भ्यालां? रे हारे सुरहि न केवळ सुयोध नर हारे ॥ १५ ॥
उठला धनंजयावरि भीष्म, पहा व्हा सहाय या परता ॥

१ थोडीशी. २ मंडल नांवाचा. ३ तुझ्या अन्नाला. ४ आणिकाला. ५ शत्रु-रूप पर्वताला. ६ रक्तकमलवनांनीं व्याप्त अशा माणिक्यभूमीवरील सरोवरासारखें. ७ सुशर्म्यांचे वीर. ८ आच्छादित. ९ अर्जुन. १० त्रिगर्तदेशाच्या राजाला. ११ अहो. १२ खळग्यामध्यें होणाऱ्या पतनानें. १३ सूर्य. १४ शत्रुसेनारूप नदींत.

लेशहि पलायनरता न सुख असे किमपि अन्य-पापरता १६
या दुर्योधन-वचनें धीर धरुनि परतले सकल शस्त्री ॥
न्हतीच भेटली परि त्यांला गृह सोडितां सकलश स्त्री १७
उठतां कुरुवीरांचे लागों देती जना न थाक थवे ॥
झालें युद्ध तुमुल तें आठवितां मज न ती कथा कथवे ॥१८॥
करितिल विराटकुरुगुरु- सम तरुणाहि इतर न कलहा निकरें ॥
सोडित होते शस्त्रें अन्योन्यवधार्थ सकल-हानि-करें ॥१९॥
होउनि विरथ सुतरथीं बैसुनि सात्मज विराट युद्ध करी ॥
जोडी सुत-शोक न जय भी हरिला जेंवि अप्रबुद्ध करी२०॥
विकळ करि शिखंडीतें गुरु-सुत खगपति जसा महा भुजगा॥
स्वरथीं घेउनि रक्षी त्यासि रणीं सात्यकी महाभुज गा २१॥
घाली गांठि अलंबुष राक्षस जो वीर्यमत्त मायावी ॥
कीं कीर्ति आपणा, अप-कीर्ति तया वृष्णि-सत्तमा यावी२२ ॥
चाप च्छेदी भेदी मर्मी निर्मी घडींत शत माया ॥
शैनेय ह्मणे भीतिल भगवद्दीविदासकिरण न तमा या ॥२३॥
विजयाप्तेंद्रास्त्रा तया शकल्या बहु बलवती हि न दमाया ॥
जेंवि गुहाचें रामा नमिति तयाचें दुरूनि पद माया ॥ २४॥
शरतति गमे पसरली झांकाया पापयातु पासोडी ॥
सुर ह्मणति पळों देतां कैसा हा वन्हि या तुपा सोडी॥२५॥

---

१ कलशसहित. २ थांग. ३ सपुत्र. ४ सात्यकीला. ५ सात्यकी. ६ भगवान्-रवि;दास-किरण. ७ अर्जुनापासून प्राप्त झालेल्या इन्द्रास्त्राला. ८ कार्तिकस्वामीचें. ९ स्त्रिया. १० बाणपंक्ति. ११ पातकी राक्षस.

साहेल काय वाटे जातो मर्मी शिरोनि शर भाला ॥
धाकें पळे अलंबुष जैसा भ्याला मृगारि शरभाला ॥ २६ ॥
धृष्टद्युम्नें तुमच्या विरथ करुनि नुरविलेंचि बळ लेंकीं ॥
वाहे रथीं शकुनि असि- मात्र-सहाया नृपासि कळलें कीं २७
कृतवर्माहि पळविला विरथ करुनि परम भीरु पामरसा ॥
भीमा भी कौरव-बल बहु जैसें पाप राम-नाम-रसा ॥ २८ ॥
नागी-पुत्र इरावान् सत्कीर्ति-सरस्वती-सदरविंद ॥
तेणें नृपा पळविला अनुविंद जसा तसा सदरें विंद ॥ २९॥
भगदत्तेंहि घटोत्कच विरथ करुनि संगरीं पळविला हो ॥
शक्रें प्रताप असुरां जेंवि तसा पांडवां कळविला हो ॥३०॥
पीडी भाच्यांसि रणीं दावी बहु मद्र-पाल कौशल्य ॥
मुनि वदले मामैवं पीडय पापाय बालकौ शल्य ॥ ३१ ॥
सहदेव विरथ होउनि नकुळ-रथावरि चढोनि कोपानें ॥
शल्यासि करी मूर्छित वक्ष विदारूनि तीव्र-रोपानें ॥ ३२ ॥
धर्में श्रुतायुराजा शरभें मृगराजसाचि कांपविला ॥
सत्तेजाचि आति दुःसह ऐसें ह्मणतिल न तज्ज्ञ कां पविला ३३
कृप चेकितान होउनि विरथ परस्पर धरूनियां असितें ॥

१ केवळ खड्ग सहाय ज्याला तो. २ तुच्छसा. ३ सत्कीर्ति आणि सरस्वती यांचें निवासस्थानभूत उत्तमकमळ. ४ भयग्रस्त. ५ मद्रदेशाचा राजा. ६ हे शल्य पापाय एवं बालकौ मा मा पीडय. हे शल्या नकुलसहदेवांस अशी पीडा करूं नको. येणेंकरून तुला मोठें पाप लागेल.

पडले मूर्छित उठले निज-शत्रु-मुखें करावया असितें ॥ ३४॥
वर्णिति जसें कृपाचें सामर्थ्य तसेंचि चेकितानाचें ॥
प्रेक्षक मन तद्भटता युद्धें हरि जेंवि कोकितां नाचें ॥ ३५ ॥
कृप काढिला शकुनिनें करकर्षे चेकितान लवलाहें ॥
पाहे हा त्वद्दास व्यास-पदाब्ज-द्वयास लवला हें ॥ ३६ ॥
त्वत्पुत्र विकर्ण दुजा दुर्मर्षण चित्रसेन तिसरा हे ॥
वधितां उगाचि अर्जुन- सुत भीमा करुनियां नतिस राहे ३७
पार्थ ह्मणे देवा त्वां केलें जें रक्षणा इभार्च्या तें ॥
धांवन करूनि रक्षीं भीष्मापासूनि आजि भाच्यातें ॥ ३८॥
भीष्म ग्रीष्मतरणिसा दुःसह अतरुणहि बाढ कलहातें ॥
धरितिल हय भय जरि तरि मम रथ तदभिमुख बा ढकल हातें॥
स्वप्नींहि नसे ठावी शत्रुपुढें विमुख चाल वीरा जा ॥
त्यासि अवश्य ह्मणे प्रभु रथ भीष्माभिमुख चालवी राजा४०
तेन्हां युधिष्ठिरादिक झाले सर्वहि सहाय जिष्णूस ॥
जेंवि स्वशत्रु-शमनीं शतमखमुख सुर समस्त जिष्णूसी॥ ४१
साऽनुज सुयोधन जपे वीर-वरांसह पितामहा मात्र॥
प्रावृड्-नदांत तरतां जेंवि गजा निज-हिता महामात्र ॥ ४२
ज्याचा प्रताप अहितां वज्रधराचा जसा नगां ठावा ॥ ॥
करुनि त्रिगर्त-कटक- क्षय विजयें भीष्म कां न गांठावा ४३

---

१ काळीं. २ त्याच्या वीरांचा समूह. ३ मोरांचा समूह. ४ करकर्ष नामक वीरानें. ५ तुझा दास संजय. ६ गजेंद्राच्या. ७ अत्यन्त. ८ इंद्रादि. ९ विष्णूला. १० वर्षाकालच्या नदांत. ११ महात.

क्रोधें धांवुनि जातां सद्गुण-मणि-सुखनि[1] शांतनव-दमना ॥
धर्म ह्मणे व्यालाऽश्रय[2] झालें त्या सुख-निशान्त[3] न वद मना ४४
युद्धीं शक्राऽवन जें कारिति यम वरुण मनुष्यधर्मा[4] तें ॥
दाविति भीम नकुल सह-देव धरुनि वर-धनुष्य धर्मातें ॥ ४५ ॥
करिती कलह जयद्रथ दुर्योधन पांडवां-सवें निकरें ॥
भीष्महि शिलीमुखांच्यां[5] रवें-भीषित-स-सुर-वासवें[6] निकरें ४६
यत्न न चाले लेशहि ह्मणुनि युधिष्ठिर ह्मणे शिखंडीतें ॥
वीरा तुवां करावें भीष्मीं नागीं करी शिखंडी[7] तें ॥ ४७ ॥
धर्म-प्रहित[8] शिखंडी शल्याऽग्न्यस्त्रास[9] वारुणें[10] शमवी ॥
धर्म-ध्वज-धनु खंडुनि देवव्रत[11] देव-दृष्टिला रमवी ॥ ४८ ॥
मारुति[12] जयद्रथाच्या स्वगदेनें सर्व घोटकां[13] मारी ॥
बहु उग्र गमे घेतां गरळाचा जेंवि घोट कामारी[14] ॥ ४९ ॥
पाहों न शकति डोळे त्या भीमाच्या गदेसि देवांचे ॥
त्वत्पुत्र चित्रसेन स्व-स्यंदन-रत्न[15] तीस दे वांचे ॥ ५० ॥
पळवी बंधु विकर्ण स्वरथीं वाहोनि चित्रसेनातें ॥
झाल्या चित्र-सम क्षण तेव्हां पाहोनि चित्र[16] सेना तें ॥ ५१ ॥

१ सद्गुणरूप रत्नांची उत्तम खाण. २ ज्यांत व्याल (सर्प) आहेत तें. ३ सुखाचें घर. ४ कुबेर. ५ बाणांच्या. ६ ध्वनीनें भिवविला, देवांसह इन्द्र ज्यानें अशा. ७ मयूर. ८ धर्मानें पाठविलेला. ९ शल्याच्या अग्न्यस्त्रास. १० वरुणास्त्रानें. ११ भीष्म. १२ भीम. १३ घोडयांना. १४ शंकर. १५ आपला रथ हेंच रत्न. १६ आश्चर्य.

तों धर्मावर धांवे गांगेय जसा त्रिलोचन रविवर ॥
ज्याचें सहस्रनयन न पाहे पाहेल काय नर विवर ॥ ५२ ॥
झाले धर्म-शर नदी-ज-शरांच्या साहते न वेगा ते ॥
टिकले न सुरर्षिपुढें जैसे मदवाहते नवे गाते ॥ ५३ ॥
होउनि विरथ युधिष्ठिर नकुळ-रथावरि चढे असुख पावे ॥
माद्रेयासि ह्मणे हूं द्या वृद्धाचे रणीं असु खपावे ॥ ५४ ॥
भंगी धर्माज्ञप्त-नृ- प-शत-शरांचें नदी-सुत पटळ तें ॥
हे किति न त्यास त्याचें काळासीं भिडवितां सुतप टळतें५५
तो तालफळ-निकरसा पाडी कौंतेय-भट-शिरो-निकर ॥
नुरवी अहित-बल जलधि- जल घटजाचा जसा शिरोनि कर
गांठुनि ह्मणे शिखंडी जरि असकृत् तिष्ठतिष्ठ पाहेना ॥
स्त्रीपूर्व ह्मणुनि रंभाऽ भिमुख शुक मुनींद्रसाचि राहेना५७॥
करुनि अनादर त्याचा शिरला पांचाळ-वीर- लक्षांत ॥
कक्षांत दाव-पावक किंवा श्रीराम जेंवि रक्षांत ॥ ५८ ॥
ऐसा पाहोनि परम- निरुपम संग्राम सातव्या दिवसीं ॥
झालीं महेंद्र-नयनें अहिपति-नयनेंहि ऐकतां हिंवसीं ॥५९ ॥

---

१ इन्द्र. २गर्व वाहणारे. ३ पांडववीरांचे शिरःसमूह. ४ शत्रु-रूप उदक. ५ वारंवार. ६ उभा रहा.उभा रहा. ७ तृणांत. ८ वणव्याचा अग्नि. ९ राक्षसांत. १० शीतल अशीं.

# अध्याय ९.

---

अष्टमदिनयुद्ध.

अष्टम दिवसीं राया प्रकुपित-खग-मृगवरांसम रयज्ञ ॥
कौरव-पांडव-सैनिक करिते झाले बरा समर-यज्ञ ॥ १ ॥
करिती युधिष्ठिराच्या ज्या ज्या गर्जोनि वाहिनी दाटी ॥
त्यांसि अमित-प्रताप श्रीभीष्म ग्रीष्मकाळसा आटी ॥ २ ॥
भीष्म-भय-भग्न झाले बहु भट टिकला वृकोदरचि राया ॥
व्याघ्र कसा व्याघ्रोदर चिरिल, क्षम तो वृकोदर चिराया ॥ ३
चुटकींताचि नाराचें सूत-शिर वृकोदरें उडाविलें हो ॥
तों भीष्म-यश हयांनीं स्वैरग होऊनियां बुडविलें हो ॥ ४ ॥
वधिले सप्त सुत नृपा रडवाया बहु तुझ्या सुना भवनीं ॥
होय प्रथम वृकोदर- शर दव भवदंगभवसुनाभवनीं ॥ ५
साश्रु सशोक सुयोधन ऐसें वदला पितामहापाशीं ॥
अजि शक्ति असोनि पडों देइल संतति पिता महा-पाशीं ॥ ६ ॥
मारूं दिलीं कसीं हो भीमास रणांत आठ नातुंडें ॥
काय तुह्मांसि ह्मणावें करितां नयपठनपाठना तुंडें ॥ ७ ॥

---

१. गरुड व सिंह यांसारखे. २ वेग जाणणारे. ३ सेना. ४ लोहमय बाणानें. ५ पाहिजे तसा संचार करणारे. ६ भवत्-अंग-भव ह्म० तुझे पुत्र. त्यांची सुनाभि हेंच वन त्यांत. ७ नीतीचें पठन (स्वतः अध्ययन करणें) व पाठन (दुसऱ्यास पढविणें).

हांसुनि भीष्म ह्मणे हित कथिलें पहिलेंचि आयकाना तें ॥
सांगा झालें तुमच्या तेव्हां आतांहि काय कानातें ॥ ८ ॥
सत्यप्रतिज्ञ दुर्जय तक्षकसा भीमसेन कोपन[1] हो ॥
हो कोप ईश्वराचा याचा कोणावरीहि कोप न हो ॥ ९ ॥
कोणें विनिवारावा बल-शाली भीम युष्मदंतकर[2] ॥
वा यासि तक्षकाचे गुरु ह्मणवुनि जोडितील दंत कर १०॥
होय न जातां दीपा- वरि कोणीही पतंग जय[3]-शाला ॥
वा पावला कधीं तरि हरिसीं झगडुनि मतंगज[4] यशाला ११॥
चुकलासि प्रथमचि तूं आतां होईल काय हाकांहीं ॥
आह्मांला तों नाहीं राखायाचा स्वकाय हा कांहीं ॥ १२ ॥
आतां निपटुनि[5] राज्य- स्त्री-जीवित-पुत्र-कामना सोडा ॥
जोडा स्वर्ग स्वर्गा- हूनि निपट[6] लाभ भूमिचा थोडा॥ १३॥
ऐसें सुयोधनासी वदतां गंगासुतास माराया ॥
ये धर्म-चमू भासे क्षुब्धाऽब्धीच्या उतासमा राया ॥ १४ ॥
झाली मारामारी तेव्हां आह्मांत त्यांत देवा जी ॥
पाहुनि तीस तरणिचा एकहि पाउल पुढें न दे वाजी ॥१५॥
अर्जुन-पुत्र इरावान् बहु-कुरुवीरांचिया यशासि हरी ॥
मारी शकुनि-सुतातें लीलामात्रें जसा शशासि हरी ॥ १६ ॥
त्यातें बहु मायावी नक्तंचर[7] आर्ष्यशृंगि तो खपवी ॥

---

१ अति कोपिष्ठ. २ तुमचा अन्त (नाश) करणारा. ३ जयाचें स्थान. ४ हत्ती, ५ झाडून सर्व. ६ अगदीं. ७ राक्षस.

दुर्योधनासि दे आरि- मथनें शक्रासि जेंवि तीख पवी ॥१७॥
गर्जे कुपित घटोत्कच भिववी आह्मांसि मूर्त अंतकसा ॥
त्यासीं सुयोधन भिडे सेनेचा साहवेल अंत कसा ॥ १८ ॥
मथन करुनि बहुतांचें विकळ करी फार तो पलांशन ॥
वाटे राक्षस–रूपें सर्वांवरि आजि कोपला शमन ॥ १९ ॥
तों द्रोणासह धांवे भीष्म कराया सुयोधनाऽवन हो ॥
लोकीं ह्मणेल कोण स्वामि–त्राणें सुयोध नाव न हो॥२०॥
गगनीं शिरोनि गर्जे सर्वांसहि दाखवून हात रणीं ॥
वाटे पीडितसे शर न कराया राख ऊन हा तरणी ॥ २१ ॥
धर्म ह्मणे भीमाला दूरुनि त्या आयकोन आरावा ॥
वीरा वत्स घटोत्कच तारावा शत्रुनीं न मारावा ॥ २२ ॥
सौभद्रादि सुतांसह धांवे तो भीम भूत–नायकसा ॥
सिंहत्रस्त हरिणसे कौरव ह्मणती विचार काय कसा॥२३॥
तेव्हां नृपा सुयोधन रोधी भीमा जसा उरग उरगा ॥
किंवा व्याघ्र व्याघ्रा भेदी प्रखरें शिलीमुखें उर गा ॥२४॥
अवलंबुनि ध्वजातें भीम क्षणमात्र वेदना साहे ॥
नसतां धृति प्रतिष्ठा कैंची ह्मणतात वेद नासा हे ॥ २५ ॥
या भीमाऽवस्थेतें पाहोनि घटोत्कचादि जे सुत ते ॥

१ मांसभक्षक राक्षस. २ यम. ३ दुर्योधनाचें रक्षण.
४ शब्दाला. ५ शंकरसा. ६ बाणानें. ७ नाक.

कोपावेशें झाले कल्पांतींचे समुद्रसे उतते ॥ २६ ॥
सर्वांसि द्रोण ह्मणे भूपें बहु भीमसेन कोपविला ॥
बहु यत्न यासि अरिच्या मथनीं गिरिच्या जसा नको पविला
दावील भीम विक्रम आजि रणामाजि राम-रायाचा ॥
रक्षावा स्वपतिसमयं आह्मां हा साजिरा मरायाचा ॥ २८ ॥
ऐसे सिद्ध करुनि सुत कृप शल्य जयद्रथादि वा राया ॥
गुरु होय पुढें साक्षात् दुर्योधन--काळ भीम वाराया॥२९॥
भीम गत-व्यथ होउनि धांवे तों द्रोण बाण-वृष्टि करी ॥
साहे तो तीस जलद- वृष्टीस जसा मदांध-हस्ति करी ॥ ३० ॥
भीम गुरूरीं शर-तति व्हाया वीरांत नव्य यश हाणी ॥
मूर्छित करी न होऊं दे ती तज्जीवन-व्ययें शहाणी ॥ ३१ ॥
द्रौणि सुयोधन उठले माराया आपणा असें पाहे ॥
वाहे गदा त्यजुनि रथ राहे निर्भय उभा पुढें बाहे ॥ ३२ ॥
जल जलद जसा वर्षे शस्त्रें द्रोणादि वीर सर्व तसा ॥ ॥
त्यांतें साहत होता सत्वांचा सिंधु पार्थ पर्वतसा ॥ ३३ ॥
तेव्हां फार खवळले सौभद्र द्रौपदेय हे राया ॥
समर असोचि न शकलों आह्मी त्यांतें मुहूर्त हेराया॥ ३४॥
भीम-सखें नील-नृपें जैसा शक्रें स्व-शत्रु नमुचि तसा ॥
गुरुसुत गांठुनि केला कलहहि होय प्रकार समुचितसा॥३५॥

---

१ धन्याची प्रतिज्ञा. २ दुर्योधनाचा काळ. ३ द्रोणाच्या हृदयांत. ४ नवीन. ५ त्याच्या जीवनाचा व्यय. ६ धैर्यगाम्भीर्यादि गुणांचा. ७ नमुचि नामक दैत्य.

गुरुपुत्र शरें भेदी जन्हि नील-नृपोर[1] अश्म-लक्षण[2] हो ॥
करुनि अचेतन पाडीं त्या धैर्य-निधीस कश्मलें[3] क्षण हो ३६
धांवे मार्कंडेया- प्रति जैसा काय कोपला शमन ॥
तैसा गुरु-पुत्राप्रति विकल करायासि तो पलाशी मन ॥३७॥
भस्मचि करी घटोत्कच कटकीं हाणूनियां परा शर हो ॥
गुरुपुत्र ह्मणे बहुधा या कर्में बहु सुखी पराशर हो ॥ ३८॥
दुर्जय जाणुनि योजी मोहाया गुरु-सुतास मायेतें ॥
मोहायाचें तांडव ज्या गरळाच्या उतासमा येतें ॥ ३९ ॥
द्रोण द्रौणि सुयोधन शल्य असे मुख्य जे बळामधिले ॥
ते पाहिले बलांनीं प्रत्यक्ष घटोत्कचें रणीं वधिले ॥ ४० ॥
भ्यालीं सकळेंहि बळें तडक पळालीं न राहिलीं पळ तीं ॥
नग-शिखरस्खलदुपलां- सम राया त्यांचि पाहिलीं पळतीं ४१
हाका मारित होतों मी कीं हे राक्षसी-तनय-माया ॥
न यमा या कर्मं वश व्हा,टाचें काण्ड हा अनय माया॥ ४२
भीष्महि ऐसेंचि ह्मणे परि जोडी एकही न भटपं कर ॥
आज्ञा अवश्य ह्मणतें जन्हि केवळ शून्यही नभ, टपकर॥ ४३
माझ्या भीष्माच्या ही कोणीही जन न वारणा परिसे ॥
जय-हर्षं सघटोत्कच पांडव-भट सर्व गर्जले हरिसे ॥ ४४ ॥

---

१. नीलराजाचें हृदय. २ दगडाप्रमाणें कठीण. ३ मूर्छा. ४ मांसभक्षक राक्षस. ५ पर्वताच्या शिखरांवरून पडणाऱ्या दगडांसारखी. ६ क-अण्ड ह्म० ब्रह्माण्ड. ७ वीरश्रेष्ठ.

सांगों काय परिभवें नृप भीष्माजवळ जें चरफडे तें ॥
घाटे अहिच्या[1] गेला लावुनि रद दिव्यखेचर[2] फडेतें ॥४५॥
देउनि उत्साहातें भगदत्ता शत्रुजन-यमा राया ॥
सेनापति शांतनव प्रेषी तो भीम-तनय माराया ॥ ४६ ॥
त्या भगदत्त-नृपासीं प्रथम तुमुल सुचिर समर भीम करी ॥
भंगी दशार्ण-पतिच्या प्रबलाहि गजा तदीय भीम-करी ४७
नाग मथावे त्या भग- दत्ताच्या अन्य कां न नागानें[3] ॥
व्हावेंचि जिंकुनि इतर अग हारिच्या धन्य काननागानें[3]४८॥
पाहुनि भगदत्त-शर- द्विप-मर्दित-सैन्य-दैन्य नयनांहीं ॥
धांवे घटोत्कच जया मरणापासूनि लेश भय नाहीं ॥४९॥
भगदत्तासीं भांडे शक्रासीं मेघनादसा[4] राया ॥ ॥
किंवा प्रवर्तला त्या द्वैता अद्वैतवाद साराया ॥ ५० ॥
किंबहुना भगदत्तें अत्युग्रा शक्ति सोडिली होती ॥
गगनांत उडोनि धरुनि इक्षुपरि स्पष्ट मोडिली होती ५१
तों साधु साधु ऐसें वदले सुर नर ह्मणोनि तो खवळे ॥
अहितांकडे दुखाविला दर्वीकरसा[5] धरूनि रोख वळे ॥ ५२॥
सौभद्रप्रमुखांतें ताडी मूर्छित करी विशोकास ॥
विरथ करूनि ह्मणे रे बळकट बांधीं पृथा-शिशो कास ५३
वरिचेवरि झेउनि घे गुरुच्या जो भीमसेन सुख-निगदा[6] ॥
शीघ्र रथावरुनि उडी टाकी कवळूनि शक्ति-सु-खनि गदा५४
भ्याला बहु इतुक्यांतचि येतां देखोनि कृष्णसारथितें ॥

१ गरुड. २ गजाला. ३ वनांतील वृक्ष (कल्पवृक्षानें). ४ इंद्रजितासारखा. ५ सर्पासारखा. ६ सुखोपदेशवाक्याप्रत.

न सुचे पळणें पाहुनि हरि विसराति जेंवि कृष्णसार थिंतें ५५
प्रथम इरावान्मरण भ्रात्याला भीमसेन आयकवी ॥
सुत-शोक वसिष्ठासहि दुःसह, न ह्मणेल कोण हाय कवी ५६॥
सुत-शोक-ज्वलनाची प्रथमचि हृदयासि लागली आं[1] हे ॥
पार्थ ह्मणे देवा हे गरलं-गुरु-गृहांत[3] वागली आहे ॥ ५७ ॥
गमला हित ओंगरितां[4] कांजी[5] मधु सूद नाकपाळाला[6] ॥
अर्थ तसा आला हे कां जी मधुसूदना कपाळाला ॥ ५८ ॥
धिक् क्षत्र-वृत्तितें, मज युद्ध न करितां अशक्त ह्मणतिल कीं
हाक हरी, येऊं दे अरि-दारांच्या अनित्यपण तिलकीं॥५९॥
गरुडाहुनि पार्थाचा बहुत पळवि लोकनाथ रथ राया ॥
लागे भयें कुरूंचें करुनि बल विलोकना थरथराया ॥६०॥
कृप भगदत्त सुशर्मा देवव्रत विजय-वाह[8]-वेगातें ॥
रोधिति, परि त्यांचें बल निज-रक्त-नदांत वाहवे गा तें ६१
द्रोणासह पुत्र तुझे भीमावरि धांवले मथायाला ॥
व्यूढोरस्का[9]दिक नव मेले, मन कांपतें कथायाला ॥ ६२ ॥
गुरुतें वारुनि, नेले एकैक-शरेंचि ते नव लयातें ॥
भीमसम भीम-विक्रमं[10] हा किति मानूं नको नवल यातें॥६३॥

---

१ असलेलें. २ ज्वाला. ३ विषाच्या गुरूच्या घरांत. ४ वाढितां. ५ आचारी. ६ इंद्राला. ७ क्षत्रवृत्तीनें स्वजनवध देखील हितच मानिलें पाहिजे असा अर्जुनवाक्याचा भाव. ८ घोडे. ९ व्यूढोरस्क हें धृतराष्ट्राच्या एका पुत्राचें नांव. १० भयंकर पराक्रम ज्याचा तो.

झाला अंबष्ठ विरथ अतिरथ-सौभद्र-शस्त्र-हृत-वर्मा ॥
त्यासि स्वरथीं वाहुनि पळवी अति संकटांत कृतवर्मा॥६४॥
भीष्मादिकांसि वारुनि विजय तदस्त्रांसि तत्तदस्त्रांनीं ॥
झांकी शर-पटलांनीं आढ्य जसा दुर्गतांसि वस्त्रांनीं ॥६५॥
बहु मानवले अष्टम- दिवसीं झाल्या रणासि सुर सांजे ॥
वीररसा बहु भुलले सेवित होते तदन्य सुरसां जे ॥ ६६ ॥
तात सुता सुत ताता भ्राता भ्रात्यास मित्र मित्रास॥
मारित होते राया होउनि विकरुण विखेद वित्रास ॥ ६७॥
न दिसे न कळे स्व पर ध्वांत परम गाढ वाढवी रजनी ॥
केला अवहार नृपा होय क्षत-ताप बाढ वीर-जनीं ॥ ६८ ॥

---

# अध्याय १०.

## नवमदिनयुद्ध.

राजा कर्णासि ह्मणे कृप शल्य द्रोण भीष्म हे आर्य ॥
पांडु-सुतांतें रक्षिति कैसें सिद्धीस पावतें कार्य ॥ १ ॥
सांगेल कवण मज तुज- वांचुनि या संकटीं उपाय सखा ॥
मित्र-मतिच हित करिती मायचि ह्मणती बळें सुपायस खा २॥
कर्ण ह्मणे मी करितों कार्य तुझें शक्य हें न अन्यास ॥

---

१ अतिरथ जो अभिमन्यु, त्याच्या शस्त्रानें छिन्न झालें कवच ज्याचें तो. २ गरीबाला.

परि भीष्माकरवीं त्वां करवावा आजि शस्त्रसंन्यास[1] ॥ ३ ॥
कीं त्यासि तीर्थयात्रा सांगा, वृद्धासि तीच उचिता कीं ॥
रुचि अमृतीं सांपडतां रसिकीं घ्यावी कशास रुचि ताकीं॥ ४
शस्त्रन्यास करावा भीष्में, कीं या बळांत न वसावा॥
मग कार्य-सिद्धि माझ्या-हातीं नलगेचि देव नवसावा ॥ ५ ॥
हें कर्ण-मत परमहित ऐसें आलें मनासि राजाच्या ॥
शीघ्र रथावरि बैसुनि रात्रौ शिबिरासि जाय आज्याच्या॥ ६
वंदी पितामहा कुरु- प जयंताचा पिता महादेवा ॥
सर्वज्ञा सन्मान्या वरदा किंवा पितामहा देवा ॥ ७ ॥
कर जोडुनि दुर्योधन वदला आजि भरत-कुल-तिलकराया॥
भुलल्या मागें विजय-श्रीदृष्टि पुढेंहि भुलतिल करा या ॥ ८ ॥
आह्मां या पायांचा आश्रय देवांसि जेंवि शक्राचा ॥
साक्षात्प्रताप तुमचा आश्रित शिव जेंवि विष्णु-चक्रांचा॥ ९॥
पांडव किति जिंकावे आह्मीं तुमच्या बळेंचि सुर सगळे ॥
युष्मद्यशासि लाजे विधु ज्यापासूनि अमृत सुरस गळे ॥ १०
परिजय दुर्लभ आह्मां झाले युद्धासि आठ वासर हो ॥
हें नवल मरालें[2] ह्मणे तृड्विकळ[3] शिशूंसि आठवा सर हो ११
ऐसें कां जी करितां शत्रु-वधें जोडिलें स्वयश राखा ॥
खाइल अहितांसि मना-आंतूनि ह्मणा असंशय शरा खा॥ १२॥
बहु वीर-क्षय झाला आलें आठां दिसांत न यश मला ॥
शमले मद्बंधु बहु, न एकहि माद्री-पृथा-तनय शमला ॥ १३॥

---

१ शस्त्राचा त्याग. २ हंस. ३ तृषाक्रान्त.

स्वीकृत कार्य मनावरि द्या, प्रभुजी पांडुवत्स मारा हो ॥
कीर्ति जसी रामाची लोकीं तुमचीहि तत्समा राहो ॥ १४॥
जरि माझ्या द्वेषें कीं केवळ मद्भाग्य मंद याकरितां ॥
मदरीतें रक्षितसां कीं सदयपणें तुह्मी दया करितां ॥ १५॥
तरि कर्णाला आज्ञा द्या तो त्या पांडवांसि मारील ॥
मारीलक्षं[1]हि न तदिपु- हुनि अधिक प्राणि-जात[2] सारील॥१६॥
दुर्योधनोक्त परिसुनि जिरवी शांतनव रोषवेगातें ॥
जें असहनत्व खळ-मत पळही सुजना न पोपवे गा तें ॥१७॥
भीष्म ह्मणे रे राया लागति वाग्बाण काळजाला कीं ॥
समरीं श्रम, आतांही तुज वदतां फार काळ जाला कीं १८॥
वाच्यावाच्यं[3] न जाणसि काय ह्मणावें तुला असों दे हें ॥
दिधले त्वत्कार्यार्थ स्वप्राण, कबंधसे असों देहें ॥ १९॥
पर्याप्त[4] तें निदर्शन मोहुनि सर्वांसि मोहनें अस्त्रें ॥
वस्त्रें विराट-नगरीं हिसकुनि नेलीं न हातिचीं शस्त्रें ॥ २०
पर्याप्त तें निदर्शन जगदीश्वर जेंवि नक्र मुक्त करी ॥
पळतां कर्ण, विजय सुर- नायक-बद्धा तुला विमुक्त करी २१
कोण तयांतें मारिल ज्यांचें जगदीश परम तो कवच ॥
ज्यांचें प्रभुला बहु मत जैसें वृद्धासि चरम-तोक-वच[5] ॥ २२

---

१ महामारीचा एकलक्ष. २ प्राण्यांच्या समूह. ३ बोलावें काय व न बोलावें काय हें. ४ पूर्ण. ५ शेवटच्या मुलाचें भाषण.

जरि नारदादि मुनिनीं कथिलें, तूं जाणसी परि न मोहें ॥
तरि जिंकितासि त्यांतें धरितासि मनीं मुखीं जरि नमो हें २३
हें पुरुष-वैर केलें तैसें युद्ध स्वयेंचि कर जा गा ॥
मायेच्या भावाचा[1] होता आतांचि कां न कर जागा ॥ २४ ॥
आह्मी करूं, शिखंडी वर्जुनि, पांचाळ-सोमकांतोतें[2] ॥
द्रववूं यशःशशीनें सहृदयजन-हृदय-सोमकांतातें[3] ॥ २५
पांचाळ-सोमकांतें भाजीनें प्रलय-सूर्य-सम राजा ॥
करिन तसा गातिल कवि- वर यावच्चंद्रसूर्य समरा जा २६ ॥
वधिन तयां मी कीं मज वधितिल ते काय आंग राखावें ॥
अमृत मिळालें त्यागुनि सुज्ञें दाटूनि कां गरा खावें ॥ २७ ॥
भगवदितर सकळहि जन ह्मणातिल तूं धन्य भीष्म-चापलते ॥
नीज मुखें, आहें मी तों करितिल काय करुनि चापल ते २८
श्रुत आहे आह्मां जो स्व-करें छेदी स्व-मास शिबिराजा ॥
निववूं त्वद्दृष्टि उद्यां श्रमलासि निजावयास शिबिरा जा २९
हर्षे अभयोक्त्यर्थी अधन जसा मूर्त-कल्प[4]-वल्यंकीं ॥
वंदुनि पितामहातें येउनि शिबिरीं निजे सुपर्ल्यंकीं[5] ॥ ३० ॥
प्रातःकाळींच उठे राजा राजांसि शीघ्र आणवुनी ॥
सर्व जपोनि नदी-सुत रक्षा ऐसें तयांसि जाणवुनी ॥ ३१ ॥
दुःशासनासि सांगे मज कळलें इंगितें असें आजी ॥

---

१ आईच्या बंधूचा ह्म० शकुनिमामाचा. २ सोमक-अन्तातें ३ रसिक जनांचें हृदय हाच चन्द्रकान्तमणि, त्यास. ४ प्रत्यक्ष कल्पवल्लीच्या अंकावर. ५ चांगल्या मंचकावर.

शांतनव अर्जुनासीं करिल मनांतूनि निश्चयें आजी ॥३२॥
शल्य-कृप-द्रोण-शकुनि- सह सर्व तुह्मी जपोनि सेनांनीं ॥
रक्षा करिल अरि-लय प्रलय-तरणिसा तपोनि सेनानी ३३॥
कुरु-सिंह अरि-गजांतें नेतो हाणूनि शर-नख-पवि लया ॥
परि काय उगा बसतां क्षुद्रमति शिखंडि-वृक न खपविल या३४
असि आज्ञा करुनि निघे नृप कांपे बहुत मेदिनी नव मी
आश्चर्य काय सागों विश्व-प्रलयचि गमे दिनीं नवमीं ३४॥
विजय ह्मणे ने धृष्ट- द्युम्ना भीष्मापुढें शिखंडीतें ॥
तो हो विगतोत्साह प्रेक्षुनि जैसा फणी शिखेण्डीतें ॥३६॥
रक्षीन शिखंडीतें याच्या प्राणांसि किमपि भय नाहीं ॥
जें कांहीं करिन कुतुक तें देखावें दुरून नयनांहीं ॥ ३७ ॥
आह्मांपुढें महात्मा भीष्म वृकोदर तयांपुढें चाले ॥
झाले उत्पात बहुत तेव्हां चळचळ वसुंधरा हाले ॥ ३८॥
व्यूह प्रथमचि मथिला अर्जुन-पुत्रें जसा वनदं वातें ॥
न शके तया सुयोधन- बळ वाराया जसें वन दवातें॥३९॥
कुरुपति अलंबुषाला अभिमन्यु-वधार्थ पाठवी राजा ॥
सुजना सुनीति तैशा माया बहुसाल पाठ वीरा ज्या ॥४०॥
तो मायावी राक्षस सौभद्रासीं करी महासमर ॥
त्यजुनि रथ पळुनि जातां त्यासि ह्मणति साधुही सहासमर
नरलोक हा द्विफाल्गुन ऐसें तेव्हां जनास वाटविलें॥
तें वाहिनी-शत विजय- पुत्रें ग्रीष्में तसेंचि आटविलें॥ ४२॥

---

१ युद्ध. २ मोराला. ३ मेघ. ४ वणव्याला. ५ हास्यसहित. ६ दोन आहेत अर्जुन ज्यांत तो.

कोपविला भीष्म नृपा करुनि बहुत कटक-मथन पणतुंडें ॥
वेढिति सौभद्रातें कौरव बोलोनि हनन-पण तुंडें ॥ ४३ ॥
कार्ष्णि ह्मणे वायुपुढें जरि काय टिकत असेल कोंडाया ॥
होइल दवासि तृण तरि व्हाल क्षम मज तुह्मीहि कोंडाया ४४
कुरु शस्त्रजाळ पसरिति अवकाशा न उरवी नभाच्या तें
विजयासि तेथ आणी प्रभु कीं परिभव घडो न भाच्यातें ४५
काय कथूं गांठि विजय घाली सहसा पितामहासीं तें ॥
झालें पुढें तईं बहु नग्न करुनि रणहिता महासीतें ॥ ४६ ॥
कृप भीष्म-प्रमुख-स्थित पार्थातें पंचवीस शर हाणी ॥
धरिता झाला ज्याच्या न यशाची करुनि युद्ध हर[3] हाणी ४७
पार्थप्रियकर सात्यकि तुमुल कृपासीं मुहूर्त समर करी ॥
अन्योन्य[4]-भंग-कामुक दे क्रोध मदांध जेंवि अमर-करी ॥ ४८ ॥
मामाचा कैवारी अश्वत्थामा लयासि तें ने या ॥
मर्मी खर शर हाणी न्हाणी क्षतजें[5] सचैल[6] शैनेयां[7] ॥ ४९ ॥
होते पुष्पित-किंशुक[8]- तर्वनुकृति करित ते शरीरांनीं ॥
असु[9]निरपेक्ष झगडले घटिकाभरि जेंवि केसरी रानीं ॥ ५० ॥
गुरुसुत विधूनं[10] सात्यकि- सायक-निकरहि गमे न राहूंन[11] ॥

१. युद्धोपयोगी. २ मोठ्या खड्गाला. ३ शंकर. ४ एकमेकांच्या पराभवाची इच्छा करणारे. ५ रक्तानें. ६ वस्त्रसहित. ७ सात्यकीला. ८ तरु-अनुकृति— फुललेल्या पळसाचे झाडाचें अनुकरण करणारे. ९ प्राणांची आशा न बाळगतां. १० विधु-ऊन—चंद्राहून कमी. ११ राहु-ऊन.

राहून नभींहि तदा  दिनमणिहि बहु भ्रमे नराहून ॥ ५१ ॥
तों द्रोणही ह्मणे कीं  जें पुत्रीं सुख न नंदनवनीं तें ॥
सुत सर्व-मत मुखींच्या  एकचि पोषी न नंद नवनीतें ॥५२॥
नेता अरिचा स्यंदन  नंदन-रक्षार्थ आडवा तातें ॥
ये विजय जेंवि दीपक  रक्षाया पदर आड वातातें ॥ ५३ ॥
गुरु शिष्य तेंवि करिति  प्राकृत सहजारि[1] जेंवि कलहातें ॥
तें त्वां केलें होतें  प्रेम न विधिच्याहि जें विकल हातें॥५४॥
गुरुभक्तोत्तमहि विजय  हाणित होता गुरूसि निकरानें ॥
शिष्यासि शिष्य-वत्सल  गुरुहि प्राणघ्न-बाण-निकरानें॥ ५५॥
तों धाडिला सुशर्मा  राया आला धनंजयावरि तो ॥
तेव्हां वदले सुर कीं  सकुळ शलभ हा धनंजया[2] वरितो ५६
गांठुनि करी सुशर्मा  शर-पटलें जिष्णुच्या रथा पिहित ॥
तो यद्यपि अहित गमे  विजया विजयोद्यता तथापि हित५७
भस्मचि करी धनंजय  लीलेनें तीं समस्त शर-पटलें ॥
दिसतें काळें नभ हें  धुरकटलें तेधवांचि करपटलें ॥ ५८ ॥
होय पतंगचि न करी  झटुनि हटानें विपन्न दीपातें ॥
तैसें सुशर्म-बल तें  आपणाचि बुडे-विपन्न[3]दीपातें ॥ ५९ ॥
विजय उडवितचि होता  वातास्त्रेंकरुनि जेंवि तृण सुकलें ॥
परि तें निर्गत-कटक-  व्यसन द्रोणाश्रयें नृपा चुकलें ॥६०॥

---

१ स्वभावतः शत्रु. २ अग्नीला. ३ विपत्तीच्या नदीमध्यें जें पतन, तेणेंकरून.

कुरु-गुरुनें शैलास्त्रें  नसतें वातास्त्र वारिलें जरि तें ॥
करितेंच रितें कुरु-बळ  हरितें एकाहि नुरवितें अरितें ॥ ६१॥
अस्त्रनिवारण होतां  लागावे जों अराति हरिखाया॥
शिरले त्रिगर्त-कटकीं  विजय-शर जसे गजांत हरि खाया६२
विजयातें कोंडाया  भट झटले बहु झटे सुयोधन ही ॥
मारा मरा पुढें व्हा  ह्मणत्यास ह्मणेल कां सुयोध नहीं ६३॥
भगदत्तें भीमावरि  करि-कटकें लोटिलीं बहुत राजा ॥
वचकावें प्रलय-जलद-  पटलेंहि भयंकरा बहुतरा ज्या ॥६४ ॥
केलें प्रयाण धर्मा-  प्रति भीष्में धार्तराष्ट्र-बल-सहितें॥
तेंव्हां जें वीरांचें  रूप न मिरावेंति सपुष्प पळसहि तें ॥ ६५॥
शिरला भगदत्ताच्या  करि-कटकीं भीम सिंहसा गमला ॥
तो वज्री, ते गज नग  तो तार्क्ष्यचि ते समस्त नाग मला॥६६॥
बहु गजविदारण करी  भीम जसें वासव नग-दारण गा ॥
मागों नेदि स्पृष्टां  कोणा जीवासि वर्न गदा रणगा ॥ ६७ ॥
गज-रक्त-दिग्धं शोभे  जेंवि गणाधिप विलिप्त सिंदूरें ॥
स्पष्ट फुटावें पाहुनि  त्यासि अमृत-रस-मयेंहि इंदूरें ॥ ६८
क्षत-हत-शेष द्रुतें गज  ते अभिचार-प्रयोगसे फिरले ॥
नाशिति कुरु-सेनेतें  तनुतें गद शेवटीं जसे शिरले ॥ ६९

१ पर्वतास्त्रानें. २ गरुड. ३ पर्वतांचें भेदन. ४ स्पर्शिलेल्यास. ५ उदक. ५ रणांतील वीरास. ६ भरलेला. ७ चंद्राच्या उरानें. ८ पकालेले. ९ हिंसाकर्माचे प्रयोग.

निववी कुरूंसि केलें गांगेयें युद्ध सोमकांसह जें ॥
निववील न प्रसादें कुमुदांतें शुद्ध सोम कां सहजें ॥ ७० ॥
स्पर्श शिखंडीतेंचि स्त्रीपूर्व ह्मणुनि करीन रोपानें ॥
भंगी इतरां सकळां कल्पांतीं रुद्र जेंवि कोपानें ॥ ७१ ॥
द्रुपद-विराट-वृकोदर- सौभद्र-द्रौपदेय-धर्मांचें ॥
भीष्म बल न वांचोंदे जैसा प्रारब्धभोग कर्मांचें ॥ ७२ ॥
नकुल-सहदेव-सात्यकि- धृष्टद्युम्नादि वीर दिन-दीप॥
झाले घटजमुनिपुढें न टिके घटिकार्ध थोरहि नदीप ॥ ७३॥
रक्त-नदींत सजीवहि हय गज न प्रेत वाहवी राजा ॥
त्यां तो किति वर्णावा बहु वचके श्वेतवाह वीरा जा ॥७४॥
देव ह्मणे हा शतशः क्षतजांचे पूर वाहविल यातें ॥
नेसिल घेसिल चित्तीं तरि तूंचि श्वेतवाह विलयातें ॥ ७५॥
मजसीं जे रिपु-सैनिक भीष्म-द्रोणादि युद्ध करितील ॥
गांडीव-मुक्त सायक त्यां त्यांच्या जीवितासि हरितील७६॥
सत्य करीं मत्स्य-पुरीं जें हें वदलासि संजयापाशीं॥
हित सत्य-पाश दाटुनि बुध अर्पिति शीर्ष-कंज या पाशीं७७
पार्थ ह्मणे सुज्ञानें सत्तेजें सत्य लोक-पति तरणी ॥
ऐसा कुरुगुरु वधितां ह्मणतिल मज सत्य लोक पतित रणीं
हेंही फार कठिण कीं गुरुवागनधीन[1] शांत न वदावा ॥
हो कांहीं हांका हय घडल्यासि वधीन शांतनव दावा॥७९॥
ऐकुनि असें प्रभु नदी- सूनुकडे चालवी रथा राया॥

---

१ गुरुवाक्-अन्-अधीन.

क्षम ज्यापुढें न कोणी धरुनि तसी चाल वीर थाराया ८०
भीष्म विजय-रथ झांकुनि कांपवि पुरुपा परा शरासारें ॥
अरि-दुःसह तेज गुरुसि दावी अर्जुन पराशरासारें ॥ ८१ ॥
भीष्म-शरांचें पार्थ प्रभु-साधूक्तीस पीत पटल हरी ॥
लाजवि सुधा-निधीच्या स्तुति-सूक्ति-समुद्र-पीत-पट लहरी ८२
छेदी देव-नदीच्यां दायादाच्या धनुष्य-वल्लीला ॥
तेणें हरि बहु हर्षे कीं आदरिली मनुष्यवल्लीला ॥ ८३ ॥
भीष्म प्रभु दुसरें धनु सज्ज करी जों न हालवे पातें॥
तच्छेदें सुर वाहति मग कां न तुह्मी वहाल वेपातें ॥ ८४ ॥
विच्छिन्न निमेषांतचि करितां दुसरें धनु स्वनातुंडें ॥
आशीर्वृष्टि करुनि करि हरिसा गंगाजनु स्वनां तुंडें ॥ ८५॥
गर्जोनि ह्मणे वत्सा विजया वीरा भला भला वा हूं॥
बाहूंस तुझ्या दृष्टि न लागो भलत्यासि काय मी बाहूं॥ ८६॥
ऐसें वदोनि तिसरें सज्य करुनि चाप परम करुण पण ॥
हाणी इपुमागें इपु करि विजयाचें विगर्व तरुणपण ॥ ८७ ॥
चुकवि प्रभु मंडळगति रथ फिरवी त्वरित घोटकें पिटाळी ॥

१ परा पुरुषा—पुरुषोत्तम श्रीकृष्णाला. २ बाणवृष्टीनें. ३ पराशरासारखें. ४ श्रीकृष्णाच्या उत्तम वचनास. ५ पीत असतां. ६ स्तुतिपर उत्तम भाषणाचा समुद्र जो पीतपट ह्म० पीताम्बरधारी श्रीकृष्ण. ७ गंगेच्या. ८ पुत्राच्या. ९ कंपातें. १० गंगेपासून जनु (जन्म) ज्याचें, तो. ११ गर्जनेला. १२ घोडे.

स्तवि जो छाया-ग्रह त- च्छत्रीचा भरुनि घोट कंपि टाळी८८
हययानीं परम बळ प्रकट करी प्रभु परोपरी चुकवी ॥
परि न शके टाळाया प्रारब्ध सुखासुखा जसा सुकवी ॥ ८९॥
ब्रह्म क्षतजें न्हालें तें पुष्पितपर्णवत् जना दिसलें ॥
झालें शल्यार्त मनीं यद्ध्यानें न टिकती अनादि सलें ९०॥
भीष्म ग्रीष्मतरणिसा अर्जुन हेमंत-तरणिसा गमला॥
देव ह्मणे बहु आला वृद्धाहुनि जिष्णुचाचि राग मला९१॥
हा शूर दूर ओसर ह्मणणार महाप्रभाव हा रविला ॥
हार विलासिजनेंसा येणें कैसा प्रभाव हारविला ॥ ९२ ॥
झाला धीर परि परि- म्लान सखा जाति-पुष्प-गुच्छकसा ॥
तुच्छ कसा हा प्रवर्या चिरडिल भलता अहींद्र-पुच्छ कसा॥
हा पांडवांसि भस्मचि करिल उपेक्षा करूं नये याची॥
पदरासि अकीर्ति श्रित- सुहृदनवनपथ करून येयाची ९४
आणुनि मनीं असें ज्या धन्य ह्मणति सर्व विप्र तो दास ॥
भीष्म वधाया धांवे हरि हस्तें कवळुनि प्रतोदास ॥ ९५ ॥
देव रथातें सोडुनि धांवे देवा-पगा-विलापार्थ ॥
कीं दुस्तरारि-सागरिं न बुडो कासेसि लाविला पार्थ ॥९६॥

---

१ हा एक राक्षस समुद्रांत होता. २ मारुति. ३ श्रीकृष्णरूप ब्रह्म. ४ पर्ण=पळस. ५ ज्याच्या ध्यानानें. ६ ह्मातारा. ७ आश्रित व मित्र ह्यांचें अनू-अवन (अरक्षण) हा मार्ग. ८यावयाची. ९ गंगेला शोक देण्याकरितां. १०दुस्तर अशा शत्रुरूप सागरातें.

पार्थप्रति प्रयत्नें तो बळकारुण्य-सिंधु राखाया ॥
क्रोधें गर्जत धांवे सिंह जसा मत्तसिंधुरा खाया ॥ ९७ ॥
एह्येहि देव देव श्रीकृष्ण नमोऽस्तु ते असें बोले॥
ओले गळ प्राज्य प्रेमाश्रुभरें करूनियां डोले ॥ ९८ ॥
भीष्म ह्मणे त्वद्धस्तें व्हाया समरांत शांत नवसा जो ॥
होता करीत तो हा जेंवि हरि-हतेभ शांतनव साजो ॥९९ ॥
जरि मारिशील मज गति-लाभ,तुजहि कीर्ति-लाभ गुरु-तर तो
विश्वगुरो प्राकृतही तारुनि शरणागतासि गुरु तरतो १००
तूं हरिसा हरि साची हरिणी सुर-सिंधु मीहि पाडससा ॥
पाड, ससाध्वंस हो अरि, हरिचा पावेल काय पाड ससा॥ १
ब्रह्मांड भस्म व्हावें ज्याच्या दर-रक्त-चक्षुच्या पातें ॥
तो तूं आंगें मारूं पाहसि मज दावुनि प्रतापातें ॥ २ ॥
झालों धन्य त्रिजगीं, भास पळ प्राकृतांस मारकसा ॥
त्या प्रभुनें तो केला भस्म स्वातिक्रमेच्छु मार कसा ॥ ३॥
धांवुनि धरी धनंजय मागुनि त्या माधवासि बाहूंनीं ॥
मग दृढ चरणींच मिठी घाली पहिलीच प्रीति पाहूनी ॥ ४ ॥

१ गजाला. २ एहि एहि=ये ये. ३ तुला नमस्कार असो. ४ बहु. ५मृत.६हरि-हत-इभ=सिंहानें मारिलेला गज.७फार मोठा. ८ गंगा. ९ वांसरासारखा.१०सभय.११ किंचित् आरक्त अशा नेत्राच्या. १२ शंकरानें. १३ आपला पराभव करण्यास इच्छिणारा. १४ मदन.

दूर उसळला होता कोपावेशें मुकुंद कंदुकसा ॥
राहे उभा प्रभु गमे इभसा धृतचरण भक्त अंदुकसा ॥ ५ ॥
पार्थ ह्मणे श्रीधर्मा- वरि धरितिल जे असिप्रति ज्ञाती ॥
मरतील त्यजसी कां "आयुध न धरिन" असि प्रतिज्ञा ती ॥ ६
मारिन भीष्मातें मी इतरांतेंही भवद्दयाधारें ॥
बा त्वत्प्रसाद ज्यावरि केवळ मेरुग्रहीं तया धारें ॥ ७ ॥
लोक तुज मृषा-वादी ऐसें न ह्मणोत सत्यसंध-पते ॥
मरतिल तव दृक्पातें भीष्मद्रोणादि सर्व अंधपं ते ॥ ८ ॥
कुरु-कुंजरासि गेला होता यदु-सिंह तो खरा खाया ॥
परते पर तेथूनि प्राण-प्रिय-मित्र-तोखें राखाया ॥ ९ ॥
कृष्ण स्वरथीं चढतां समर-चमत्कार मग नवा तातें ॥
दाखविला वाहों दे न शर-व्रज पूर्ण-गगनें वातातें ॥ १० ॥
भीष्म-शर-व्रज दावचि पांडव-भट-निकर तो गमे घास ॥
क्षण सोसवे न कोणा- सहि जैसा वायुवेग मेघास ॥ ११ ॥
तों पांच सात हय गज हाणुनि एकाचि सायका मारी ॥

---

१ चेंडूसारखा. २ गजसा. ३ धरिले चरण ज्यानें. ४ अर्जुन. ५ शृंखळेसारखा. ६ तुझ्या कृपेच्या आधारानें. ७ मेरूचें शिखरही. ८ नीच. ९ असत्यवादी. १० सत्यप्रतिज्ञ जनांच्या नायका. ११ अंधपालक. १२ कुरुवंशांतील कुंजर ( गज) भीष्म. १३ संतोष. १४ भरून टाकलें आकाश ज्यानें असा (बाणसमूह).

वदलीं बहु कटकें कीं कारितो कल्पांत काय कामारी[1] ॥ १२॥
कुंतीसुत माद्री-सुत कृष्णा-कृष्णानुजा-सुत[2] भ्रमले ॥
भ्रम लेखांसहि[3] पडला गतचेतनसेचि[4] सर्वही गमले ॥ १३ ॥
जेंवि महावात करी अभ्रांचा[5] नलवितां पळ विसकट ॥
त्वत्तातशर-व्रात ध्वंसुनि सर्वांसही पळवि सकट ॥ १४ ॥
भीष्मास पहायाही त्या समयीं एकही न पर परते ॥
जे मद-मत्त मतंगज हगले मदसेकहीन[6] परपर ते ॥ १५ ॥
बहु वधिले उरले जे ते केले बाहुजप[7] पराभूत ॥
पाहों शकले न जसे श्रीनरहरि-मंत्र-जप-परा भूत ॥ १६ ॥
तों मावळला दिनकर होय बहु प्राप्त साध्वस[8] मग तिहीं ॥
केला अवहार[9] परि- श्रांतांहीं लंघिताध्व[10]-सम-गतिहीं॥ १७ ॥
आह्मी गाजत वाजत गेलों शिबिरासि विजय साधूनीं ॥
स्तविला भीष्म बहु जसा ध्वस्तासुर[11]-सैन्य विजय[12] साधूनी १८

---

१शंकर. २कृष्णासुत—द्रौपदीपुत्र कृष्णानुजासुत—अभिमन्यु. ३देवांतहीं. ४ ज्याची चेतना गेलीते. ५ मेघांचा. ६मददकवृष्टीनें हीन. ७ क्षत्रियांचे अधिपति. ८ भय. ९ सैन्याचें एकीकरण. १०लंघिला मार्ग ज्यांनीं, त्यां सारखी झाली गति ज्यांची, त्यांनीं. ११ संहारिलें असुरसैन्य ज्यानें तो. १२ इन्द्र.

# अध्याय ११.

---

## दशमदिनयुद्ध.

रात्रौ राजा धर्म व्याकुळ होउनि असें ह्मणे हरिला ॥
धरिला राज्यमनोरथ म्यां मूढें न वनवास आदरिला ॥ १ ॥
मूर्खें म्यांचि बुडविले संबंधी बंधु आप्त शोकांत ॥
अयशःपात्र सुयोधन आधीं तद्बंधु मीहि लोकांत ॥ २ ॥
दे आज्ञा जाऊं दे आदरिला हा कशास्तव निकामी ॥
राज्या योग्य न केवळ तप मात्र करावया बहु निकामी ३ ॥
भीम-पराक्रम[1] भीष्म- प्रभुच्या वदनाकडे पहावेना ॥
हरिणा जसें हरिपुढें आह्मांसि तयापुढें रहावेना ॥ ४ ॥
जिंकाया शक्य यमहि शक्रहि वरुणहि कुबेरहि रणांत ॥
परि हा अशक्य आह्मी होतों खद्योत तदिषुकिरणांत[2] ॥ ५ ॥
म्यां या प्रभुसीं केला मतिदौर्बल्येंकरूनि संगर हा ॥
मांगावें होतें त्वां कीं साधूंचा धरूनि संग रहा ॥ ६ ॥
आतां तरि परमाप्ता देवा तूं स्वहित सार सांग मला ॥
शरणागतां तुझा उप- देश जसा सूर्य सारसां गमला ॥७॥
देव ह्मणे राया तूं दाटुनि धरितोसि कां विषादास ॥
म्यावा श्रीकंठाचा कीं गरुडाचा तऱ्हीं विपा दास ॥ ८ ॥
विजयी-विष्णभुज तसे भ्राते करितील काम हे भारी ॥
समरीं हरीप्रति हट सोडुनि वरितील कां महेभारी ॥ ९ ॥

---

१ भयंकर पराक्रम ज्याचा, तो. २ त्याचे बाण हेच किरण, त्यांत.

कीं या जनास ह्मण हूं कैसा करितों त्वदर्थ समर पहा॥
तो भीष्म वृत्र भासो संपादुनि सद्यशासि अमरपं हा॥१०॥
मत्संकल्प असा कीं साधुनि द्यावीच सर्व भू पार्थां॥
आह्मी प्रजा तुझ्या बा साधूं वेंचूनि सर्व भूपार्थां॥ ११ ॥
जसि अर्जुनें करावी त्वद्वशगा बा तसीच हे महि म्यां ॥
जरि साधु साह्य करितिल पावतिल तरीच बाहु हे महिम्या १२
त्वद्धित मद्धित ते जे त्वदरि मदरि तेंचि अन्यथा न मनीं॥
अन्यप्रेम न माझ्या ये शिशुच्या जेंवि अन्यथान मनीं॥ १३ ॥
संबंधी शिष्य सखा अर्जुन तूं आर्य रामसां मान्य ॥
स्वशिर त्वदर्थ कापूनि देइन हें काय काम सामान्य ॥ १४॥
विजय ह्मणेल तरि वधिन शस्त्रास्त्रें मी पितामहास रणीं ॥ ॥
होउनि सुयोधनाचा शोकार्त वरो पिता महासरणी ॥ १५ ॥
कार्याकार्य न समजे चळला तो वृद्ध काय सांगावें ॥
मणिपंजरीं शुका कीं सुज्ञें पाळोनि वायसां गावें ॥ १६ ॥
धर्म ह्मणे जगदीशा बा तुझिया साहतिल न वेगा ते ॥
त्वद्यश अनंत गातां थकले निपुणहि जुने नवे गाते ॥ १७॥
आहेसि मच्छिरावरि अवितर्थ-संकल्प तूं परस्वामी ॥
स्वधनातें पावेनचि वांछीत नसेन जरि परस्वा मी ॥ १८ ॥
तूं असतां मत्पक्षी लाविन मी धाक लोक-पाळाला ॥ ॥
भीष्माची काय कथा भंगिन मी संगरांत काळाला ॥ १९ ॥

---

१ इंद्र. २ मानूं नको. ३ बलरामसां. ४ स्वर्गमार्ग. ५ रत्नांच्या पिंजऱ्यांत. ६ सत्यसंकल्प. ७ श्रेष्ठस्वामी. ८ दुसऱ्याच्या द्रव्याला.

युद्ध न करितांचि करीं साह्य न जेंवी लया प्रतिज्ञा ती ॥
माझे जातील तुझ्या दासद्वेषें लयाप्रति ज्ञाती ॥ २० ॥
शांतनवें समय असा केला कीं करिन युद्ध कुरुपार्थ ॥
मंत्र त्वदर्थ होइल तो विजयद जेंवि धन्विगुरु पार्थ ॥ २१॥
मंत्र पुसाया आह्मी सा जण जाऊं चला उठा राया ॥
प्रार्थूं स्ववधोपाया देइल सुरतरु जसा कुठारा या ॥ २२ ॥
देव ह्मणे बहु उत्तम ने लाजे शक्र-सद्म शिबिरा ज्या ॥
पावे धर्म नदीजा पूर्वी जैसा कपोत शिबिराजा ॥ २३ ॥
सविनय विशस्त्र विकवच साच्युत पांडव पितामहा नमिती॥
त्यांहीं गुरु जिंकाया केली ती प्रणति-मिष महा-समिती २४॥
भीष्म प्रहृष्टचित्तें वार्ष्णेय स्वागतं तर्व असेंच ॥
धर्मादिकांप्रति वदे सांगा युष्मत्प्रियोद्यत असेंच ॥ २५ ॥
प्रीतिकर कार्य तुमचें दुस्करहि असो करीन सांगा तें ॥
ये धर्मचि, पुत्र स्त्री कोश रथ तुरग करी न सांगातें ॥ २६ ॥
धर्म ह्मणे द्याल अभय तरि मी अतिमंद तोक विनवीन ॥
जो संता संतानकं ह्मणता मतिमंद तो कवि नवीन ॥ २७ ॥
संत सकल शरणागत- वत्सल नाहींच अधिक शिबि कांहीं॥
एक्या सदुक्तिनें जी सुगति घडे ती न कोटि शिबिकांहीं २८॥

१ इन्द्राचें मंदिर. २ महायुद्ध. ३ हे श्रीकृष्णा. ४ सु-आगत- चांगलें येणें. ५ तुझें. ६ तुमचें प्रिय करण्यास तयार. ७ कल्पवृक्ष.

गंभीरता न मिरवू साधुजनांमाजि नाव उदधीची ॥
तुमचीच सुकविकरवीं विश्वांत सुकीर्ति गावउ दधींची२९ ॥
केला स्वधर्म ह्मणउनि समरंमखारंभ फळ न परिणामीं ॥
नव दिन तुह्मां हरीसीं रण करितों मेळवूनि हरिणा मी॥३०॥
दुस्तर चिंता होतां ती कर जोडूनि गुरुसचि वदावी॥
दावा उपाय-पथ मज शक्राला जेंवि गुरु-सचिव दावी ३१॥
न सुचे कांहींच मला स्व-वधोपाय स्वयेंचि सांगावा ॥
गावें तुह्मांसि कविनीं संतत एकचि दधीचि कां गावा॥ ३२॥
ह्मणतां तुह्मिच जपावें पार्थिव-वपुपरिस बहु यशोदेहीं ॥
सन्मतिस यशःसंग्रह सर्वस्वाधिक जसा यशोदे हा ॥ ३३॥
होय प्रजा-क्षय न बहु राज्य-जय-प्राप्ति होय आजोबा ॥
ऐसा उपाय सांगा हा शरणाऽगत जगांत साजो बा॥ ३४॥
हास्य करुनि भीष्म ह्मणे वत्सा त्वद्धृदयवृत्ति बहु सरला ॥
सर लाजो अमृताचें त्वद्धृदया ताप तव गुणें सरला ॥ ३५॥
आह्मी आहों तों तुज कैंचा जय संगराजिरांमाजी ॥
सोमिल इतर कसी दे मदिपूंची भंग राजिं रामा जी॥ ३६
करिसिल सर्वांचें जरि करिसील प्रथम मन्मथन राजा ॥
कैसे शमविल कोप- प्रभृतिन शमवेल मन्मथ नरा जा३७॥
आज्ञा तुह्मांसि दिधली निःशंक करा प्रहार पांडव हो ॥

१ हा एक ऋषि आहे. २ युद्धरूप यज्ञाला आरंभ. ३ पंचभूतात्मक शरीरापेक्षां. ४ यशोरूपी देहाला. ५ संगर-अजिर (अंगण). ६ पंक्ति. ७ श्रीपरशुरामाला.

अस्मद्वधोत्सवीं बहु पुरुहूतें-सभेंत गीत तांडव हो ॥ ३८ ॥
आणा पुढें शिखंडी ह्मणजे पावेन मी उपरमातें ॥
हाणा दूरुनि विजय- प्रमुख तुह्मी वीर त्याउपर मातें॥३९॥
दोघां कृष्णांहुनि मज तिसरा न त्रिभुवनांत जन हंता॥
मानील सत्य हें तो ज्ञाता ज्याच्या मनांत अनहंता॥ ४०॥
येतांचि पुढें पाहुनि मी त्या स्त्रीपूर्वका मनुष्यातें ॥
सहसा समरोत्साहा- सह सांडिन साशुंगा धनुष्यातें ॥४१ ॥
शस्त्र त्यजिल्यावरिही बाणांहीं अर्जुनेंचि हाणावें ॥
तरिच विकळ होइन मी हें माझें वचन सत्य जाणावें॥४२॥
वत्सा विजया सोडुनि शंका करिसिल मदीय वचना कीं ॥
कचें नाकीं सुप्ताच्या तेविं न हो हो जगाचि कचें नाकीं४३॥
धर्मा कर जोडुनि जरि पुससी निज-विजय-हेतुसदुपाया ॥
तरि हा ऐसा आहे वा नाहीं विदित्त काय यदुपा या ॥ ४४ ॥
मूर्त सदुपाय सकळां पुरुषार्थांचा मुकुंद हा जिकडे ॥
तिकडे जय, तुज देतिल मेरूचे पाय-वाट आजि कडे ॥४५॥
श्री-भूति-जय-नयांतें ज्याची सर्वत्र गुण-कथा पिकवी ॥
तो हा भगवान् सारथि करितां चिंता तुह्मी तथापि कवी४६
जा स्वस्थ निजा प्रातः काळींच उद्यां करा जसें कथिलें ॥
कृष्णाश्रितें करावी चिंता न जसी रमाश्रितें कथिलें॥ ४७॥

---

१ इन्द्र. २ त्यानन्तर. ३ बाणासहित. ४ केश. ५ गुरुपुत्र.

जय-चिंता कां करितो देवा कौंतेय बा दयालो हा ॥
धन्य करिल तव-चरण स्पर्श-मणि-रजोग्रपाद या लोहा ४८
नमुनि कुळगुरुसि सानुज साच्युत शिबिरासि धर्म ये राया॥
त्या तैशांच्याचि कथा ऐशा घडतील काय येरा या ॥४९॥
प्रातःकाळीं होउनि सिद्ध करुनियां पुढें शिखंडीतें ॥
धर्म निघे भीष्माचें रक्षक कुरु-कटक जें विखंडी तें ॥ ५० ॥
बहु भाग्य शिखंडीचें मोठ्याच्याही मदासि जें विरवी ॥
कीं दों पार्श्वीं दोघे भीमार्जुन चक्रपाळ जेंवि रवी ॥ ५१॥
करुनि पुढें भीष्मातें कौरव आले सशक्र लोकपसे ॥
वीर-रसें सुर डोळे भरिति जळें जेंवि तृषित लोक पसे ५२॥
कौरव-भट दंश मशक विजय धनुर्वल्लि काय ती चवरी ॥
हरिस हरिजनांसहि लघु- पण वरितां कीर्ति आयतीच वरी५३
भीष्मा मदाया अरि विट जेंवि सतीकुचा मरायास॥
झटति तदायास जसा गरुडींच पृदाकु-चामराऽयास॥ ५४॥
भीष्म-हत लक्ष गमले जेवि लय-गलित गतासु रवि पत्ती ॥
स्मरली सुरांसि तेव्हां अमृतार्थ्यच्युतहतासुरविपत्ती ॥ ५५॥
वधिले सारोह अयुत हय गजहि तुझ्या महा-कथें बानें ॥
बहु कडकडे पर-शरें जैसा अति तैल-पाक थेंबानें ॥ ५६ ॥

१ विध्वंसी. २ वनमक्षिका. ३ सर्परूप चवरीचा श्रम. ४ प्रलयकाळीं गळालेले. ५ अमृत इच्छिणाऱ्या, विष्णूनें मारिलेल्या दैत्यांची विपत्ति. ६ स्वारांसहित. ७ महा कथा ज्याची तो. ८ भीष्मानें.

विजयें भीमेंहि बहुत रिपु मर्दुनि करुनि भग्न पृतनेला ॥
भीष्मापुढें शिखंडी साधुपुढें जेंवि हत-सुकृत[1] नेला ॥ ५७ ॥
तो तीन बाण हाणी भीष्म ह्मणे. त्वां यथेष्ट हाणावें ॥
आह्मी स्त्रीपूर्वावरि शर सोडूंनाच सत्य जाणावें ॥ ५८ ॥
कोपुनि ह्मणे शिखंडी यद्यपि तूं क्षत्र-घातका रामा॥
दुर्जय, तथापि मारिन तुज याचक-पारिजातकारामा[2] ५९ ॥
योद्धा वक्ता दाता ब्रह्मण्य[3] शरण्य अजित तूं हरिसा ॥
परि सावध हो मारिन तुजला मी वृद्ध हरिस युव-हरिसा६०
दशशतभुजार्जुनाचें रामें त्याचें तुवां तुझें आजी ॥
सर्व यश हराया मी आलों तुजसीं करावया आजी ॥ ६१ ॥
भीष्म नव्हे तो शुक कीं ज्याचे विषयांसि मुखें-सुरव[4] धूती॥
न शिखंडी आलीसे सेवाया विषय-सुख सुर-वधू ती ॥ ६२॥
पार्थ शिखंडीस ह्मणे हूं शांतनवावरि प्रहार करीं ॥
आहे सिद्ध वराया विजयश्री तुज धरूनि हार करीं ॥६३॥
हें धर्म-कार्य सद्यश व्हाया सत्य-प्रतिज्ञ साधुनि ये ॥
मी वारितों परांला सुकृती न कवण गतिज्ञ साधु निघे ॥ ६४॥
हें ऐकुनि तो धाया मत्तोरण[5] जेविं मृगवरा टकर ॥
कीं जाय तो कराया निधिपतिसीं[6] द्यूत-पण वराट-कर[7]६५
धृष्टद्युम्न-विराट- द्रुपद-नकुळ-ससुत-जिष्णु-सहदेव॥

---

१ ज्याचें पुण्य नष्ट झालें, तो. २ याचकांच्या कल्पवृक्षवना. ३ ब्राह्मणभक्त. ४ मुखांतील सुन्दर ध्वनि. ५ उन्मत्त बोकड. ६ कुबेराशीं. ७ कवडी हातीं ज्याच्या, तो.

हे धांवले नदीजा-　वारि बळिवरि जेंवि विष्णु-सह देव ॥६६॥
वारी धृष्टद्युम्ना　कृतवर्मा, सौमदत्ति भीमातें ॥
नकुळा विकर्ण, कृप सह-　देवा तें होय फार भी मातें॥६७॥
जो कांबोज सुदक्षिण　तो सौभद्रासि यश न दे वारी ॥
सात्यकिला दुर्योधन　जैसा प्लवगेश्वरासि देवारी[1] ॥ ६८ ॥
वारी अश्वत्थामा　द्रुपद-विराटामति मतापानें ॥
धर्मासि द्रोण, जसा　वारावा चपळ बाळ बापानें ॥ ६९ ॥
हें बहु किति वर्णावें　अत्यद्भुत एक सांगतों परिसा॥
विजयाला दुःशासन　वारी शरभा सुदुर्जया हरिसा॥ ७०॥
मोही युद्ध सुरांच्या　न तसें सिंधूत्थ तें विष मना मी ॥
सम भीष्म भीम ह्मणतों　केवळ कविला दिसो विषम नामीं७१
मुनि वदले कां ऐसा　सोडूनि ह्मणेल इतर वरिन रसा ॥
सत्य धनंजय कर्में　रूपें दिसतो उगाचि वरि नरसा ॥ ७२ ॥
युद्धीं भीष्म ह्मणे रे　धर्मा होइल दहांत कुत्सा हें ॥
भय न धरूनि वत्सा मज　कथितोपायेंचि[3] मार उत्साहें॥७३ ॥
बहु वीर-क्षय घडला　तेणें बहु जीविताभि मन विटलें ॥
मेलों रणांत ह्मणजे　तुमचें याचेंहि सर्व ऋण फिटलें ॥ ७४॥
यापरि आज्ञा जाणुनि　धृष्टद्युम्नें समस्त-कटकांतें ॥
कथिलें उठा असें जें मान्य न करितिल यशोर्थि-भट कां तें ७५
त्यांसीं करिती गुरु-कृप-　नृपभगदत्तादि नर-वरा जन्यें[4] ॥
सुर-मुनिस रुचों देती　निजवीणेचाहि न रव राजन्य ॥७६ ॥

---

१ हुत्रोवाला. २ कुम्भकर्ण. ३ सांगीतल्या उपायानें. ४ युद्ध

भीष्म ग्लहसा त्याचे तुमचेही द्यूतकारसे भट ते ॥
हरणार्थ रक्षणार्थ त्यजुनि तदितरार्थ जाहले झटते ॥ ७७॥
विजय गमे काळचि कीं कोणांतहि बळ न तो टिकों दे हो ॥
गगनीं प्रलय-घनघटा तैसी तद्विशिख-कोटि कोंदे हो॥७८ ॥
मर्मी बाण शिखंडी हाणी परि शांतनव गडबडेना ॥
जैसा ह्मणे विवेकी बडबडतो दुष्ट कां बडबडेना ॥ ७९ ॥
साहे जेंवि समर्थहि साधु प्रारब्धकर्म-भोगातें ॥
सत्व असें नसतें तरि धन्य ह्मणुनि त्यासि कोण हो गातें८०
टिकले विजय शिखंडी कीं शांतनवापुढें भट-कबंध॥
विसकटलं विजयपुरो- वर्ति भुजगपाशसे कटक-बंध ॥ ८१॥
वधिलें धनंजयानें भीष्में त्याहूनि कटक बहुत रणीं ॥
दुष्प्रेक्ष्य जसा गमला भीष्म ग्रीष्मज तसा न बहु तरणी८२
चित्तीं भीष्म ह्मणे मी स्वच्छंद-मरण असें गुरु-वरानें ॥
मन्निधनेच्छा धरिली परि या श्रीविष्णुनें गुरुवरानें ॥८३ ॥
त्यांहि दिला धर्माला वर बरवा वीर-मानवा सव हा ॥
या समयीं सोडावें वपु मद्विजयें ह्मणो न वासव हा ॥ ८४
व्योमीं ऋषि वसु वदले अस्मदभिप्राय हाचि शांतनवा ॥
यावरि समर पुरे हो शांत, जुना शांत तूं न शांत नवा८५॥
आज्ञा अवश्य ऐसें त्यांसि ह्मणे भीष्म मान्य तो करि तें ॥
कळलें मला मुनिवरें कां सुरभीचें पडे न तोक रितें ॥ ८६ ॥

---

१ द्यूतांतील पणासारखा. २ इच्छेस येईल तेव्हां मरणारा.
३ जगद्गुरूनें. ४ यज्ञ.

ह्मणतां अवश्य भीष्मा पळ न दिसों पुष्प-वृष्टि दे वाहे ॥
हिम मंद सुगंध पवन झाली बहु धन्य दृष्टि देवा हे ॥ ८७॥
जो देणारा विष्टपं- बाह्य विषयवांस विप्रतापातें ॥
होय स्वयेंचि तो तव तात विषय वांसवि-प्रतापातें ॥ ८८ ॥
जिंकावया न शकला त्रिभुवनजित् तरिहि मार वीरा ज्या ॥
गांगेय आपणा त्या विजयाकरवींच मारवी राजा ॥ ८९ ॥
पांडव-वीरांत शिरुनि घे तदिषुदवें स्वतनुस भाजून ॥
प्रकटुनि साधूंत जसा घेतो अत्र्यात्मजनु सभाजून ॥ ९० ॥
जाणो गुरुला वाहुनि शर उजविति साप्तधर्म-भीम-कर ॥
त्यांच्या शस्त्र-समूहीं भीष्म जसा सागरीं न भी मकर॥९१॥
लीलेनें युद्ध करी तन्हि दुर्जय भीष्म त्यांस शंकरसा ॥
ज्यासि पतनीं अगड् कासि तरि मी स्पर्शूं ह्मणे सशंक रसा९२
भीष्म शिखंडि-शरांहीं मर्मांत शिरोनिही न कांपविला ॥
किति ते हरिजन-वर तो करिता न शिरोनि हीन कां पविला९३
हांसुनि पितामहाला हाणी दशदा पळांत विजय शतें ॥
मानी प्रसन्नचित्त त्वत्तात्त महाप्रताप निज यश तें ॥ ९४॥
आपणही शस्त्रास्त्रें योजी जाणों निरोप दे हातें ॥
जों जों कृष्णसख करी व्याकुळ हाणोनि रोप देहातें॥९५॥
ज्या ज्यातें सज्य करी छेदी त्या त्याहि अतनु-चापातें ॥
द्रोणादिकांसि तेणें बहु होतें दुःख न तनुचा पातें ॥ ९६ ॥

१ जगत्. २ देशांत वसति. ३ अर्जुनाच्या प्रतापाला. ४ श्रीदत्तात्रेय. ५ पूजून. ६ मोठ्या धनुष्याला.

निःसंशय खंडाया प्रभु सज्य करुनि धनुष्य दे हातें ॥
हें काय नवल दाटुनि खंडवि धरिल्या मनुष्य-देहातें ॥९७ ॥
सर्वहि शरीर खिळिलें गिळिलें विजयाशुगें वराजगरें ॥
भ्रमला न प्रभु कांहीं पक्षीश्वर जेंवि भुजगराज-गरें॥ ९८ ॥
गमलें शरीर शारदसंध्यांशुच्छुरित जेंवि अभ्र मला ॥
भ्रमता सहस्रनयनहि परि धैर्य-जलधि नदीज न भ्रमला९९ ॥
नित्य नवाचि कथेला दिधला बहु मान साधुनीं ज्याच्या ॥
विजय शरांहीं ताडुनि सुख दे बहु मानसा धुनीजाच्या१००
दुःशासन मात्र जवळि उरला होता तया तुजा तातें ॥
सप्रेम कळविलें बा बहु वर्णुनि त्या पृथासुजातातें ॥ १ ॥
वत्सा पहा पहा रे विजयाशुग-निकर कार्य-हानिकर ॥
स्त्रीपूर्वें आह्मांवरि हरि हरि करिजेल काय हा निकर ॥२ ॥
यासि रणीं जिंकाया शक्त नव्हे वज्रधराहि अमरांत ॥
मातेंहि देव दानव राक्षस करितिल न भग्न समरांत ॥ ३ ॥
करिति व्याकुळ आह्मां सर्वामरशत्रुफणिशिखंडीचे ॥
कुरु-कुळ-कमळे-तरणिचे पार्थाचे शर,न हे शिखंडीचे ॥ ४॥
न शिखंडीचे, भेदुनि जातील सुमेरुच्याहि शिखरा जे॥

१ अर्जुनाच्या बाणानें. २ वर—अजगरें. ३ शरदृतूंतील संध्या समयींच्या सूर्यकिरणांनीं उपलिप्त. ४श्रीभीष्माच्या. ५ अर्जुनाला. ६ अर्जुनाचा बाणसमूह. ७ देहनाशक. ८ सर्व देवांचे शत्रु—दैत्य-दानव हेच फणी (सर्प,) त्यांचा मयूर अर्जुन, याचे. ९ कुरुकुल-रूप कमलास विकासित करणारा सूर्य अर्जुन, याचे.

वज्राग्निसमस्पर्श　व्याळसम क्रूर हे विशिखराजे ॥ ५ ॥
÷कर्कटिकेसि तिचे सुत　खंडिति मत्तनुसि हे तसे बाण ॥
प्राण व्याकुळ होते　न शिखंडि-शरव्रजें खरें जाण ॥ ६ ॥
होउनि एकत्र सकळ　राजे मज विप्र-पद-नता पातें॥
सर्वास्त्रांच्या देते　कीं शूळाद्युग्रगद न तापातें ॥ ७ ॥
ऐसें वर्णुनि गंगा-　नंदन जंव्हि शक्ति राहिली थोडी॥
सोडी शक्ति, तिला तीं　बाणांहीं अर्जुन त्रिधा तोडी॥ ८ ॥
मग खड्ग चर्म घेउनि　टाकूं पाहे उडी रथावरुनी ॥
कीं टाकावें सत्वर　वपु निजरणधर्मसत्पथा वरुनी ॥ ९ ॥
अंतःखिन्न धनंजय　शतधा खंडूनि चर्म करवाल ॥
प्रभुसि ह्मणे गुरुजि पुढें　न कळे कीं काय कर्म करवाल १०॥
तों बाहु उभारुनि निज　सैन्यासि ह्मणे त्यजूनि धर्म दया ॥
धांवा मारा भीष्मा　आह्मां हा धर्म कीर्ति-शर्म-द या ॥११ ॥
वेढुनि सर्वास्त्रांहीं　हाणिति जरि एकदाचि अरि सेना ॥
भीष्म न मानी जैसा　परिसुनिहि दुरुक्ति साधु परिसेना १२॥
त्या समयीं स्वपरांची　गणिली तुमच्या न हानि कटकांहीं ॥
स्वर्गासि पावले बहु　भट परि न पितामहानिकट कांहीं॥ १३॥
भीष्मार्थ युद्ध तुंबळ　झालें, पूर्वी सुधारसार्थ कसें ॥
असुरांपरि कुरुवीरां　गमलें रणमरण तें असार्थकसें ॥ १४ ॥
पार्थ-शर-वर्ष शमवी　कुरु-कटकातें, जसें जल दवातें ॥

१ श्रेष्ठ बाण. २ प्रहारानें. ३ शूळ इ० उग्र रोग. ÷ विंचू

बहु उडविले दिगंतीं शर-निकरें गज जसे जलद वातें॥१५॥
हाहा हाहा ऐसें ह्मणतचि हत-शेष-बळ पळालें हो ॥
तों विजय-शर-विकळ कुरु-वर-वपु रविबिंबसें गळालें हो १६॥
पडतांचि भीष्म पडले रडले कुरुवीर भूप सुर सगळे ॥
जाणों तो परमातुर[1]- हस्तींचा अमृतरूप सुरस गळे ॥ १७ ॥
शराचित देहें जिंकी फळ भीष्म मनुष्य-देव पणसाचें ॥
समयीं सन्मित्र तसें भेटे तें त्यास देव-पण साचें ॥ १८ ॥
असुहृदुदासीनांचे[2] भरले भरतिल न अन्य काय गळे ॥
कांपे क्षिति जेव्हां तो रथ-रत्नावरुनि धन्य-काय गळे १९
भीष्मावरि दिव्य फुलें देवनिकर दिव्य तोय घन वर्षे ॥
वदले सुरर्षि भो भो देवव्रत साधु साधु अनवर्षे[3] ॥ २० ॥
पक्वार्कबीजसा न क्षितिस शिवे वरिच राहिला काय ॥
वाटे इषुंनीं माथां धीरगुरु[4] ह्मणोनि वाहिला काय ॥ २१ ॥
पडतां सांजे बहुधा दिनमणिनें शीघ्र रथ न हाकविला ॥
मरणानुचित समय हें कळवाया त्वत्पितामहा कविला ॥ २२
तों दक्षिणायनीं वपु न त्यागावें बुधें असें कवण॥
सांगेल या बुधवरा- प्रति ऐसें होय दिव्य-वाक्-श्रवण २३॥
उदगयन होय तोंवरि मीं शर तल्पीं असाचि राहेन ॥
वाहेन देह शंतनु- वर-सामर्थ्यें व्यथेसि साहेन ॥ २४ ॥
ऐसें उत्तर देऊनि नेत्रें झांकी जसा सुपर्यंकीं ॥

---

१ परम—आतुर. (उतावळा.) २ असुहृत् (शत्रु) आणि उदासीन यांचे. ३ अ-नव-ऋषे. ४ धैर्यगाम्भीर्यसम्पन्न जनांचा गुरु.

किंवा पूर्वी जैसा गंगेच्या शिशुपर्णी उपर्यंकीं[1] ॥ २५ ॥
त्यावरि देव-नदीनें दायादांचे[2] गुणौघ आठविले ॥
ऋषि उदगयन-मरण वर ऐसें सुचवावयासि पाठविले॥२६॥
ते हंसरूप घेउनि येउनि करुनि प्रदक्षिणा प्रणती ॥
हा दक्षिणायनीं कवि होउनि मरतो कसा असें ह्मणती२७
जाणुनि भीष्म ह्मणे या शर-तल्पीं तों करीन मी शयन ॥
भय न धरावें, झांकिन नयन तईं जैं फिरेल हें अयन॥२८॥
मज शंतनु-गंगा-गुरु गो-विप्र-वर-प्रसाद-पात्रास ॥
या त्रासमय भ्रंशें दुर्गति ऐसा धरूं नका त्रास ॥ २९॥
इतुकें वदोनि उपनिष- दर्थ विचारी सुखें शरास्तरणीं ॥
रडलों आह्मी सर्वहि होउनि धवलाश्वशरपरास्त[3] रणीं ३० ॥
भीमादि नाचले बहु जेंवि परवधें सुयोध नाचावे ॥
अस्मच्छोक किति कथूं शोकव्याळचि सुयोधना चावे ३१॥
द्रोणाला दुःशासन कथितां दे भीष्म-हानि मोहातें ॥
रडुनि ह्मणे विजयाच्या, कुरु-गुरु तैसाचि हा निमो हातें ३२
अवहार करुनि कौरव कवचें शस्त्रें सहाश्रु सोडूनी ॥
सकळ मिळाले त्वद्गुरु, शर-तल्पाजवळ[4] हात जोडूनी ॥३३॥
पांडवहि सर्व तेथें आले राया तयांसि पाहूनी ॥
भीष्म ह्मणे या हो या तन्नाम-ग्रहण-पूर्व बाहूनी ॥ ३४ ॥
माझें शिर लोंबतसे यास्तव उपधान[5] द्या मला तूर्ण ॥

१ मांडीवर. २ पुत्राचे. ३ अर्जुनाच्या बाणांनीं हाकून लाविलेले. ४ शरांच्या शय्येजवळ. ५ उशी.

इतुक्यानें या शयनीं झालें साहित्य वीर हो पूर्ण ॥३५ ॥
तें ऐकतांचि राजे उपधानें बहुत शीघ्र आणविती ॥
प्रभुजी स्वीकारावीं ऐसें जोडूनि हस्त जाणविती॥ ३६ ॥
हांसे भीष्म ह्मणे हो हीं उपधानें न युक्त या तल्पीं॥
कोण्हाही वीराचें मन उपभोगीं नसो अशा अल्पीं ॥ ३७
विजयासि ह्मणे बापा तूं तरि उपधान योग्य दे हातें ॥
रचुनि दिलें तल्प जसें वत्सा हें वीर-योग्य दे हातें ॥ ३८ ॥
ऐशी आज्ञा करितां त्या शांतनवें समस्त-योध-नुतें ॥
ठेवुनि मस्तक चरणीं सज्य करी शीघ्र सुज्ञ तो धनुतें ३९॥
अभिमंत्रुनि बाणत्रय गांडीवाच्या गुणासि तो लावी ॥
सोडी अश्रुसह नृपा ती अद्भुत शक्ति काय बोलावी ॥ ४०॥
लागोनि अधोदेशीं ते घेउनियां सुमंत्रितेषु[1] उशीं ॥
उचलुनि धरिते झाले शिर असि दिधली पितामहासि उशी४१
हर्षोनि नदीज ह्मणे दिधलें उपधान युक्त बापा हें॥
तूं या उचित-ज्ञत्वें स्वोत्कर्ष रणीं सदैव बा पाहें ॥ ४२ ॥
तुच्छ मजपुढें तो जो करुनि स्त्री-बाहुची उशी रमला ॥
चुकतां न लागता तुज पळही शापावया उशीर[2] मला॥ ४३॥
नृप हो पहा कसें हें वीरा शयनीं असेंचि ओपावें ॥
सांबा[3] समयीं यासम समयज्ञाला ह्मणोनि ओ पावें ॥ ४४॥
वपु उत्तरायणींच त्यागिन तोंवरि असाचि राहीन ॥
साहेन उष्ण शीतहि न तनुकडे,रविकडेचि पाहीन ॥ ४५ ॥

१ सु-मन्त्रित-इषु. २ उसाळी. ३ हे शंकरा.

परिखा करवा मोठी . या शरतल्पासभोंवती खोल ॥
लोल श्वापद मांसीं लागो तुमच्या न नीतिला बोल॥४६॥
सोडा वैर नृपति हो द्या हें मजला पुरे करा समर॥
किति रे तुह्मीं न पुरला स्पष्ट जरी छंद-मृत्यु हा अमर ४७॥
तों वैद्य-राज आले शिक्षित-कचसेचि पोटहि चिराया ॥
शल्याकर्षण-सुनिपुण ज्यांचे कर मूर्त चुंबकचि राया ॥४८॥
पाहुनि वैद्यांसि ह्मणे घडली हे परम सुगति नवसांनीं ॥
जाळा शरांसह मला वैद्यांचें कार्य काय अवसानीं ॥ ४९ ॥
सांगुनि सुयोधनाला त्यांतें धनमान देववी राया ॥
त्या सत्वें मानवले भूदेव नृदेव देव वीरा या ॥ ५० ॥
परिखा करवुनि सेवक ठेवुनि तद्रक्षणार्थ पद नमुनी ॥
स्वस्थाना गेले नृप तैसेचि विरक्ति-केलि-सदन मुनी॥५१॥
भगवान् धर्मासि ह्मणे नाहींच तुळा तव प्रतापा या ॥
येणें लागेल परहि लोकालोकाग-वप्र तापाया ॥ ५२ ॥
साक्षात्सूर्यचि मानित होते योद्धे रणीं पहाते जा ॥
तो भीष्म भंगिला त्वां या लोकों तूंचि बा महातेजा॥५३॥
छंद-मरण अति-दुर्जय अमरांत नसे असी महामरता ॥
भलत्या तेजें कैसा तेजाचा निधि असीम हा मरता ॥५४॥

---

१ खंदक. २ इच्छामरणी. ३ तुलना. ४ या प्रतापानें. ५ लोकालोक-अग-वप्र ह्म० सूर्यप्रकाशमर्यादा असा जो लोकालोक पर्वत. त्याचें शिखर. ६ महा-अमरता. ७ अमर्याद.

स्मर-होम श्रीरुद्रें केला त्वां भीष्म होम हा देवा ॥
योग्य सखा तूं अहितां- युर्वारिग्रीष्म हो महादेवा ॥ ५५ ॥
धर्म ह्मणे जगदीशा वर्णितिल तुझ्या कवि प्रसादास॥
केला धन्य तुवां हा रुद्रें उपमन्यु विप्रसा दास ॥ ५६ ॥
पावे तव प्रसादें स्पष्ट नसोनिहि सुयोध नर विजया ॥
तव सेवका न काळहि भयद मग कसा सुयोधन रविजें या
रक्षिसि तूंचि अभिलषित पुरवुनि शरणागता अवनतातें ॥
या तुजपुढें करावें शक्रसमेंही किती अवन तातें ॥ ५८ ॥
देतां महत्व दासा घ्या देतो तात काय तो कनका ॥
देऊं लागे प्रेमें तरि ह्मणतें त्यासि काय तोक नका॥ ५९ ॥
होउनि बहु प्रसन्न प्रभुजी देतां स्वसेवका महिम्या ॥
महि म्यां न जोडिजेल सु- कीर्तिहि पुरवूनि देवकामाहि म्यां

---

# अध्याय १२

प्रातःकाळीं कौरव पांडव गेले पितामहापाशीं ॥
दुःखित सर्वहि जैसे बाळक पडतां पिता महापाशीं ॥ १ ॥
स्त्री बाल वृद्ध झाले नति[3]-नति-पूजा-प्रदक्षिणाऽसक्त ॥
व्यक्त शिवाचे जाणों ते श्रावण-सोमवासरीं भक्त ॥२ ॥

---

१ शत्रूंच्या आयुष्यरूप उदकाला ग्रीष्म. २ कर्ण. ३ स्तुति नमस्कार इत्यादिकात आसक्त.

लोकांसि मूर्तिमान् शर- तल्पीं गमला तुझा पिता महसा ॥
राजर्षि-ब्रह्मर्षि- त्रिदशर्षि²-सभांतरीं पितामहसा³ ॥३॥
तो 'पानीयं'⁴ ऐसें वदला राया नृपांसि पाहून ॥
तों आणविती भक्ष्यें शीतल-जल-कलश शीघ्र वाहून ॥ ४॥
तें पाहुनि भीष्म ह्मणे हा पहिलासाचि काय हो गमला ॥
हा वेडे हो हा या समयीं समुचित मनुष्य-भोग मला ॥ ५ ॥
काय तुह्मांसि ह्मणावें इतरा क्षुधिता पदार्थ हा चारा ॥
साचा रामचि समरीं जो तो मद्वत्स पार्थ पाचारा ॥ ६ ॥
प्रार्थी विजय प्रभुला जेंवि विनय-भर-विनम्र-काय कपी ॥
तो, किंकरोमि,⁵ हें वा- गमृत श्रुति भरुनि भरत-नायक पी॥७॥
शर-जाळ सोडिलें त्वां भेदाया जेंवि पर्वता पवितें ॥
हें मर्मी चावुनि अहि- शतसें मद्देह सर्व तापवितें ॥ ८ ॥
बहु बाधते तृषा मज पाजाया तूंचि योग्य तोयातें ॥
घन जेंवि चातकातें दावीं स्वोदार्य⁶-भाव तो यातें ॥ ९ ॥
वंदुनि तथास्तु ह्मणुनि स्वरथीं बैसुनि गुणासि शर जोडी॥
सोडी घनास्त्र योजुनि तद्दक्षिण-पार्श्व-भूमितळ फोडी॥ १०॥
भू-रंध्रांतूनि निघे सज्जलधारा⁷ जसी बुधाधारा ॥
वदनीं शिरोनि निववी हरिलीलासीच त्या सुधाधारा॥११॥
होउनि तृप्त नृपातें भीष्म ह्मणे काय ती सुधा राहो ॥
पाजी असाचि मजला गंगास्तन आयती सुधारा हो॥ १२॥

---

१ उत्सवसा. २ देवर्षि. ३ ब्रह्मदेवासारखा. ४ पाणी. ५ मी काय करूं. ६ आपला उदारपणा. ७ सत्-जळधारा.

बापा किरीटि-कर्में कौरव ससहायें[1] कां न कांपावे ॥
कंठीरव-पाटन-पटु[2] भट पशु मर्दुनि वृकां न कां पावे ॥ १३॥
बहु विस्मित नृप मुनिसुर ह्मणती उडवूनि उत्तरीयांतें ॥
बुडतिल कौरव दुसरी कैंची भेटेल उत्तरी[3] यांतें ॥ १४ ॥
सर्वत्र शंख-दुंदुभि- घोष परम तुमुल होय सैन्यांत ॥
तत्काल विगत-गौरव कौरव गेले बुडोनि दैन्यांत ॥ १५ ॥
शांतनव ह्मणे वत्सा[4] दाखवितो जेंवि नित्य नवल हरी ॥
तत्सख तसाचि तूं ही कीं क्षीराब्धींत नित्य नव लहरी १६॥
त्वत्साराथि नारायण तूं नर पूर्वर्षि[5] नारदें कथिलें ॥
तुमच्या द्वेषें धन्यें खळ-कटकें जेंवि पारदें कथिलें ॥ १७ ॥
ज्यापरि नाक[6] तुज यशें न तयापरि मानवे शतक्रतुला ॥
जिंकिल दुग्धाब्धिसमा कैसें अरि-मानवेशें[7]-तक्र तुला॥ १८ ॥
जातींत जसा ब्राह्मण तेजांत तरणि सरांत कीं जलधी ॥
चाप-धरांत तसा तूं श्रेष्ठ न जाणे तुला कधीं मल-धी॥१९॥
हित कथिलें म्यां दुसरें द्रोणें रामें जनार्दनें परि तें ॥
मरणारा औषधसें रुचलें नाहींच या तुझ्या अरितें ॥ २० ॥
दुर्योधनासहि ह्मणे या जिष्णुपुढें पुरे करा शास्त्रें ॥
जाणतसे हा अर्जुन सकळेंहि महाद्भुतें सुरेशाऽस्त्रें[8] ॥ २१ ॥
मोठा सर्वांतहि हा होय महा-वीर पांडव न धाकटा[9] ॥

---

१ साहाय्य करणाऱ्या राजांसह. २ सिंहाचें विदारण करण्यांत कुशल. ३ उत्तम नौका. ४ हे अर्जुना. ५ पुराणमुनि. ६ इन्द्राला. ७ शत्रुरूपराजे हेंच तक्र. ८ इन्द्रास्त्रें. ९ लहान.

केली निर्माण कसी हाणुनि वसुधेंत कांडं[१] वन-धारा[२]॥ २२
ऐसें अद्भुत इच्छुनि सज्जनरक्षाचि यादवें कृष्णें ॥
हें कर्म करावें कीं या रिपु-कक्षाचियां[३] दवें कृष्णें[४] ॥ २३ ॥
ऐकेल कृष्ण माझें कृष्णाचें धर्म, भीम धर्माचें ॥
वांच करूं दे साम भ्रात्यांचें सख्य मूळ शर्माचें[५] ॥ २४
शेष असा वरिली रण- रंगीं रंगोनि हानि शांतनवें ॥
अतिजीर्ण तसें न जसें ह्मणवी भंगोनि हा[६] निशांत नवें २५
दे अर्ध-राज्य सानुज इंद्रप्रस्थीं अजातरिपु राहो ॥
तुमच्या साम-श्रवणें उत्सव यां आणि त्या हरिपुरीं[७] हो२६
अत्युग्र भीम काळचि हें वचन यथार्थ मान रे शर्म[८] रे ॥
अमरेश मरेल नृपा धर्मक्षोभें, न कां नरेश मरे ॥ २७॥
राहे भीष्म उगा कीं सोडी तव सुत न दुरभिमानातें ॥
पावे न सूक्ति कुजनीं हत-भाग्य-जनींहि सुरभि मानातें २८
क्षणभरि उगेचि कौरव पांडव ससहाय चित्रसे ठेले ॥
केले प्रणाम दूरुनि मग सर्व स्वस्थळासि ते गेले ॥ २९ ॥
त्या उपरि किंचिदागत- भय[९] कर्ण हळूचि जवळ ये राहे ॥
पाहुनि मनीं ह्मणे शर कवणा करितिल न कवळ येरा हे ३०
तो शर-तल्पगत[१०] प्रभु गमला गुह[११] शर-वनीं[१२] जसा पडला ॥

१ बाण. २ जलधारा. ३ शत्रुरूप तृणाच्या. ४ अर्जुनानें. ५ घर. ६ हस्तिनापुराला. ७ द्वारकेला. ८ शान्त हो. ९ थोडें भय उत्पन्न झालें ज्यास तो. १० बाणशय्येवर पडलेला. ११ कार्तिकस्वामी. १२ शरनांवाच्या गवतांत.

रडला कर्ण महात्मा शोकासि कधींच जो न सांपडला३१॥
कर्ण ह्मणे अजि देव- व्रत निजलां काय हो त्रिशिख-शयनीं
तो हा तुमच्या खुपतो कण होउनि सर्व काळ जो नयनीं३२
नेत्रें उघडुनि रक्षक दवडुनि एकांत करुनि हातातें॥
कंठीं घालुनि केला पुत्रादर लोभ धरुनि हा तातें ॥ ३३ ॥
पुत्रास जसा प्रेमें अनिमिष चंद्राहि परिस बा पाहे ॥
एक भुज गळां घालुनि भीष्म वदे बोल परिस बापा हें३४॥
ये ये मजसीं स्पर्धा करिता तूं विप्रतीप मोटा कीं ॥
आलासि धन्य होसिल ज्यां त्यजिला द्वेष तूंहि तो टाकीं ३५
जरि काय मजकडे तूं आजि न येतास समय चुकतास ॥
कर्णा कल्याणाला केवळ कवि-मत असोनि मुकतास॥ ३६ ॥
कर्णा तुला प्रसवली दिनकर-वीर्यें पृथा,न राधा ती ॥
तरिच कवि विलोकुनि तुज जैसे नारायणा नरा धाती ३७॥
तूं रविज असें वदला जो लोकीं मूर्त परमंह व्यास ॥
दुर्बोध-तत्व-कथनीं ज्याचा सर्वत्र परम हव्यास ॥ ३८ ॥
वदले असेंचि नारद केशव मजसी रहस्य हें मागें॥
केले तरीच कुलजें त्वां प्रमुदित विबुध जेंवि हेमार्गे ॥३९॥
न तुझ्या ठायीं माझा द्वेष खरें हें मनांत आणावें ॥
वदलों सभेंत निष्ठुर तें तेजोवध-निमित्त जाणावें ॥ ४० ॥
करितात निमित्तास्तव लोक तिरस्कार जेंवि अनयांचा ॥
कारिसि अधिक्षेप तसा नसतांहि निमित्त पांडु-तनयांचा४१॥

---

१ डोळे न मिटतां २ अतिविरुद्ध. ३ ब्रह्मतेज. ४ निंदा.

संस्कार-धर्म-लोपें दुष्ट-जन-समागमें उडे शुद्धी ॥
मग गुणवंताचीही सदधिक्षेपीं प्रवर्तते बुद्धी ॥ ४२ ॥
हित-रत-गुरु-मन पाहुनि गत-सद्वृत्ता मुलास कळकळतें ॥
गुरु-कोप भाव्यशिव-परि- हारार्थचि हें तुला सकळ कळतें ४३
धरणिवरि समरीं अरि- जन-दुःसह मज तुझें सुधनु ठावें ॥
संध्यार्थहीं ह्मणति तुज सोडुनि निर्लोभही बुध नुठावें॥४४॥
ब्रह्मण्यता-गुणें तुज कर्णा श्रीकृष्ण नित्य मानवतो ॥
शौर्यगुणें जिष्णुहि मग काय इतर मागधादि मानव तो४५॥
बा तूंचि एक दाता झाले होतील अन्य बहु दाते ॥
परिसुनि तव यश जोडुनि कर ह्मणतिल तुजचि धन्य बहुदा ते
अस्त्रबळीं शस्त्रबळीं संधानीं लाघवीं वृषाकपिसा ॥
एकांगवीर तूं पर- बलसिंधुविलंघनीं वृषा कपिसा ॥ ४७ ॥
काशिपुराप्रति जाउनि एकें त्वां शस्त्र-वर्ष सोडून ॥
मोडून शत्रु कन्या- रत्न दिलें कुरु-पतीस जोडून ॥ ४८ ॥
दिग्विजयाची केली सत्या त्वां वीर-कुंजरा संधा ॥
आलें गुणें उणेपण रणरंगीं तुजपुढें जरासंधा ॥ ४९ ॥
सर्वमनुष्याधिक तूं तेजोबलराशि दिविषदर्भकसा ॥

---

१ संस्कार व धर्म यांच्या लोपानें. २ सत् अधिक्षेपीं. ३ हिताविषयीं तत्पर अशा गुरूचें मन. ४ नष्ट झालें सद्वर्तन ज्याचें, त्यास. ५भावि-अशिव ३० पुढें होणारें अकल्याण टाळण्याविषयीं. ६ ब्राह्मणभक्तत्वामुळें. ७ शंकर किंवा विष्णु यांसारखा. ८ एकटा बहुत वीरांबरोबर युद्ध करणारा. ९ हे कर्णा. १० मारुतीसारखा. ११ वीरश्रेष्ठा. १२ प्रतिज्ञा. १३ देवपुत्रसा.

होइल तृणांत तृणसम  यज्ञ-विहित तज्ज्ञमाहित[1] दर्भ कसा ५०
आम्हीं कोप त्यजिला  दैव बहु प्रबळ, पुरुषबळ अल्प ॥
नाहीं तरि आम्हांला  हें व्हावें प्राप्त काय शर-तल्प ॥ ५१ ॥
मत्प्रिय इच्छिसि जरि तरि  पार्थासीं[2] नमुनियां अजा मिळ रे॥
करिल दया नारायण  या नामें तारिला अजामिळ रे॥ ५२॥
हा कलह मदन्त[3] असो  तूं काळमुखीं न हें कटक टाकीं॥
बा शतकोटि अवीरा[4]  ह्मणतिल बत हंत[5] हा कटकटा कीं ५३
कर्ण ह्मणे सत्य तुझें  भाषण हें भरतनायका सारें ॥
म्यां तुज अमृताब्धिपुढें  मिरवावें स्व-यश काय कासारें ५४
जाणें राधेय नव्हें  कौंतेयचि मी असें असे नातें ॥
कुंती-मनीं असावें  जें पुत्र-प्रेम बा असेना तें ॥ ५५ ॥
सांगा त्याग उचित कीं  माझा कुंतीस उचित अत्याग ॥
मज उपजतांचि मळसा  त्यजिलें याहूनि काय अत्याग[6] ५६॥
टाकूं कैसी प्रभुजी  प्राशुनियां सर्व थान राधा मी॥
स्थिति होय कृतघ्नत्वें  नरकाच्या सर्वथा नरा धामीं ॥५७ ॥
भोगुनि ऐश्वर्य कसें  समयीं दुर्योधनासि सोडावें ॥
मोडावें म्यां स्वकृत-  ज्ञत्व कृतघ्नत्व केंवि जोडावें ॥ ५८ ॥
जैसा धनंजयाचा  परम-दृढ-व्रत सहाय यदुप[7] कृती[8] ॥
तैसा कुरुपतिचा मी  कीं बहु राज्यार्पणादि यदुपकृती[9]॥५९॥

---

१ त्या दर्भाला जाणणाऱ्यांस मान्य. २ श्रीकृष्णदेवाला. ३ माझा अंत (शेवट) ज्यांत तो. ४ पतिपुत्ररहित स्त्री. ५ हाय हाय. ६ मोठा अपराध. ७ श्रीकृष्ण. ८ कुशल. ९ यत्-उपकृति.

दुर्योधनार्थ यापरि स-धन-तनय[1]-दार सोडिला काय ॥
आनृण्य[2] न जोडावें तरि आह्मीं अर्थ जोडिला काय ॥६०॥
व्हावें शस्त्रेंचि रणीं वीरांचें गलित न वपु रोगानें ॥
सकळां मर्त्यजनांतें सुख द्यावें नित्य नव पुरोगानें[3] ॥ ६१॥
क्षत्रियशरीर जें जें पात्र सुशस्त्रा न आमयातें[4] हो ॥
हा पक्क विचार तुह्मी ह्मणतां कां व्यर्थ आम[5] यातें हो॥६२॥
दुर्योधनाश्रयें म्यां कोपविले पार्थ[6] योध या करितां ॥
हा समरांत मरों द्या क्षत्रिय जन काय बोध याकरितां६३
बा सर्व-क्षत्र-क्षय- सूचक उत्पात बहुत होतात॥
सकळ मरोत रणीं सुत किंवा शोकांत न हुत हो तात॥ ६४॥
अच्युत पांडव सकळां मर्त्यांस अजेय हेंहि या कळतें ॥
परि योग्य-वीर-समर- क्रीडोत्सुक-चित्त काय आकळतें ६५
जिंकिल चवघांस सुखें हा कर्ण, असाध्य पांचवा यास॥
सारथि होउनि जपतो जगदीश्वर त्यास वांचवायास॥६६॥
शक्रासहि प्रतापें मदिषूंचा[7] दापिता महानिकर ॥
त्यांवरि, कीं तदिषूंचा मजवरि, करु बा पिता महा निकर६७
बहु कटु तुह्मांसि वदला कीं नुरवी शांति पर-मनीं चपळ ॥
प्रभुजी क्षमा न करितां तरि हा नुरताचि परम नीच पळ॥६८
युष्मदनुमोदनानें धरिल मदुत्साह-शक्ति पुष्कलता ॥

---

१ धन, पुत्र व स्त्रिया यांसह (काय). २ ऋणमुक्तता. ३ पुढाऱ्यानें. ४ रोगाला. ५ अपक्व. ६ अर्जुन. ७ माझ्या बाणाचा. ८ भयजनक.

दग्ध-लता अमृत-घनें फळती न फळेल काय शुष्क लता ६९
माझें दुरुक्त तुमच्या चित्तीं नाहींच राहिलें कांहीं ॥
परि चुकतां विनवावें ताता करुणाकराहि लेंकांहीं ॥ ७० ॥
भीष्म ह्मणे कर्णा हे मति हो तुज सर्वकामदा ज्ञात्या ॥
आपण अनुसरलों ज्या कर्मा होइल न कां मदाज्ञा त्या ७१
जा सद्वृत्त न सांडुनि युद्ध करीं त्यजुनि गर्व भय शोक॥
हो कठिन प्राप्त तुला होतील क्षत्र-धर्म-जित-लोक ॥ ७२ ॥
प्रशमीं प्रयत्न केला परि माझेंही न चाललें कांहीं ॥
हे काढिली नवी धृत- राष्ट्राच्या हीन चाल लेंकांहीं॥ ७३॥
जा परि पळ पाहूं दे वदन करीं पूर्ण काम हा भागें॥
टाक पुढेंचि धरावी इतुकी त्वां भीड कां महाभागें॥ ७४ ॥
या भीष्म-प्रभु-वचनें आवरला रविसुतासि न गहिंवर ॥
प्रेमभरचि विकळ करी धीरा न तसा पडोनि नगहि वर ७५
वंदुनि आज्ञा घे तों आणी कर्णासि हुंडका नातें ॥
सुच्छात्रासि सुगुरुचें जैसें लागोनि तुंड कानातें ॥ ७६॥
निघतां प्रदक्षिणा त्या परमोदारा करूनि तो रडला ॥
राम-घन वनीं त्यजितां जेंवि बहु भरत-मयूर ओरडला ७७॥
हें भीष्मपर्व पावो साधु-श्रुति-शष्कुलीनभा सावें ॥
श्रीव्यास-कृत मयूरे- श्वराविलिखित वेगळें न भासावें ७८ ॥
पुरुषा आर्या वृत्तें जैसी ग्रंथा जया तसी मोटी ॥

---

१ पर्वतही. २ हुंद्का.

शोभा आर्या-वृत्तें आली भुलतील यासि कवि कोटी॥७९॥
ग्रंथ प्राकृत दिसतो, परि न प्राकृत, विलोकितां नीट ॥
गोपांत गोप भासे कृष्ण, परि नयेचि पाहतां वीट ॥ ८० ॥
रसिक कवि परम सज्जन भगवद्भक्त प्रसन्न होतील ॥
न गमेल या परिस हित तो जो वदनांत अमृत ओतील ८१
कीं या विजयग्रंथीं हरि-हर-जन-सत्कथा दुजी थोडी ॥
गोठी अन्य-कथांची नित्य जिला त्यजुनि गर्व कर जोडी ॥८२
श्रीनारद वाल्मीक व्यास पराशर वसिष्ठ शुक सुकवी ॥
प्रतिभा१-रक्षक, नाशक खळ किर्ति, अमृताश्रिता दव न सुकवी

१ स्फूर्ति.

---

# मुंबईमध्यें

"श्री हरिवरदा" प्रिंटिंगप्रेसमध्यें छापिला.

भीष्म द्रोण रवि शशी गिळिले पांचाळ-काळ-राहूनीं ॥
निववित होते कीं ते जननयना सर्वकाळ राहूनी ॥ १९ ॥
मरण नये उर न उले जरि हें बहु शोकपर्व तापवितें ॥
विधि न धरी भेदाया कां या धृतराष्ट्र पर्वता पवितें ॥ २०॥
कविवृंद सदुपदेशें तुज शिणवुनि देवि वाणि तळमळलें ॥
हा कोळसा कराया शुद्ध धुतां व्यर्थ पाणि-तळ मळलें २१॥
बहु जन बुडवुनि शोकीं दुष्टा दुर्योधना बुडालास ॥
मकरालय[1] लंघाया मत्ता मशका कसा उडालास ॥ २२ ॥
गज गोष्पदां बुडाला हा दैवा सिंधु शोषिला मशकें ॥
न शकें सोसाया हें वधिला तो केसरी कसा शशकें॥ २३॥
आली मूर्च्छा सूता उत्तम होईल जरि न वांचेन ॥
कांचेन आधि-पाशीं सुतशोकचि गुण सुपाक यांचे न॥ २४
हा भार्गवास्त्रसर्व-स्वसुपात्रा त्वद्वळें हरिप्रति[2] मी॥
न वचकलों नव्हतों जय-कण कल्पित अर्जुनीं हरिप्रतिमीं२५॥
हा द्रोणा हा द्रोणा हा द्रोणा मृत्यु तुज कसा घडला
ऐसें रडोनि धडधड धरणीवरि तो धरापती पडला ॥२६ ॥
यापरि कुरुगुरुच्या बहु शोकभरें होय काय कारा जा ॥
उठविति वारा घालुनि शिंपुनि शीतांबु बायका राजा २७॥
दैवें आप्तोपायें कश्मल[3]-जलधीस तो नरपति तरे ॥
करुनि बहु विलाप ह्मणे निंदिल धर्मासि तो नर पतित रे२८

१ समुद्र. २ श्रीकृष्णसदृश अशा. ३ मूर्च्छा.

रे संजया महात्मा राजर्षि अजातशत्रु कोपविला ॥
पुण्य-श्लोक तपोनिधि भस्म कटाक्षें करील तो पविला २९॥
एकेंचि गदाघातें भेदिल भीम-प्रभाव भीम नगा ॥
शरभास जसें हरिचें माझें ऐकोनि त्यास भी मन गा ३०॥
अर्जुन नर नारायण कृष्ण-प्रभु परम-पूत-नामा या॥
बाळपणींहि न शकली माराया करुनि पूतना माया॥ ३१॥
मथिला वत्स[1] अघ तृणा- वर्त कपटि खलवतंस[2] बक राहो ॥
कालियकेशि-दमन हरि हरि हरि हरि होय कंस बकरा हो ३२
न सरेल वानिलें जरि दिव्य सहस्राब्द आठ यामहिं[3] म्यां ॥
लाजोनि अनंताच्या ज्ञानें दिधलीच पाठ या महिम्या ३३॥
जात्यंधासहि मजला देवें निज दिव्य रूप दाखविलें ॥
दाटुनि दयोदधीनें दीना सगदास[4] अमृत चाखविलें ॥ ३४॥
केला नाहींच नरक निजनामानें तसाचि चक्रानें ॥
बल पारिजात हरितां दाखविलें यासि काय शक्रानें ॥३५॥
दुर्वासा भगवान् बहु वर देता जाहला सदारा ज्या ॥
जो जगदीश्वर जपतो निज निधिला कृपणसा सदा राज्या
मरतील जरि कथंचित्[5] सतनय पांडव समस्तहि तथापी ॥
न भलें कीं राज्यपदीं ईश्वरचि करुनि समस्त हित थापी ॥
तो ईश्वर कृष्ण करें कवळिल कदना करालें[6] करवालें[7] ॥
सांगा तुह्मी कवि कुशळ काय कसें मग कराल करवाल ३८

१ वत्सासुर. २ दुर्जनश्रेष्ठ. ३ प्रहर. ४ रोगसहितास. ५ कसे तरी. ६ भयंकर. ७ तरवार.

कौरव मारुनि देइल निष्कंटक सर्व राज्य आतेला ॥
त्यर्जुनि हित अहित घे तो खल करितो वमुनि आज्य आ तेला
मी माझें हें घातक लागो या आजि आग मोहाला ॥
न मनांत अहंममतां- भ्यधिका लोकांचिया गमो हाला॥४०॥
सांग रणकथा काढिल नसतां मनिं मोह काय बाप रडे ॥
वांकेल ताजव्याचें भारावांचूनि काय बा परडें ॥ ४१ ॥
संजय ह्मणे नृपा मन लावूनि अनश्वरीं सुखीं न रडें ॥
हो सावध काळानें जों नाहीं घातलें मुखीं नरडें ॥ ४२ ॥
पुत्राप्तराज्यमोहें होय जरि तुज व्यथा, परि सराया ॥
मोह श्रोत्यांचा, मी कथिन गुरुवरें कथा, परिस राया४३
स्वीकारुनि अभिषेक द्रोण ह्मणे मज अभीष्ट वर मागें ॥
लोपविलाचि नतजना ऽसुहृदर्क गुरु-प्रसादें-चरमागें ॥४४॥
दुर्योधन नमुनि ह्मणे धर्म धरुनि मज समीप आणावा ॥
गुरुजी मज कोटि-वर- स्थानीं हा वर अभीष्ट जाणावा४५॥
द्रोण ह्मणे कुरुराया या भरतकुलांत धन्य पांडव गा ॥
तरिच सुर ह्मणति नट हो धर्माचे गुण करूनि तांडव गा४६
पुण्यश्लोक युधिष्ठिर अजातरिपु धर्मराज ज्या नांवें ॥
वानावें भगवत्सम कविनीं मानव असें न मानावें ॥ ४७ ॥
बहुधा त्याचा द्वेष्टा कोण्ही नाहींच आजि हें कळलें ॥
मळलें न द्वेषें मन तरिच प्रेमें रसें असे वळलें ॥ ४८ ॥
प्रथम रणीं जिंकावें मग द्यावें काय राज्यपद भावा ॥

---

१ अविद्येहून अधिक. २ नतजनाचे असुहृत् (शत्रु) हेच सूर्य. ३ गुरुप्रसादरूप अस्ताचलानें.

आणा धरूनि न वधा ह्मणसी याच्या स्वयेंचि वद भावा ४९
त्वत्पुत्र ह्मणे गुरुजी अर्जुन भीमहि न आवरायाचा ॥
पाहुनि तुह्मांसि सम्मुख समरीं जाईल आव रायाचा॥ ५०॥
कीं जरि तेजस्वी तो साधु मृदु शशी तुह्मी तपनसे हो ॥
कुतुकें धराल त्याच्या पदरांत तुह्मांअसें तप नसे हो ५१ ॥
कथितों द्यूतीं पहिल्या- परि जिंकायास पांडव धराया ॥
कां अन्यथा न ह्मणतों वा हाण उरांत कांड वध राया ५२
वधिल्या धर्म नसे जय भीमार्जुन परम उग्र अंतकसे ॥
कोपें खवळुनि आह्मां सकळांचा न करितील अंत कसे॥ ५३ ॥
ह्मणुनि धरुनि दवडावा द्यूतीं जिंकुनि वनास दायाद ॥
जाणे स्वहित द्यूता मच्चित्त जसें वना सदा याद॥ ५४ ॥
हृदयीं बहु हांसोनि द्रोण ह्मणे युक्ति बहु भली सुचली ॥
राज-मना जी कांहीं रुचली तीच प्रजा-मना रुचली ॥ ५५॥
परि जरि हरिसारथि[1] मज धर्माला गांठितां न लक्षील॥
तरि करिन कार्य हें मी भीमादि न अन्य शूर रक्षील ५६॥
याकरितां सर्व तुह्मी तो कुरुसंताननलिनरवि[2] रोधा ॥
विजयापुढें कवण जय पावेल करूनि बलि नर विरोधा ५७
जरि म्यां प्रथम पढविला बाळपणीं पुत्रसाच खेळविला ॥
तरि मदधिक कीं तेणें परमेशास्त्र[3]-प्रसाद मेळविला ॥ ५८॥
वृद्ध ब्राह्मण मी तो तरुण क्षत्रिय मला न आटेल ॥

१ अर्जुन. २ कुरुवंश हेंच कमल त्याचा सूर्य अर्जुन. ३ पाशुपतास्त्ररूप प्रसाद.

भार्गव-नदीज-समर स्मरतां मद्वचन सत्य वाटेल ॥ ५९ ॥
त्याल उपायें अर्जुन दूर तरि धरिन रणांत धर्मातें ॥
या सांतरें-वरदानें पावे बालिश-समूह शर्मातें ॥ ६० ॥
परहित ह्मणुनि गुरु करी मंत्राचा स्वकटकांत बोभाट ॥
होय श्रुत-प्रतिज्ञा-स्थैर्यार्थ नृप स्वयेंचि तो भाट ॥ ६१ ॥
हें दूतमुखें परिसुनि धर्म ह्मणे अर्जुना महाबाहो ॥
वा हो त्राता कोणा व्यसनीं घेऊनि नाम हा बाहो ॥ ६२॥
गुरुनें सुयोधनाला देतों मज धरुनि हा दिला वर हो ॥
न घडो हें समरीं मी मेल्यावरि तो सुखें इलो-वर हो॥ ६३ ॥
अंतर वरांत आहे वत्सा तें कळवितों बरें परिस ॥
धर्म धरिन जरि विजय न राखिल गुरु-वर वदे असें अरिस ॥
यास्तव समीपचि रहा समरीं होऊनि अनलस मदवना ॥
आश्रयगुणें लघुहि गुरु होय जनाऽलंघ्य अनलसम दवना६५
विजय ह्मणे त्या गुरुचा वध या गुरुचाहि उचित न त्याग ॥
जरि करिन भवदुपेक्षा तरि मग त्याहूनि कोण अत्याग ६६॥
सोडीन प्राण परि न गुरुवरि मरणार्थ बाण सोडीन ॥
मोडीन न प्रतिज्ञा बोलुनि अनृत न अकीर्ति जोडीन ॥६७॥
क्षितिवरि खचोनि सहसा सग्रह नक्षत्र-मंडल पडेल ॥
पृथिवी विरेल परि हे दुष्टाची कार्यसिद्धि न घडेल॥ ६८ ॥
प्रभुजी हा मी सेवक जीवंत असें तसें कसें होतें ॥
पुण्य-प्रताप तुमचा सिंह सकळ शत्रु-बल ससे हो तें ॥६९॥

१ अर्जुनास दूर करणें हें अंतर ज्यांत. २ पृथ्वीपति.

जरि सप्तुरासुर साक्षात् स्मर[१]-हर होइल सहाय पापा हो ॥
समरीं अदृष्टपूर्व[२] स्वपरिभवा तो महातपा पाहो ॥ ७० ॥
असतां समर्थ सारथि अरिची आह्मांसि काय परवा हो ॥
शोणित-पूरीं गृध्र- श्येनकृतग्रासकाय[३] पर वाहो ॥ ७१ ॥
दुर्लभ अहिचा बाळा होय स्पर्शांच कालसाचि मणी ॥
होईल काय हंसी गति टाकूनीहि आलसा[४] चिमणी॥ ७२ ॥
त्याला वर कुरु-गुरुनीं अभयवर दिला तुह्मांसि गुरुगरुनीं[५] ॥
सिंह शरभाश्रितांचें करितील अनिष्ट काय गुरुगुरुनी॥ ७३॥
अर्जुन-वाग्वसानीं[६] बहुधा ते वीर गर्जले हरिसे ॥
अरिसेना भी जाणों ती सिंह-रवासि गज-घटा परिसे॥ ७४॥
मग आह्मीं ते करिते झालों स्वजयार्थ आहवारंभा[७] ॥
भट ह्मणती वीररसें शृंगाररसांत वाहवा रंभा ॥ ७५ ॥
आह्मां अर्जुनपालित- धर्मनृप-बलाकडे पहावेना ॥
त्यां पांडवांहि कुरुगुरु- रक्षित-कटक-प्रभा सहावेना ॥ ७६॥
राया दोन्हीहि चमू स्तिमित क्षणमात्र राहिल्या होत्या ॥
चित्रीं जेंवि लिहाव्या सर्वांहीं तेंवि पाहिल्या हो त्या ॥ ७७ ॥
व्यूहांतुनि रुक्मरथ द्रोण-चमू-पति निघे महातेजा ॥
घन-पटल-निर्गत तरुण तरणि ह्मणति निपुणही पहाते ज्या ॥

---

१ शंकर. २ पूर्वी न पाहिलेला. ३ गिधाडें व ससाणे यांनीं केले ग्रास ज्याचे असा देह ज्यांचा. ४ आळशी. ५ श्रीकृष्णांनीं. ६ अर्जुनाचे भाषणाचे शेवटीं. ७ युद्धारंभास.

इतर भट किती पाहों न शकेचि श्वेतवाह वीरा या ॥
सोमक पांचाळ वधुनि रक्ताची सिंधु वाहवी राया ॥ ७९ ॥
भट गांठिती भटांतें अहि अहितें जेंवि पतग पतगातें ॥
कीं हरि हरितें अत्य- द्भुत होय द्वंद्व-युद्ध-शत गा तें ॥८० ॥
सौभद्रपौरवांचें अत्युग्र द्वंद्वयुद्ध परिसा हो ॥
तुमचें निजापकर्षा धर्मोत्कर्षासि चित्त परि साहो ॥ ८१ ॥
करितां सारथिमस्तक- कोदंडच्छेद पौरवें अहितें ॥
आर्जुनि असिचर्म धरुनि गांठी अरितें जसा गरुड अहितें ॥
खंडुनि सूतशिर ध्वज वाम करें केशभार दृढ धरिला ॥
पाडूनि रथाखालें द्यावी जों त्या कबंधता अरिला ॥ ८३
तों खड्गचर्म घेउनि सिंधुप टाकुनि उडी रथावरुनी ॥
गर्जुनि हरिपरि अरिवरि धांवे तद्वध-मनोरथा वरुनी ॥८४ ॥
त्या पौरवासि सोडुनि सौभद्र जयद्रथावरि उगर ॥
हांसुनि ह्मणे हरिपुढें वृक-शशकाया न थावरि उगा रे ॥
सैंधव- सैनिक- शस्त्रें खड्गें खंडुनि सरोज-नाभाचा ॥
मोही वीरजना हर- सा स्मरसा अप्सरोजना भाचा ॥ ८६ ॥
असि भंगतां प्रहारें लोकांत न थापटुनि भुजा माता ॥
ज्या माता भी तें करि कीं जाय तुझा पळोनि जामाता ॥

१ अर्जुन. २ आपल्या पराभवाला. ३ तरवार व ढाल. ४ जयद्रथ. ५ श्रीकृष्णाचा. ६ रंभादि अप्सरांस. ७ जांवई ( जयद्रथ ).

कटकीं जयद्रथाच्या कदन करी त्यजुनियां दया दवसा ॥
गमला परां जनकसा तो किंवा दानवांसि यादवसा ॥ ८८॥
लोक-मुखें धन्य असें जो ह्मणुनि रणांगणांत राहुनि घे ॥
सौभद्र-सुधांशुवरि[1] ग्रासाया मद्रराज-राहु निघे ॥ ८९ ॥
वारुनि सुतासि भीम स्यंदन सोडुनि महाभुज गदेतें ॥
घेउनि शत्रुभटांला दे भेकांलों[2] महाभुजग दे तें ॥ ९० ॥
अवकाश सिंह-नादें भरती ते शूरसत्तम नभाचा ॥
मामासा नात्यासि न दे वीररस-प्रमत्त मन भाचा ॥ ९१॥
भीमगदा शल्यातें शल्यगदा एकदांचि भीमातें ॥
ताडी मूर्छित पाडी कांपविती सांगतांहि भी मातें ॥ ९२ ॥
कृतवर्मा शल्यातें स्वरथीं वाहोनि शीघ्र-तर पळवी ॥
होय स्वयेंचि सावध भीम न तो मोह तद्यशा मळवी॥९३॥
उठतांचि तो गदीश्वरें[3] भीम पळे कुरु-चमू न राहे ती ॥
अमरांहि जी न सोसे त्याची सोसेल कसि नरा हेती[4]॥९४॥
कर्णाचा नंदन वृष- सेन कुरु-बलासि अभय दे वारी ॥
तेणें केले पांडव- वीर गुहें[5] जेंवि सभय देवारी[6] ॥ ९५ ॥
पाहुनियां निजसैन्यें वृषसेन-शर-प्रलय-वनाकुलितें ॥
जें आश्रितावनें[7] यश गिरिधर जोडी स्वयेंहि नाकुलि[8] तें९६
चाप ध्वज खंडुनि बहु शर सोडी कर्णसुत शतानीकीं ॥

१ चंद्रावर. २ बेडकांला. ३ गदायुद्ध करणारांत श्रेष्ठ. ४ तरवार. ५ कार्तिकस्वामीनें. ६ दैत्य. ७ आश्रिताचें रक्षण करण्यानें. ८ नकुलाचा पुत्र.

बंधु ह्मणति हा केला आहि विकल पिपीलिकाशतांनीं कीं९७
ते द्रौपदेय चवघे वृषसेनीं विशिखं वर्षले शतदा ॥
न उरे कुरु-कटक-मनीं युद्ध-जयोत्साह- हर्ष-लेश तदा ९८॥
त्या द्रौपदी-सुतां-वरि कर्ण कृप द्रौणि धांवले हरिसे ॥
त्यांवरि पार्षत सात्यकि भीमहि उठले जवें मनासरिसे ९९॥
करिते झाले युद्ध क्रुद्ध शरभ-सिंह देव-दानवसे ॥
मानवसे गमले न स्नेह-कणहि तन्मनीं तदा न वसे॥१००॥
उठली युधिष्ठिर-चमू जसि महिषासुर-बलावरि भवानी ॥
शोभति सुभट-भुज जिचे असकृत्कृतशत्रुबलपरिभवांनीं॥१॥
स्व-बल-क्षय पाहूनि द्रोण करि क्षत्रियान्त भार्गवसा॥
वीरांसि ह्मणे स्वर्गीं जा मच्छर दावितील मार्ग वसा ॥२॥
रविला झांकी गगनीं कुरु-गुरु बहु शर भरी तिमिर विखरी
लीलेनें नर-केसरि लक्ष चिरी शरभरीति मिरवि खरी ॥ ३॥
धर्माला गांठाया धांवे तो विप्र कटक विसकटुन ॥
वाटे तदेकविशिखा- हुनि सिंधुज-गरलें-घट कविस कटु न॥४॥
मदमत्त मतंगज कीं मर्दी जैसा समीर कदलींतें ॥
कुरुगुरु तसें करी तें परिसा कटकें सकंप वदलीं तें ॥ ५ ॥
पक्षिपति पक्ष-पवनें उडवुनि जल सागरीं अहिस धरितो ॥
करितो तसेंचि कुरुगुरु हा हा कृतकृत्य होतसे अरि तो॥६॥

---

१ शेंकडो मुंग्यांनीं. २ बाण. ३ वारंवार केलेल्या शत्रूच्या पराभवांनीं. ४ शरभाप्रमाणें कृति. ५ त्याच्या एका बाणाहून. ६ समुद्रांतून निघालेलें कालकूट नामक विष त्याचा घट.

हा आला हा आला कोंडील युधिष्ठिरासि शरभवनीं ॥
शिरला समीराचि जसा सिंहासि वधावयासि शरभ वनीं७ ॥
आह्मीं वदलों केलें जें हृदय निसर्ग-मृदुल कर्कश तें ॥
धरिलाचि धर्म गुरुनें निश्चय केला असाचि तर्कशतें ॥ ८ ॥
येतां समीप गुरुला पाहुनि आधीं मनांत कर जोडी ॥
सोडी श्वास शर तया धर्म ह्मणुनि धर्म संगरीं झोडी ॥९॥
धर्माच्या चापातें कुरुगुरु एकेंचि मार्गणें तोडी ॥
झोडी भीमप्रमुखां बहुतांतें बहुबळें बळें मोडी ॥ १० ॥
भग्नार्तस्वभटोच्च- ध्वनि परिसुनि विजय निजयशोदात्यां ॥
सूता हूं हाक ह्मणे ज्या जपल्या देवकी यशोदा त्या॥११॥
दुस्तर संकट पडतां मारिति शक्रादि हाक वीरा ज । ॥
त्या जगदीशाकरवीं हूं ह्मणुनि हयांसि हाकवी राजा १२ ॥
द्रोणानीकीं केला शर-वृष्टी करुनि घोळ वीरानें ॥
लोळविलीं रथवृंदें बहु जैसीं वात लोळवी रानें ॥ १३ ॥
रक्त-नदी वाहविली राया त्या शत्रु-सिंह-शरभानें ॥
केवल कुरु-कटकांचीं हरिलीं विखरुनि अनंत शर भानें१४॥
जे विजय-मुक्त सायक भरिती झांकुनि रविप्रति नभा ते ॥
सरतिल सरतिल मागें कधिं तरि चारिहि अपांपतिं न भाते॥

---

१ बाणाच्या घरांत. २ स्वभावतः कोमल. ३ बाणानें. ४ पराभूत व भ्यालेल्या आपल्या सैनिकांचा कलकलाट. ६ आपणास यश देणाऱ्याला. ६ देहभान. ७ समुद्र.

दाटे बहु निबिड-तिमिर राया त्या विजय-रचित-शर-भवनीं॥
आह्मां दिग्भ्रम झाला जैसा सिंहासि होय शरभ-वनीं ॥
असुर-चमूचा बहुधा धीर तसा नृहरिनें नसे नेला ॥
ज्यां सर्पदष्टकन्ये- हूनि उणें पाहिलें न सेनेला॥ १७ ॥
तों रवि गेला जाणों सकळ-कटक-कदन राहवायातें ॥
करिजेल कां न अद्भुत शक्राद्यजितें नराहवा यातें ॥ १८ ॥
आलों शिबिरा वर्णित विजया गुरुहून अंगपाहून ॥
भ्यालों अन्योन्याचें पर्ण-कुसुम-वर्ण अंग पाहून ॥ १९ ॥
परते पार्थ गजांच्या शून्य करुनि जेंवि हरि समस्त वना॥
अजितत्वगुणें होय स्तोत्यांच्या विषय हरिसम स्तवना॥२०॥
द्रोण ह्मणे कुरुराजा मद्वचन प्रत्ययासि आलें कीं ॥
विजय-निवारण-शक्ति न माझ्या चापीं न माझिया लेंकीं॥२१॥
युद्ध कराया हटकुनि विजयाला न्याल दूर जरि सारे ॥
धरिन न पळतां धर्मा कौरवहो हें यथार्थ परिसा रे ॥ २२ ॥
तेव्हां ह्मणे सुशर्मा जरि न द्विभुजहि सहस्रबाहूनें ॥
अर्जुन नेऊं वोढुनि दूर बळें संगरार्थ बाहूनें ॥ २३ ॥
आह्मांला तो किंवा त्याला आह्मी वधूं प्रतिज्ञानीं ॥
बहु रक्षिति प्रतिज्ञां- प्रति जैसे कुलवधूप्रति ज्ञानी ॥ २४ ॥
बोलुनि ऐसें स्वमतीं घे तो सुत बंधु-वीर-वर्गातें ॥
स्वर्गातें साधाया सुखवाया रण-मुखांत भर्गातें ॥ २५ ॥
सुत-बंधु-वीर-कटका- सह निश्चित-चित्त देव-देश-पर्थ ॥

---

१ सर्प चावलेल्या कन्येहून. २ कर्णाहून. ३ पलाशपुष्पवर्ण. ४ अजिंक्यगुणेंकरून. ५ सहस्रबाहूपेक्षां उणा. ६ बोलावून. ७ शिवातें. ८ स्वर्गमार्ग.

अवलंबाया होमुनि विप्रांला वित्त दे वदे शपथ ॥ २६ ॥
जैसें मरण सुशर्मा तैसें तद्भट अशेष पथकारिती ॥
कारितां रणीं पलायन नरक घडावे असे शपथ कारिती २७
ते समसप्तकसंज्ञ प्रबल सुभट सिद्ध जाहले युद्धा ॥
क्रुद्धाशीविष गरुडा कीं जिंकाया अशुद्ध-धी शुद्धा ॥ २८॥

प्रथमदिनयुद्धसमाप्त.

---

# अध्याय २.

## द्वितीयदिनयुद्ध.

दुसरे दिनीं सुशर्मा जेव्हां रण-मख करावया बाहे ॥
अर्जुन धर्मासि ह्मणे दे आज्ञा शत्रु बाहती बा हे १ ॥
धर्म ह्मणे मागितला मद्ग्रह-वर कीं सुयोधनें अहितें ॥
गुरु धारिल मला धरितो लीलेनें पाक्षिपति जसा अहितें॥२॥
कृष्ण-सख ह्मणे देवा होऊं द्यावें न भीत चित्त रणीं ॥
होइल गुरु-शर-तिमिरा- प्रति हा पांचाल्य सत्यजित् तरणी
रक्षित आला तुमचा धर्म तुह्मांला पुढेंहि रक्षील ॥
गुरु तो करुणाचि कठिनहि काल न कोपेंकरून लक्षील४ ॥
जरि सत्यजित् कदाचित् समरीं पावेल मरण न रहा हो ॥
स्वस्थमनें आज्ञा द्या दव संसप्तक-तृणांत नर हा हो ॥ ५ ॥
वत्सा विजयी हो ये संहारुनि शत्रुसैन्य सत्वर तें ॥
यापरि वदोनि आज्ञा दिधली सत्व-निरतास सत्वरतें ॥ ६ ॥
जे जे प्रताप शस्त्रा- स्त्रांचे संसप्तकांकडे होते ॥

१ कोपलेला सर्प. २ दुष्ट. ३ शत्रूनें.

पांडव-चंडांशु-पुढें झाले तत्काळ कांजळे हो ते ॥ ७ ॥
पार्थाचा प्रलय-घना ऽधिक दारुण देवदत्त दर वाजे ॥
दरवाजेसे डोळे झांकिति आइकति भीतिदें-रवा जे ॥ ८ ॥
शर्मा रथ धर्मा धनु बाहु भ्राते सुपूर्व पांच विती ॥
ज्यां त्यांसि पूतनाशी विजय-विशिख-वृष्टि पळ न वांचविती
नर-हर-शर-दृक्-पातें पडला सहसा खचोनि सु-धनु-रवी ॥
धैर्य पर-जनीं अर्जुन षड्वर्गा तिलहि जेंवि बुध नुरवी॥१०॥
सर्व त्रिगर्त-बल सा प्रेक्षुनि भटनायका द्रवे यश तें ॥
किति वर्णू विपत्तिपुढें ठाकावें काय कांद्रवेयशतें ॥ ११ ॥
त्यांला ह्मणे सुशर्मा सुखद न हा वासवाहि लेश पथ ॥
परता भीतां तरि कां दाउनि भावास वाहिले शपथ॥१२॥
फिरले ते नारायण गोपालहि बहु जसे घन रविवर ॥
विवर न तच्छर देती वाता लोपे पराहि नरविवर ॥ १३ ॥
शरतिमिरीं कृष्ण ह्मणे मच्चेतोऽबुजनवातप कासि ॥
चित्र अपक्वाहि फल-प्रकरा पाडी न वात पक्वासि ॥ १४ ॥
पार्थ ह्मणे स्वस्थ असें होतीं त्वच्चिंतनेंचि नरक रिते ॥
नसता आधार तुझा मज भस्म रणीं कधींच नर करिते १५
देवा निज-प्रसादा ह्मणसिल तूं होय दास मी रणगां ॥
काळा पळविन काय न होइन परतोयदां समीरण गा १६॥
ऐसें वदोनि योजी त्वष्ट्यानें वोपिल्या वशास्त्रातें ॥

१ शंख. २ भयप्रद शब्दाला. ३ सु आहे प्रथमाक्षर ज्यांच्या नांवाचें असे सुशर्मा इ०. ४ सर्प ( कद्रूचे पुत्र ). ÷ समूहाला. ५ रणांत आलेल्याला. ६ शत्रुरूप मेघाला. ७ वायु. ८ मोहनास्त्र.

जेंवि सुकवि सुमतातें कुतर्कें खंडावया अशास्त्रातें ॥ १७ ॥
अर्जुनरूपें शतशः क्षणमात्रें प्रकट जाहलीं कटकीं ॥
भुलले ते संसप्तक केली बहु आपणांत कटकट कीं ॥ १८ ॥
शेर ह्मणति हा अर्जुन हा केशव काय पाहतां हाणा ॥
आणा मनीं कुलज हो ज्या अग्निसमीप वाहिल्या आणा१९
वेष्टा धनंजयाला आत्मयशें सत्यपांड[1] वेष्टाया ॥
चेष्टा करूं न द्याव्या गोपाला सत्य पांडवेष्टीं[2] या ॥ २० ॥
पार्थ ह्मणोनि परस्पर हाणुनि शस्त्रांचिया महानिकरें ॥
मेले वहुत भुलविले त्या अस्त्रें शत्रुधामहानिकरें[3] ॥ २१ ॥
समरीं स्वयेंहि वासवि बहुशत्रूंतें हरूनि असु खपवी ॥
याचा जेंवि शर परा तैसें देईल काय असुख पवी ॥ २२ ॥
संसप्तकां नर जसा नरहरि मारी विशृंखळ खळांतें ॥
होय असृक्स्रोतःशतँ[4] वाहे समराजिरीं खळखळां तें ॥२३॥
अरि-कदन जसें अर्जुन कुरुगुरुहि तसेंचि वीर-कदन करी ॥
मिरवी तयापुढें भट जेंवि हरिपुढें बलीहि मदन-करी२४ ॥
धृष्टद्युम्न-वृकोदर[5]- सौभद्रप्रमुख वीर कंपविले ॥
द्रोणें वहु शूरांचे समर-रसोत्साह सर्व संपविले॥ २५ ॥
कौंतेय गांठिला रण- रंगीं नटउनि महा-भट कबंध ॥
जैसा जलद समीरें तैसा विसकटुनियां कटक-बंध ॥ २६ ॥
धीर धरुनि धर्मज्ञें धीरें धर्में धनुष्य चढवीलें ॥

१. ब्रह्मांड. २ पांडवांच्या मित्राला. ३ शत्रूचें तेज नष्ट करणाऱ्या. ४ रक्ताच्या शेंकडो नद्या. ५ भीम.

दाखविलें तें गुरुला जें होतें आपणासि पढवीलें ॥ २७ ॥
गुरुनें नृप धरिला रे धरिला हाणा ह्यां कशा हाका ॥
हा काय पाहतां द्विज वेढा भट मारिती अशा हाका ॥२८॥
तों धांवे वेंचाया धर्मार्थ स्वायुधासुवित्त रणा ॥
वाटे मुहूर्त तो द्विज- राज द्विजराज सत्याजि तूतरणी॥ २९
त्या पांचाल्यातें गुरु- राज स्वर्गासि पाठवी राजा ॥
तेव्हां धर्म पलायन धर्म ह्मणे धर्म पाठ वीरा ज्या ॥ ३० ॥
धर्म न भांडे गुरुसीं जैसा सत्पुत्र पाठि दे वढिला ॥
त्यासि न ह्मणति नभींचे सोडूनि स्तोत्र-पाठ देव ढिला ३१
समरांजिरासि राया सोडुनि जैसा युधिष्ठिर पळाला ॥
कुरुगुरु तसेंचि पळवी त्याच्या स्व-निवारणोद्यत बळाला ३२
भ्याले गुरुसि पर जसे पंचाक्षर-मंत्र-जप-परा भूत ॥
हतशेष भट पळाले जेंवि असुर विष्णु-बल-पराभूत ॥ ३३ ॥
कुरुपति कर्णासि ह्मणे आचार्यें पळविले पहा पर ते ॥
भ्याले सात्यकि धृष्टद्युम्न वृकोदर न एकही परते॥ ३४ ॥
गुरु भीष्माहुनि शतगुण अधिक धनुर्वेद मूर्त हा सत्य ॥
हास त्यक्तावधि ये झाला मद्रिपुगदास नासत्य ॥ ३५ ॥
राधेय ह्मणे राया जयहर्षें हासतोसि परि समज ॥
परम अनर्थ परतला भीम गमे उग्र मृत्युपरिस मज ॥३६॥
पांडववीर पळाले गेले ऐसें तुवां न मानावें ॥

---

१ चाबूक. २ रणांगणाप्रत. ३ अमर्याद. ४ माझ्या शत्रुरूप रोगास. ५ अश्विनीकुमार.

याचें बल सत्कार्वेंनीं हरि-हर-बलसें सदैव वानावें ॥ ३७ ॥
आतां गुरुवरि धर्म स्वकटक फिरवील भीम परतेल ॥
परम प्रदीप्त होइल कीं तो नररूप वन्हि परं तेल ॥ ३८ ॥
रक्षावा द्रोण रणीं यत्नें आह्मीं तुह्मीं ससेनांहीं ॥
ह्मणतिल काय अराक्षित हरि-मथन-यशःस्पृहा ससे नाहीं ३९
ऐसें कर्ण वदे तों मागें सहसा फिरे कटक राया ॥
प्रलयींचा पाथोनिधि जैसा पृथ्वी प्रजा गट कराया ॥४०॥
द्वंद्व-शतें किति वर्णूं भीम क्रीडे रणीं समुद्ररसा ॥
त्या युद्धरसा सेवूं त्वच्छ्रुति सेवी जसी अशुद्ध रसा ॥ ४१॥
भीमासीं युद्ध करी द्विरदीं बैसोनि पुत्र नरकाचा ॥
टिकला भीमचि टिकता त्यासीं समरांत काय नर काचा४२
मर्दुनि करि-कटकातें व्याकुळ दुर्योधनासि भीम करी ॥
तों प्रेरिला तयावरि अंगें म्लेंछाधिपें स्व-भीम करी ॥ ४३॥
एकेंचि शरें मस्तक भेदुनि येतांचि नाग लोळविला ॥
पर-लोकाप्रति अंग च्छेदुनि मूर्धा पळांत बोळविला ॥४४॥
ज्या ऐरावत कुलजा अर्पुनि पूर्वीं महेंद्र साम करी ॥
तो प्रेरिला सकोपें भगदत्तें सुप्रतीक-नाम करी ॥ ४५ ॥
भीमावरि न गणुनि शर- वृष्टीची झड करी करी लगट ॥
वाटे जनांसि काळचि तो त्याला झडकरीं करील गट ४६॥
तो क्रोध मदांऽध महा- नागाऽयुत-शक्ति-मूळ-पीठ करी ॥
शुंडा-पादाऽघातें साश्व-रथातें पळांत पीठ करी ॥ ४७ ॥

१ शत्रु. २ समुद्र. ३ रक्त. ४ पृथ्वी. ५ हत्तीवर. ६ आपला भयंकर हत्ती. ७ डोकें. ८ हत्ती.

भीम गमे मेला परि त्याच्या पोटातळीं दडाला हो ॥
तो चित्तांत ह्मणे बहु मदलाभें ताप या जडाला हो ॥४८॥
भ्रमला कुलाल-चक्रा- सम नाग धरावया लपाल्याला ॥
जरि तो प्रवर्तला श्रित- नाशीं मदमत्त न त्रपा त्याला ४९
सत्वर निघोनि पळतां धरुनि करें कंठ दे उरीं गुडघे ॥
चीत्कार करी जाणों पतिला चाटावया ह्मणे गुड घे॥५०॥
बंधापासुनि सुटला वेगें भीम भ्रमोनियां उठला ॥
शुंडा तसि होय बळें जसि पडली साधुच्या गळां कुलटा५१
पोटातळीं पुन्हां त्या द्विप-पतिच्या तो पृथा-सुत लपाला ॥
वाटे जनासि ह्मणती कवि एक बळी वृथा सुतल-पाला ५२
भीम निघे दृष्टिपुढें येतां निज-गज-घटा शिरे तींत ॥
श्रम होय सुप्रतीका जैसा नटतां नटासि रेतींत ॥ ५३ ॥
जन ह्मणति नवल साहुनि वज्राघातासि भीम नग जाला ॥
कीं या भगदत्ताच्या देवगजाचेंहि भी मन गजाला ॥ ५४ ॥
वेष्टिति भगदत्ताला पांडव होऊनि एकवट सारे ॥
तेव्हां सुर ह्मणाति अहा गमतो जलधींत एक वटसा रे ५५ ॥
मुनि ह्मणाति या बलीं हा गज त्या सिंधूंत जेंवि मंदर तो ॥
एवंविध रण-यज्ञ त्यागुनि यज्ञांऽतरांत मंद रतो ॥ ५६ ॥
बहु भग्न चूर्ण केलें बल त्या भगदत्त-सिंधुराऽग्रानें ॥
वाटे गज बुडवितसे प्रलय समय-मत्त-सिंधु रागानें ॥ ५७ ॥
भीम रथीं बैसुनि ये त्यावरि फू करुनि तो थुकी उडवी ॥

१ मी न सांपडल्यामुळें. २ लाज. ३ सोंडेनें. ४ दुर्वृत्त स्त्री. ५ पाताल—पतीला. ६ समूह. ७ भगदत्ताचा हत्ती हाच कोणी पर्वत त्यानें.

बुडवी भयांत वाजी   पळवी धांवुनि सहाय बहु तुडवी॥५८॥
गज-गर्जितें धनंजय   समजे भगदत्त-कृत्य चित्तांत ॥
होय बहु विकल कीं बुध   लुब्ध यशीं कृपण जेंवि वित्तांत५९
कृष्णानुमतें भंगुनि   भुलवुनि निज विशिख-भव-तमीं परते ॥
मोहूनि सुशर्म्यातें   सोदर-शोकें शरें विजय परते ॥ ६० ॥
कुरु-कटका तप्त करी   पार्थ ग्रीष्मीं जसा पतंग[१] जगा ॥
तों प्रेरिला तयावरि   भगदत्तें काळसा मतंगज गा ॥ ६१ ॥
देव गजासि ह्मणे रे   गर्व अयःस्तंभ-सम-रदा[२] न वहा॥
हा मत्सख नर सिंहचि वज्रधराऽसह्य[३]-समर दानवहा[४] ॥ ६२ ॥
होय पुढेंचि न मागें   पार्थशराहतहि शतमखसख[५] सरे॥
मुनि ह्मणति अर्जुनीं तव   शक्ति जसी सागरांत खसखस रे॥
हाणी वज्र-प्रतिम   प्राग्ज्योतिष-वीर-राय[६] तोमर तो॥
भगवत्प्रसाद सुकवच   त्याला जो साधु काय तो मरतो६४॥
प्रकट करूं दे समरीं   श्रीदेवी जेंवि सैरिभासु[७] कला[८] ॥
तेंवि विजय-चापलता   मग दवडी दूर वैरि भा[९] सकला॥६५॥
विजय-विशिखार्त[१०] होतां   पूर्वीं दुष्करहि आयकोन करी ॥
भगदत्ताचें कथिलें   अधनाचें जेंवि बायको न करी ॥ ६६ ॥
शस्त्रें सरतां आला   पार्थ-विमथनार्थ अंकुश मनाला ॥
विष्णवस्त्रें अभिमंत्रुनि   सोडी हरि जेंवि रंकु-शमनाला[११] ॥६७॥

---

१ सूर्य. २ लोहस्तंभाप्रमाणें ज्याचें दांत आहेत अशा. ३ इंद्रालाही असह्य आहे युद्ध ज्याचें. ४ दैत्यांस मारणारा. ५ इंद्राचा सखा. ६ प्राग्ज्योतिष नामक नगराचा राजा. ७ महिषासुराला. ८ ( युद्धांत ) कौशल्य. ९ शत्रूंचें तेज. १० अर्जुनाच्या बाणांनीं पीडित. ११ सुवर्ण-मृगाला मारण्याकरितां.

प्रभुनें अनिवार्य ह्मणुनि वक्षःस्थलं अंकुशास वोढविलें ॥
अत्युग्र वैष्णवाऽस्त्रा- पासुनि निजमित्र-रत्न सोडविलें॥६८॥
होऊनि वैजयंती अवलंबी अस्त्र विष्णुचें उर तें ॥
त्या अंकुश-प्रहारें न निमेषाहि वक्ष जिष्णुचें उरतें ॥ ६९ ॥
हें नेणुनि पार्थ ह्मणे वोढविलें अंकुशासि कां उर गा ॥
सुर गाती अनृत मला गरुड न खंडील कोणत्या उरगा ७०
कां भीसी भय कैचें मज असतां त्वत्प्रसाद-पवि-कवच[3]॥
भक्तःप्रणश्यति[4] न मे हें कीं वदलासि तूंचि भविक[5]-वच ॥
समयीं न आठवूं दे हे वत्सलता गुरुप्रतिज्ञा ते ॥
काय व्यास-पराशर- मुख[6] ह्मणतिल तुज गुरुप्रति ज्ञाते ७२
देव ह्मणे भूतें[7] स्यां दिधलें याच्या पित्यास रक्षाया॥
तें वैष्णवास्त्र झालें दाय[8] तसें प्राप्त युद्ध-दक्षा या ॥ ७३ ॥
या अस्त्रें अभिमंत्रित भगदत्तांऽकुश तुला न सोसवता॥
अथवा तुझेंचि उर हें भाव सख्या त्वन्मनीं नसो सवता ७४
अस्त्र-बल-रहित झाला जय तुज देतो मरोनि भगदत्त ॥
होसिल सकल-रिपु-क्षय- कर तुजहुनि अधिक काय मग दत्त
आधीं पट्ट च्छेदीं त्या वृद्धाचीं मिळोत बा पातीं ॥
दुर्जय सुरासुरांसहि तुजही जों लागलीं न बापा तीं॥७६॥

१ पुढें केलें. २ विष्णूच्या गळ्यांतील माळा. ३ तुझा प्रसाद हेंच वज्रतुल्य कवच. ४ माझा भक्त नाश पावत नाहीं. ५ मंगल उक्ति. ६ आदिकरून. ७ पृथ्वीला. ८ पितृधन. ९ दुजा.

मारी भगदत्तातें खंडुनि तत्पक्ष्मबंधन करीतें ॥
गुरु-वचन-रत्न डोळस मान्य करी मान्य अंध न करी तें७७
प्रभुनें हूं वध ह्मणतां वधिला पार्थें महेंद्र-सख चुलता ॥
उलता शोकें परि गुरु- बोधें बाधों दिली न आकुलता॥७८॥
गांधार-रथ खवळले पाहुनि त्या पार्थ-शर-विपन्नास ॥
तेही वधिले विजयें सिंहें गज जेंवि तेंवि पन्नास ॥ ७९ ॥
तेव्हां तुमचे शालक वृपक अचल फार तापले रागें ॥
नागें मूपकसे ते वधिले एके शरें महाभागें ॥ ८० ॥
झाले सुयोधना जरि शोकद शर-दलित-काय मातुल ते ॥
तरि धन्यचि देवांसीं सुचिरहि वांचोनि कायमा तुलते ८१॥
यत्न करी शकुनि कपट- शर-दहनीं पार्थ-काय होमाया॥
त्याच्या चालों देइल भगवत्सख पार्थ काय हो माया ॥८२॥
माया-क्षय-भीत शकुनि सूतासि ह्मणे रथा पिटाळावें ॥
जरि रण-मरण हित अहित- मर्दन-कामें तथापि टाळावें ८३॥
जो नील भूप दावी बल हरिचें मृग-कुलांत शिरत्याचें ॥
हटकुनि तटकरि तोडी भटतिलक द्रोण-पुत्र शिर त्याचें ८४
कर्णापुढेंचि वधिले त्याचे भीमानुजें तिघे बंधु ॥
सिंधु अगस्त्याऽच्मना न पुरे पुरतील काय मग अंधु॥८५॥
दुसरे दिवशीं गुरु-शर-निकरें बहु धर्म-वाहिनी आटे ॥

१ ( वार्धक्यामुळें खालीं पडून राहणारीं ) त्याच्या डोळयाचीं पातें वर उचलून धरणारें बंधन. २ अग्नींत. ३ शत्रूंस मारूं इच्छिणागनें. ४ कृप. ५ सेना.

कुरु-कटकासि किरीटी स्पष्ट कटु-कुठार-पाणिसा वाटे ८६॥
गुरुनें कर्णादि जगद्- गुरुनें धर्मादि रक्षिलें पार्थ ॥
विश्वाच्या यश केलें कर्पूर-सुचूर्ण अक्षि-लेपार्थ ॥ ८७ ॥

---

# अध्याय ३.

## तृतीयदिनयुद्ध.

तिसरे दिवशीं प्रातः- कालीं वंदन करूनियां राजा॥
द्रोणासि ह्मणे गुरुजी कां आशा-भंग करितसां माजा ॥१॥
प्राप्त युधिष्ठिर झाला असतां धरिला तुह्मीं न कां काल ॥
झांकाल तपन नयनें तेजें काळासही न वांकाल ॥ २ ॥
आत्माहि उपेक्षावा परि रक्षावाचि बोल संतानीं ॥
झाला भक्त-मनोरथ न गुरुजनीं कीं न फोल संतांनीं ॥ ३॥
सगळी तिकडेचि असे तुमची इकडे नसे कृपा लेश ॥
ऐसें नसतें तरि तो कां मरता शक्र-सखे नृपालेश ॥ ४ ॥
द्रोण ह्मणे त्यजुनि कुमति सन्मतिसीं करुनि संग रम राया
निंदिसि कां तुजकरितां जरि सजलों वरुनि संगर मराया
त्रिभुवनहि न जिंकिल हरि- सखे-रक्षित धर्मनंदना सत्य ॥
हे अजित कृष्ण साक्षा- न्निजजन हृद्रोग-कंद-नासत्यें॥ ६ ॥
जेथें जगदुत्पादक केशव तन्मित्र विजय सेनानी ॥
तेथें नर-वीरांच्या साधावा विजय काय सेनांनीं ॥ ७ ॥
एक त्र्यंबक वर्जुनि इतर सकल पुरुष जरि बलनदीप ॥

---

१ डोळ्यांतील अंजनाकरितां. २ भगदत्त. ३ कृष्णाचा मित्र अर्जुन, त्यानें रक्षिलेला. ४ कृष्णार्जुन. ५ अश्विनकुमार. ७ बलसागर.

तरि दीन हरिपुढें ते  दाखवितिल रविपुढें बल न दीप॥ ८॥
पाडीन निश्चयें मी  कोणा एका महा-रथा आजी ॥
गातील जिला सत्कवि  ऐसी होइल सर्वथा आजी ॥ ९ ॥
परि हटकुनि दूर तुह्मी  त्या पार्था वीरसत्तमा न्या हो ॥
योग कथासी प्रबला  ऽरिलय-कथा हेहि दत्तमान्या हो १०॥
ऐसें वदोनि चक्र-  व्यूह सुदुर्भेद्य युक्तिनें रचिला ॥
जो धीर-वीर-हीर-  प्रवर-प्रकरेंकरोनियां खचिला ॥ ११ ॥
प्रभुला ह्मणे भरार्ता  भू ज्यातें करुनि बोध वळवा जी ॥
संसप्तक माराया  जाय हटकितांचि तो धवलवाजी ॥ १२ ॥
चक्रव्यूहामध्यें  भूप पुढें द्रोणगुरु-महातेजा ॥
अढळ सदाश्रय ह्मणउनि मेरु असें ह्मणति कवि पहाते ज्या १३
व्यूहातें भेदाया  धर्म झटे करुनि यत्न सानुजनीं ॥
परि लोपवि प्रतापा  गुरु तपना जेंवि रत्न-सानु जनीं॥१४॥
धर्म ह्मणे सौभद्रा  दुर्भेद्य व्यूह यत्न चालेना ॥
व्यूहपुरःस्थित अस्मत्-  गुरु कुरु-कटकेश लेश हालेना१५॥
गुरुनें सकल पळविले  गज जेंवि मृगेश्वरें समन्यूनें ॥
पूर्ण गुरुदया नव्हतां  व्हावें कैसें तयासम न्यूनें ॥ १६ ॥
तत्काल मातुलें कीं  भेदावा व्यूह हा तुझ्या तातें ॥
पांडिस जें तयांचें  तुज पाठ असेचि वा सुजाता तें ॥ १७॥

१ युद्ध. २ शत्रूंच्या नाशाची कथा. ३ बलाढ्य वीर हेच उत्तम हिरे त्यांच्या समूहानें. ४ दुष्टांच्या भारानें त्रासलेली. ५ अर्जुन. ६ धाकट्या भावांसह. ७ सूर्यास. ८ मेरुपर्वत. ९ व्यूहाच्या द्वारावर असलेला. १० रागावलेल्यानें. ११ मामानें (कृष्णानें).

ह्मणतिल ह्मणोत, पर पारि ह्मणेल,मज समक्ष यदुप हा साधू
ह्मणुनि व्यूह विभेदुनि वा स्वयशें तूंचि मदुपहासा धू.१८॥
अभिमन्यु ह्मणे चिंता करितां हे व्यर्थ काय हो तात ॥
या वाक्यें बहु लज्जित कीं हे तुमचेचि पाय होतात ॥ १९ ॥
तातें कथिला आहे दुर्भेद्य-व्यूह-भेदनोपाय ॥
शिरतों भय काय मनीं आहेत सहाय राय हे पाय ॥ २०॥
व्यूहीं शिरेन शरसा मागें परतेन एक पदही न ॥
युष्मत्पद-प्रसादें होतिल युष्मत्सपत्न[1] मदहीन ॥ २१ ॥
धर्म ह्मणे त्वद्रचित- द्वारें आह्मी समस्त हे मागें ॥
येतों रक्षाया, तुज द्यावें स्वस्थैर्य धैर्य हेमागें[2] ॥ २२ ॥
मारुति ह्मणे शिरे आहि- रदरचितें[3] जेंवि तद्विष द्वारें ॥
त्वन्निर्मितें शिरेन व्यूहीं टिकिजेल न द्विषद्वारें[4] ॥ २३ ॥
सौभद्र ह्मणे शिरतों व्यूहीं,डोहीं जसा मतंगज[5] वा॥
हरि-पोत[6] दंति-यूथीं-[7] कीं दहनीं[8] करुनियां पतंग जवा॥२४॥
जें करिन आजि होइल पितृ-मातुल-सुचरितानुरूपचि[9] तें ॥
क्रव्यादांला[10] खाया देइन उधळुनि बळें कुरूपचितें[11][12] ॥ २५ ॥
ज्येष्ठपित्याला देउनि अभय ह्मणे तो सुवीर सूतातें ॥
हं हांक रथ, ह्मणावी माय सुभद्रा सुवीरसू[13] तातें ॥ २६ ॥

---

१ तुमचे शत्रु. २ मेरूनें. ३ सर्पाच्या दांतानें केलेल्या. ४ शत्रुसमूहानें. ५ हत्ती. ६ सिंहाचा छावा. ७ गजसमूहांत. ८ अग्नींत. ९ पिता-अर्जुन व मातुल-श्रीकृष्ण यांच्या चरितास योग्य १० मांसभक्षकांस. ११ सैन्यें. १२ दुर्योधनानें जमविलेलीं. १३ उत्तमवीरमाता.

तो सूत सुमित्र ह्मणे भो आयुष्मन् कुमार आपण कीं ॥
हाकिन हरि अरिवरि परि कुरुगुरुशीं गांठि कठिन ह्या पणकीं
हांसुनि सौभद्र ह्मणे हटकीन हठें रणास भीमातें ॥
शक्राऽर्जुन-कृष्णांशीं करितां समर न शिवेल भी मातें २८
द्रोणानीका मानू जन सागर मजहि सत्वरा मकर ॥
घे काय न्यायपर- स्वच्छात्र-नदीज-सत्व राम-कर ॥ २९॥
तन्निर्बंधें नीटचि चालविला रथ विमानसा सूतें ॥
देती प्रभूक्तितें श्रित- मति कुलजा जेंवि मान सासूतें॥३०॥
भीमादि सबळ सर्वहि ते उठले व्यूह-कोट फोडाया ॥
इकडुनि कौरव-कटकहि होय पुढें शत्रु-सैन्य मोडाया॥ ३१ ॥
रथ थडकले भडकले हय शस्त्रजवन्हि धडकले वरते ॥
अन्योन्य द्व्यंगुलही राहों देती न धड कलेवर ते ॥ ३२ ॥
पावत असतां दोन्ही करुनि सुतुमुलाहवास वध सेना ॥
व्यूहीं शिरे गुरु पुढें चित्तींहि जयांत वासव धसेना ॥ ३३॥
व्यूहीं गमे सुभद्रा- सुत गज-यूथांत जेंवि बाल-हरी ॥
त्यावरि पडल्या सेना त्या मंथाद्रिवरि जेंवि बा लहरी ॥३४॥

---

१ घोडे. २ शंकराला. ३ द्रोणाच्या सैन्याला. ४ त्वरायुक्ताला. ५ न्यायनिष्ठ जो आपला शिष्य भीष्म, त्याचें सत्व. ६ परशुरामाचा हात. ७ त्याच्या आग्रहानें. ८ आश्रितांच्या बुद्धि. ९ कुलीन कन्या. १० व्यूहरूप किल्ला. ११ शस्त्रावर शस्त्रें आपटून निघालेले अग्नि. १२ शरीर. १३ अतिभयंकर युद्धास. १४ इंद्र. १५ सिंहाचा छावा. १६ मंदरपर्वतावर.

बहुताशीं एकाकी सौभद्र कलह करी समुत्साहें ॥
असकृत् सूतासि ह्मणे सुयशस्कर समर हो समुत् साहें ३५॥
तच्चापलतेसि दुजी दावील श्रीस काय मद नारी ॥
वाटे करितो कौरव- संहार मनुष्य[4]-काय मदनारी[5] ॥ ३६ ॥
मूर्त वसंत गमे तो गमति रिपु विपन्न[6] ते करीरागं[7] ॥
कुरु-कटकीं पशु-निकरीं श्रीरुद्र तसाचि तो करी राग॥३७॥
समरीं बालासि ह्मणे रक्तप[8] गगनींच करुनि आ वर्ते ॥
किंबहुना हय रथ गज गिळिले शोणितनदींत आवर्ते ३८॥
तेव्हां त्वत्पुत्रांचीं वदनें झालीं रणांत शुष्क रसें ॥
शोभे विजयोत्साहें अभिमन्यु-मुख प्रफुल्ल-पुष्करसें ॥ ३९ ॥
दुर्योधन स्वयें मग सौभद्र-वधार्थ धांवला कोपें ॥
कलभ-मथन[9] हरिसि तसें- त्याला तें कर्म वाटलें सोपें ॥ ४०॥
तैं द्रोण ह्मणे भट हो राक्षिति सुर जेंवि तारका सुरसा[10] ॥
रक्षा, अभिमन्यु नहो गुहसा[11], कुरु-राज तारकासुरसा॥ २१॥
भूरिश्रवा शकुनि कृप कृतवर्मा कर्ण शल्य यांसहित ॥ ॥
धांवे ससुत गुरु कसें होऊं देइल समक्ष तो अहित ॥ ४२ ॥
सोडविला नृप जेव्हां होय नृपा शस्त्र-मय नभ क्षण हो ॥
करितेंचि त्या स्मराचें तत्तेजोरुद्र-नयन भक्षण हो ॥ ४३ ॥
आठवला जो मारुति- पासूनि सुटोनि वांचला तरणी[12] ॥
बसती कुरुप[13]-शिरीं पर- शर-शनिची तेधवांच लात रणीं ४४

१ मोठ्या उत्साहानें. २ वारंवार. ३ मोठ्या आनंदानें. ४ मनुष्यदेहधारी. ५ शंकर. ६ विपत्तींत पडलेले. ७ नेप्तीचे वृक्ष. ८ राक्षस. ९ गजबालकाचें मर्दन. १० अमृताला. ११ कार्तिकस्वामीसारखा. १२ सूर्य. १३ दुर्योधनाचे शिरावर.

सुप्तोत्थित हरिसा तो क्षघडी होउनि विमोह दृष्टीतें ॥
स्व-विशिख-निकर-समीरें उडवी बहु शस्त्र-शत्रु-वृष्टीतें ४५॥
नृप न दिसतां ह्मणे हा गेलों खाया करूनि आ जवळ ॥
तों कवळें पळविला कीं पावेलचि आज लाज आजवळ ४६
सौभद्र बहु क्षोभे गर्जे पाहूनि कवळ हरित्यातें ॥
जाणों अपराधी गज हटकी दापूनि जवळ हरि त्यातें ४७॥
त्या सिंह-नाद होय व्याला पुच्छीं जसा पद-न्यास ॥
वेष्टुनि हाणिति सर्वांहि देखवतेंही न तें तदन्यासें ॥ ४८ ॥
प्रभुचा मर्मीं हाणी सर्वांसाहि तीन तीन शर भाचा ॥
वाटे बहु सिंहांशीं समर करी कुपित पोत शरभाचा ॥ ४९॥
द्रोण-द्रौणि-कृपादि प्रबल बहु भटांसही न तो आटे ॥
फाटे तद्दृष्टिपुढें बल जलदीं मूर्तवातसा वाटे ॥ ५० ॥
होय पुढें अश्मक-पति कीं तत्तेजें न वीर करपोत ॥
खंडी तद्धय सूत ध्वज धनु भुज शिर सलील नर-पोत ५१॥
पडतांचि अश्मकेश्वर कर्ण-द्रोणादि करिति शर-वृष्टी ॥
फल्ल-पलाश-श्री तो निववी भिववी सुरांधि पति-दृष्टी॥५२॥
भेदुनि शरें उरःस्थळ चळचळ बल-जलधि कर्ण कंपविला ॥
मूर्छित करूनि मद्रप सौभद्रें तत्प्रताप संपविला ॥ ५३ ॥
एकें सुषेण वधिला बाणें एकेंचि दीर्घ-लोचन हो ॥

१ निजून उठलेला. २ आपल्या बाणसमूहरूप वायूनें. ३ ग्रास ४ सर्पाला ५ त्याहून दुसऱ्यास. ६ सैन्यरूप मेघांत. ७ लीलेनें. ८ अर्जुनपुत्र. ९ फुललेल्या पळसाची शोभा आली ज्याला, तो. १० इंद्राच्या दृष्टीला.

एकेंचि कुंड भेदी गमले त घूक तो [1]विरोचन हो ॥ ५४ ॥
मानी वीर पळाले गुरुनेंहि निवारितां तडक राया ॥
स्यंदन शीघ्रहि पिटितां सांगति सूतांसि तांतड कराया ५५ ॥
झाला पुढें महाबळ शल्यानुज जो तयास तो खपवी ॥
होय जयापरि पावुनि [2]पर्वत-पाटन-जया स[3]तोख पवी ॥ ५६ ॥
मर्दी मद्रप-कटका असुरबला जेंवि [4]तारकाराती ॥
रोधिल काय परचमू त्या तो पूर्णावतार [5]कारा ती ॥ ५७ ॥
सप्रेम पार्थ-पुत्रा- प्रति पाहुनि तत्पराक्रमें डोले ॥
कुरुपति परिसत असतां द्रोण कृपाशीं कृपा-भरें बोले ५८ ॥
हर्षवितो मज पुत्रा- हूनि नव्हे हा कुमार सामान्य ॥
धन्या सती सुभद्रा नंदन जीचा कुमारसा[6] मान्य ॥ ५९ ॥
मारावें सकळहि बल परि सुज्ञा तत्व वद न कां मारो ॥
वाटे धृत-रण-कुतुका[7]ऽ च्छादित-बहु-बाहु वदन कामारी ६० ॥
कुरुराज ह्मणे कर्णा कुरुगुरु पळवील अंतकालाहीं ॥
गरुडापुढें यमो[8]ग्रहि काय न पावेल अंत काला[9]हीं ॥ ६१ ॥
परि झाला त्या शिष्य- स्नेहानें मूढ हा तपोराशी ॥
स्तवितो भाट तसा कीं वाटे जोडील हात पोराशी ॥ ६२ ॥
बाला दिलें बल जसें द्यावें दहनाचिया ल[10]वां वातें ॥

---

१ सूर्य. २ पर्वताच्या भेदनानें होणाऱ्या जयाला. ३ सहर्ष. ४ कार्तिकस्वामी. ५ बंधनालय. ६ कार्तिकस्वामीसारखा. ७ धरलेल्या युद्धाच्या इच्छेनें आच्छादिले आहेत बहु (दहा) बाहु आणि वदनें (पांच) ज्यानें, तो. ८ यमाप्रमाणें उग्र. ९ कालसर्प. १० कर्णाला.

हें पाळावा पदरें   जेणें तेणेंचि मालवावा तें ॥ ६३ ॥
गुरुनें करुनि उपेक्षा   केला दुःसह असाध्य आमयसा ॥
पसरिल न जग गिळाया   रुद्रप्रियभूत कोण आ यमसा ६४
दुःशासन बोले जड   काय मदनहानिकामें उग्रासें ॥
मद्वाहुराहुचा शश-   धरसा शिशु हा निका मउ ग्रास॥ ६५॥
आहे मच्छरनिकरा   अवगत पांडित्य जें अजगरा तें ॥
या असुहृदपत्यातें   गिळिल ग्रासी जसा अजं गरातें ॥ ६६॥
मरतिल सकृष्ण पांडव   धीरहि ते सोडितील आवास॥
आवास अंतकाचा   प्रिय-शोक   हरिस ह्मणेल आ वास ६७
एक-क्षणें समस्त-   क्षय होय असें पहा कसें करितों ॥
सौभद्र-मस्तकासह   आतां निज-कटक-संकटा हरितों ॥ ६८॥
ऐसें बोलुनि धांवे   विधुसि गिळायासि जेंवि राहु निघे ॥
[10] कार्ष्णि ह्मणे ये देतों   सच्छल[11]फल पलें[12] समोर राहुनि घे ६९
[13] सर्वंसहेसही बहु   देतो खल-कार्य[14]-भार ताप सदा ॥
ताता भीमाचें हें   नोहे बल काय भारतापसदा[15] ॥ ७० ॥
माझे न पावतिल तव   हननें साधूंत व्हीप्रति ज्ञाती ॥
जरि खल ह्मणतिल भग्ना   आह्मी साधूं तरी प्रतिज्ञा ती ७१॥
आत्मा पुत्र असें हें   श्रुतिचें मत भीम तात हा तनय ॥

१ रोगसा. २ मदनाचा नाश इच्छिणारा. ३ शंकराला. ४ चंद्रसा. ५ चांगला. ६ शत्रूच्या पुत्राला. ७ शंकर. ८ धैर्याला. ९ स्थान. १० अभिमन्यु. ११ साधुच्छलाचें फळ. १२ पळभर. १३ पृथ्वीला. १४ दुष्टाच्या देहाचा भार. १५ भरतकुलांत अधमा.

श्रुतिकिंकरांसि देवां- धर्मासह जोडितात हात नय ॥ ७२ ॥
परिमुनि धिक्कार रणीं मानी रथ चाप कां न नीट करी ॥
गमले जमले क्रुद्ध- द्विप मारायासि काननीं टक्करी ॥ ७३ ॥
सक्षत तव सुत गमला पुष्पांनीं दाटला पळस साच ॥
मूर्छित ह्मणुनि पळवितां सूतानें वाटला पळ ससाच ॥७४॥
धर्मादि सर्व आले दुःशासनपरिभवें परम हर्षी ॥
ज्ञानें मोहपराभव होतां जैसे तपःपर[1] महर्षी ॥ ७५ ॥
धांवति सहाय व्हाया सौभद्रा द्रोणसैन्य फोडूनी ॥
सोडूनि विशिख-वृष्टिसि सारूं पाहति परांसि मोडूनी ॥७६॥
भूप ह्मणे कर्णा शिशु झटले जरि भट समस्त न निवारे ॥
स्वभुजांसि ह्मणे सुरिंचे[2] आलिंगुनि घटसम स्तन निवारे ॥७७
तूं या धनंजयाच्या[3] शर-वर्षें शमविशील फुणगीतें ॥
घेशिल चित्तावरि तरि भुलविशिल सुर स्व-कीर्तिगुणगीतें
शस्त्रास्त्रवृष्टि करितां घन कर्ण गमे सुवर्ण[4]-नग वाळ ॥
किंबहुना व्यासेतर[5]- रचित सविस्तर सुवर्णन गबाळ ॥७९ ॥
शस्त्रें अस्त्रें छत्र ध्वज धनु खंडुनि वधूनि अनुजातें ॥
राधेयातें पळवी सौभद्र कुमार जेंवि दनुजातें ॥ ८० ॥
व्यूहीं शिरतां पांडव- वारण केलें जयद्रथें बा तें॥
हरवैर[6]कृत्य, जलधितें करिल प्रभु थेंब जलधि थेंबातें॥८१ ॥

---

१ तपोनिष्ठ. २ देवांगनांचे. ३ अग्नीच्या, पक्षीं-अर्जुनाच्या. ४ मेरुपर्वत. ५ व्यासावांचून इतरानें रचिलेलें. ६ शंकराच्या वराचें कृत्य.

वसुषेणसूत नरंजें वधितां झाले रणीं चपळ वाजी ॥
जाणों परस्पर ह्मणति जाऊं द्या यश धणीच पळवा जी ८२
वधितां वशात्य राजा तद्भट काळें मुखांत लपवीले ॥
शल्यज रुक्मरथसहित तत्सखशत-राजपुत्र खपवीले ॥ ८३
हरिशिशुवरि यूथ-वध- प्रकुपित-मदमत्त-यूथपालकसा ॥
धांवे कुरुप परि पुन्हां त्यासि न पळवील पार्थबाळ कसा ॥
अंध ह्मणे रे संजय हें त्या पौत्रास वर्ष सोळावें ॥
लोळावें मांडीवरि तेणें द्रोणादिकांसि घोळावें ॥ ८५ ॥
नपवे सुनीतिचें पर- मार्थाची वाट लेंकरूं काय ॥
सत्यार्चि कथिशी परि हें मज लटिकें वाटलें करूं काय ॥ ८६
संजय ह्मणे ह्मण अनृत भीष्माचा एकला पणतु मुलगा ॥
करिता झाला गुहसा बहुतांनीं वेढिला रण तुमुल गा ॥ ८७
कुरुसैन्यांत गमे ज्या- परि रंभाकाननांत वारा हो ॥
त्या विजयश्री देउनि परिरंभा कां न नातवा राहो ॥ ८८ ॥
समरीं स्मरोनि वदलों मी धन्य अधन्य विनयंधा तूतें ॥
काय कथूं कुरुगुरुसहि पळवि पळ त्यक्तविनय नातू तें ॥
लक्ष्मण धांवे जेव्हां द्रोणाद्यांखिलाहि सुयोध नावरती ॥
घननाद दशमुखावरि जी स्थिति घाली सुयोधनावर ती ॥

१ कर्णाचा सारथि. २ अभिमन्यूनें. ३ गजसमूहाच्या वधानें रागवलेला मदोन्मत्त असा गजपति. ४ पावत नाहीं काय? ५ सुनीति ही ध्रुवाची माता. ६ केळीच्या वनांत. ७ आलिंगनाला. ८ नेत्रहीनाला. ९ टाकिली मर्यादा ज्यानें तो. १० इन्द्रजित्.

हननंचि बहुमत झालें पहिलें तुमच्या न नातवा नातें ॥
वदनें न वानवे तारे शौर्य शिशूचें मनांत वाना तें ॥ ९१ ॥
कार्ष्णि ह्मणे ये शोकद हो ताता साधुगजन कुशीला ॥
आलें भानुमतीच्या मळवाया वंश अंजन कुशीला ॥९२ ॥
तूं त्या योग्य सुमित्रा- सुत धारि खलदुर्मिला सुनामा ज्या ॥
कांकी ह्मणत्ये लुसा करुत यशें उर्मिला सुना माज्या ॥ ९३
लक्ष्मण हें योग्य मला योग्य तुला मेघनाद हें नाम ॥
रावणसा बाप तुझा बा माझा शुचियशा जसा राम ९४॥
धिक् प्रथम मग करुनि रण वधिला लक्ष्मण किरीटितनयानें॥
हें पुत्रशोकविषफल दिधलें दुर्योधनासि अनयानें ॥ ९५ ॥
सुत मरतां भूप ह्मणे होईल अधर्म ह्मणुनि न चपापा ॥
सारे मिळोनि मारा राहों द्या एक पळहि न च पापा ॥९६ ॥
द्रोण द्रौणि बृहद्बळ कृतवर्मा कर्ण कृप असे सा हे ॥
वळले घनसे त्यांतें कार्ष्णि महावातसा न तो साहे ॥ ९७ ॥
कोंडूनि ह्मणत होते विझवूं मारूं दिवा जसा सा जे ॥
तो त्यांसि भंगुनि जय- श्रीयोगें श्रीनिवाससा साजे ॥ ९८॥
क्राथसुत मथुनि केला विरथ कृपाचार्य बा तुझ्या नातें ॥
कुरु कीर्तिद वृंदारकें वधितां स्मरलें न जातु ज्या नातें ॥

१ साधुच्छलका. २ खलांस दुर्मिळ अशा. ३ काकी-भानुमती. ४ इन्द्रजित्. ५ अर्जुनपुत्रानें. ६ भ्या. ७ पाप्याला. ८ विष्णुसदृश. ९ नातवानें: १० देव. ११ कदापि.

वधितां बृहद्बळातें म्हणती सुर सर्व कांपवीना कीं ॥
वज्रशताधिक याचे शर मिरवी गर्व कां पवी नाकीं १०० ॥
कर्णासमक्ष मारी त्याचे निधि यक्षवत् सचिव सा हो ॥
त्यासि म्हणे होउनि चिर वीर-सुगति-सुरभि-वत्साचि[1] वसा हो
कर्णाचा भंग करुनि मागधसुत अश्वकेतुला खरची ॥
प्रतिकूळ विधि तसा तो परबळ नाशार्थहेतु लाख रची ॥२
कालियसा दौःशासनि[2] करिन म्हणे त्या परासु[3], धीटांचा॥
प्रभु तन्मर्मी हाणी इषु, जैसा तो परां सुधी टांचा ॥ ३ ॥
त्यासि म्हणे सुत त्याचा कीं तूं नरकार्य[5] पापवनिं[6] रीसँ[7] ॥
जो झोंबला सतीच्या सोडाया सत्क्रियेसह निरीस ॥ ४ ॥
मज जिंकाया कैचें बल खलजन्मा[8] तुला निरी हातें ॥
सोडुनि अजितत्व जगीं एका सन्मातुला[9] निरीहातें ॥ ५ ॥
जैसा बाप पळाला तूंही तैसाचि पाप पळशील ॥
मळशिल अपयशें कीं आतांचि पतंगसाचि जळशील॥ ६ ॥
ऐसें बोलुनि सोडी दुःशासनसुतवधार्थ नाराचा[10][11] ॥
छेदी शरत्रयें कुरु- गुरु त्या मित्रा सुदर्शनाऽराचा[12] ॥ ७ ॥
ती शरहानि तया जशि हरिच्या नाकांत घातली काडी ॥

१ मरणोत्तर वीरास होणारी सुगति हीच कामधेनु, तिचे वत्स. २ दुःशासनपुत्र. ३ मृत. ४ श्रीकृष्ण. ५ मनुष्यदेहधारी. ६ पापरूपी वनांत. ७आस्वल. ८ खलापासून जन्म ज्याचा तो. ९ उत्तम मातुल श्रीकृष्ण यास. १० विरक्ताला. ११ बाणाला. १२ सुदर्शनाच्या धारेच्या.

द्रोणध्वज सौभद्र   च्छेदुनि तत्काल भूतळीं पाडी ॥ ८ ॥
शल्य पुढें होय तया   तत्काळ उरीं शरेत्रयें ताडी ॥
मंद्रप शर नव नवें नव-   नीत-मृदु-कुमारदारणा धाडी ॥९॥
विरथ करूनि पळविला   शल्य जसा तारकासुर कुमारें ॥
शत्रुंजयादि पंच   प्रबळ रथी मारिले मग कुमारें ॥ १० ॥
शकुनि ह्मणे कुरुनाथा   हा सर्वांहीं मिळोनि मारावा ॥
भ्याले यास भट जसे भीती गजशिशु मृगोत्तमारावा ॥ ११॥
मारिल एकैकातें   शरै-गोचर शूर कोण न खपविला ॥
मृदु-पूर्व परि न कंपद   काय नृहरि-रक्तशोणनख पाविला १२
द्रोणासि कर्णहि ह्मणे   गुरुजी मज तों नसेचि आवांका ॥
आवांका युक्ति ह्मणो   न तुह्मांसहि हा करूनि आ वांका १३
गुरुहि ह्मणे कर्णा हा   तक्षकचि गरल करूनि आ वमला ॥
आहें संकोचें परि   सोडुनि गेला मघांचि आवं मला ॥ १४॥
मज भंगुनिहि सुखविता   बा हा सामान्य काय गा बाळ ॥
उतरुनि सांडावा या-   वरुनी सर्वस्व कार्य गाबाळ॥ १५ ॥
याचा धन्य गुरु, जसे   धन्य प्रद्युम्नगुहकुशलवांचे ॥
न दिसे आज मज रणीं   जो सौभद्रापुढें कुशल वांचे॥१६॥

---

१ शल्य. २ नऊ. ३ नवनीताप्रमाणें मृदु जो कुमार अभिमन्यु, त्याच्या विदारणार्थ. ४ कार्तिकस्वामीनें. ५ सिंहगर्जनेला. ६ बाणाच्या तडाक्यांत सांपडलेला. ७ नरहरीचें रक्तानें लाल झालेलें नख. ८ धैर्य. ९ योजा. १० धैर्य. ११ देह.

स्पष्ट अभेद्य-कवच हा बीभत्सुकुमार अंगपा ल्याला ॥
कीं अभिनवाहि याचें त्यावें सुकुमार अंग पाल्याला ॥ १७॥
त्यां विजयासि पढविली विजयानें कवचधारणा तनया ॥
भेदुनि कवच करिल सुरें- पाहि तिल-तुल्य व्यथा रणांत न या
जरि इच्छिसि हत-सुत-कुरु- पति-शोक-प्रशम कार्ष्णिच्या पातें
तरि पाहूं पाड कसा आधीं तोडोनि कार्ष्णिचापातें ॥१९॥
कार्मुक-गुण-हय-सारथि- स्यंदन इतुकें अशक्य वापा हें ॥
जें यांत घडेल तुला तें तरि करि करुनि यत्न बा पाहें २०
अक्षतधनु तोंवरि हें वीरशिरोरत्न नावरायाचें ॥
यास्तव सर्वहि रक्षूं आजि करुनि यत्न नांव रायाचें ॥ २१॥
प्रभु वृत्रशिरासि जसा खंडी भयदायकास नाकाचा ॥
तसाचि कर्ण करिता होय तया सायकासना काचा ॥२२॥
मारी हरींस सहसा कृतवर्मा सारथीस गौतमही ॥
परि न गडबडे तो पितृ- मातुल-सम शुद्धकीर्तिधौतमही २३॥
सौभद्र विरथ होतां धर्मज्ञहि करिति शस्त्रवृष्टीतें ॥
तें निष्कपटत्व पाहुनि झांकिति बहु-सदय साधु दृष्टीतें ॥२४॥
ह्मणती ह्मणा मारा पाडा ह्या काय पाहतां तोंडा ॥
कोंडा प्राणव्यसनीं बाळ बुडो कर्दमीं जसा घोंडा ॥ २५ ॥

---

१ भेदण्यास अशक्य कवच ज्याचें तो. २ अर्जुनपुत्र. ३ हे कर्णा. ४ नूतन-कोमल. ५ कवच धारण करण्याची विद्या. ६ ७ मृत झाला पुत्र ज्याचा अशा दुर्योधनाच्या शोकाची शान्ति. ८ अक्षय आहे धनुष्य ज्याचें तो. ९ धनुष्याला. १० घोड्यांला. ११ कृपाचार्य. १२ पिता-अर्जुन व मातुल-श्रीकृष्ण यांच्यासारखा १३ शुद्ध कीर्तीनें शुभ्रवर्ण केली पृथ्वी ज्यानें तो.

तो खड्ग चर्म घेउनि अवलंबी वीरनायक विहाय ॥
संकट पडतां सोडुनि धैर्यासि ह्मणेल काय कवि हाय २६॥
पाहुनि गरुडा गमनीं धैर्य जसें काय काद्रवेयांचें ॥
तैसेंचि भगवदनुजा- तनुजा कुरुनायका ब्रवे यांचें ॥ २७ ॥
केवळ हृदयीं भ्याले जे जे त्या पविपरीस गाढाला ॥
शिरले रथातळीं मग घेतील शिरीं न काय गा ढाला २८॥
खड्ग क्षितिवरि पाडी द्रोण च्छेदूनियां नव रुसरुस ॥
चित्तीं ह्मणे न मज, तुज धन्य त्रिभुवन ह्मणो,न वत्स रुस२९
कर्ण करी चर्माचे श्रितविघ्नांचे जसे गणप टुकडे ॥
तरि पाहों हि न शकले वीर विशस्त्राहि त्या रणपटुकडे ३०
कार्ष्णि ह्मणे पळ इकडे पाहुत सज्जन, न पत्रिकेतुकडे ॥
चर्मापरि लिहिले कीं वपुचे मज्जननपत्रिके तुकडे ॥ ३१ ॥
शत्रुमुखींचें क्षितिवरि उतरुनि घेऊनि चक्र पाणि हरी ॥
भासे साक्षात् शिरला असुरसमूहांत चक्रपाणि हरी ॥ ३२ ॥
वारिति जसें प्रयत्नें एकमतें सर्व संत परचक्र ॥
कर्णद्रोणादि तसें खांडिति बहु तें स्वअंतपर चक्र ॥ ३३ ॥

---

१ ढाल. २ आकाश. ३ सर्पांचें. ४ भगवत्-श्रीकृष्ण, त्याची अनुजा, सुभद्रा तिचा तनुज अभिमन्यु, या.स. ५ दृढाला. ६ मुष्टीला. ७ श्रीगणपति. ८ शस्त्ररहिताला. ९ युद्धनिपुणाकडे. १० श्रीविष्णूकडे. ११ हे माझे जन्मपत्रिके. १२ तेज. १३ आपल्या नाशाविषयीं तयार झालेलें.

मग भेकमूपकां जें   क्षुधित क्रोधी महाभुजग दे तें ॥
दुःसह भय आह्मां दे   धरुनि करीं तो महाभुज गदे तें॥ ३४॥
तेणें हय सूत वधुनि   अश्वत्थाम्याप्रति प्रभावातें ॥
दावुनि हरिली कौरव-   दीप्ति जशी दीपकप्रभा वातें ॥ ३५॥
पाहुनि संमुख जेव्हां   धांवे सौभद्र सिंहसा रागें ॥
त्यजुनि रथोपस्थ सरे   गुरुनंदन तीन पाउलें मागें ॥ ३६॥
त्वा माते देवि गदे   धर्माहितमहिषकालिके यातें ॥
ऐसें ह्मणोनि मारी   तो सबलतनूज कालिकेयातें ॥ ३७ ॥
गांधार सप्तसप्तति   बाह्य-वसातीय-रथ दहा मथिले ॥
कैकेय वीर सप्त   द्विप दश हे मुख्य मुख्य मीं कथिले॥ ३८॥
केला चूर्ण सहय रथ   दुःशासनसूनुचा गदा-घातें ॥
साहे न परबलातें   जैसा हरिनाममनु गदाघातें ॥ ३९ ॥
बाहुप्रतापचरितें   दावी तो पार्थकार्यज गदी शें ॥
वाटे वर्तविला यम-सा यमकोपार्थ काय जगदीशें ॥ ४० ॥
त्या सौभद्रावरि बल-   सागर गरगर गदेसि फिरवीत ॥
दुःशासनसुत धांवे   निजभुजभुजंगप्रताप मिरवीत ॥ ४१ ॥
युद्धचमत्कार रुचिर   सुचिर प्रकटुनि महागद भ्राते ॥

१ बेडूक व उंदीर यांस. २धर्माचा शत्रु हाच महिषासुर, यास दुर्गादेवी. ३ सैन्य व पुत्र यांसह.४ सत्याहत्तर.५ हरिनाममंत्र. ६ रोग व पाप यांस. ७ अर्जुनपुत्र. ८ आपले भुज हेच भुजग (सर्प) त्यांचा प्रताप ९ फार वेळ. १० मोठ्या गदा ज्यांच्या ते.

अन्योन्यकृताऽघातें बा मूर्छा पावले अदभ्रां ते ॥ ४२ ॥
आधीं उठोनि उठतां सौभद्र-शिरीं प्रभो गदा घाली ॥
विवश करी ती दुष्परि-हार्या जेंवि प्रभोगदाघाऽली ॥ ४३ ॥
पडली जसी कराया प्रेक्षकसुर विरस मस्तकोऽपरि ती ॥
भूवरि सौभद्रतनुहि ओकुनि सरुधिरसमस्तकोप रिती॥४४॥
आधीं श्रम बहु झाला होता तो त्यांतही असावध हो ॥
केला दौःशासनिनें धर्म नय त्यजुनियां असा वध हो॥४५॥
प्रेक्षक सुर मुनि सज्जन बहु हळहळले किरीटिसुतपातें ॥
रडला पाहुनि सत्य- ब्रह्मज्ञहि नारदादिसुतपा तें ॥ ४६ ॥
ज्यांचा संकल्प प्रिय- सुतशोकें जिष्णुचे असु खपावे ॥
ते तव पुत्रचि झाले मुदित इतर अहितेंही असुख पावे॥ ४७॥
धर्म स्वभटांसि ह्मणे वृत्ति परमदुर्लभा असी मरणीं ॥
कां रडतां सौभद्रें वत्सें यश जोडिलें असीम रणीं ॥ ४८
चित्तींच पळांत ह्मणे शतदा बाहेर न बहुवेंस हाय॥
समजावुनि कटकातें धैर्यें शिबिरासि जाय ससहाय ॥ ४ ॥
कवच विकळ होउं न दे धर्मासि जसा तुरंगमा तंग ॥
सुतशोकाऽवश शिबिरीं जैसा सिंहा कुरंग मातंग॥ ५० ॥

---

१ परस्परांनीं केलेल्या प्रहारानें. २ पुष्कळ. ३ हे धृतराष्ट्रा. ४ अनिवार. ५ प्रभोग-द-अघ-आली=फार दुःख देणारी पापपंक्ति. ६ पाहणारे देव. ७ रक्तासहित सर्व कोप. ८ संतुष्ट. ९ शत्रुही. १० दुःख. ११ अमर्याद. १२ पुष्कळदा.

# अध्याय ४.

चतुर्थदिनयुद्ध.

धर्म ह्मणे हा हा म्यां मंदें दाटुनि कुमार मारविला ॥
बहुवीरसूंत[1] दिसल्या अधिक सुभद्रा उमा रमा रविला ॥ १ ॥
अर्जुन-कृष्ण-सुभद्रा-कृष्णा-कुंतीस काय समजावूं ॥
काळ न भेटे कैसा तद्वदनीं पुत्रकायसम जावूं ॥ २ ॥
अद्यापि उत्तरेचें मुख पीत असेल बहळ हळदीनें ॥
म्यां जीवें लब्धसंन्निधि[2] नाशें करिजेल न हळहळ दीनें ॥ ३ ॥
तुज उत्तरे मुलि दिला म्यां कापायास मान विश्वास ॥
कलिकाल काय बुडविल मज बहु-पापासमान विश्वास ॥ ४ ॥
कथिलें कसें असें मज धर्मा करवाल[3] काढ-कलहातें ॥
मृत्युमुखीं कुलकर-गुण-शर्माऽऽकर[4] बालका ढकल हातें ॥ ५ ॥
धर्माच्या सुतशोका शमवाया ये महातपा व्यास ॥
ज्या जोडिले त्रिभुवनें प्रभुच्या जैसेच हात पाव्यास ॥ ६ ॥
तो मुनि ह्मणे श्रुतिस्मृति- शास्त्रज्ञा पांडवा नकोचि रडूं ॥
शोकभरें प्राकृतसा बा कृतसाफल्य तूं नको चिरडूं ॥ ७ ॥

---

१ वीरमातांमध्यें. २ प्राप्त झालेल्या द्रव्याच्या नाशानें. ३ तरवार. ४ कुलवृद्धि करणारा, गुणांचें व सुखाचें स्थान अशा पुत्राला.

गेला उत्तमगतिला   पुरुषोत्तम तो जगीं असामान्य ॥
शोच्य नव्हे बा धर्मा   पुत्र असावा कुलीं असा मान्य ॥ ८॥
मृत्यु हरितसे समयीं   अमरांसहि कवण मृत्युला चुकवी ॥
ऐसें जाणुनि तत्व   व्यसनांत न मोह पावती सुकवी ॥ ९ ॥
धर्म ह्मणे हो गुरुजी   मजला मृत्युस्वरूप कळवा हो ॥
या तप्तावरि तुमची   सूक्तिसुधा[1]-सिंधु एक पळ वाहो ॥ १०॥
व्यास ह्मणे मी कथितों   इतिहास पवित्र तुज पवित्रास
बाधों न दे बुधा जो   शोक महेंद्रा जसा पवि त्रास ॥ ११॥
होता कृतीं[2] अकंपन   नृप तो हरि गांठिजे जसा हरिनीं ॥
तन्नंदन हरिसमबल[3]   हरिनामा मारिला रणीं अरिनीं ॥१२॥
शोकार्त तूं जसा मज   पुससि अकंपनहि नारदा नमुनी ॥
मृत्युस्वरूप सांगुनि   करि त्यातें मोहपार[4]-दान मुनी ॥ १३॥
जें तूं मज पुससि, पुसे   तेंचि अकंपनहि नारदा नमुनी॥
मृत्युस्वरूपकथनें   त्यासि करी मोहपार-दान-मुनी ॥ १४ ॥
पूर्वी बहुभारार्ता   ऐसें चतुरानना धरा विनवी ॥
वाटे भय, दाटे, नच   आटे किति म्यां प्रजा धरावि नवी १५
न सुचे युक्ति चतुर्विध[5]-   भूतग्रामासि संहरायातें ॥
कोपे ब्रह्मा जाणो   त्या भूतांचेंचि अर्ह[6] राया तें ॥ १६॥

---

१ सुवचनामृताची नदी. २ कृतयुगांत. ३ इंद्रासारखा बलवान्. ४ मोहाच्या परतीराचें दान. ५ जरायुज, अंडज, स्वेदज उद्भिज्ज ६ पाप.

तेव्हां विधिच्या रोम-　च्छिद्र-वदन-नयन-कर्ण-नाकानीं ॥
वमिला वह्नि अशा या　आइकतों कोपवर्णना कानीं ॥
वनं[1]वह्नि तृणासि तसा　भूतग्रामासि वह्नि तो कवळी ॥
रुद्र जगत्क्षयसमयीं　धांवुनि ये पद्मयोनिच्या जवळी ॥ १८
रुद्र प्रभुला प्रार्थुनि　लोकक्षयकारि तेज आव रवी ॥
इतर किती विनवाया　तेजस्वीही धरी न आव रवी ॥ १९॥
प्रार्थुनियां आवरवी　जेव्हां कोपानलासि मदनारी ॥
प्रकटे रक्ता कृष्णा　पिंगा सुरदृष्टिविभ्रमदे[2] नारी ॥ २० ॥
तो प्रभु सांगे ठेवुनि　मृत्यु असें नाम तेंचि काम तिला ॥
त्या उग्रनामकार्य-　श्रवणें होइल न खेद कां मतिला ॥२१॥
मृत्यु ह्मणे प्रभुजी हें　काय, बरें तेंचि कार्य करवा जी ॥
योजावा जन सुपथीं　धीरें वीरेंहि कार्यकर वाजी ॥ २२ ॥
ऐसें ह्मणुनि रडे कीं　गुरुहि सुशीलासि सोडवी पाणी ॥
प्रभु अश्रुबिंदु तीचे　न गळों दे क्षिप्र ओढवी पाणी॥ २३ ॥
द्रुहिण[3] ह्मणे मृत्यो तूं　माझ्या होशील मान्य उक्तीतें ॥
कीं जन्मलीस योजित　असतां संहार-हेतु युक्तीतें ॥ २४ ॥
लघु गुरु असें न ह्मणतां　ओढुनि घे सर्व जीव सरसकट ॥
जैसा गंधगजाचा[4]　मोहुनि हरितो अलींस सरस[5] कट[6] २५॥
माझ्या वरें तुला अघ　कोणीहि न लावितील अनघे[7]तें ॥

१ वणवा. २ देवांच्या दृष्टीला भ्रम पाडणारी. ३ ब्रह्मदेव. ४ ज्याच्या मदोदकाला सुगंध येतो असा गज. ५ रसयुक्त. ६ गंडस्थळ. ७ निष्पापेस.

ऐसें बहु समजावी परि न तिचें क्रूरकार्य मन घे तें ॥२६॥
करितें आज्ञा ऐसें स्पष्ट न वदतांहि देव हर्षविला ॥
तो पूर्वदग्धजीवां- वरि करुणामृतपयोद वर्षविला ॥ २७ ॥
एकें चरणेंचि उभी धेनुकनामाऽश्रमीं नृपा होती ॥
तप एकवीस पद्में तपली गमली खरी कृपा हो ती ॥ २८ ॥
त्यावरि चवदा वर्षें पुण्याऽरण्यांतही सती तपली ॥
मग अयुत पदा* मृगसह- चर्या करितां पितामहा जपली २९
जीचें अति शीतोदक त्या नंदेमाजि जी उभी हर्षें ॥
होती निजनियमातें संरक्षुनियां अशीतिशतवर्षें ॥ ३० ॥
तितुकेंचि कौशिकीच्या तीरांत तसेंचि पंचगंगांत ॥
वेतसकांतहि तपली जों ये केवल कृशत्व अंगांत ॥ ३१ ॥
तपली तुहिननगीं सुर- यजनस्थानींहि खर्व-वत्सर ती
तच्चित्तरति तपीं बहु जशि जननीच्या स्तनींच वत्सरती ३२
गंगातट-मेरु-मलय- पुष्कर-गोकर्ण-नैमिष-वनांत ॥
तपली धरिले तेजें उग्रनियम वाटले प्रिय मनांत ॥ ३३ ॥
भेटे प्रसन्न होउनि विधि आचरतां अनंत तप तीस ॥
स्मित करुनि ह्मणे मृत्यो कां दुर्धर नियम वरुनि तपतीस
मृत्यु ह्मणे कांपवितो प्राणिवधाऽधर्म ह्मणुनि तप वरिलें ॥
जगदीशा आमयं[1] मज द्यावे त्वां सर्व विनतभय हरिलें ३५
द्रुहिण ह्मणे न अधर्म स्पर्शेल मृषा नसेंचि विधिवाणी ॥
सति सद्गुरूपदेश न बुडवी कोणाहि अमृतनिधिवाणी[2] ३६

---

१ रोग. २ अमृतसमुद्रासारखा. * समा असा पाठ असावा.

मृत्यु ह्मणे जरि आग्रह तरि भूतांची अशीच हो हानी ॥
भेदावें प्राणिवपु द्रोहे-र्ष्या-क्रोध-लोभ-मोहानीं ॥ ३७ ॥
कर्माऽनुरूप दुर्गंग रोग प्राण्यांसि नित्य खातील ॥
तुज काम कोप सोडुनि करितां संहार साधु गातील ३८
तव अश्रुबिंदु धरिले रोगांचा तोचि होय हा निकर ॥
प्राण्याऽयुर्हानिकर ग्रीष्मीं रवि जेंवि तोयहानिकर ॥ ३९॥
संहारनिमित्त अशी मृत्यु विधिकृता अकंपना आहे ॥
रडतोसि पुत्रमरणें कां मृत्युग्रास सर्वही बा हे ॥ ४० ॥
करुणानीरदं नारद मुनिच्या वर्षोनि उक्ति गारा या ॥
देती अकंपनाला तापापासूनि मुक्ति गा राया ॥ ४१ ॥
सांगे शोक शमाया ऐसा इतिहास हा शुभ व्यास ॥
याच्या श्रवणें श्रोते निवृती पावोनि आशु भव्यास ४२
धर्म ह्मणे पुनरपि मज निववाया कीर्तिसत्सुधाभरितें ॥
चरितें राजर्षींची सांगा मन याचि सद्वरा वरितें ४३
व्यास ह्मणे जरि ह्मणसी श्रवणीं राजर्षिचरितरस ओता ॥
तरि ऐक श्वित्यनृपति- सुत सृंजय पांडुनंदना होता ४४
सख्येंकरूनि पर्वत नारद आला तया पहायाला ॥
संजय पूजी प्रेमें प्रार्थी सर्वस्वही वहायाला ४५
तों तत्सुता तयाप्रति येउनि वंदुनि पदें उभी राहे ॥
पर्वत ह्मणे नृपा रवि- भाँ कीं श्री कीर्ति कोण हे आहे ४६
भूप ह्मणे आली वरं- वर मागायासि पर्वता तनया ॥

१ मेघ. २ सुखाला. ३ सूर्यप्रभा. ४ पतिरूपवर.

हें कन्याऽकृतिचिंता- ह्रदिनीशत तरति सर्व तात न या॥४७
नारद ह्मणे नृपा मज योग्य जरि तुझें ह्मणेल मन दे हें॥
कन्यारत्न न केवळ अर्थिकरीं देति साधुजन देहें॥ ४८॥
भूप ह्मणे योग्य सुता- रत्ना तूं जेविं आनना रदन॥
कोण सुबुद्धि ह्मणेल स्वप्रियकर याग्य आन नारद न ४९
स्तव्याचि पिशाचसखा झाली जाणुनि सुपर्वता वरिती॥
स्तविते न ठेविती जरि मन हरिवरि कीं सुपर्वतावरि ती५०
पर्वत ह्मणे न कोणा तूं बहुकाळिहेतु वांकशी वरिली॥
गति तुज नसो मनें स्यां वरिली जी हे तुवां कशी वरिली
वाग्दानादिविधिविना हृदयें वरिली ह्मणोनि कशि भार्या॥
तुजहि मजाविना स्वर्गति न घडो कीं व्यर्थ दूषिसी आर्या॥
ऐसें परस्परांतें शापुनि सकलारिकाल बा हो ते॥
संजयसदनीं नारद पर्वत मुनि बहुत काल बा होते॥ ५३॥
ज्या ब्राह्मणांसि पूजित होता पुत्रार्थ भूप तो भावें
ते ह्मगति नारदा सुत- दीपें सृंजयनिशांत शोभावें॥ ५४॥
साशीं देवर्षि जसा प्रियपुत्राशीं सुखें वदे तात॥
तुज हे सुसंतति जशी सुजनासी जन सुखेंव देतात॥ ५५॥
बोल जसा तुज व्हावा ऋषिवरवचनें तसाचि सुत पाहें॥
सा सृंजयासि वदला होउनि बहुसुप्रसन्न सुतपा हें ५६
भूप ह्मगे विख्यात स्वायुधदहनांत अहित होमुनि हो॥

१ कन्यारूप चितानदीचें शत. २ याचकाच्या हातांत
३ शंकराला. ४ सर्व शत्रूंचे काळ. ५ सृंजयाचें घर. ६ इंद्रा
गन. ७ आपल्या आयुधरूप अग्नींत.

यन्मलमूत्रादि सकल कनक असा पुत्र मागित हो मुनिहो ॥
दिधला तसाचि वर सुत अद्भुत झाला तयासि तो जनक ॥
ठेवी नाम सुवर्ण- ष्ठीवि[1] असें तो हगे मुते कनक ॥ ५८ ॥
त्याचें कनकचि सारें मल मूत्र स्वेद लाळ सेंबूड ॥
कां न ह्मणेल तशाचे मोहीं ताताशि बाळसें बूड ॥ ५९ ॥
भाग्यभरें बहु भारी भासे सृंजयपुरी जशी अलका ॥
पर ईतचि धन वाढे ह्मणउनि दृष्टांत होय हा हलका॥६०॥
किं-बहुना कौंतेया बा अनुपायज्ञ[2]-लुब्ध-चोरांनीं ॥
चोरांनीं हरुनि बळें वधिला कनकार्थ बाल तो रानीं ६१
नृपति ह्मणे हा हा हे होइल मिथ्या शिशो कदा वार्ता ॥
निववील मज कवण तुझ्या कुशलसुधेंकरुनि शोकदावार्ता॥
नारद त्यासि ह्मणे गा तुज उचित नव्हेचि शोक तोकाचा
तो काचा स्पर्शमणि त्यागुनि जो काय वेंचितो काचा ६२
पणज्याला आज्याला न रडसि कृतपोषयत्नें[3]- बालाँहीं[4] ॥
श्रेयस्कर ते कीं हा विरहगरंद[5] सुगुणरत्न बालाहीं[6]॥६४॥
कथितों पुण्यतर तुझ्या पुत्राहुनि पुरुष एक त्यास रड ॥
कवि ह्मणति उगीचि शिरः- कंपसहाहि सूक्तऐकत्या सरड६५
होता यज्वा दाता शक्राहुनि लब्धरस मरुत्त[7] रणीं ॥
ज्याची सदुपायनियति इष्ट सुगाति तेविं न समरुत्तरणी[8] ६६

१. सुवर्ण हगणारा. २ उपाय न जाणणारे. ३ केला आहे पोषणाविषयीं यत्न ज्यानें तो. ४ बापाला. ५ वियोगरूप विष देणारा. ६ बालसर्प. ७ मरुत्तराजा. ८ वायुसहित नौका.

यज्ञ कराया प्रार्थी स्वर्गीं त्या स्वकुलगुरुवरा जीवा ॥
चुंबी शिरें पद-युगा जेविं मुखें तृषितमधुप राजीवा॥ ६७ ॥
सुरपति सोडुनि जाणें नृपयज्ञा उचित हें नव्हे मातें ॥
ऐसें मनांत आणुनि जीव उपेक्षी तया शुचितमातें ॥ ६८॥
भेटे नारद त्याला फिरतां पावोनि फार खेदास ॥ ॥
ऐकुनि वृत्त ह्मणे हो लेखावे सर्व सारखे दास ॥ ६९ ॥
सांगे सुरर्षि आहे गुरुबंधु तदीय-वृत्ति पैशाची ॥
संवर्त नाम त्याचें त्यासि यशाची स्पृहा, न पैशाची॥७०॥
वाराणसी शर्वा शिव- धी तो वळखावयासि हे खुण गा ॥
वळखावा बहुयत्नें अतिकृपणाचा नृपा जसा कुणगा॥७१॥
वाराणसीपुरीच्या द्वारीं मांडूनि कुणपें उमगावा ॥
पुसतां दहनीं शिरलों ह्मण कविनीं त्वत्प्रताप धुम गावा॥
छल सोसितां मरुत्तें गुरुमंत्रबळें विशंक पद नमुनी ॥
होय परम इष्टवरद शिष्टवर दयाप्रसन्नवदन मुनी ॥ ७३ ॥
भक्ता अभयप्रद जो इतरां लोकांस काय संवर्त ॥
घालील न शरणागत- कार्या तो कास काय संवर्त ॥७४॥
करितां मरुत्त मखें ये शतमख उचलूनि वज्र माराया
कांहीं चालों न दिला संवर्तें तदभिमान बा राया ॥७५॥
ज्याच्या मखीं सभासद सुर सर्व मरुत्समूह परिवेष्टां ॥

१ बृहस्पतीला. २ पिशाचतुल्य. ३ कल्याणबुद्धि. ४ प्रेत. ५ प्रलय. ६ यज्ञ. ७ इन्द्र. ८ देवसमूह.९वाढपी.

ह्मणति परस्पर भुक्त- द्विज जरि पट न धरि पोट परि वेष्टा
शक्रा धनदा देऊं उधळुनि बहु कनक तो अपा दास ॥
ह्मणउनि गुरु दे ज्याला कांचनमय तुहिनगोत्रपा[1]दास॥७७
केली सफला ज्याची सर्वत्रें सर्वपावनसवेहा[2] ॥
ज्याच्या राज्यांत ह्मणे तस्कर दारिद्र्य दुःख नसवे[3] हा ७८
राहे पथींच ऋत्विग्- विप्रजना बहुत दक्षणा विटवी ॥
त्या सुगुणसागराचा पावेल न अंत सुकविधी-टिटवी ॥ ७९॥
कां रडसि सुताकरितां यज्वा दाता असा मरुत्त मरे ॥
होता बहुप्रकारें त्वत्तनयापरिस परम उत्तम रे ॥ ८० ॥
देवर्षि ह्मणे सृंजय- राजा दुसरा सुहोत्रनृप होता ॥
न तसा दुजा प्रतापी अहित-महीपति-महा[4]हुती-होता ॥८१॥
त्याच्या राज्या-मध्यें वर्षति घन बहुत वारिपरि[5] सोनीं[6] ॥
चित्तीं मिथ्या न ह्मणे हें परमाऽश्चर्यकारि परिसोनी ॥८२॥
ज्या तद्राज्यांत नद्या वापी जे कूप काय कासारें[7] ॥
तत्तोय पंक शैवल[8] कनकाचि तें मनुजनायका सार ॥ ८३ ॥
त्यांतील स्वर्णमय प्लवें[9] दर्दुर[10] मकर मीन कांसव हो ॥
ऐसा सभाग्य न करिल होउनि गुरुचरण लीन कां सवें[11] हो ॥
जें हेमयादें[12] पडलें मेघां-तुनि तेंहि हेमयादा वी ॥
अद्भुत दाखवित्या अति- अद्भुत नृप-भाग्य हें मयां[13] दावी ॥

१ हिमालयाच्या जवळच्या अल्प पर्वताला. २ सवेहा—यज्ञाची इच्छा. ३ न असवे. ४ शत्रुरूप राजांच्या मोठ्या आहुतीचें हवन करणारा ५ उदकासारखें. ६ सुवर्णें. ७ तळें. ८ शेवाळ. ९ नौका १० बेडूक. ११ यज्ञ. १२ स्वर्णमय जलचर. १३ मयासुराला.

यज्ञांत सर्व सोनें दे, छत्राचि त्या न देववे, दानें ॥
त्या यादांचींहि दिलीं यजिले जे उक्त देव वेदानें ॥ ८६ ॥
जो हयमेध-सहस्रें सविधि यजी वीर राजसूयशतें ॥
पर वीरसू न जें तिल मिरवि बहु सुहोत्रराजसू यश तें ॥
मेला असाहि कोणिहि जन न मृतिस करुनि पुण्य तरतो कीं॥
वद आपणांत अथवा गुण ऐसा कवण पुण्यतर तोकीं ८८
हयमेधसहस्राचें जेणें केलें सहस्र सन्मत रे ॥
ऐसाहि अंग मेला काळाला कोण वरुनि जन्म तरे ॥८९॥
जो शतसहस्र देता झाला यज्ञांत दक्षिणा कन्या ॥
मग उत्तरोत्तर अधिक वर्णाव्या दानजाति किति अन्या ॥
मखनटनर्तकसुख तें ऐकुनिहि दिलें नृपा सुख न कानें ॥
अंगें मखक्रिया मरु-मार्गीं केली कृपा सुखनकानें ॥ ९१ ॥
तुजहुनि चतुर्गुण बरा त्वत्पुत्रापरिस पुण्यतर अंग ॥
तोही मेला राया कां रडसी सोड शोककर संग ॥ ९२ ॥
देवर्षि ह्मणे राया श्रवण तुदां तो नसेल शिबि केला ॥
ज्याच्या कीर्तिहुनि उणी ह्मणति सुकवि अमृतवर्षि-शिबिकेला
युद्धहताहितनृपहृत वित्तें विष्ण्वादि-सर्वदेव यजी ॥
गो-ब्राह्मण-प्रजाऽवन निजधर्मकरींच सर्व दे वय जी ९४
श्रीगणपतिजवळ गणक सिद्धांत-रहस्य जो सुधी सिकता
तो त्याबळें न मोजिल कां गंगासिंधुजंतुसह सिकता ९५

---

१ सुहोत्र राजाची माता. २ निर्जलप्रदेशांतील मार्गांत. ३ उत्तम खणणारानें. ४ युद्धांत मेलेले जे शत्रु राजे त्यांपासून हिरावून घेतलेलें.

मोजलि वर्षधारां[१] तारा सारा सुमेरु पाखाण[२] ॥
शिबिदत्तधेनु वर्णिल जरि वरदेश्वर ह्मणेल वाखाणं ॥ १६॥
रथहयचतुष्टय जसें प्रेरित असतो कवि प्रतोदानें॥
वपु बोधें प्रेरी बहु सुखवी अस्तोक[३] विप्र तो दानें ॥ १७ ॥
बहु अश्वमेध केले बहु गो-कन्यादि-दक्षिणा दिधल्या ॥
कवि ह्मणति कंठकर्णी सन्मुक्तावृंद यद्यशोभिध[४] ल्या १८
ज्या शिव ह्मणे शिवेचा धनपत्वें[५] अपर मित्र देवर हो ॥
अक्षय धर्मश्रद्धा सुयश असे बहुत चित्र दे वर हो ॥ १९॥
धर्मा देवर्षि ह्मणे गेला मेला असाहि शिवि राजा ॥
यास्तव नको रडों ह्मण या साश्रु-जनांसाहि स्वशिविरा जा

---

## अध्याय ५.

देवर्षि ह्मणे होता दशरथनृपपुत्र-रामराजा गा ॥
जेणें साधूनि दिला लोकां सुरसिद्ध-पामरा जागा ॥ १ ॥
वधिला जेणें राक्षसं- वर[७] विश्वविनाशकर दशानन गा ॥
आली घ्याया यत्पद-यश देवांच्याहि वरदशा न नगा[८] ॥ २॥
यच्चरणाच्या घेती मस्तक मळवूनि देव धूलीला ॥
तीर्थाधिक हे गौतम- मुनिची कळवूनि दे वधू लीला ॥ ३ ॥
कीं पाहे शापतमीं चिंतुनि चित्तांत जे विभात[९] शिळा ॥
यत्पदयशें सुधारस विरस सुरसिकांसि जेंवि भात शिळा ४
द्रववुनि अजडा केली यत्पादरजोलवाऽनिलें[१०] कुशिला[११] ॥

१ पर्जन्यधारा. २ पाषाण. ३ पुष्कळ. ४ यशोरूप. ५ कुबेरपणामुळें. ६ दीर. ७ राक्षसांचा नायक. ८ कल्पवृक्षाला. ९ प्रातःकाळ १० ज्याच्या पायाच्या कणरूप वायूनें. ११ वाईट शिळा.

यज्जननीच्या होउनि   दुग्धोदधि लोल वानिलें कुशिला [5]
यत्तेजें जलनिधिच्या   तरले न दगड विशाल·नगाहि वर
ज्याच्या सुयशें आला   स्पष्ट दशमुखासमात्र न गाहिवर [6]
न तुला शतांत पहिल्या   मधिल्या अंत्याहि तुरगमेधा त्या
गुरुकुलमुख श्रुतीचें   साक्षात् साकेतपुर[1] गमे धात्या ॥ ७ ॥
युववृत्त असो चाविति   सर्व पिसांचीं[8]हि न वपु ढेंकुण गा ।
राष्ट्र प्रेमें पोषी   कृपण जसा नित्य नव पुढें कुणगा ॥ ८ ॥
करिते झाले ज्याच्या   कीर्तिसुखें शंभुसेचि कपि लास्य ।
यद्दर्शनेंचि सर्वहि   तत्वज्ञ न पाहतीच कपिलास्यें[2] ॥ ९ ॥
रुद्रसहस्राब्द[3] करुनि   रंजन दे शेवटीं सुपद विश्वा ॥
किंबहुना पात्रविला   जेणें यतिपातिमता सुपदावि श्वा ॥१०॥
गेला ऐसाहि प्रभु   बा करिसी शोक काय तोकाचा ॥
सोनें हगे मुते जो   स्वजना दे शोक काय तो काचा ॥११॥
भूप भगीरथ होता   जो शत्रूंतेंहि सुगति दे वधुनी ॥
ज्यासि ह्मणे त्वत्पुत्री   मी ऐसें नमुनि सुगतिदेवधुनी[4] ॥१२॥
उगमापासुनि सागर-   संगमपर्यंत इष्टकामहिता ॥
गंगार्चयनें[6] रचिली   कनकाच्या करुनि इष्टकाँ[7] महिता॥ १३ ॥
यज्ञांत दक्षिणा दे   विप्राला भूप भूपसुतकन्या ॥
अन्या न घडायाचें   घडलें हें दान त्याचि अतिधन्या॥१४॥

१ अयोध्या. २ कपिलऋषीचें मुख. ३ अकरा हजार. ४ गंगा. ५ मनोरथसंपादक. ६ गंगानदीच्या काठीं केलेल्या यज्ञानें. ७ विटा. ८ चिरट पिसवाहि, असाही पाठ आहे.

विप्रांसि सहस्रांचें कन्यांचें दे सहस्र तो भूप ॥
आच्छादिलें जयांचें दिव्यांऽबररत्नभूषणें रूप ॥१५॥
प्रतिकन्याकनकरथीं जोडियले चार नव चतुर गमनीं ॥
कैंची कशा प्रतोदहि साहति हूं हेंहि न वच तुरग मनीं १६
एका एका रत्न- ध्वज-भूषित-कन्यका-रथामागें ॥
शत शत सुमणि सुवर्ण स्ववंर-धर गज दिले महाभागें १७
नागानागामागें कांचनमाली सहस्र दे वाजी ॥
त हरिहरां ह्मणति कवि तुमचें देणें अनंत देवा जी ॥ १८ ॥
वाजीवाजीमागें शत समवत्सा यथोक्त दे गाई ॥
विप्रसती ह्मणति शिवे ऐसेंचि सदा कथोक्त देऽगाऽई १९
गाईगाईमागें जें वर्णू काय किति अजाविक तें ॥
हें साधुभाग्य येइल विश्वस्रष्ट्याहि त्या अजा विकतें ॥२०॥
ऐसाहि भूरिदक्षिण यज्वा राजा भगीरथ न राहे ॥
राहेल कसा त्वत्सुत कवणा न स्पर्शली गति नरा हे॥२१॥
देवर्षि ह्मणे होता सत्पालक विष्णुचा दिलीप गडी ॥
जेणें अप्रणतांच्या न शिरीं शाश्वत उरों दिली पगडी २२
यत्सुपदासीं हरिच्या मैत्री संपादिली पदानें हो ॥
सुरानिलयं रत्नसानुहि पावे कंपा दिलीपदानें हो ॥ २३ ॥
यज्ञांत दक्षिणा वसु- पूर्णा वसुधा दिली पदा नमुनी ॥

१ चाबूक. २ पराणी. ३ उत्तम वस्त्र धरणारे. ४ स्वर्णमाला धारण करणारे. ५ शेळ्या, मेंढरें. ६ बहुत. ७ स्थान. ८ मेरु.

ऐसें हें अत्यद्भुत गाती प्रेमें दिलीपदान मुनी ॥ २४ ॥
शतमन्यूपें जो प्रभु मान्य जसा व्यजनवायु वायूपें ॥
ज्याच्या लाजविला विधु सुदृगादृतभुज नवा युवा यूपें २५
असति कनक मय वेदी मंडप यूपहि परंतु हेमाचे ॥
यद्यज्ञवाटवाटहि ज्यांत निजुनि नृपाहि म्हणति हे माचे २६
सुर शिवसे देखति ज्या करित्या सुखवृष्टिच्या दिलीपातें ॥
दूरुनि विलोकित्यांहि स्वर्गति यद्दृष्टिच्या दिली पातें ॥
ज्याचें रथचक्र जळीं न बुडे आत्मज्ञमन जसें भवनीं ॥
कृपण जसा वित्ताच्या सत्याच्या अति निविष्ट जो अवनीं ॥
कवि वदले नेत्रांहीं कर्णांहीं लोक हो दिलीपा प्या ॥
पुण्यश्लोकें रामें सद्गति जेणें तसी दिली पाप्या ॥ २९ ॥
स्वाध्यायज चापगुणज खा जेवा प्या असे जसे शब्द ॥
तैसे उदार ज्याच्या सदनीं हे पांच न विरती शब्द ॥३०॥
मेला असाहि ज्याचें अरिला लिहिलेंहि दे वपु त्रास ॥
कां आठवूनि शोचिसि रे सृंजय मनुजदेव पुत्रास ॥ ३१ ॥
नारद म्हणे वियोगें पुत्राच्या पावलासि कष्ट महा ॥
तरि परिस सांगतों तुज शोक सराया समर्थ अष्टम हा ३२
नृपति युवनाश्व होता गेला मृगयार्थ तो वनीं दूर ॥
तणें श्रांत तृषितें ऋषिसत्रींचा विलोकिला धूर ॥ ३३ ॥

---

१ इन्द्रापेक्षां. २ सुंदक्-सुदर स्त्रिया यांहीं आदरिला-स्वीकारिला भुज ज्याचा तो. ३ यज्ञस्तंभानें. ४ रक्षणांत. ५ वेदाध्ययनाचे शब्द. ६ धनुर्गुणाचा शब्द.

सत्रीं शिरोनि न पुसे देउनि एकाहि हाक विप्राशी ॥
भाविबळें स्वार्थचि मुनि- साधित पृषदाज्य[1] हा कवि प्राशी॥
तत्काळ गर्भवान् नृप- होउनियां होय सभय सत्रप[2] हा ॥
पृषदाज्यपानसंकट जाणुनि वदले समस्त सत्रप[3] हा ॥३५॥
भेटुनि युवनाश्वाला हांसोनि ह्मणे सदेव वासव हो ॥
हें संकट हरितों परि सांगुनि पुत्रासि देववा सवँ हो ॥३६॥
वैद्याकरवीं तदुदर व्हाया गर्भासि वाट तो चिरवी ॥
या कर्में बहुकरही[4] द्विकरसुतन्यून[5] वाटतोचि रवी ॥ ३७ ॥
काढुनि उदरांतुनि शिशु मोहांतुनि नृप हि तूर्ण बाहेर ॥
शक्रासि दस्र[6] ह्मणती केला आदेश पूर्ण बा हेर ॥ ३८ ॥
शक्र ह्मणे युवनाश्वा करिताहे ऊर्वशीहि बा लास्य ॥
ऊठ सख्या नेत्रांहीं प्याया पीयूषपूर बालास्य॥ ३९ ॥
अमर ह्मणाति कंधास्यति[7] तों मां-धाता[8] असें ह्मणे शक्र ॥
घाली अंगुलि वदनीं तीहि अमृत जेवि गोपिका तक्र ॥ ४०
मां धाता शक्र ह्मणे झालें तन्नाम तेंचि गा राजा ॥
तत्कीर्ति सुखा देती पीतां तप्ता जनासि गारा ज्या ॥ ४१
झाला श्रुतिशास्त्रनिपुण तरुण सुभटहि भरतां दिवस तीस
दिवसांतचि तो विजयी जिंकुनि देवाऽसुरादि वसतीस ४२
विषयीं प्रथम शिरावें जैसें पावोनि यौवना श्वानें ॥

---

१ दधिमिश्रित घृत. २ लज्जायुक्त. ३ यज्ञ. ४ पुष्कळ कर (हात) ज्याला तो सूर्य. ५ दोन हाताच्या पुत्राहून. ६ अश्विनीकुमार. ७ कं-कोणाला. धास्यति-पिईल. ८ मां-मला. धाता-पिईल.

ऐशी जंतुस्थिति परि वरिलें शुचि शील यौवनाईवानें ॥
गमला मूर्त घटजकर परनृपबल-सिंधुपतित मांधाता ॥
ज्यातें निर्मुनि पावे कीर्ति त्रिजगांत अतितमा धाता ॥ ४४
यद्राजसूय हयमख शत ह्मणति अपूर्व अमरही राजा ॥
भंगावया न शकले परनृपमणि करुनि समर हीरा जा ॥
विश्वहि शतदा पावुनि ज्याचें तें यज्ञपुण्य-पर्व तरे ॥
घृत-मधु-दुग्ध-नदीशत ज्यांत बहुत ते सदन्नपर्वत रे ॥४६॥
जो जोगयादि होता समरीं जिंकी पराक्रमांधा त्या ॥
आलेंचि मरण बापा सृंजयराया अशाहि मांधात्या ॥४७॥
भाग्यें शौर्यें ज्ञानें जो विश्वाऽधिक असाहि तो मेला ॥
ऐकसि कीं कां शिशुच्या शोकें त्वन्मुखशशांक कोमेला॥
होता असाचि हरिच्या जो सुगुणें उतरला ययाति तुकीं ॥
वदले कवि सत्कर्में सुयशें जीं तीं वशें जया तितुकीं ॥ ४९॥
वज्रधरासहि बहुभय- दायक यत्पाणिवर्ति-कुशें नाकीं ॥
तो ज्याचा श्वशुर असुर- पति-वृषपर्व्या-समेत उशना कीं ५०
ज्याच्या प्रसूस परिसुनि धन्य ह्मणे देवराजसू यश तें ॥
कीं तो यजिता झाला हयमेधशतें सराजसूयशतें ॥ ५१ ॥
बहुधा घडलें नुरवी तिळ जें अव वाजपेयशत गा या ॥

१ मान्धात्यानें. २ शत्रुसैन्यरूपसमुद्रांत पडलेला. ३ अत्यन्त. ४ पर्व—उत्साह. ५ हा एक राजा. ६ प्रतापानें अन्ध. ७ तुझा मुखचन्द्र. ८ वजनीं. ९ इन्द्रास. १० ज्या शुक्राच्या हातांतील दर्भ. ११ स्वर्गीं. १२ शुक्र. १३ आईस. १४ देवराजमाता.

काय असें हरिहर- नामें मघवा जपे यश तगाया ॥ ५२ ॥
अरि यत्समरीं हरिच्या जेंवि शिरःपुंडरीकंद शश तरे ॥
दशशत अतिरात्र करी जो विधिनें पुंडरीक दशशत रे॥ ५३
सत्रें चातुर्मास्यें त्यांची संख्या बरी कथावि किती ॥
स्वल्पचि रसिकमत वदति बहुत लिहुनि काय कावे कथा विकिती
भूमंडल विप्रकरीं करुनि ब्रह्मस्वं वेगळें देहा ॥
आधीं राज्यश्री मग वरुनि तपस्या ह्मणे गळें देहा ॥ ५५ ॥
जें हिम-हेममहीध्रीं क्रीडे बैसोनि देवयानीं तें ॥
नृपरत्न क्षण रडवी करुनि विरक्तीस देवयानीतें ॥ ५६ ॥
ऐसाहि प्रभु मेला बरवा तुजपरिस जो चतुर्गुण गा ॥
गुण गाउनि पुत्राचे काय रडसि शुद्ध शंभुचे गुण गा ॥५७॥
नृप अंबरीष होता यत्पितृसंबंधि नाम नाभाग ॥
जो नित्य ह्मणे न विषय- भजनें हरिनातिविना मना भाग ५८
क्षितिस प्रजा प्रजेस क्षितिहि ह्मणे सुगुणसद्म नाभागा ॥
आह्मांकरितां करितां जो सदय तयाचि पद्मनाभा गा ॥५९॥
परि पाळिल्या प्रजा बहु जैशा भगिनी सुता सुना भाच्या ॥
जेणें आशीराशी वरिल्या मर्दूनि खल सुनाभाच्या ॥ ६० ॥
अरिराजसहस्राचें जिंकूनि सहस्र जो सदय न वधी ॥

---

१ पाप. २ इन्द्र. ३ ज्या ययातीच्या युद्धांत. ४ शिरकमल देणारे. ५ यज्ञविशेष. ६ ब्राह्मणास दिलेलें धन. ७ हिमालय व मेरुपर्वत ह्यांवर. ८ देवांच्या विमानीं. ९ ईश्वरमननाशिवाय. १० सद्गुणाचें स्थान अशा नाभागाला. ११ करणारा. १२ विष्णु. १३ आशीर्वादाच्या राशी.

शरणागताभयव्रत[1] सोडुनि सुकुलज[2] कशी करिल नवधीद ॥
न सुधेशीं ज्याच्या मख- विप्रोऽच्छिष्टाऽन्न-नव-सुवास वदे[3] ॥
हा[4] एकींहि सवीं तें हयमेधशतींहि न वसु वासंव[6] दे ॥ ६२ ॥
यज्वे वदान्य[7] राजे सपरिच्छद[8] लक्षसंख्य विप्रकरी ॥
दिधले यज्ञांत जसे पशु द्यावे ख्यात हे कवि-प्रकरीं ॥ ६३ ॥
येथें सर्वहि पहिला संपन्न गणेश-देव दोंदानें ॥
बा अन्नदान एकचि ज्याचें दुसरीं न दे वदों दानें ॥ ६४ ॥
मूर्धाभिषिक्तदानें[9] तो दे तेशीं सदानगंजदानें[10] ॥
किति सांगों दिधलीं हय- गोदानें त्या सदानगंजदानें[11] ॥६५॥
प्रमुदित विप्र पहाया यज्ञचमत्कार अंबरीख रची ॥
इतरीं धन नग्नजनीं निज-अंबर जेंवि अंबरी[12] खरची ॥६६॥
हा पुत्रा काय ह्मणसि काय रडसि जो असा अरिसभारी[13] ॥
मेला तुजपरिस चतु- र्गुण गुणवान् त्वत्सुतापरिस भारी॥६७॥
देवर्षि ह्मणे राजा परिसावा नृपजनेंद्र[14] शशबिंदु[15] ॥

---

१ शरणागतांस अभय देण्याचें ब्रीद. २ उत्तमकुलोत्पन्न. ३ यज्ञांतील ब्राह्मणाच्या उष्ट्या अन्नाचा नूतन सुवास. ४ हा राजा (नाभाग). ५ यज्ञांत. ६ इंद्र. ७ उदार. ८ चामरयुक्त. ९ पट्टाभिषिक्त राजदानें. १० मदोन्मत्तगजदानें. ११ सदानगज-द-निरंतर गज देणारानें. १२ वस्त्रवान्. १३ शत्रुसभेचा शत्रु. १४ राजशिरोमणि. १५ नामविशेष.

यद्दृष्टिपुढें अरिनृप- सिंह तयांचा बलाब्धि शश[1] बिंदु ॥६८॥
त्या शतसहस्र होत्या सुगुणामृतसिंधु-बायका राजा ॥
लिहिति रतिस्तुति-पूर्वी मात्रा देऊनि बा यकारा[2] ज्यां[3]॥६९॥
पुत्र सहस्र-सहस्र[4] स्वसमगुण दिले स्वदारलक्षातें[5] ॥
जेणें कथिलें देणें हें धर्माचें स्वदार लक्षा तें ॥ ७० ॥
सुरुचिर सुशील सुचरित साऽक्षर[6] ते सर्वही अयुत-याजी[7] ॥
देह प्राणासि तसे जे येतां ब्राह्मणा ह्मणति या जी ॥ ७१ ॥
तितुकेहि अश्वमेधीं दिधले देताहि सुत नवे दानीं ॥
कथिला एकहि भावी ऐसा कवि लोकनुत[8] न वेदांनीं ॥७२॥
एकैक सुतामागें शत शत कन्या दिल्या महाभागें ॥
कन्येप्रति शत शत गज बा आइकतां न या महा[9] भागें[10] ७३
एकैक गजामागें शत शत रथ दे रथारथामागें ॥
शत शत हरि[11] दे हरिला श्रद्धा[12] परिसावया कथा मागें ७४
एकैका हरिमागें दशशत ज्या भरिति घट सुधेनु तिघे[13] ॥
ज्यांच्या पयें ह्मणावें करुनि अयज्ञोचित सुधे नुति[14] घे ७५
एकैक धेनुमागें बहु दे जो दानपति अजाविहि रे ॥

---

१ ससा, ( ज्यापुढें शत्रुसिंह ससे आणि त्यांचा बलसमुद्र थेंब असा अर्थ). २ य या वर्णास ( रतिस्तुतिपूर्वी ये लिहिती; ह्मणजे येर ति स्तुति, ती रतीची स्तुति येर "निष्फळ"). ३ बायका. ४ दहा लक्ष. ५ आपल्या लक्ष स्त्रियांस. ६ वेदशास्त्रसंपन्न. ७ यज्ञकर्ते. ८ लोकस्तुत्य. ९ उत्सवास. १० शिणें. ११ अश्व. १२ विश्वास. १३ तीन घागरी. १४ स्तवन.

ज्यासि तसे विषय जसे क्षीर समुद्रालया[1]-अजा विहिरें[2] ॥७६॥
हयमेधांतीं उरले क्रोशोन्नत अन्नराशि तेरा हो ॥
कांचनयूपाद्यद्भुत साहित्याची कथाचि ते राहो ॥ ७७ ॥
ऐसा शशबिंदु न जो करितां अरिकायहोम घामेला ॥
तोही वृद्धमुनि ह्मणति बहु पुसतां काय हो मघा मेला ७८
देवर्षि ह्मणे भूपा परिस बरें हें सुवर्णन गयाचें ॥
प्रतिहयमेधीं धारे भय अधिकाधिक मणिसुवर्णनग याचें ॥७९.
केलें शतवर्षें हुत- शिष्टान्नाऽशन अनंत-रायें हो ॥
मेळविलें पुण्ययश न्याया-चरणें अनंतरायें[7] हो ॥ ८० ॥
गय सुप्रसन्न होतां अग्नि ह्मणे त्यासि पावका मातें ॥
जरि वर देसी पावसि या पुरवायासि पाव कामातें ॥ ८१ ॥
वरदा वरदानादिक कांहीं जरि नाउवे द्या वेगा ॥
तरि सद्गुरु प्रसादें यमनियमें पाठ वेद यावे गा ॥ ८२ ॥
मज अक्षय्य मिळावीं धर्में न करूनि अन्यहानि धनें ॥
या सुवरें धन्य जरि न करिशिल हा दास धन्य हा निधनें
देतां सर्वस्व सदा श्रद्धा ब्राह्मण पदावरि असावी ॥
शिवमूर्ते[11] नाशाया सर्व सुरद्रुमदा[12] वर असावा ॥ ८४ ॥
भार्या भल्या सवर्णा थोड्याचि बहुत नको बहु कुशीला ॥

---

१ क्षीरसिंधुवासीला. २ झरे. ३ कोसभर उंच. ४ सुवर्णयज्ञस्तंभादि. ५ शत्रुदेहाचा होम. ६ मेरु. ७ निर्विघ्नपणें. ८ अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, परिग्रह, अशा पांच नित्यकर्मांच्या नियमानें. ९ सुचिर. १० मरणें. ११ कल्याणमूर्ते. १२ कल्पवृक्षाच्या गर्वास.

पुत्रत्वें साध्वीच्या यावें म्यां द्यावया यश कुशीला ॥८५॥
श्रद्धा वहु दे आले असतां अशना वरांक राजे वा ॥
मम विनवावें कीं या सूदाशय नावरा करा जेवा ॥ ८६ ॥
वा जेंवि पिशुनमन पर- मर्मीं धर्मींच मन्मन रमो जी ॥
धर्मरतिविना वानर-जन्मांतचि कां न जन्म नर मोजी॥८७॥
माझ्या विहिताऽचरणीं दृक्पात नसोचि अंतरायाचा ॥
व्हावा या निजधर्मा- चरणीं तनुसहित अंत रायाचा॥८८॥
अग्नि ह्मणे अप्रतिम- प्रभु सत्तम तूं नृपा इलेवँर हो ॥
जे मागितले ते त्यां रूपें जगदीश्वरें दिले वर हो ॥ ८९ ॥
नित्य प्रातःकाळीं शतवर्षें जो प्रभु प्रमोदानें ॥
अयुतवरतुरगदानें दे निष्कहि लक्ष लक्ष गोदानें ॥ ९० ॥
मणिवालुकाऽन्वित कनक- मय करुनि क्षोणिवलय दे हातें॥
करि गय हयमेध-यश- श्चंदनशतनिलय-मलय देहातें ॥९१॥
सव्विस गांवें जीची रुंदी जी लांब तीस गावें गा ॥
असि गय-हयमख-वेदी काशीस तसेंच तीस गावें गा ॥९२॥
ती विप्रजना गयनृप- वाक् हय-मेधक्रियासुखानि वेदी ॥
मणिकनकमयी जसि तनु साध्वी व्हाया प्रिया सुख निवेदी ॥

---

१ भिकारी. २ चहाडखोराचें मन. ३ धर्मप्रतिशिवाय. ४ कर्तव्याऽचरणांत. ५ दृष्टिपात. ६ विघ्नाचा. ७ पृथ्वीपति. ८ अग्निस्वरूपें. ९ मणिरूप वाळूनें युक्त. १० भूमंडल. ११ अश्वमेधयशोरूप चंदनतरुशतांस स्थानभूत मलयगिरि. १२ गयाची अश्वमेधभूमि. १३ अश्वमेधकर्माची खाण.

द्विजदत्तशेष बहु मणि- कांचनमय[1] यूप इक्षुसे वेची ॥
ज्यास रुचि अर्थिरतिची जेंवि मुमुक्षूस भिक्षुसेवेची ॥ ९४ ॥
ने तृप्तिमति भूत- ग्रामातें मखाहि सिंधुनिलयातें ॥
गय हयमखीं रणींही विशिखें[3] मर्मींच विंधुनि लयातें ॥९५॥
परमपवित्रान्नाचे पृथ्वीपाताळ-तृप्तिला पुरले ॥
पुर लेखांचें[4] धालें परि पर्वत पंचवीस कीं उरले ॥ ९६ ॥
वाहत होत्या पुष्कळ पूतपयःप्रमुख-सर्व-रसकुल्या[5] ॥
तैशाचि बहुत उरल्या वस्त्रालंकारराशि गिरितुल्या ॥ ९७ ॥
वर्णू अक्षय्य करण वट कीं तें ब्रह्मरसहि न गयाचें ॥
यश वर्णवे कविशता देणें बहु ह्मणति अमरनग याचें॥९८॥
बा लागलाचि समयीं पुरवावा अंतकालकाम गया ॥
राजा त्वां शोचावें कां हें ऐकोनि बालका मग या ॥९९॥

---

## अध्याय ६.

नारद पुन्हां ह्मणे गा राया सोडूनि खांते दे वाची ॥
मंजु हरिहरस्तोत्रां- परि चरितें नित्य रंतिदेवाचीं[6] ॥ १ ॥
अभ्यागता तिथींतें ज्याचें सूद द्विलक्ष ओगरिते ॥
कीं अन्य रंतिदेवा गमले याहूनि सर्व योग रिते ॥ २ ॥

---

१ रत्न आणि सुवर्ण ह्यांनीं मंडित असा यज्ञस्तंभ. २ उंसासारिखे. ३ बाणानें. ४ देवांचें. ५ पवित्र दुग्धप्रमुख सर्व रसांच्या नद्या. ६ नामविशेष. ७ वाढणारे.

ज्याचे स्वयेंचि वारिती स्वर्गार्थ सुसत्रपशु भय जनाचें ॥
न धरिति हें वर्णिति यश शतमखमुखसत्रप शुभयजनाचें ३
पशुचर्मराशिपासुनि झाली चर्मण्वती नदी नांदे ॥
कृमि यत्पानें स्वर्गीं जी भलत्या अर्थ तीन[1] दीनां दे ॥ ४ ॥
साऽष्टशत सुवर्णात्मक निष्क-शत-सहस्र दान ओपावें ॥
जेणें द्विजां ह्मणावें अणु वितरण[2]पाणिनें न कोपावें ॥ ५ ॥
जो एक दिवसमात्र द्विज राहे निष्क कोटि तो लाहे ॥
किति वनद[3]-धनद-कीर्ति प्रभु[4]कीर्तिसवेंचि कीर्ति तोला हे ॥ ६ ॥
देउनि कोटि ह्मणे हे वाहिली जोडूनि हात पाकोळी[5] ॥
तंतुपटें काय हरिल दिगिभाच्या घनाहिमां[6]ऽऽतपा कोळी[7] ॥ ७ ॥
अभय न देऊ माझ्या तुमचा वदतां मृषा कुला पाणी ॥
आवडतें मज याचें दर्शन जैसें तृषाकुला पाणी[8] ॥ ८ ॥
प्राणविरह सुसह पळहि बहु दुःसह विप्रपाणिविरह मला ॥
वमला जो विष वासुकि ऐसा तापद नसेल तो गमला ॥ ९ ॥
मी मीनसाचि माझ्या द्विजवृंद घरीं जसेचि आप सरीं[9] ॥
पाहुनि मेघांसि जसा चातक मी ब्राह्मणांशि आ पसरीं ॥ १० ॥
जो रंतिदेव ऐसें बोले विप्रांसि कनक दे हातें ॥
द्विजबहुमानासि जपे साधु जसा वृद्धजनकदेहातें ॥ ११ ॥

१ धर्म-अर्थ-काम; असे तीन अर्थ. २ दानशूर हातानें. ३ मेघ कुबेर. ४ परमेश्वराच्या कीर्तीबरोबर. ५ पाकळी ( फूल नाहीं फुलाची पाकळी अशी ह्मण ). ६ पाऊस थंडी आणि उष्ण ७ कीटकविशेष; सुतेरा. ८ उदक. ९ सरोवरांत.

कांचनमय-गोशत-युत कांचनमय-वृष सहस्रशः पूर्ण ॥
शतवर्षं निस दिले कीं हें जाणार सर्वहीं तूर्ण ॥ १२ ॥
श्रीरंतिदेवसदनीं अतिथि द्विज एकरात्र जो राहे ॥
तो एकविंस सहस्र- प्रातःकाळींच धेनुधन लाहे ॥ १३ ॥
जें अग्निहोत्र-हयमख[2]- मुखयज्ञ-गृहोपकरण[3] सर्वहि तें ॥
विप्रांसि दिलें भूपें सर्वजनांचीं करूनि सर्व हितें ॥ १४ ॥
कव्यास[4] पितर घेती प्रत्यक्ष तसेचि देव हव्यास[5] ॥
हव्यास धरुनि करि बहु यज्ञाचा जनसुखावह व्यास[6] ॥१५ ॥
श्रीस न आली वेंचुनि बहुमणिकांतस्वरा[6] जरा जाच्या ॥
लाजवि समृद्धिला जो न हरुनि आर्तस्व[7] राजराजाच्या[8]१६॥
मेला असाहि करिता जो हयमेधादि सर्व सर्व[9] सुकृती[10] ॥
न रहति अनिस जाणुनि जातां सुत दार वपुहि सवसु कृती
नारद ह्मणे प्रसवली ज्या कण्वसुता शकुंतला गावा ॥
परिसावा भरत तुज न सुत-शोक-हुताशकुंत[11] लागावा ॥१८॥
ह्मणसी शकुंतलासुत- रत्नाचा सुमहिमा वदा तरि तें ॥
पाडी गहन हरुनि हरि- शत मल्लीसुमहिमाऽवदात[12] रितें ॥१९॥
व्याघ्रवराहमहिषगज- मद नुरवी मूर्ति सुरुचिराशि[13] शुची॥

---

१ लौकर. २ अश्वमेधप्रमुखयज्ञगृहांतील. ३ साहित्यें. ३ पितृभाग. ४ देवभाग. ५ विस्तार. ६ रत्नें आणि सुवर्णास. ७ दुःखिताचें धंन. ८ कुबेराच्या. ९ यज्ञ. १० पुण्यशील. ११ पुत्रशोकाग्निरूप भाला. १२ जाईचें फूल आणि हिम तद्वत् शुभ्र जें सिंहशत त्यातें हरुनि वन रितें पाडी. १३ तेजःपुंज.

हरिशत दमुनि वनीं जी बहु मुनि वर्धिष्णु सुरुचिरा शिशुची
सुतपोवनांत लावी हरि-हरितोकांस दामनीला जो ॥
तेणें न कण्व हरिसह हरि हरि तो कां सदा मनीं लाजो २१
सिंहादि सर्व सत्वें सोडी तो सर्ववीरवर दमुनी ॥
यास्तव सर्व-दमन हें ठेविति भरतासि नाम वरद मुनी ॥२२॥
शत यमुनेच्या तीरीं दोन शत सरस्वतीतटीं भरतें ॥
गंगातटीं चतुःशत केले हयमेध धर्मलाभरतें ॥ २३ ॥
पुनरपि हयमख केले दशशत शत राजसूय साधूनीं ॥
स्तविला रिपुनींहि भरत केवळ वाखाणिला न साधूंनीं ॥२४॥
तैसाचि विश्वजित्सव अग्निष्टोमाऽतिरात्रसन्मख गा ॥
इतरां भरतयश गरुड- यश दुर्लभ जेंवि नीडजन्मखगां॥२५॥
वा वाजपेय ह्मणति ब्राह्मण पुण्यर्द्धिच्या अगारा जा ॥
त्या यज्ञसहस्रांचीं तीन सहस्रें करी अगा राजा ॥ २६ ॥
हंस तसा आरब्धा- खिलमखकर्माऽब्धिला भरभर तरे ॥
शुचिसचिवशिरीं ठेवी राज्याचा सर्वही भर भरत रे ॥ २७ ॥
अर्पुनि शुचि जांबूनद- पद्मसहस्र क्रतूंत पद नमुनी ॥
जेणें केला कण्वचि न सकलही सुप्रसन्न-वदन मुनी॥ २८ ॥
शंभर वांवें ठोसर कनकाचा यूप भूपरत्नानें ॥
यज्ञांत घडविला तो होय उभा साऽमरेंद्र-यत्नानें ॥ २९ ॥
धन-धान्य-गृहक्षेत्र- ग्राम-रथ द्विरद-धेनु-हय-दानें ॥

१ मूर्ति. २ वाढणारी. ३ दाव्याला. ४ यज्ञविशेष. ५ घरोट्यांतल्या पक्ष्यास. ६ सुवर्णकमळें. ७ गज.

दिधलीं नको नको तों या भरतानें कुबेर-भयदानें ॥ ३० ॥
दासी बहुकोटि दिल्या पात्र करुनि बहु-सुवस्त्र-मणि-कनका॥
ज्या ह्मणती भूषणभर दुर्वह इतुकाचि फार अणिक नका ३१
बहु कोटि दिले भूषित- तनु कर्म-समर्थ-भुज नवे दास ॥
स्वामीस आदरें जे भजणारे जेंवि सुजन वेदास ॥ ३२ ॥
ऐसाहि भरत मेला मग संसारांत कां न इतर मरे ॥
खाणुनि सुतशोक सदा जाणुनि भगवत्पदींच हित रम रे ३३
देवर्षि ह्मणे बहुधा त्वां आइकला नसेल पृथु कानें ॥
तरिंच मरोनि तुझें मन मोहीं केलें निमग्न पृथुकानें ॥ ३४ ॥
पृथुचा पृथु प्रताप प्रेक्षुनि झाली भयें इला दुहिता ॥
गाईस गोपसा जो राजा झाला स्वयें इला दुहिता ॥ ३५ ॥
पृथ्वी अकृष्टपच्या सर्वसुखस्पर्श दर्भ कनकाचे ॥
झाले कोणालाही ज्याच्या राज्यांत अर्भक न काचे ॥ ३६ ॥
वत्सें प्यावें द्यावें गाईंनीं दुग्ध भरुनि घागर गा ॥
कुसुम-रस-मिश्रिता-मृत- कल्पोदक-पूर-पूर्ण सागरगा ॥ ३७ ॥
वृक्षांच्या वल्लींच्या पुटकीं पुटकीं प्रभूत मधुरस रे ॥
वा ज्यापुढें न अमृतहि ह्मणवाया आपणासि मधुर सरे ३८
जन तुष्ट पुष्ट अकुतो- भय नयमय सर्वही अमंद-वार्त ॥
पृथु राज्य करित असतां नव्हतेच वनांतही अंग दवार्त ॥

१ अलंकाराचा भार. २ बालकानें. ३ मोठा. ४ पृथ्वी. ५ मुलगी. ६ भूमीला. ७ दोहनकर्ता. ८ कर्षणाशिवाय पिकणारी. ९ नद्या. १० निर्भय. ११ रोगवार्तारहित. १२ वृक्ष. १३ दवानें पीडित.

बहुताचि जन रंजविला लावुनि निजगुणरसीं पृथुकथानीं ॥
जननींनीं जेंवि[1] करुनि तप परम चरमवर्यी पृथुक थानीं ४०
स्तंभितजल[2] होय जलधि देती ज्या प्रभुसि मार्ग पर्वत रे ॥
जन ज्याचें यश गाउनि पावुनि काशींत जेंवि पर्व तरे॥४१॥
सव-दैवत-मात्रांस न दे विश्वास प्रमोद तो यजनीं ॥
मखमंडपीं न तितुकें दानजल वहु प्रमोदतोय[3] जनीं ॥ ४२ ॥
क्षितिवरि होते पार्थिव जे जे ते करुनि हेममय सारे ॥
दे दान हयमखीं पृथु परिस गये अर्थिलोक[4]अयसा रे ॥४३॥
पृथु सांगे गज ओता पाहुनि हरिचा करी लपो कळतो ॥
श्रम मज किति घेत्याचें देत्याचें हित करील पोकळ तो[5] ४४
ओतविले कनकरसें सासष्ट सहस्र भव्य दंती[6] हो ॥
विप्रांसि दिल्हे तेव्हां मी होतों हे न किंवदंती[7] हो ॥ ४५ ॥
मणिरत्नभूपिता हे कनकाची करुनि दान देवसुधा ॥
पृथुकीर्तिरत विसरले रंभा विसरतिल कां न देव सुधा॥४६॥
एवंविध चरित-सुधा- निधिहि निधन पावलाचि पृथु कवि रे॥
ज्या कालाच्या वदनीं मेरु विरे[8] त्यांत कां न पृथुक[9] विरे ४७
देवर्षि ह्मणे भार्गव- रामाची सृंजया कथा परिस ॥
अतुलप्रताप दुःसह- शर जो विश्वास मन्मथापरिस[10] ॥ ४८ ॥
रणपंडित[11]कोटिपुढें ज्याचा मार्ग न परशु कावि सरला ॥

---

१ ह्मातारपणीं. २ स्थिरोदक. ३ आनंदाश्रु. ४ भिक्षुकरूप लोहास. ५ पोकळ हत्ती. ६ हत्ती. ७ गप्प. ८ मरण. ९ पोहा. १० मदनापेक्षां. ११ युद्धपंडितसमुदायापुढें.

जो आपणा समरपर जैसा हरिकीर्तिपर शुक विसरला ४९
भिववी ज्याची श्रीमत्- दत्तास-सहस्रबाहुला शमना[1] ॥
जो अर्जुन[2] अर्जुनता[3] दे अरिच्या होय वा हुताश[4] मना[5]॥५०॥
त्यां[6] जलधीस शरकरें भृगुवंशघटज महातपा प्याला ॥
तप्तांऽय:पिंड[7] तसा जो लावूं दे न हात पाप्याला ॥ ५१ ॥
जो प्रभु ह्मणे दिले क्षिति- वर्ती[8] क्षत्रिय, मुखें कुठारा[9] खा ॥
उठला कबंध हो यश राखाया बहु वरें उठा राखा ॥ ५२ ॥
राम चतुःषष्टि अयुत बाहुज[10] मर्दी धरूनि कोदंड ॥
कोण ह्मणेल पितृवध-[11] क्रुद्ध प्रभुला करूं नको दंड ॥ ५३ ॥
खड्गें सहस्र हैहय[12] ताडी पाडी सहस्र तो मुसळें ॥
खळ-रक्तासि ह्मणे जा भेटें मित्रा कुंजा[13] कुंजा[14] उसळें ॥ ५४ ॥
अत्यंतोऽत्कंठित जो ओतु[15] तसा मत्त पर-शुकोंऽपाया[16] ॥
लागों दे अयुतातें पळाहि न हरदत्त-परशु कापाया ॥ ५५ ॥
उद्बंधनेंहि[17] वधिले प्रबळ ब्रह्मघ्न[18] पाप दशशत रे ॥
क्षत्रिय एकाहि न जसा लावुनि मृगभूमिपा[19] पद शश तरे ५६
दाखिलि रामें केली निःक्षत्रा एकवीसदा माहि म्यां ॥

---

१ यमास. २ सहस्रार्जुन. ३ तृणता. ४ अग्नि. ५ सहस्रार्जुनास. ६ भृगुकुलोत्पन्नपरशुरामरूप अगस्ति. ७ तप्त लोहाचा पुतळा. ८ पृथ्वीवर राहणारे. ९ हे परशो. १० क्षत्रिय. ११ जमदग्नीच्या वधामुळें तापलेला. १२ कार्तवीर्य. १३ मंगळास. १४ कुत्सित रक्ता. १५ मांजर. १६ शत्रुरूप राव्याच्या नाशाकरितां. १७ गळफांसानें. १८ ब्रह्महत्या करणारा. १९ सिंहास.

या गाती जे हरिहर- चरितरसिक ते कवी सदा महिम्या ॥
रक्तें भरी प्रतापी प्रभु तो रक्त-प-चमू-सुख-कर तळीं
स्थापी स्वयश कविमुखीं सर्व-क्षत्रिय-वधू मुख करतळीं[1] ५८
निष्कंटक सद्वीप- क्षितिमंडल सर्व वश्य पाहून ॥
राम ह्मणे या दाना पात्र नसे अन्य कश्यपाहून ॥ ५९ ॥
संपादुनि सर्वहि सव करुनि सकलरत्न-हेममंडित हो ॥
कन्यारत्न तसें दे भूमंडळ युद्धयज्ञपंडित हो ॥ ६० ॥
कश्यप रामासि ह्मणे माझ्या राहों नकोचि विपयांत ॥
कीं यशआयु-क्षय-कर दत्त-पुनर्ग्रहण-रूप विष यांत ॥६१॥
राम ह्मणे बहु उत्तम मागे स्थल तो नदीनदेशाला[4] ॥
प्रभुनें प्रभुला द्यावें देइल दीना न दीन देशाला ॥ ६२ ॥
उत्तरहि याचकास न जैसें बहु-भाग्य-मत्त मानव दे ॥
तैसेंचि तोहि जलधी कांहीं त्या वीरसत्तमा न वदे ॥ ६३ ॥
बहुधा घटजापासुनि पूर्वीं जें काय होय तें विसरे ॥
शर सुटतां मागें खल-बल जेंवि समुद्रतोय तेंवि सरे ॥ ६४ ॥
त्या इषुपात-क्षेत्रीं पाहोनि महेंद्रनामि-नग रमला ॥
राम ह्मणे करिन सुचिर रुचिर तप कशास देश नगर मला॥
ऐसाहि राम अंतीं मरणार यथार्थ जाण सन्मत रे ॥
संसृतिनदींत काळा- वर्ती पावोनि कोण जन्म तरे ॥ ६६ ॥

१ तळहातीं (दुःखाचें चिन्ह). २ देशांत. ३ दिलेले. ४ नदी-नद ईश- समुद्राला. ५ बाण पडलेल्या स्थळीं. ६ नामविशेष पर्वत. (परशुराम क्षेत्र आहे तेथें.) ७ संसारनदींत. ८ कालचक्रांत.

व्यास ह्मणे हें षोडश- राजिक आख्यान. सर्व-सन्मंहित ॥
धर्मा याच्या श्रवणें एकीं जन्मींच कोटि-जन्म-हित ॥ ६७ ॥
हा सोळा राजांचा महिमा पूर्णायु करि लवांऽऽयूतें ॥
यापरि जें मंद- दहन- तेज सबल काय करिल वायू तें ॥६८॥
सांगुनि आख्यान असें देवर्षि ह्मणे नृपा असे तोकीं ॥
होते गुण सांग खरें गेला तच्छोकभर असे तो कीं ॥ ६९ ॥
भूप ह्मणे बा चातक- चित्ताला मुंदिर हर्ष दे वर्षे ॥
परि अल्पचि तो म्यां तुज सांगावा काय हर्ष देवर्षे ॥ ७० ॥
जो अस्मदादिजनंन प्राकृत होईल तो कसा मान्य ॥
ज्यासि रडत होतों मी बहु मानुनि तेंहि तोक सामान्य ॥७१॥
त्वद्दृष्टिपुढें प्रबलहि नतमोहं ज्ञानिनायका सरतो ॥
देवासमक्ष उरला त्रिभुवनदुर्जयहि काय कासर तो ॥ ७२ ॥
देवर्षि ह्मणे परिसुनि सूक्ति न घे पशु भला भला मार्गे ॥
उपदेशासि न वळतां कोणीही न शुभ लाभला मार्गे ॥ ७३ ॥
वंदुनि तो भूप ह्मणे जे झाला सुप्रसन्न हाच वर ॥
श्रीकर माथां असतां बहु काय च्छत्र काय बा चवर ॥ ७४ ॥
नारद ह्मणे कृपेची त्वत्साधुत्वें न आवरे उर्काळी ॥
हो पूर्णकाम सुरभी- पोषक जन ताक काय गा उकळी॥७५॥
भेटो त्वत्सुत तुज जो गेला होउनि परासु नरकास ॥

१ सज्जनाम पूज्य. २ अल्पायुष्याला. ३ पुत्रांत. ४ मेघ. ५ नम्रांचा मोह. ६ रेडा. ७ सु-उक्ति-उत्तम भाषण. ८ हुंदका. ९ कामधेनुपाल.

घालूत साधु-भजनें, पावाया गति प[1]रा सुनर कास ॥ ७६ ॥
या वाग[2]वसानीं तो अंकींच प्रकट होय जनकाच्या ॥
सनकाच्या बंधुपुढें अमृतकथा ह्मणति सुज्ञ जन काच्या॥७७॥
धरिला पुत्र सुवर्ण- ष्ठीवी हृदयीं द्रवोनि मग नमुनी ॥
प्रथम प्राज्य प्रेमें नित्य नव[3]दयाऽमृताभ्रगगन मुनी ॥ ७८ ॥
हयमेधादि मखांच्या ठेवी सप्रेम चित्त तो यजनीं ॥
वर्षे सृंजय धा[4]रा- धरसा सर्वस्ववित्ततोय जनीं ॥ ७९ ॥
शिशु अन[6]पत्य अग[7]ज्या रणयज्ञांतहि न पावला मरण ॥
ह्मणुनि उठविला मुनिनें करवाया सुगतिकर सदाचरण ८०
अभिमन्युसि धन्य ह्मणति गेला करुनि सुकृतें सुगतिला जो
ज्यास स्वर्गति घडली या मर्त्यगर्तीस[8] ते सुगति लाजो ८१
निववितसे जो विखरुनि सुखकर क[9]रानिकर इंदु नित्य जगा
तोचि अभिमन्यु धर्मा धरिल्या शोकासि निंदुनि त्यज गा ॥
उरले शो[10]च्य सुगतिला गेल्याचा शोक कां करावा हो ॥
कर्पूर कुशल वाहो नेत्रीं जड लोक कां[11]करा वाहो ॥ ८३ ॥
जोडावा स्वर्ग तुह्मीं सोडावा सर्व मोह माजा तो ॥
हा भाव शोक सारा सरला कीं राजसत्तमा जातो ॥ ८४ ॥
स्पर्श न मोहाचा हो तुज अं[12]तर्हित-परा शराचा हो ॥

१ शेवटची (मोक्ष). २ भाषणांतीं. ३ दयामृतमेघ. ४ मेघसा. ५ सर्व संपत्ति हेंच जल. ६ निपुत्री. ७ यज्ञ न केलेला. ८ मृत्यु लोकींच्या वस्तीस. ९ किरणसमुदाय. १० शोकास्पद. ११ खडा. १२ अंतःकरणपूर्वक हित करण्याविषयीं तत्पर अशा तुला.

ऐसें बोलुनि झाला सुत अंतर्हित पराशराचा हो ॥ ८५ ॥
नृप आपणा मनिं ह्मणे कोठें तो वत्स उत्सवंद-शील ॥
हें पुसतां विजया तूं काय कसें मार्श-कुत्स वदशील ॥८६॥

---

# अध्याय ७.

संसप्तक वधुनि विजय सांजे शिविरासि यावया परते ॥
प्रभुसि ह्मणे कां कांपे मन कांपविले जरि स्वयें पर ते ॥१॥
कंठ गहिवरें भरला शिरली हृदयांत केशवा धडकी ॥
येतें रडें वृथा कां बा माजी प्रकृति काय गा रडकी ॥२॥
स्फुरणाहि अनिष्ट भिवविति उत्पातहि सांग काय बापा हें ॥
कुशल असे कीं माझा राजा ध्यानांत नीट बा पाहें ॥ ३ ॥
देव ह्मणे कुशल असे प्रभु ऐसें मन्मनास वाटतसे ॥
कीं थोडे जन जगती- वरि धरिते धर्मनीति वाट तसे ॥ ४ ॥
झालें असेल आणिक कांहीं त्वद्विक्रिया नव्हे वंध्या ॥
यद्वा-तद्वाऽस्तु करीं आर्धीं न गणूनि आधिर्ला संध्या ॥५॥
संध्या करवुनि नेतां सेनेंत मनीं ह्मणे परस्वामी ॥

---

१ अंतर्धान. २ आनंददायक स्वभाव ज्याचा. ३ निंद्य. ४ वामनेत्रादिकस्फुरण. ५ पृथ्वीवर. ६ तुला होणारीं चिन्हें. ७ कसें तरी असो. ८ शोकाला. ९ परपुरुष.

स्वधना न जपों कैसा काय रथीं वाहतों परस्वा[1] मी ॥ ६ ॥
अर्जुन अस्वस्थहृदय जाय गतश्री[2]क शिबिर पाहून ॥
प्रभुसि ह्मणे महदप्रिय[3]- सूचक बहु चिन्ह काय याहून ॥७॥
मी नायकें सुवाद्यें स्तुति-गीत-रवासि तूंहि नायकसी ॥
मज पाहुनि आप्त अधो- मुख होती गति असेल हाय कसी ८
अतुलप्रताप लोकीं ज्या खलबलजलधि[4]वाडवाभाचा ॥
तो कृष्णा आज तुझा मज आला कां न आडवा भाचा ॥ ९ ॥
व्याकुळ होय महाजन भाजन[5] होउनि जसा मह[6]ऽघातें ॥
लोक तसा हा दिसतो व्हावें विकलत्व हें महा[7]घातें ॥ १० ॥
शिबिरीं शिरोनि विजयें धर्मादिक देखिले अधोवदन ॥
तें पुत्ररत्न एकचि न निरखिलें सद्गुणर्द्धि[8]चें सदन ॥ ११ ॥
मृदुलप्रकृति[9] न साहे सुतशोका जेंवि न रविला पाला ॥
शिबिरीं करी परोपरि नारायणमित्र नर विलापाला ॥१२॥
मज आडवा न आला तरि या पांचांत पृथु[10]नय नसावा ॥
कीं नीरजनाभाचा[11] भाचा सुगुणाब्धि पृथु[12]नयन सावा ॥१३॥
बोले कृष्णमुखींचा वेणु तसा परम लाडिका-वाणी ॥
जो स्पर्शे शिशुहि न घें गुरुसन्निध पर मला डिका[13]वाणी ॥१४॥

१ परद्रव्य. २ हततेज. ३ महत्. अप्रिय-सूचक मोठें अनिष्ट सुचविणारें. ४ खलसैन्यरूप समुद्रास वडवानलतुल्य तेज ज्याचें त्या तुझा. ५ पात्र. ६ महा-अघातें. ७ मोठ्या घातानें. ८ सद्गुण-ऋद्धीचें (वृद्धीचें) स्थान. ९ कोमलप्रकृति-अर्जुन. १० नीतिमान्. ११ पद्मनाभाचा. १२ आकर्णनेत्र. १३ डिकासारिखा.

जो बहु परपृतनांसीं[1] गोपींसीं बाळकृष्णसा रमला ॥
दावा हो सत्वर तो स्वगुरुवचनगीतकृष्णसार[2] मला ॥ १५ ॥
बालहि जो खड्ग परशु चक्र गदा चाप तोमरा वाहे ॥
संकल्प दुर्जनांचे झाले कीं सफल तो मरावा हे ॥ १६ ॥
ज्याचा शास्त्रीं शस्त्रीं व्यवहारीं वासुदेववत्समज[3] ॥
काय तुह्मीं केला हो आणुनि तो भेटवाचि वत्स मज ॥१७॥
बहुधा तुह्मीं धरुनि गुरु-कृत-चक्रव्यूह-भेदकामाले[4] ॥
केलाचि पुढें नाहीं- तरि करिता स्पर्श खेद कां मातें ॥१८॥
न तुह्मी न कौरवहि मी तद्घातक[5] कीं तया रिघायाचा ॥
कथिला उपाय चपला आधीं ऱ्यां न कथिला निघायाचा[6] १९
इतुक्यांसि एक बालक संरक्षण कठिन कां नवल यांचें ॥
भुजसौकुमार्य.सुचलें अपनयनहि[7] सेवकां न वलयांचें ॥ २० ॥
तुमच्या भुजशस्त्रांतें धिक् हा निःसार हो खटाटोप ॥
शिर ज्या न रक्षवे तो कार्याचा काय ओखटा टोप ॥२१॥
वदला असेल कृष्णा आव्हेरिसि बाळनमन कां पावें ॥
अथवा त्यातें ज्याचें समयीं अळुमाळ न मन कांपावें ॥२२॥
हरहर जाणों चुरिला तो बाळ करेणुनीं[8] चरणपातें ॥
शिव शिव भरतिल कीं हो, तो बाळक रेणुनींच रणपातें[9] २३

---

१ शत्रुसैन्यांशीं. २ ताताज्ञारूप गीतास हरिण, असा. ३ वासुदेववत् समज-कृष्णासारखें ज्ञान. ४ द्रोणरचित चक्रव्यूहाचा भेद करण्याची इच्छा. ५ तत्-घातक-त्याचा घात करणारा. ६ शिरायाचा. ७ काढणें. ८ गजांनीं. ९ रणांत पतनानें.

कुंतीस काय सांगूं कृष्णेला दाखवूं कसें वदन ॥
दुष्कर मला सुभद्रा- सांत्वन दुर्दर्श उत्तरासदन ॥ २४ ॥
जावूं दिला मजविना परलोका काय एकला भाचा ॥
होता उपाय हातीं सुयशाच्या हाहि एक लाभाचा ॥ २५ ॥
खाताच अद्वितीय[1] सु- दर्शन परबळ पळांत चाटून ॥
परि बुडविल निज यश तें कर्म करिल कवि कशास दाटून २६
याचें स्वरूप कळतें, तरि पळ न विसंबतोंचि बाला हो ॥
शिव शिव ह्मणेल म[3]रणावधि वैधव्या[4]ऽधिमग्न बाला हो ॥२७॥
समयीं कोठें गेल्या बा तुज सोडूनि गुरुर्जनवराशी[5] ॥
वाहेल आधिच्या किति ती मृदुलप्रकृति नित्य नव राशी २८॥
स्वार्थपर अकृप निस्त्रप[6] आह्मी ह्मणउनि मनांत विटशील[7] ॥
परि उत्तरा सती पर- गतिकामा[8] तुज ह्मणेल विटशील[9]॥२९॥
न ह्मणे अमृतरस अधिक करि ज्याच्या बाप लालना कवि तो[10] ॥
काय पितृपरिष्वंगज[11] जें सुख त्या वा पलाल[12] नाक विता ३०
कां माझें उर न उले कवि पवि[13] कीं ह्मणति तोक-शोकाला ॥
लोकां लाजे मन कीं जावें यश हारवूनि ओकाला[14] ॥ ३१ ॥

---

१ अनुपम. २ दर्शनसंतुष्ट. ३ मरणपर्यंत. ४ वैधव्यरूप दुःखांत बुडालेली. ५ गुरुजनांचे वर आणि आशी. (आशीर्वाद) अथवा गुरुजनवरांच्या आशी. ६ निर्लज्ज. ७ कंटाळशील. ८ मोक्षाची इच्छा करणारी. ९ विटस्वभावाचा. १० बालक. ११ पित्याच्या आलिंगनापासून झालेलें. १२ भूस. १३ वज्र. १४ स्थानाला.

न तुतें पार्थ कदाचित् कृपणहि वांचेल सोडुनि धनातें ॥
चुकविल न चकोराच्या विधुवांचुनि सर्व सोडु निधनातें ३२
हा वत्सा रक्ताक्षा झाले त्वत्सुगुण आजि घातकसे ॥
बा वाहिले परांचे तुजला हाणावयासि हात कसे ॥ ३३ ॥
अभिमुख परप्रहारें पडला कीं धर्मराज सांगावें ॥
प्रभुजी न जें यशस्कर तें स्वगुरुसमक्ष तोक कां गावें ॥३४॥
संरक्षिलें न असतां शस्त्र नयन बाहुही विपुल याला ॥
निष्फल भार वहातां कां सोडा जो नव्हे रिपुलयाला ॥३५॥
भगवान् ह्मणे बुडाला कीं हा मोहांत रक्ष भो गीते ॥
जीवांला विषय तसे संमोहाया न दक्ष भोगी ते ॥ ३६ ॥
प्रभु पार्थासि ह्मणे भो बुध वीरशिरोमणे सखे दमन ॥
केलें तुझेंहि शोकें माझें येणेंचि बहु सखेद मन ॥ ३७ ॥
गळबंधन कीं पुत्र- प्रेम विवेकेंचि तोड बापा हें ॥
सुखकर नव्हेचि उघडुनि विषरत्नाचा न तो डबा पाहें॥३८॥
सोत्साह युद्धधर्मीं होता नव्हताचि तो असावध हो ॥
गेला उत्तमगतिला त्याचा कां शोक हा असा वध हो ३९ ॥
धर्म ह्मणे जें झालें तें कथितों सर्व ऐक बा ज्ञात्या ॥
म्यां व्यूहीं द्वार करीं ऐशी केली स्वयेंचि आज्ञा त्या ॥४०॥
द्वार करी शिरतां भी न व्यूहा जेंवि सागरा मकर ॥
तुरवी कुमार परमद लवहि जसा धरुनि राग रामकर ॥४१॥

१ स-उडु-नक्षत्रांसह. २ मरणातें. ३ समोर. ४ रक्षण कर. ५ हे भगवद्गीते. ६ गळफांस.

होय जयद्रथ आह्मां हेतु कुमारास अंतरायास ॥
त्यास न निवारवे बा जेंवि प्रबलास अंतरायास[1] ॥ ४२ ॥
आह्मां त्या क्षुद्रवरें रुद्रवरें[2]करुनि वारिलें वाटे ॥
प्रभुनें सौभद्रासि न पांचांसहि आजि मारिलें वाटे ॥ ४३ ॥
कृतवर्मा द्रोण कृप द्रोणज कौशल्य कर्ण रथ सा हे ॥
शर वर्षले जलदसे परि धैर्यैंकरुनि धर्मपथ साहे ॥ ४४ ॥
केला विरथ अधर्में दूषुनियां शुद्धयुद्धसव सांनीं[3] ॥
दौःशासनिनें वधिला स्वगदेनें कश्मलांत[4] अवसानीं[5] ॥ ४५ ॥
अष्टसहस्र रथ द्विप- पति नवशत राजपुत्र रणदक्ष ॥
द्विसहस्र मर्दिले बा सौभद्रें अश्वपति बहुत लक्ष ॥ ४६ ॥
गुरुला न सांपडावें ह्मणउनि ऐसें करावया गेलों ॥
तों शोका सांपडलों पुत्रा-आधींच मी न कां मेलों ॥ ४७ ॥
पार्डी विजयास ह्मणे तुजही मी शोक-वेग मोहीन ॥
हा[6] अधिक क्ष्वेडँ[7] करी मूर्छित तरि ओकवे गमो हीन ॥४८॥
धर्ममुखें वृत्तांत स्वसुताचा ऐकतांचि तो कानें ॥
पडला मूर्छित अर्जुन हा वत्स असें ह्मणोनि शोकानें ॥ ४९ ॥
सर्वाप्तवीरमंडल झालें अत्यंत घाबरें हो तें ॥
धर्म ह्मणे दाखवितें न तपोर्वन[8] या अघा[9] बरें होतें ॥ ५० ॥
सावध होउनि अर्जुन सोडी बहु दीर्घ उष्ण निःश्वास ॥

---

१ विघ्नास. २ शंकराच्या वरानें. ३ सहा जणांनीं. ४ मूर्छेंत. ५ शेवटीं. ६ हा पुत्रशोक. ७ विष. ८ वनांतच असतों तर बरें असा भाव. ९ या कुकर्मास.

कोपें पेटे वाटे जाळील सधार्तराष्ट्रविश्वास ॥ ५१ ॥
विजय ह्मणे सत्य उद्यां मारीन जयद्रथासि आपण हो ॥
म्यां केला होइल जरि मिथ्या शरणागतींच[1] हा पण हो ॥५२॥
वांचेल कराया तप जरि जाइल काय तो अरण्यातें ॥
अथवा ह्मणेल शरणा- गत मी या केशवा शरण्यातें ॥ ५३ ॥
किंवा युधिष्ठिराच्या आश्रय तो[2] जरि करील पायाला ॥
गेला शिवाहरिभयें[3] प्रभुमागें तरि करी लपायाला ॥ ५४ ॥
अथवा भीमनकुळसह- देवांसि ह्मणेल वांचवा दास ॥
तरि खोव्यासहि राखिति साधु जसे काय लांच वादास ॥५५॥
ज्या जीवदान दिधलें तो हा कीं कां अजी वदाना तें ॥
कळलें पात्र दुखविला अहिंसा वैरी न जीवदानातें ॥ ५६ ॥
वधिलाचि रणांत उद्यां म्यां बालकघातहेतु सिंधुप हा ॥
या गरुडें धरिला तो अहि उडवुनि शत्रु-सैन्य-सिंधु पहा ५७
मारिन जयद्रथाला कोंडिन दोघे गुरूहि शर-भवनीं ॥
भ्रमतिल कौरव माझ्या इषुपटलीं जेंवि सिंह शरभवनीं ॥५८॥
न वधिन जयद्रथा तरि पावेन असत्यसन्ध[4] नरका[5] मी ॥
ज्या ज्या पावे क्रोधी लोभी बहुसंपदन्ध[6] नर कामी ॥ ५९ ॥
मारिन जयद्रथ करिन यश भुवनीं विशिखजाल वितत रणीं ॥
हें न घडतां जळेन ज्वलनीं होतांचि अस्तमित[7] तरणी ॥६०॥

---

१ शरण आल्यास. २ जयद्रथ. ३ दुर्गावाहन सिंहाच्या भयानें (हत्ती जर शंकरामागें लपेल तर कल्याण होईल असा भाव) ४ भग्नप्रतिज्ञ. ५ नरकास. ६ संपत्-अंध-श्रीमदांध ७ अस्तम् इत-अस्त पावतांच.

करितां अशी प्रतिज्ञा जगदीशें पांचजन्य वाजविला ॥
लाजविला प्रलय-जलद नादें ब्रह्माण्डगोल गाजविला ॥६१॥
वाजवुनि शंख झाला कौरवहृदयासि देव दत्तदर[1] ॥
तैसाचि सखा त्याचा अर्जुन फुंकोनि देवदत्त दर ॥ ६२ ॥
देतां दुर्जनहृदया स्वदररवें[2] करुनि कंप देवाद्यें ॥
प्रकटिति कटकीं भेरि- प्रमुखें बहु नादसंपदे[3] वाद्यें ॥ ६३ ॥
चारकथित प्रतिज्ञा परिसुनि बहु सिंधुराज तो भ्याला ॥
भिववी धननाशाची वार्ता अत्यन्त जेंवि लोभ्याला ॥ ६४ ॥
राजसभेप्रति जाउनि पार्थाची श्रुत करी प्रतिज्ञा ती ॥
पळतों ह्मणे न राक्षिति पल हरि-भार्गा[4] करी-प्रति ज्ञाती ॥६५॥
जाच ह्मणा न उगे तुह्मि धरुनि असा ध्यान हा निरोपाला ॥
पावो रिपुची त्याच्या लेश असाध्या न हानि रोपालीं[5] ॥ ६६॥
कुरुप ह्मणे पतनावधि[6] निजधर्मी काय हा निभावो जी ॥
शुद्ध यशो-हानिपरिस बहु वपुंची काय हानि भावोजी ॥६७॥
दुःशासनादि आह्मी आहों तुज सर्व वज्रकोट रहा ॥
कर्णभुजाश्रितजीवा न ह्मणों दे कीं सुरद्रुकोटर[7] हा ॥ ६८॥
आहेत कृप द्रोण द्रौणि शुचियशासि सर्व थारा जे ॥
राक्षितिल तुज यत्नें हे कालिंगादि सर्वथा राजे ॥ ६९ ॥
आहेस शूर तूंही सोडूं धृति धर्म नय नको पावें ॥

---

१ भय देणारा. २ कृष्णानें. ३ नादबाहुल्यास. ४ सिंहाचा भाग जो हत्ती त्याप्रति. ५ बाणाला. ६ पतन-अवधि-मरणपर्यंत. ७ सुर-द्रु-कोटकरल्पतरूची ढोल.

कोपुनि काय करिल पर न महेशाचेंचि नयन कोपावें ॥७०॥
बोलुनि ऐसें येउनि वंदुनि गुरुच्या पदाप्रतिं ज्ञाते ॥
कुरु सिंधुराज कथिती पार्थकृता तापदा प्रतिज्ञा ते ॥ ७१ ॥
सिंधुपति ह्मणे गुरुजी लाघवं[1] दृढ दूर[2]लक्षवेध रणीं ॥
बहु जाणें मी कीं तो रविलाचि [3]अशेष लक्षवे[4] धरणी ॥ ७२ ॥
द्रोण ह्मणे सिंधुपते ठावें हें तुजहि त्याहि सभ्यास ॥
परि तुजहुनि विजय अधिक, साचा चापीं अखंड अभ्यास ॥
बहु खवळला धनंजय वनवासें त्यांत आजि सुत-पातें ॥
तत्तप[5] बहुमत त्यां जे तपले पंचाग्निमाजि सु-तपातें ॥ ७४ ॥
परि तूं भिवों नकोचि त्यजुनि मरणभय सुखें करीं समर ॥
न शकतिल मद्भुजाश्रित[6]- मर्त्य-विलंघन करावया अमर॥७५॥
रक्षीन असंशय मी तूं वदन करूं नकोचि अवनत[7] रे ॥
कांसेसि लागल्याचें क्षुद्र अलाबुहि[8] करूनि अवन[9] तरे॥७६॥
करिन असा व्यूह जया तो न शके [10]वासविहि तरायातें ॥
प्रिय हित सत्य वदावें मज भूदेवास विहित राया तें ॥ ७७ ॥
अनुभविलें [11]सांध्वी-सुत- रत्न-परिष्वंग-सुरस-दामहि म्यां ॥
गाती यशोरसाच्या अमृतरसाच्या न सुर सदा महिम्या ७८
पुरवी प्रयागसा कीं हा धीरांचा समस्त काम रण ॥

१ चापल्य. २ लांबचें निशाण मारणें. ३ सर्व. ४ पहावे. ५ तत्-तप-अर्जुनाचें तप. ६ मत्-भुज-आश्रित. ७ खालतें. ८ भोंपळाहि. ९ रक्षण. १० अर्जुनहीं. ११ साध्वीपुत्राचें आलिंगन-रूप हार.

नाचवि अमस्तका[1] हें कां नाचविना समस्तका मरण ॥ ७९ ॥
कौरव पांडव यादव अन्य जन तसाच समुत मीहि महा ॥
अध्रुव सर्वहि नुरवी काल जगीं स्थिति जसा तमीं हिमंहा[2] ८०
नरवर्या पर्यायें[3] आह्मी हरिलों असोंचि कालबलें ॥
सुगतिद रण-मरण उप- स्थित होतां केविं चित्त कालँबलें[4] ८१
गुरुच्या अभयें बोधें काळेंही सिंधुपालक वळविला ॥
हा काय मृत्युकरवीं दैवें प्रभु-मित्र-बाळ[5] कवळविला ॥ ८२ ॥
सैंधव ह्मणे विभय मी झालों कीं गुरु नव्हे अलीकवचा[6] ॥
गुरुवचना कीर्ति जशी कंची पविच्या तशी भली कवचा ८३
सस्मित सचिंत होउनि गुरु[7]-शिष्यांच्या गुरु प्रतिज्ञानीं ॥
प्रार्थिति अपकीर्ति न हो ऐसें त्रिजगद्गुरुप्रति[8] ज्ञानी ॥ ८४ ॥
एकुनि गुरु-प्रतिज्ञा कुरुकटकीं वाद्यमात्र वाजविलें ॥
बहु नरसिंहध्वनिनीं घटिकाभरि सर्व गगन गाजविलें ॥८५॥

---

## अध्याय ८.

देव ह्मणे सखया मज धर्मभीमाहि न पुसतां स्वमतें ॥
काशि दुर्घट प्रतिज्ञा केली बा परम कठिन हें गमतें ॥ १ ॥

---

१ कबंधातें. २ सूर्य. ३ क्रमानें. ४ कालवलें येथें प्रासाकरितां "व". ५ अभिमन्यु. ६ मिथ्यावादी. ७ द्रोणप्रतिज्ञेनें सस्मित आणि अर्जुनप्रतिज्ञेनें सखेद. ८ कृष्णाप्रत.

जाणों वेडे ते जे स्वगुरुजना सुमति-दायका एमते ॥
बा तूं सत्य धनंजय काय द्रोणादि-काय कापुस ते ॥ २ ॥
हे चार ह्मणति भ्याला सैंधव परिसुनि गुरु-प्रतिज्ञा ती ॥
कथिते झाले त्यासहि पाय धरुनि हे गुरुमति ज्ञाती ॥ ३ ॥
तद्रक्षणार्थ केली स्वमुखें गुरुनें तुझ्या प्रतिज्ञा ते ॥
कीं हे सहा गातिल त्याच्या कीं तव भुजा-प्रति ज्ञाते ॥ ४ ॥
शकट-व्यूहीं पद्म- व्यूह तयाच्याहि कर्णिके-माजी ॥
राहेल जयद्रथ कीं बहु चिंता बुद्धि पावली माजी ॥ ५ ॥
कर्ण वृषसेन गुरुसुत मद्रप भूरिश्रवा कृपाचार्य ॥
सिंधुपतिपुढें षड्रथ हें तेव्हां साधतें कसें कार्य ॥ ६ ॥
हे दुर्जय जिंकावे त्वां आधीं मग सुदुर्जय द्रोण ॥
तेव्हां कीं सैंधव-वध हें शक्य ह्मणेल तुजविना कोण ॥ ७ ॥
मंत्रज्ञ सचिव सात्यकि भीमादिक धर्मराज हे आर्य ॥
साध्याऽसाध्य विचारुत कीं व्हावें सिद्ध योजिलें कार्य ॥ ८ ॥
अर्जुन ह्मणे मुकुंदा मानिशि ज्या सा रथांसि अधिक-बळ ॥
ते मद्बलार्ध-सम-बल न जसे नवनीतकवळ दधिकवळ ॥ ९ ॥
कृष्णा असोत मदधिक- बल ते कर्णादि सा रथ कवी-न ॥
कोदंड-वेद-पंडित मी त्यांसि हरूनि सार थकवीन ॥ १० ॥
सैंधवशिर हरिन करिन रण सगण-द्रोणगुरु-समक्ष महा ॥

---

१ मध्यभागीं. २ माझी. ३ हे सहा महारथी. ४ वळ (बळ.) ग्रासाकरितां. ५ ग्रास. ६ कवि-इन-कविश्रेष्ठ. ७ धनुर्वेद. ८ बळ. ९ गणासहवर्तमान.

चिंता करूं नको बा गुरु माहात्म्येंचि गुरु-सम क्षम हा ॥११॥
किंबहुना जरि तिकडे होइल जिंकीन तूर्ण विश्वास ॥
माझ्या शस्त्रास्त्रांचा मजला आहेचि पूर्ण विश्वास ॥ १२ ॥
मजसीं करील गुरु त्या पापा रक्षावयास कटकट कीं ॥
एकहि अभग्न राहों देईन न मी तया- सकट कटकीं ॥ १३ ॥
गांडीव यशस्वि जय- श्रीचें लोकीं अगार मानिल या ॥
दुर्योधनहि उद्यां अभि- मानी तो कीं अगा रमा-निलया १४
गांडीव चाप योद्धा मी सारथि तूं श्रित-स्वरग काय ॥
मग जिंकिला न मार्गे कोण पुढेंही नमत्करग-काय ॥१५॥
सर्वार्थ-दर्शक ह्मणों तुझिया भास्व-च्छवि प्रसादास ॥
या स्वार्थ-पात्र सु-गृह- स्था अतिथि स्वच्छ विप्रसा दास १६॥
मद्रथ सिद्ध असों दे उदया-पूर्वीच हेंच कर जा गा ॥
आहेचि तुझा स्वीकृत सर्व-समर्वनीं सदैव कर जागा ॥ १७ ॥
त्या रात्रींत श्रांतहि गज मन निद्रा-करीं न दे वाजी ॥
जो तोहि ह्मणे सैंधव मेल्या निद्रा करीन देवा जी ॥ १८ ॥
विजय ह्मणे माधवजी दावाया वदन न स्वसे लाजा ॥
शोकाग्नि तिचा विझवा भिजवा पुसुनि नयन स्व सेला जा१९
सुविवेक सुभद्रेच्या द्या परिदेवनें-परा सुनेला हो ॥

---

१मी अर्जुन. २ जगास. ३ भरंवसा. ४ जयद्रथा. ५ स्थान. ६ गांडिवा. ७ रमावासा (कृष्णा.) ८ श्रित-स्वर्-अग- (श्रित-कल्पतरु). ९ प्रसादास. १० रक्षणीं. ११ भगिनीस. १२ शोकरूप अग्नि. १३ आपला शेला. १४ विलाप.

वहुधा देह शिवांनीं त्याचा होतां परासु[2] नेला हो ॥ २० ॥
अंतःपुरांत जाउनि देव सुभद्रेसि बोध युक्त करी ॥
त्या-सकरुणासि हें किति केला जेणें क्षणांत मुक्त करी[3] २१॥
तूं वीरजा सुभद्रे बाइ उगी वीरबांधवा कन्या ॥
झालीस वीर-पत्नी वत्से तैशीच वीरसू धन्या ॥ २२ ॥
सु-यशें पितृ-मातुल-कुल उज्ज्वल करिता असा असावा गे ॥
बाई वदले सुर गिरि- जा-सुत तारक-बली असा वागे ॥ २३ ॥
त्यजुनि अमृत मधुर ह्मणुनि जेविं न मधु[4]खंड-पायसां गावें ॥
तव सुत-यश इतर यशो ऽधिक ऐसें बहुत काय सांगावें २४॥
वत्से आह्मांशि असी गति देवू वरदनायक पिनाकी[5] ॥
रण-मरण अमरताऽधिक झाले नाहींत काय कपि[6] नाकी[7] २५
उडविल उद्यां स्वसुत-वध- हेतु-जयद्रथ-शिरासि सितवाजी[8] ॥
आण तुझी होईल प्राप्त दशा योग्य होय कितवा[9] जी॥२७॥
ऐकुनि ह्मणे सुभद्रा हा वत्सा काल काय हा निर्धना[10] ॥
झाली कशी अकस्मात् धन-लुब्धाच्या समूळ हानि धना २७
शोकीं कसे बुडविले माझे असु उत्तराऽसु-सह सारे ॥
झालाऽसि स्वप्नींचा निधिसा[11] तूं दृष्ट[12]-नष्ट सहसाऽरे ॥ २८ ॥
धिक् पांडु-यदु-बळातें रक्षाया न शकलें मुलाला जें ॥
स्वपति-पराक्रम-वर्णन- शीलत्वें मीहि वा तुला लाजें ॥ २९ ॥

---

१ कोल्ह्यांनीं. २ मृत. ३ गजेंद्र. ४ शर्करा. ५ शिव. ६ वानर. ७ स्वर्गवासी. ८ अर्जुन. ९ दुष्टाला. १० मरणा ११ द्रव्यासारिखा. १२ दिसून अदृश्य.

झालें व्यर्थ वृकोदर- भावोर्जीचें बलाढ्य-पण आजी ॥
वाटे मरेल शोकें नातू आहेत फार पण आजी ॥ ३० ॥
हा वत्सा धैर्य-निधे हा वत्सा जन-मनोहराऽकारा ॥
हा वत्सा कुलतिलका हा वत्सा सर्वसद्गुणाऽधारा ॥ ३१ ॥
जी शूर-साधु-धार्मिक- पितृ-सुर-गुरु-विप्र-भक्त परम गती ॥
प्राप्त असो तुज वत्सा विरह न देवू कदापि पर मग ती ३२ ॥
इतुक्यांत उत्तरे-सह कृष्णा ये होय भरं विलापाला ॥
शोकीं आप्त-समागम विष-तरुचा जेविं भरविला पाला॥३३ ॥
मूर्छित पडे सुभद्रा शीघ्र तिला सांवरी कमल-पाणी ॥
वारा घाली लावी नेत्रांला शीतसें अमल पाणी ॥ ३४ ॥
कृष्ण ह्मणे कृष्णे दे पुण्य असावीच उत्तरा सासू ॥
हा हे तिची वदवितो परि किमपि न देचि उत्तरा सासू ३५
प्रभुला हाय ह्मणाया लावी मोहीं बुडोनि घटिका हो ॥
स्नेहें असाचि असो जरि लटिका करितील साधु लटिका हो ३६
उठवुनि अनुजेसि ह्मणे हें तुजला योग्य काय गा वाळ ॥
त्यजिति हित सुयश जोडुनि कवि पलभुग्भोग्य-काय गावाळ
जें तव उदार देता झाला सर्वां परां सुत रणीं तें ॥
मुनि-दुर्लभ कीं भेदुनि गेला तत्कृत-परासु तरणीतें ॥ ३८ ॥
सत्य करिल प्रतिज्ञा हा न कधीं विजयि-बाहु टळला गे ॥

---

१ कुंती. २ अतिशय. ३ चांगला. ४ कृष्ण. ५ स-असु-जीवंत. ६ प्रीति " साधुसर्वमायावीअसें मानितात ह्मणून. " ७ श्वापदभोग्य शरीर गावाळाला. ८ शत्रूंस. ९ गृत १० सूर्यास.

न उडेल अरि-शिर-स्तृण कां ज्या विजयेषु वाहुटळ लागे ३९
कृष्णोत्तरासुभद्रा- धेनूंच्या मथुनि मोहयवनातें ॥
भवनातें येउनि तो प्रभु विजयाच्या करी समवनातें॥ ४० ॥
प्रक्षाळुनि कर-चरण प्रभु विमल जलें करूनि आचमनें ॥
शुचि शयन रची मानी मित्रा [1]मणि आपणास काच मनें ४१
लिप्तस्थंडिलशयनीं एकहि सोसेल शुष्क दर्भ कसा ॥
देवाला भक्त नवा नवसाचा [2]गतवयास अर्भकसा ॥ ४२ ॥
शयनासमीप मांडी गांडीवप्रमुख सर्व हातेरें ॥
तत्तेज वाढवी निज तेजाचें घे करूनि मातेरें ॥ ४३ ॥
निजतां रात्रौ त्र्यंबक[3]- बलिविधि हा शिष्ट पथ सदा साचा ॥
त्या [4]महदस्वास्थ्यांतहि लोपों दे [5]लोकगुरु न दासाचा ॥४४॥
अर्पावें गंधकुसुम उपहार त्र्यंबकासि जे कांहीं ॥
कृष्णासि अर्पिलें तें पार्थें कीं स्वास्थ्य मानसीं नाहीं॥ ४५ ॥
स्मित करुनि मनिं ह्मणे प्रभु गेलें सोडूनि भान निज यातें॥
[6]स्मितदर्शन होतां स्व- [7]स्खलित समजलें मनांत विजयातें ॥
यच्चापरवें खचले पावुनि अहिता समेत कांप हुडे ॥
तो पार्थ स्वापार्थ प्रभुनें संप्रार्थिला न कां [10]पंहुडे ॥ ४७ ॥
समजुनि शरण्यवर्य स्वर्गीं स्तवितो जयासि शिबिराजा ॥
अर्जुन ह्मणे तयाला श्रमलासि निजावयासि शिबिरा जा ॥

---

१. रत्न. २. वृद्धास. ३ शंकरपूजा विधि. ४ मोठ्या चिंतेंतही. ५ श्रीकृष्ण. ६ हास्यमुद्राऽवलोकन. ७ आपली चुकी. ८ त्रुरुज. ९ निद्रार्थ, १० निजे.

निधि-रक्षणार्थ जैसा अति सादर राजराज यक्षांतें ॥
पार्थाऽवनार्थ तैसा स्थापी शिबिरीं मुकुंद दक्षांतें ॥ ४९ ॥
शयनीं निजोनि पाहे परमेश्वर पारि न पळहि निज लागे ॥
चित्तीं चिंतोसि ह्मणे त्वां वारिला कोण जडाहि निजला गे ५०
देव निशीथीं शयनीं बैसे मग दारुकासि आणवुनी ॥
त्यासी वदे प्रतिज्ञा पार्थाची प्रथम सर्व जाणवुनी ॥ ५१ ॥
भक्तीं जसा मदात्मा देहींहि तसा न दारुका रमला ॥
या विजय-वेद-वचना द्यावा लागे सदा रुकार मला ॥ ५२ ॥
निजरक्षणाऽधिक ध्वज- रक्षण राजासि दारुका पडतें ॥
मोलें राजशिराहुनि वहु असतें काय दारु कापड तें ॥ ५३ ॥
मद्रथ सिद्ध असों दे जाणोनि व्यसन कां गळांठावें ॥
पतिच्या श्रित प्रतिज्ञा बुडतां पडती स्त्रिया गळां ठावें ॥ ५४ ॥
विश्वासहि-कुरु गुरुचें आप्त-विपत्सरिदलाबु धनु ठावें ॥
कोण ह्मणेल व्यसनीं स्वजनसमऽवना भला बुध नुठावें ॥
तूं पांच-जन्य-नाद श्रवणीं शिरतांचि शीघ्र पाव कसा ॥
पेटेन वसोनि रथीं मी कुरुकटकीं तृणांत पावकसा ॥ ५६ ॥
साची करिन सख्या जी मारुनि सर्वहि अरि प्रतिज्ञा ते ॥
जोडितिल उद्यां बहु कर या शार्ङ्ग-प्रति अरि-प्रैति ज्ञाते ५७

१ कुबेर. २ चतुर वीरांतें. ३ मध्य रात्रीं. ४ अर्जुनरूप-वेदवाणिसि. ५ ध्वजाची काठी. ६ दुर्दशेतें पावावें. ७ प्राप्तविपत्ति-रूप नदींत भोंपळ्यासारिखें. ८ न-उठावें. ९ धनुष्यातें. १० चक्रानें.

प्राकृतहि लुब्ध जातां पदरींचा एकदा रुकाहि मरे ॥
सर्वहि पदार्थ तापद मज भक्तचि एक दारुका हिम रे ५८
दारुक ह्मणे अवश्य स्यंदन आहेचि सिद्ध आजि तरणी ॥
तेज न मिरविल तुमचा प्रभुजी सेवकाहि सर्व अजित रणीं ॥
मोठें प्रियसुत-शोकें करुनि पणहि दुःशला-विलापार्थ ॥
स्वप्नीं दर्शन दे प्रभु कीं तो कांसेस लाविला पार्थ ॥ ६० ॥
श्रीपति ह्मणे सख्या कां म्लान वदन चित्त काळजी वाहे ॥
चिंता चतुर न वरिती नाशी धृति-वित्त काळ जीवा हे॥६१॥
स्वप्नींहि प्रेमें दे प्रत्यु-त्थानाऽसनादि वासवि त्या ॥
जोडी कर तेजस्वी तेजस्वीशा जसा दिवा सवित्या ॥ ६२ ॥
भीती न कालि-काल- प्रभुचे कालाहिच्या विषा दास ॥
सांग स्पष्ट सख्या तूं कां सांपडलासि या विषादास ॥ ६३ ॥
पार्थ ह्मणे देवा कशि होइल केली खरी प्रतिज्ञा ती ॥
रक्षितिल सकल सैन्यें व्यूहा-मार्गें अरि-प्रति ज्ञाती ॥ ६४ ॥
मज दुर्घट न सकळ कुरु- कटक-चटक-कदन-कर्म पारि सविता॥
दुतंगति कृत-प्रतिज्ञ द्रोण गुरुहि सर्व धर्म परिसविता॥६५॥
सैंधव-शिर न उडवितां जरि जाइल काय भानु अस्तं-नगा ॥
तरि जीवित अयश-स्कर व्यर्थ स्त्रीरत्न जेविं अस्तन गा ॥

१ पैशाचा तिसरा भाग. २ थंड ( शांतिदायक असा भाव ). ३ जयद्रथस्त्रीच्या विलापार्थ. ४ धैर्यरूप द्रव्य. ५ अर्जुन. ६ तेजस्वी-ईशा. ७ कालाचा काळ अशा. ८ कालसर्पाच्या. ९ खेदास. १० त्वरित चालणारा. ११ अस्ताचलास १२ स्तनरहित

दुसरी तरि प्रतिज्ञा रक्षिन दहनांत काय होमीन ॥
नाकहि नरक तुज विना[1] वांचे अन्यत्र काय हो मीन ॥६७॥
स्पर्शमणे संगा क्षण विद्रें धरिला विषाद या लोहें ॥
मित्र तुझें पात्र न हो विरहाऽपयशो-विषा दयालो हें ॥६८॥
प्रभु करुनि जल-स्पर्श प्राङ्मुख बैसे उगाचि पळ आधीं ॥
मग विजयास ह्मणे मी सांगेन तसेंचि कार्य तूं साधीं ॥६९॥
परमाऽस्त्र सनातन जें ज्ञाते ह्मणताति पाशुपत ज्याला ॥
जेणें देव महेश्वर समरीं असुरांसि मारिता जाला[2] ॥ ७० ॥
तें जरि असेल अवगत मारिसिल उद्यां जयद्रथास रणीं ॥
अवगत नसेल तरि मन लावीं त्या श्रित-सुर-द्रुच्या[3] चरणीं ॥
करिल प्रसाद देइल अस्त्र सुनिश्चय करीं असा ध्या तें ॥
शिव-पद सु-साध्य करितें ध्यातां मोक्षाहि कीं असाध्यातें ॥
बैस स्वस्थ ध्यानीं पात्यासीं पातयासि लाव कसा ॥
हो श्येनसा सख्या तूं शत्रु जयद्रथहि शीघ्र लावकसा[4] ॥७३॥
उदक-स्पर्श करुनि नर बैसे दर्भाऽसनीं असा ध्याया ॥
कीं नारायणहि ह्मणे परमा सिद्धिहि नसे असाध्या या ॥७४॥
धरितां समाधि पार्थ ब्राह्म-मुहूर्तींच तो असें पाहे ॥
जातों स्वयें उदीचीं[5]-प्रति गगनपथें सवें हरिहि आहे ॥७५॥
चालविला दक्षिण-भुज धरुनि नभीं पार्थ जलज-नाभानें[6] ॥
ज्याच्या तेजःश्रवणीं सोडुनि जावेंचि खलजना मानें[7] ॥७६॥

---

१. जलावांचून इतर ठिकाणीं. २ झाला. ३ आश्रित-कल्पतरूच्या. ४ पक्षिविशेष (लाव्हा). ५ उत्तर दिशेस. ६ कृष्णानें. ७ स्मृतीनें.

पाहे हिम-नग मणिमान् श्वेताऽद्रि धनाधिप[1]-प्रिया नलिनी[2] ॥
कविनीं शिव-लीलासी जी सादर सेविली सदां अलिनीं ७७
स्वर्गासि सुखें जीच्या स्नानें पानें सुरा[3]प गेला हो ॥
अवलोकी नारायण- सख बहु मानें सुरा[4]ऽपगेला हो ॥ ७८ ॥
प्रेक्षी मंदार-द्रुम- भूषित मंदर-गिरि-प्रदेश तदा ॥
पाहुनि काल-नगातें दृष्टि न लागो असें वदे शतदा ॥ ७९ ॥
जो ब्रह्म[5]तुंग-पर्वत तैसाचि सुतुंग आणि शतशृंग ॥
शर्याति-वनीं तापस कमल-वनीं जेविं हंस-खग भृंग ॥ ८० ॥
अश्व[6]-शिरःस्थान सकल सिद्धाचें जें सभाग्य माहेर ॥
आथर्वणाऽश्रमहि ज्या सजुनि पल न मुनि निघति बाहेर ८१
वृषदंशस हा मंदर पूर्वी हृदयांत रेखिले होते ॥
जे परम रम्य तापस- सुर-सिद्ध-निवास देखिले होते ॥८२॥
श्रीराम-बाण-सम-गति देऊनि दावी सख्यासि नवल हरी ॥
देव-दया दासा दे सुख न तसें अमृत-सिंधु-नव-लहरी ॥ ८३ ॥
तो श्री-नारायण-सख नर तेजःपुंज-पर्वता पाहे ॥
चित्तीं ह्मणे निवाले डोळे सोडूनि सर्व तापा हे ॥ ८४ ॥
त्या शैलाच्या अग्रीं झाले सुर चित्रसे पहाते ज्या ॥
अवलोकिला भवानी- सह भगवान् भूत-पति महा-तेजा ॥ ८५

---

१ कुबेर प्रिया. २ कमल युक्त सरोवर नदी. ३ मद्यपी. ४ सुर-आपगा-देवनदीला. ५ नामविशेष पर्वत. ६ हयग्रीवस्थान

ज्याच्या शुद्ध तपा सम कोठेंही किमपि तप न भास्वर[1] गा ॥
कृष्ण नमस्कारीं त्या दासांच्या कोटि[2]-तपन-भा स्वरगा[3] ८६
अजित तसा विजय नमी क्षिति-वरि ठेवूनि सुचिर शिरगुड घे॥
बहुनमन-लाभलोभी जाणों दुष्काळ-सुक्षुधित गुड[4] घे ॥ ८७ ॥
ईश्वर ह्मणे उठा बहु साधु तुह्मी मुनि कवि-प्रवर दास ॥
मज आशुतोष[5] ह्मणती सर्वज्ञ अनेक विप्र वरदास ॥ ८८ ॥
झालों प्रसन्न मागा ऐसें ऐकोनि अभयदान मुनी[6] ॥
स्तविती प्रेमें सात्विक- भावांत बुडोनि अभयदा नमुनी ॥८९॥
त्वत्सेवा-सुरभीच्या कासेला भक्त वत्स लागावा ॥
कविनीं तुझा प्रसादचि अनु-दिन बा भक्त-वत्सला गावा॥९०॥
सर्वार्थ-संप्रदर्शक अर्क तुझे पाय अंधकाऽराते[7] ॥
याचे आश्रित जे जे भीति भवाख्या[8] न अंधकारा ते ॥९१॥
नमनें स्तवनें अर्जुन होय स्नात प्रसाद- वृष्टींत ॥
आलें धैर्य मनांत प्रभु- दर्शन-योग्य तेज दृष्टींत ॥ ९२ ॥
जें आपण कृष्णासि त्र्यक्ष-बलि-द्रव्य[9] वाहिलें होतें ॥
प्रभुच्या पायापाशीं पार्थें पुष्पादि पाहिलें हो तें ॥ ९३ ॥
पार्थिव -मूर्ति- समर्पित- माल्य किरातीं तसेंचि हें वाटे ॥
हरि- हर-रूपाऽभेद- ज्ञानानंदाप्तिनें[10] गळा दाटे ॥ ९४ ॥

१. देदीप्यमान. २ कोटिसूर्य-प्रभ अशा. ३ कल्पतरूला. ४ गूळ. ५ लवकर तुष्ट होणारा. ६ नरनारायण. ७ अंधकासुर-रिपु. ८ भव आख्य संसार नामका. ९ शंकराचें पूजासाहित्य. १० अद्वैतज्ञानाच्या आनंदप्राप्तीनें.

मागे मग प्रतिज्ञा- सिद्ध्यऽर्थ प्रभुसि पाशुपत नमुनी ॥
कीं ह्मणति न हो अयशीं हो मृत्यु-मुखांत आशु पतन मुनी ॥
स्मित करुनि महेश ह्मणे यदु-कुरु-वरहो[1] पुरेल हा हेत ॥
जा चाप बाण आणा त्या अमृत- सरोवरांत आहेत ॥ ९६ ॥
कृष्णं[2] प्रभुसि नमुनि जों गेले रवि-मंडळ-प्रभा सु-सरा ॥
तों एक नाग आहे घोर सहस्त्राऽस्य[3] घोरतर दुसरा ॥९७ ॥
पाहिल्याहुनि बहु दुसरा दुष्प्रेक्ष्य विषाऽग्नि-संपदे व्रमुनी ॥
ज्यातें पाहुनि पावति दूर-स्थित नतहि कंप देव मुनी॥ ९८ ॥
वंदुनि भावें ह्मणतां शतरुद्रिय- पाठ हात जोडून ॥
झाले धनुष्य शर ते नाग स्व-महोग्र- रूप सोडून ॥ ९९ ॥
कृष्ण- स्कंधीं घेती चाप गमे हॅल[4] विशाल शर भाला ॥
प्रभुला नमुनि निवेदुनि नमिती पुन्हां सिंह जेविं शरभाला[5] १००
गुण शर जोडुनि जेव्हां प्रभु मांडुनि ठाण चाप आकर्षी ॥
तें ध्यान पाहुनि जितं[6] कृष्णाचि न ह्मणती समस्त नाकर्षी १०१
श्रीमूर्ति राज-मुद्रा नर कागद त्यांत सम ठसा हो तो ॥
तो ध्यान-योग वुडतां सर्वांहि जडांसि कमठसा होतो ॥१०२॥
हृदयांत ध्यान तसें धरिलें सरहस्य पाशुपत गा तें ॥
जें कालातें जिंकी जेविं गरुड-तेज आशु पतंगातें[7] ॥ १०३ ॥
प्रभु दावुनि निज विजय-द सदरि-घ्न ध्यान चाप चढवूनी ॥
शर त्या सरींच टांकी कार्मुकहि महाऽस्त्र-मंत्र पढवूनी १०४

---

१ यादवकौरवश्रेष्ठकृष्णार्जुन. २ कृष्णार्जुन. ३ सहस्त्रमुख. ४ नांगर. ५ शिव. ६ जयजय. ७ पक्ष्यातें.

विजयी व्हा जा ऐशी आज्ञा होतां महेश-पद नमुनी ॥
होउनि कृताऽर्थ आले शिबिरासि पुन्हा प्रसन्न-वदन मुनी[१] १०५
प्रभुनें स्वप्नीं केला कृत-कृत्य सखा न लेश भागविला ॥
इकडे दारुक गोष्टी सांगोनि प्रातरंऽवधि[२] जागविला ॥१०६॥
प्रथम करी जप होम ब्राह्मणपूजादि विहित जें कर्म ॥
मग विश्वकर्म-निर्मित भासुर-भद्राऽसनीं बसे धर्म ॥ १०७ ॥
शुभ्रांऽबर मुक्ता-धर सित-चामरवीज्यमान शोभे तें ॥
बहु राज-रत्न ओढुनि घे शारद-पूर्ण-चंद्र-शोभेतें ॥ १०८ ॥
चंद्र किति जसा धर्मा न तसा कवि मानवे शतक्रतुला ॥
मग तद्यशोऽमृताची[३] धरिल कसें मानवेश[४] तक्र तुला[५] ॥१०९॥
ज्याचा प्रताप-रवि मधु- कैटभ-तिमिरीं लव प्रभा वमला ॥
तो प्रभु ज्याच्या द्वारीं वाच्य न त्यांचा[६] लव प्रभाव मला ॥
तों भूप-प्रभ कवची खड्गी मणि-कुंडली युवा वंदी ॥
द्वास्थ[७] ह्मणे प्रभ येतो तो वेद स्तविति ज्या जसे वंदी ११ १॥
धर्म ह्मणे त्यजिति जया नमुनि कुल-धनादिभव-मदा[८] ज्ञाते ॥
प्रभु चरण दर्शन मला द्याया इच्छिति कसे मदाऽज्ञाते ११२
तिमिर-हत[९] गतीच्छु[१०] कवण रविच्या घालील आण वाजीतें ॥
आणा हो द्वास्थ तया पूजासाहित्य आणवा जी तें ॥११३॥

---

१ नरनारायण. २ प्रातःकालपर्यंत. ३ तत्-यश-अमृताची-धर्म-यशोमृताची. ४ मानवश्रेष्ठ. ५ बरोबरी. ६ धर्मांचा ७ द्वारपाल. ८ कुल-धन-तारुण्य आणि विद्या-यांपासून होणारा जो मद त्यातें. ९ अंधकारामुळें अडलेला. १० गमनेच्छु.

येतां प्रभुचें धर्म स्वकरें लागे सभाजन कराया ॥
धन्य ह्मणे या जसि रघु- पति-बहुमानीं सभा जनकराया ११४
भक्तापुढें न मिरवी तेज श्रीमूर्ति रविस भाजी जी ॥
दावी बहु विनय ह्मणे जरिहि ब्रह्माऽऽदि-कवि-सभा जी जी ११५
द्रुपद विराट वृकोदर सात्यकि-इत्यादि सर्वही आले ॥
झाले कृतार्थ हरिला पाहुनि चन्द्रा चकोरसे धाले ॥ ११६ ॥
धर्म ह्मणे माधवजी भ्यालें मन करुनि बोध वळवा जी ॥
व्यसनीं तरेल मंदर- सा जरि ताराल तो धवल -वाजी ११७॥
कृष्ण ह्मणे राजाजी कां भ्यालां विजय हा असामान्य ॥
एका पुरारिवांचुनि नाहींच जगत्त्रयीं असा मान्य ॥ ११८ ॥
ज्या पाहुनि सुरहि ह्मणति कृष्णचि कृष्णाऽनुजा-धव लवा जी
तो धर्माला सर्वां मागुनि येउनि नमी धवल- वाजी ॥ ११९ ॥
आलिंगुनि धर्म ह्मणे वत्सा विजयोत्सुका महाबाहो ॥
मारिन जयद्रथ ह्मणसि तरि सत्य तुझा सु-काम हा वा हो१२०
आश्रय मेधा विजया विजया होतोसि तूं करुनि आंजी ॥
कीं हा प्रसन्न बहु तव मुख-वर्ण असाहि अच्युतहि आजी १२१
धर्मासि विजय सांगे स्वप्नींच्या अद्भुता अनुभवातें ॥
नमिति क्षितिवरि ठेवुनि शिर सर्व स-देवकी-जन भवातें १२२

---

१ पूजन. २ धर्माला. ३ रामचंद्राच्या बहुमानीं. ४ दहनकरी. ५ अर्जुन. ६ शिव. ७ कृष्ण-अनुजा धव (पति) अर्जुन. ८अर्जुन. ९ विजय-उत्सुका. १० युद्ध. ११ देवकीनंदनासह. १२ शिवातें

किति ह्मणति कायसुरभी पुरवी आस्था पिनाकि-लीला हो ॥
किति ह्मणति एक हरि हर इतरीं हा स्थापिना किलीला हो॥१२३
धर्म ह्मणे हूं अद्भुत करुनि मला आजि समर-सत्र दावा ॥
काय इतर रस योगचि एक भला आजि-समररस वदावा॥१२४
धर्म-प्रेरित गेले ते भीमाऽदिक सुरोपम रणाला ॥
राम-प्रहित जसे दश- मुख-कटकाच्या सुरोप मरणाला॥१२५

---

# अध्याय. ९

श्रित-वत्सलें मुकुंदें त्यजिला स्व-स्वामि-भाव-सार थिता ॥
प्रेमें श्रीहि न वरिली तैसी जैसी स्वदास-सारथिता ॥ १ ॥
सिद्ध करिति यन्नामें ब्रह्माऽदि सकल मनोरथास जुनीं ॥
तो प्रभु ह्मणे पटु न मी दे पंचाऽक्षर मनो-रथा सजुनी ॥ २ ॥
देव ह्मणे अर्जुनजी व्हा सिद्ध रथस्थ तपन-कोपार्थ ॥
तें कां न ह्मणेल मनीं ब्रह्म-पदाद्याऽर्थ तप नको पार्थ ॥ ३ ॥
करुनि प्रदक्षिण द्विज- वृंदासि रथासि तो कवि नयानें ॥
मग वेघोनि अधिष्ठी जनकाऽकीं जेंवि तोक विनयानें ॥ ४ ॥
काय उणें त्यां करि स- श्रीकृष्णा ज्या निवास विप्राऽशी ॥

---

१ युद्धयज्ञ. २ युद्धतुल्यरस. ३ देवतुल्य. ४ उत्तमशर. ५ धनीपणा. ६ तोकडा. ७ सूर्यकोपार्थ. ८ नीतीनें. ९ बसे. १० नम्रतेनें. ११ अर्जुनास. १२ कृष्णासह. १३ स्थान. १४ ब्रह्माणाचा आशीर्वाद.

कर्णाहीं स्व-स्तुतिस श्रीकृष्णाजानि[1] वासवि[2] प्राशी ॥ ५ ॥
जाला निज दासाचा ज्या स्तविति सुधीर विप्र तो दास ॥
श्रीनलिनीचा[3] चक्र त्यजुनि धरि सुधी रवि प्रतोदास[4] ॥ ६ ॥
पांसु[5]-निकराहि[6] प्रभुच्या हेतु बहु प्रीतिचा बुकासा च ॥
वाटे न कौस्तुभाला जपला जगदीश चाबुका साच ॥ ७ ॥
अनुभवती रूपाची एक स्थिति एक हानि पट[7] सूत ॥
तैसे हे कृष्ण सखे एक रथी एक हा निपट[8] सूत ॥ ८ ॥
कृष्ण रथीं चढले मग तोहि चढे पुत्र सत्यकाचा हो ॥
जेंवि हर-रथीं विधि हरि दुसरा दृष्टांत सत्य काचा[9] हो ॥ ९ ॥
अवलोकुनि सात्यकिला पार्थ ह्मणे धर्मराज रक्षावा ॥
सैंधव[11]-वधाहुनि उणा[10] न तुवां हा कार्यभाग लक्षावा ॥ १० ॥
चिंता करूं नको तो कुरु-गुरु तेजें असो अनलें[12] सरें[13] हां[14] ॥
एक मजपुढें माधव तूं जा धर्मापुढें अनलसें[15] रहा ॥ ११ ॥
गेला तो धर्माला रक्षाया जेंवि सत्यक पित्याला ॥
सुगलो-क्तें[16] रामसेवा स्मरला पाहोनि सत्य कपि त्याला १२॥
द्रोणें रचिला सैंधव- रक्षाऽर्थ व्यूहनायक व्यूह ॥
परमाऽर्थ-रक्षण-क्षम अपराजित जेविं काय कव्यूह[17] ॥ १३ ॥

---

१ द्रौपदीपति. २ अर्जुन. ३ लक्ष्मीरूपकमलिनीचा. ४ चाबुकास. ५ धूळी. ६ समूह. ७ वस्त्र. ८ अत्यंत. ९ सात्यकिचा. १० कच्चा. ११ जयद्रथ. १२ अग्नि. १३ सरोवर. १४ अर्जुन. १५ आलस्यरहित. (सावध) १६ सुग्रीवानें सांगितलेली. १७ कवि ऊह-कवितर्क.

चोवीस कोस लांब व्यूह सहा कोस रुंद तो मागें ॥
जेणें श्रिता न बाधों- धावा पर-काल[1] जेंवि सोमांऽगें[2] ॥ १४॥
जिंकीसा कोणीहि न शास्त्रें शस्त्रें तपोनि धीरा जा ॥
तो[3] जपला अमृतरसा बहु शक्र तसा तपोनिधी राजा[4] ॥ १५ ॥
सैंधव मार्गे दूर स्थापूनि व्यूह-गूढ-गर्भांत ॥
होय पुढें पर-कटकीं जाया दव[5] जेंवि शुष्क दर्भांत ॥ १६ ॥
व्यूहापुढें स्वयें गुरु दुर्मर्षण त्यापुढें उभा राहे ॥
मृग जैसा वाराया हरिची[6] तो वाट जिष्णुची पाहे ॥ १७ ॥
सेनाग्रीं वाजविती नर-नारायण सखे दर[7]-वरा जे ॥
ते[8] मोरसे भुजगसे एकती होउनि सखेद रव राजे ॥ १८ ॥
रोमांच-कंचुकाला कडकडतां कृष्ण-कंबु कांपि त्याला ॥
पर सोडी भानाला सिंह-रवें जेविं जंबुक पिल्याला ॥ १९ ॥
बहु गज हय हगति मुतति दे शंख-स्फुरण तें विपत्तीतें ॥
श्री-नृहरि-नाम-गर्जन भूतातें होय तेंवि पत्तीतें[10] ॥ २० ॥
ज्याचे निवात-कवचाऽद्य-ऽसुर बला निपट ह्मणति शर दभ्र[11]
त्या दुर्मर्षण-बल किति गर्जनि भिववील वायु शरदऽभ्रा[12] ॥ २१ ॥
अर्जुन-बाण-समूहें दुर्मर्षण-कटक सर्व भंगे तें ॥
जरि विजय-शक्तितें पर रोधिल सैकतहि[13] सेतु[14] गंगेतें ॥ २२ ॥

---

१ शत्रुरूपकाळ २ सोम-अग-कैलासपर्वतानें. ३ द्रोण. ४ जयद्रथास. ५ दावानल. ६ सिंहाची. ७ शंखश्रेष्ठा. ८ नरनारायण. ९. मारुति. १० पायदळास. ११ तुच्छ. १२ शरदृतूंतील अभ्र. (मेघ) १३ वाळूचा. १४ बांध

दुःशासन होय पुढें दुमर्षणसाचि भग्नहि रणांत ॥
खद्योत-तेज उरतें कांहीं तरि काय अर्क-किरणांत ॥ २३ ॥
दुःशासन शीघ्र पळे जाणों गिरिवरुनि दगड तो घसरे ॥
गुरुवरि जाय कपि-ध्वज जेंवि पुढें मथुनि सेतु ओघ सरे२४॥
कृष्णाऽनुमतें अंजलि जोडुनि अर्जुन ह्मणे अहो गुरुजी ॥
स्वस्त्यऽस्तु ह्मणा द्या मज शिष्या आशी जयप्रदा गुरुजी२५
पांडुसम युधिष्ठिरसम कृष्णसम तुह्मी त्रिनेत्रसम महितं ॥
करिल प्रसाद तुमचा जेंवि तसे नार्कनाथ न मम हित ॥२६॥
प्रेम असामान्य करी गुरुराज दयालु जनक-सामान्य ॥
तें न स्मरेल जो तो होईल कृतघ्न जन कसा मान्य ॥ २७ ॥
या दुर्भेद्य-व्यूहीं इच्छितसें आजि मी शिरायास ॥
तुमचा प्रसाद नसतां होइल माझा वृथा चिराऽऽयास ॥२८॥
अश्वत्थामा तैसा सैंधव-वध-पणहि हाहि राखावा ॥
कीं भंगतां प्रतिज्ञा मान-धनें अग्नि वा हिरा खावा ॥२९ ॥
हांसोनि द्रोण ह्मणे पार्था मजला न जिंकितां आजी ॥
जिंकावया जयद्रथ शक्य नव्हे मजसवें करीं आजी ॥ ३० ॥
ऐसें वदोनि मार्गण- वृष्टि तयावरि महातपा सोडी ॥
जैशी आटोपाया मत्त-गज-शिरीं महात पांसोडी ॥ ३१ ॥
तों अर्जुन गुरु-कार्मुक खंडाया बाण निज गुणीं जोडी ॥

---

१ अर्जुन. २ प्रवाह. ३ मोठी. ४ शंकरासमान. ५ पूज्य. ६ इंद्र. ७ किंवा. ८ युद्ध. ९ मोठें आहे तप ज्याचें असा द्रोण. १० झापडी.

तें जाणोनि गुरु प्रभु गांडीवाच्याचि त्या गुणा तोडी ॥३२॥
जोडुनि गुण पार्थ करी कुरु-सेना-पाल-विप्र-कटकान्ता ॥
कीं गुरु-पराभवेंही कुरुसेना पाळवि प्रकट कांता ॥ ३३ ॥
त्या दोहीं कृष्णांवरि गुरु खवळे जेंवि देव कीनाश ॥
बहुधा ह्मणे पृथेसह शोकें पावोंच देवकी नाश ॥ ३४ ॥
द्रोण करी नाराचें क्षत वक्षीं जेंवि तक्षक रदानें ॥
कांपे क्षण जो भीता रक्षाया परम दक्ष करदानें ॥ ३५ ॥
धैर्य धरुनि गुरुवरि शर सोडी श्वेताऽश्व जेंवि कुपिताही ॥
हर्षे द्रोण न कोपे पुत्रोत्कर्षे कुढे न कु-पिताही ॥ ३६ ॥
जो योजिला गुरूनें सर्वहि तो कृष्ण-रक्त सायक पी ॥
ज्याच्या व्रजीं प्रसादें खाती ब्रह्माऽद्यऽलभ्य साय कपी ३७॥
गुरु-शर पडति नर-रथीं नव-जलजीं जेंवि भृंग सु-रसाऽर्थ ॥
कीं त्या सु-यज्ञवाटीं शिरला घ्याया स्वभाग सुर-सार्थ ॥३८॥
केशव ह्मणे सख्या हा गुरु सोडुनि मुख्य कार्य साधावें ॥
सैंधव-वधार्थ सत्वर नियत शिवाऽर्चाऽर्थ आर्यसा धावें ३९॥
पार्थ ह्मणे सूचविलें समयीं हित उचित काय तुज वाहूं ॥
चाल सख्या लवकरि हा कुरुसेना-पाल घाल टजवा हूं ४०
गुरुतें प्रदक्षिण करुनि रथ काढी वासुदेव वेगानें ॥

---

१ द्रोणाच्या सैन्याचा अंत (नाश). २ हाका मारी. ३ यम. ४ दंतानें. ५ हात देण्यानें. ६ क्रुद्ध सर्प. ७ दुःख न मानी. ८ गोकुळीं. ९ नूतन कमलावर. १० उत्तम रसाकरितां. ११ उत्तम यज्ञमंडपीं. १२ देवतासमूह. १३ शिवपूजार्थ.

नच ह्मणितलें जयाच्या किमपि यशाच्या न देववे गानें ॥
आतां गुरुवरि सोडी शर नर होऊनियां परावृत्त ॥
असुरा अमृत तसें बहु दुर्लभ ज्यां साधुचें परा वृत्त॥ ४२ ॥
द्रोण ह्मणे रे अर्जुन कोठें जातोसि कां निसरलास ॥
शत्रूस न जिंकितां तूं निघसी कीं या पणा विसरलास॥४३॥
पार्थ ह्मणे शत्रु न तूं माझा गुरुराज बा दयाळो कीं ॥
जोडील कोण समरीं तुज जिंकुनि साधुवाद या लोकीं॥४४॥
ऐसें बोलोनि निघे अतिसत्वर सिंधुराज-वधं-कर्मा ॥
त्या अयुत-बळें रोधिति जय कांबोज श्रुतायु कृतवर्मा॥४५॥
त्या कटकातें मथितां गांठी कुरु-गुरु पुन्हांहि परि त्यांतें ॥
सोडी पार्थ महा-मति काळ-विलंबाऽर्थ युद्ध करित्यातें॥४६॥
कृतवर्म्यासीं झटतां देव ह्मणे चाल करुनि मथना तें ॥
आणूं नकोचि चित्तीं व्याही हें त्यजुनि धर्म-पथ नातें॥४७॥
मोहुनि भोज निघे कीं प्रभु वरिच्याव‍रि ह्मणे सख्या निघ रे॥
शिरतां नर द्रवे पर- बल अर्कें घनहि घृत जसें विघरे॥४८॥
पांचाल उत्तमौजा चक्रत्राता दुजा युधामन्यू ॥
त्यां गांठी भोज जसा गत-सत्संगा तपीं बुधा मन्यू ॥ ४९॥
व्याली ज्याला वरुणा- पासूनि नदी प्रसिद्ध पर्णाशा ॥

---

१ माघारा फिरून. २ द्रोणाचें. ३ शाबासकी. ४ जयद्रथाचा वध करण्याचेंच आहे कर्म ज्याचें असा अर्जुन. ५ द्रोणातें. ६ कालक्षेप करण्याकरितां. ७ कोप. ८ नामविशेषनदी.

जेणें पूर्ण न केली स्वपरिभवें शत्रुचीच कर्णाशा[१] ॥ ९० ॥
पर्णाशा प्रार्थी बहु ज्या अमर करा वरें असें वरुणा ॥
ज्याला मंत्रपुरस्कृत[२] सु-गदा देउनि पिता करी करुणा॥९१॥
ज्यासि ह्मणे वरुण तरणि[३] होउनि अरि-सागरांत तारील ॥
युद्ध न करित्यावरि जरि सोडिसिल गदा तुलाचि मारील ॥
तों धांवला श्रुतायुध राजा भीमाऽनुजासि वाराया ॥
होउनि विरथ स्वगदा सोडी नारायणासि माराया ॥ ९३ ॥
जें भक्ष्य[४]भ्रांत्याऽगत- मूषीतें भय महा भुजग दे तें ॥
त्या वरुण-सुत-नृपाच्या देता झाला महाभुज[५] गदेतें ॥ ९४ ॥
जसि योजितां अविपर्यी कृत्या तसि ती महागदा परते ॥
मारी श्रुतायुधाला सर्व भयें भंगले तदा पर ते ॥ ९५ ॥
मग कांबोज-सुदक्षिण नृप वधिला जेंवि सिंह शरभानें ॥
हरिति शिरें बहुतांचीं जैसीं तैसींच पार्थ-शर भानें ॥ ९६ ॥
हाणी श्रुतायुराजा समरीं रक्तप्रपा[६]ऽर्थ तोमर तों ॥
मोहे प्रभुही जाणों वदला न वदोनि पार्थ तो मरतों ॥ ९७ ॥
तद्बंधु अच्युतायुहि हाणी शूलेंकरूनि सितवाहा[७] ॥
देव ह्मणे बा सावध हो देइल हर्ष मोह कितवा[८] हा ॥ ९८ ॥
उठतां वाट आला जाऊनि प्रेत-राज-सदनातें[९] ॥
वारा घालूनि पुसी प्रभु वारंवार मित्र-वदनातें ॥ ९९ ॥

---

१ श्रवणेच्छा. २ मंत्रपूर्वक. ३ नौका. ४ भक्ष्याच्या आशेनें आलेल्या उंदरास. ५ अर्जुन. ६ रक्ताची पोई होण्याकरितां. ७ अर्जुनास. ८ कपट्याला [ दुर्योधनास ]. ९ यमगृहास.

गमले स्वकाळिजा अहि डसले शर शौरिच्या शरीरा जे ॥
विजया निजनयन-युगीं कण दोघे बंधु ते शेरी राजे ॥६० ॥
दावी विकलत्व प्रभु जो कांहीं कौतुकेंचि कोपार्थ ॥
इंद्राऽस्त्रें कटकासह करि दोघांचेंहि भस्म तो पार्थ ॥ ६१ ॥
नियुतायु एक दुसरा दीर्घायु कुमार वीर जे त्यांचें ॥
तेही वधिले विजयें राहों न दिलेचि धीर जेत्यांचे ॥ ६२ ॥
वेष्टिति अंग कलिंग प्राच्य असे बहुत भूप कोपानें ॥
ते दंडिले नरानें जेंवि स्व-पशु प्रमत्त गोपानें ॥ ६३ ॥
पार्थ प्रवर्तवी पर- बल मर्दुनि शोणितोऽपगेला हो ॥
जैसा वर्षाकालीं तैसाचि क्षोणि-ताप गेला हो ॥ ६४ ॥
प्रभुसि गदेनें हाणी तों अंबष्ठ-श्रुतायु जगदीशा ॥
हृदयीं धन्य ह्मणे त्या विजय-ध्वज-निलय वायुज गदीशा६५
नर त्या गदेसि खंडी जों तों धांवे धरूनि दुसरीतें ॥
आला गमे नदीचा लोंढाचि पुढें करूनि सुसरीतें ॥ ६६ ॥
ताडी आधीं प्रभुला मग पार्थाला पुनःपुन्हा रागें ॥
अद्भुत तें चावावे गरुड-गुह-शिखी बळें जसे नागें ॥ ६७ ॥
जसि गति घटकर्णाची करि पुरदाया स्वकाम राम रणीं ॥
झाली प्राप्त तसिच त्या पार्थापासूनि पामरा मरणीं ॥ ६८ ॥

---

१ रजःकण. २ बाण धरणारे. ३ जयशीलांचे. ४ पूर्वदेशाचे राजे. ५ रक्तनदीला. ६ अंबष्ठदेशाचा राजा श्रुतायु. ७ वायुपुत्र मारुति. ८ कुंभकर्णाची.

शिरतां विजय बहु करी दुर्योधन कटक तें विकळ[1] पातें ॥
भिववील न प्रवेशें हरिणाच्या हरिहि तेंवि कळपातें ॥ ६९ ॥
व्यूहीं शिरतां अर्जुन दुर्योधन निज मनीं ह्मणे हाय ॥
जाय द्रोणापासीं नमुनि ह्मणे त्यासि हें बरें काय ॥ ७० ॥
तो तुजसमक्ष कैसा शिरला व्यूहीं शिरों नये वातें ॥
तेजें अलंघ्य कीं तूं आचार्या वासवादि देवांतें ॥ ७१ ॥
भ्याले सर्वहि योद्धे पार्थां हरि जेंवि वध-परा शरभा ॥
आह्मां न सोसवे नर- रथ-भा जसि राक्षसा पराशर-भा[2] ७२॥
दिधलें जयद्रथाला अभय व्यूहीं सिताऽश्व शिरकविला ॥
रक्षोचित प्रतिज्ञा- वच न तसें धन कलत्र शिर कविलें[3] ७३
विश्वास-घातकी हा लावियला त्वांचि पाप डाग मला ॥
अभयद जयद्रथा तव कर माथां जेंवि पापडा गमला[4] ॥७४॥
मद्विप्रिय-रत धर्म- प्रिय-रत तूं स्पष्ट आजि कळलास ॥
मज पोपित्या विष-फळें अमृत-फळें मद्दिदार्थ फळलास७५॥
तूं मधुनें सारविला केवळ वरि मात्र गोड वाखरची ॥
जो गुण करी तयाचें अरि-वश होउनि अनिष्ट वाख रची ७६
खेदें प्रलाप केला गुरुजी चित्तीं धरूं नका पावा ॥
रक्षा सैंधव आपण लावुनि पोषुनि तरू न कापावा ॥ ७७ ॥
द्रोण ह्मणे तूं अश्व- त्थामासा हें न अन्यथा नातें ॥
सेवी गुरु-मातेच्या विद्या-रूपा न अन्य थानातें ॥ ७८ ॥

---

१ मूर्च्छित. २ पराशराचें तेज. ३ ज्ञात्याला. ४ वस्त्रा.

कोप नसेचि तुझा मज सांगतसें सत्य मी न वंचकसा ॥
माझा धनंजयाचा होइल तुल्य प्रताप-संच[1] कसा ॥ ७९ ॥
मी वृद्ध रथी सारथि नर नारायण सखे तरुण बा ते ॥
अक्षय लक्ष[2]यशोधन- जनसंस्तुत रथ तुरंग धनु भाते ॥ ८० ॥
बा सोडिले शर पुढें जे जे त्या अर्जुनें महाभागें ॥
वेगाऽतिशयें पडती ते एक क्रोश तद्र[3]थामागें ॥ ८१ ॥
हय-बल बहु कृष्णाचें निपुणपणहि बहु न सांगवे गा तें ॥
न तसा संचहि सोसिल- हि प्रवयांचें[4] न अंग वेगातें ॥८२॥
व्यूहाचें मुख सोडुनि त्यामागें म्यां वृथा न लागावें ॥
वदलों धर्म धरिन तें करिन मग तुह्मीं न कां मला गावें ८३
करितां युद्ध धनंजय उजवें घालूनि हात जोडूनी ॥
गेला न जिंकितां मज बहु होंकरितांहि[5] शीघ्र सोडूनी ॥८४॥
अर्जुन शिरला व्यूहीं त्यामागें धर्म सांपडेल मला ॥
सुख-साध्य[6] यक्षराज-[7] त्यक्त निधि जसा तसाचि तो गमला ॥
मी जातों धर्मावरि तूं जा त्या पांडवास[8] वाराया ॥
होय सुदुःसह जीवित-[9] निस्पृह-जन-कांड वासवा[10] राया[11] ॥८६॥
भूप ह्मणे इच्छावा बाळें घ्याया सुधांशु[12] उडुनि करें ॥
तेंसें हे गुरुजि कसा जिंकावा चंडभानु[13] उडुनिकरें[14] ॥ ८७ ॥

---

१सामग्री. २ लक्षजनांनीं उत्तम प्रकारें करून स्तुत. (रथाचें विशेषण). ३ अर्जुनाच्या रथामागें. ४ वृद्धाचें. ५ हटकितांही. ६ सुखानें साध्य. ७कुबेरानें टाकलेला. ८ अर्जुनास. ९जीवावर उदार झालेल्याचा बाण. १० इंद्रास. ११ दुर्योधनास. १२चंद्र. १३सूर्य. १४नक्षत्रसमूह.

हें न घडेल न ह्मणवे धरिता झाला धरेसि दर्भ कसा ॥
रक्षावें यश आपण हा शिष्य करिल गुरूक्त अर्भकसा ॥८८॥
द्रोण ह्मणे कुरुराजा पार्थ दुराधर्ष सत्य परि त्यातें ॥
तूं रोधिशील माझ्या सामर्थ्यें सैंधवान्त करिसातें ॥ ८९ ॥
होशील त्या प्रवाहा पर्वत तूं मी नव्हें अलीकवचा ॥
तुज लेववितों तें ज्या दृढता वज्राहुनी भली कवचा ॥९० ॥
घे कवच अ-भेद्य सुराऽ सुर-नर-सर्वाऽस्त्र-शस्त्र-वृष्टीनें ॥
श्रीशुक वैराग्य जसें रंभादि स्त्रीप्रकांडें-दृष्टीनें ॥ ९१ ॥
श्रीगुरुनें लेवविलें नव कनक-कवच जपोनि मंत्रास ॥
जें अरिचा हॅरि सत्पद- रज मूर्तिंचा जेंवि सर्व संत्रास ॥९२॥
द्रोण ह्मणे वृत्रासुर या सामर्थ्येंचि जिष्णुनें मथिला ॥
साक्षादिंद्रेंचि कवच- धारण-मंत्र-प्रयोग हा कथिला ॥ ९३ ॥
हरिपासुनि जोडुनि दे हें विद्या सु-धन अंगिरा जीवा ॥
तो अग्निवेश्य-गुरुला र्‍हद जीवन जेंवि संगिराजीवा ॥ ९४ ॥
लेवविलें तुज म्यां हें कौतुक दाविल अभेद्य कवच रणीं ॥
ऐसें ऐकुनि गुरुच्या घाली नियतां नृपाल कव चरणीं ॥९५॥
जाय सुयोधन कारुनि पार्थातें सिंधुराज राखाया ॥
स्पर्शे युधिष्ठिर-चमू व्यूहा जसि सिंधुरा जरा खाया ॥९६॥

१ अशक्य. २ जयद्रथाचा अंत. ३ प्रशस्त नजरेनें. ४ हरण करी. ५ इंद्रानें. ६ बृहस्पतीचा बाप. ७ बृहस्पतीला. ८ डोह. ९ संगकर्त्या कमळास. १०मिठी.

# अध्याय १०.

मारुति सात्यकि धृष्ट- द्युम्न तसे कुरुबळासि तुडवीती ॥
कुनृ-पति-राष्ट्रासि जसे दुष्काळ व्याधि चोर बुडवीती ॥१॥
द्रोण न थारे क्षण पर- कटकांत जसा न रुद्र थारावा ॥
तच्चाप-रवा पांडव भीति जसे अहि गरुडथारावा ॥ २ ॥
द्रोण क्षत्रिय-हृदया बहु जैसी भीति राम दे वधुनी ॥
कारि पूर्ण सेवित्यांचे रक्त-नदी जेविं काम देवधुनी ॥३॥
शत-संख्य नाचले त्या अद्भुत-समरोत्सवीं भट कबंध ॥
वातें घनसा द्रोणें धर्माचा भेदिला कटकबंध ॥ ४ ॥
रक्त-नदींत बुडाले गज मग गेले न कोण वाहोन ॥
गमला गोवर्धन-नग- वर्षि-घन-समूह शीर्ण-वाहोन ॥ ५ ॥
द्रोण-रण विलोकुनि सुर सिद्ध स्मरती तदा पिनाकि-रणा ॥
ह्मणती दापिल काळा हा रविच्या काय दापिना किरणा॥६॥
गांठी धृष्टद्युम्न द्रोणाला राहु जेविं रविला हो ॥
सिकताऽद्रि नदेंसा तो वाटे त्या बाहुजें विराविला हो ॥ ७ ॥
भिडवूनि हयांसीं हय घेउनि तेजस्वि चर्म करवाली ॥

१ स्थिरन होय. २ गरुडाच्या शब्दास. ३ परशुराम ४ भागीरथी. ५ व्यूहरचना. ६ रक्ताश्व जो द्रोण त्याहून कमी. ७ शिवाच्या युद्धास. ८ दबाविना. ९ वाळूचा पर्वत. १० क्षत्रियें (धृष्टद्युम्नानें) ११ ढाल १२ तरवार धरणारा.

तौ स्व-रथा-वरुनि उडे जैसा समरोग्र[1]-कर्म-कर वाली[2] ॥ ८ ॥
द्रोणावरि झड घाली तो जेविं श्येन आमिषा नेया[3] ॥
कौरव ह्मणती बहुधा काळचि हरणार या मिषानें या[4] ॥ ९ ॥
चडतां युगीं हयाच्या पृष्ठींहि क्षिप्र सर्व विभ्रम या ॥
पाहुनि पर पृथ्वी-पति झाले परि पावला न विप्र भया ॥१०॥
खंडुनि असि चर्म रथहि मर्मीं सर्वत्र विंधुनि करानें ॥
घेउनि खर शर जोडी चापीं तो शक्ति[5]सिंधु निकरानें ॥११॥
प्राण हरावेचि ह्मणुनि जों प्रखरतरा[6]ऽशुगासि गुरु सोडी ॥
तों तत्काळ चतुर्दश- बाणांहीं त्यां[7]सि सात्यकी तोडी ॥१२॥
सात्यकिला षड्विंशति शर हाणी द्रोण तो महाकोपी ॥
तो माधव तितुकेचि प्रखर शर गुरु-स्तनांऽतरीं वोपी ॥१३॥
तों वीरांला राजा- धर्म ह्मणे सैन्यपाल पळवा हो ॥
सात्यकि-रण-प्रवाहीं पडला गुरु हा असाचि पळं[10] वाहो॥१४॥
[11]बळॅप पळविला तें गुरु दावी भृगुवीरें[12]सा समर-सरणी[13] ॥
किति ह्मणति देखिलाचि न यामागे या-रसा[14]सम रस रणीं ॥
शैनेय ह्मणे सूता द्रोणावरि नीट वाहें हाक रणीं ॥
करित नसे विप्राची धृत-पर-धर्म-प्रवाह हा करणी ॥ १६ ॥
षट्कर्मींच असावें नित्य रत ब्राह्मणें अ-घात-रतें ॥

---

१ रणांगणीं उग्रकर्म करणारा. २ वानर. ३ नेण्यास योग्य. ४ द्रोणास. ५ बळाचा समुद्र असा जो द्रोण. ६ मोठ्या कठीण बाणास. ७ बाणांस. ८ सात्यकी. ९ धृष्टद्युम्न. १० पलभर. ११ सेनापति. १२ भार्गवरामसा. १३ युद्धरीति. १४ युद्धरूप रसासारखा.

क्षत्र स्वधर्म-युद्धाऽनुष्ठानें सर्वथा अघा तरतें ॥ १७ ॥
सात्यकिसीं द्रोणासीं होय महायुद्ध तेधवां कवि[1]ला ॥
वाटे तद्बाण-निहत कटक-शव-भरें अहींद्र[2] वांकविला ॥ १८ ॥
इषुनीं झांकुनि घेती ते करुनि च्छत्र केतु विध्वंस्त[3] ॥
तो अभ्रकाश त्यांचा आप्त-कुमुद-खेद-हेतु विध्वंस्त[5] ॥ १९ ॥
सात्यकिनें कुरु-गुरुचीं कोदंडें खंडिलीं रणीं सोळा ॥
त्या समर-चमत्कारें केले ब्रह्माऽदि सुर नभीं गोळा ॥ २० ॥
शिष्याच्या शिष्याला[6] तो गुरु-वर बहु मनांत मानवला ॥
का नवलास नव्हे घट- कर्ण-गलीं जरि बसेल कानवेला[9] २१
गुरु-योजित सर्वाऽस्त्र प्रत्यस्त्रें सात्यकि स्वयें शमवी ॥
रमवी सत्सुर-दृष्टिसि वमवी मद अहित-दृष्टिसी भ्रमवी ॥२२॥
करितां गुरुशर-पटलें दिन-कर-तेजोविनाश तम खवळे ॥
सात्यकिकडे मनें विज- याऽर्थ विनविल्याविना शतमख[10] वळे॥
गुरु सात्यकि रक्षाया धरुनि सुधैर्याऽयुधा बहुतरा जे ॥
भिडले झाले शस्त्र-ज्वलनीं न करुनि विलंब हुत[11] राजे ॥२४॥
हरिनें जेंवि नराचा अरुणें रथ पळविला न तपनाचा ॥
मुनि ह्मणति परस्पर हें पाहुनि झालेंचि सफळ तप नाचा॥
अरे एक क्रोश पुढें लक्षुनि ज्या ज्या शरा विजय सोडी ॥
क्रोश पुढें गेल्यावरि मागें तो तो तदीय[12]शिर तोडी ॥ २६ ॥

१ पंडितास. २ अहि-इंद्र-शेष. ३ भग्न. ४अंधकार. ५ चंद्रास्त. ६अर्जुनाच्या. ७ सात्यकिला. ८ कुंभकर्णाच्या गळ्यांत. ९ पक्वान्न विशेष. १० इंद्र ११ दग्ध. १२ शत्रूंचे.

तो कीं सूत मिरविला तिळ-भरहि जयापुढें न वेग मनें ॥
रविचे उण गुणें हय जिंकितिल कवण तयां नवे गमनें॥
विंदाऽनुविंद ताडिति पार्थासि जसे तसेचि गोविंदा ॥
विरथ करुनि अनुविंदा मारी लोकैकवीर[1] तो विंदा ॥ २८ ॥
ताडी मार्नीं त्यातें कोपें अनुविंद तो गदा-घातें ॥
ज्याचें चरण-स्मरणचि नाशी बहु नरक-भोग-दाऽघातें[2] ॥२९॥
अनुविंद-बाहु-मस्तक- खंडन केलें पळें सिताऽश्वानें[3] ॥
नर-कीर्ति[4] नर वळें जरि हरितिल हरिची[5] बळें सिता[6] श्वानें ॥
श्वश्रू-कर जेंवि शिरे गेहीं जरि न ह्मणती सुना सीर ॥
व्यूहीं तेंवि कुरु-चमू धिकारुनि तो धरा-शुनासीर[7] ॥ ३१ ॥
श्रमला जयद्रथाच्या जायासि न शक्त हा निकट कांहीं ॥
हें योजुनि वेढियला पार्थ[8] करायासि हानि कटकांहीं ॥३२ ॥
त्या समयीं पार्थ ह्मणे देवा संश्रित-शुभाऽकरा[9] वाजी ॥
श्रमले कीं श्रम-शमना घडिभरि तरि रथ उभा करावा जी ॥
कृष्ण ह्मणे माझ्याही हेंचि मनीं लोळवीन हे वाजी ॥
लोळित्र तूंहि कुरु-चमू बा करिते तुजसवेंहि हेवा[10] जी ॥ ३४ ॥
उतरे रथावरुनि नर पळवी कुरु-कटक कृत-पराभव तें ॥
करि निर्मनुष्य मंडल तो एक क्रोश आपणा-भवतें ॥ ३५ ॥
स्वस्थ रथांतें क्रीडे कुरु-बळ-पंकज-वनांत पार्थ-करी ॥

---

१ वीरश्रेष्ठ अर्जुन. २ नरकभोग देणाऱ्या पातकातें. ३ अर्जुनानें. ४ अर्जुनाची कीर्ती. ५ सिंहाची. ६ सुंदर गोरी स्त्री. ७ पृथ्वींद्र, अर्जुन. ८ अर्जुन. ९ संश्रिताच्या कल्याणाची खाण. १० स्पर्धा.

मंत्र-बळें सु-सरोवर निर्मुनि शर-गृह अनातपाऽर्थ करी ॥३६॥
शर जेंवि किरण भवते जें कौरव-कटक तोचि परिवेष ॥
रविच कविमतें अर्जुन तेजें रूपेंहि भिन्न परि वेष ॥ ३७ ॥
निःशंक कुरु-बळीं नर जेंवि हरि-शताऽवृतींहि शरभ वनीं ॥
पवीं शिवाऽलयींसा शिरला देवर्षि शीघ्र शरभवनीं ॥३८॥
प्रभुनें मुक्त करुनि हय चुचकारुनियां हळूच कौशल्यें ॥
निजबोधें श्रितहृद्गत दुःखेंसीं सकळ काढिलीं शल्यें ॥ ३९ ॥
अश्व पर-शरांहीं भव- तापांहीं जेंवि दास पोळविले ॥
ते देवें भक्तिरसें जाणों स्व-चरण-रजांत लोळविले ॥ ४० ॥
देवर्षि मुखीं घालुनि बोट ह्मणे हा सुयोधना कुटिला ॥
भक्ति-बळेंचि पहा हा परमेश्वर आजि अर्जुनें लुटिला॥ ४१ ॥
ज्याचें पद-नख दासां जें सुख दे तापल्या न तें विधु तो ॥
भगवान् स्वयें अहा या विजय-हयां सत्पदास तेंवि धुतो४२॥
आह्मी दत्तसे गुण गुरु लघु हो वर्जुना नरा बावा ॥
तूं धन्य खळहि नातरि यापरि हा अर्जुना न राबावा ॥४३॥
ज्याच्या श्री-पद-दास्यें पावे तोखा सदा रमा जाया ॥
हरितो मना नराचा होउनि तो खासदार माझा या ॥ ४४ ॥
पुरुषाऽर्थद ते केले दास-हय-हितोदया-कर खरारे ॥
झालासि दास-दास प्रभुही तूं बा दयाकर खरा रे ॥ ४५ ॥

---

१. छायार्थ. २ पारीवि. ३ आत्मबोधें. ४ आश्रितांच्या हृदयांतलीं. ५ उद्धार. ६ दत्तात्रेयासारखे. ७ दुर्योधनहि. ८ खपावा. ९ संतोषातें. १० माझ्या.

सुखद स्पर्श श्रीच्या बहुधा न हयांसम स्तनाचा या ॥
हें यश गाउनि शिवसा लागेल सुधी समस्त नाचाया ॥४६॥
प्रेमें माता बाळा न्हाणी कीं भक्त शंभुच्या लिंगा ॥
तैसाचि नरहयां हरि कवि हो याचेचि पाय आलिंगा ॥४७॥
औषध सु-चणक कल्पी पीत-पट पसाहि तोबरा माप ॥
श्रित-साहित्य कराया न बरा मंदार तो बरा मा-प ॥ ४८ ॥
हरि हरित-तृणीं चारी तो प्रभु ज्याचा प्रताप दुर्वार॥
हरि हरि तई कारिति पद देउनि गणपति-शिरींहि दुर्वा र॥४९
तोक-तृषा-शमना कीं क्षालाया तातें तोक-मल पाणी ॥
प्यायाचेंही वेंची करि न पिउनि तेविं तो कमल-पाणी ॥ ५० ॥
उच्चैःश्रवा ह्मणावा पार्थाच्या कां न नीच तुरगानीं ॥
त्यां पूजी तो ज्याचें यश नंदन-काननीं चतुर-गानीं ॥ ५१ ॥
योजुनि तुरग-वर रथीं आपण कुरुबल पहात देव रिघे ॥
मग विजयातें मर्दुनि रडवाया खलप हात दे वरि घे ॥५२॥
चालवितां प्रभुनें तो गरुडें स्तविला तसाचि रथ वातें ॥
फाटे पर-बल वाटे तमचि कनक-कशिपु-वक्ष अथवा तें ॥५३॥
वेदासि नास्तिक तसे गेले पार्थासि भीरु सोडूनी ॥
मोडूनि धर्म-सन्नय- मर्यादा प्राज्य पाप जोडूनी ॥ ५४ ॥
नद सिंधु-पासुनि नरा- पासुनि पर परतले न माघारे ॥

---

१ श्रीकृष्णास. २ चांगले हरभरे. ३ कल्पतरु. ४ लक्ष्मीपती. ५ दुर्धर्ष. ६ रुदन. ७ बाप. ८ उदक. ९ खलपति. १० हिरण्यकशिपूचें हृदय.

सुर ह्मणति भला क्रीडा करिसी शात्रव-शशांत[1] वाघारे॥५५॥
कुरु-कटक-राहु-वदना- आंतुनि ते कृष्ण[2] रवि शशी सुटले ॥
कीं ते मकर-व्यूहचि जाल[3] सु-भट-तंतु तटतटां तुटले ॥ ५६॥
कृष्ण जयद्रथ पाहुनि होति सुखी जेविं यज्ञ[4]-वाट सुर ॥
मरुधन्व-देश-मार्गी जैसे प्राशूनि तोय वाटसुर ॥ ५७ ॥
गज गांठिला हरींनीं तुडउनि गेला मंदांऽध पुच्छातें ॥
तुच्छातें बहु मानिति तृषित मधुप जेंवि कुटज-गुच्छातें[6] ॥५८॥
श्वेताऽश्व ह्मणे न शकुन झालें या आजि सा-रथां[7] बरवे ॥
प्रभुजी ह्मणा सुदृष्टा तरिहि पहा आजि-सार[8] थांब रवे[9] ॥५९॥
म्यां वाहिला प्रभु-पदीं तो जिंकिल आजि सा रथां वेल ॥
जरि भानु बहु[10]-द्रष्टा देखाया आजि-सार थांबेल ॥ ६० ॥
देशिल जयद्रथा तूं मरुनि अयश आजि सा रथा नीचा ॥
देवींच्या पदराला ढाळिल हा आजि-सार थानींच्या[11] ॥ ६१ ॥
विजय असा हर्षे तों दुर्योधन होय आडवा राया ॥
विघ्न[12]हरा विघ्न जसा किंवा उदधीस आड वाराया ॥ ६२ ॥
कृष्ण ह्मणे कौंतेया श्रीमद्रुद्रा[13]पुढें जसा मार[14] ॥
आला पुरुष-व्याघ्रा दुर्योधन मूढ हा ससा मार ॥ ६३ ॥

---

१ शत्रूरूप सशांत. २ कृष्णार्जुन, ३ जालें. ४ यज्ञमंडप. ५ भ्रमर ६ कुड्याच्या फुलांच्या झुबक्यांस. ७ सहारथ्यांस. ८ युद्धसामर्थ्य. ९ हे सूर्या. १० सर्व पहाणारा. ११ स्तनावरच्या. १२ विनायकास. १३ श्रीमत् रुद्र-श्रीमत शंकर. १४ मदन.

तुज हा वराक[1] वाहे तरि हरि मरणाऽर्थ कां न बाहु रुरूं[2] ॥
घालुनि गांठि अधर्महि धर्माची करिल कां न वा हुरुरू[3][4]॥६४॥
मरणार्थ वाहतो हा तुज नर-सिंहास मस्त बकरा गा ॥
करितील मरालांचें[5] काय धरुनिही समस्त बक रागा ॥६५॥
झाला धनंजयाला मान्य अभिप्राय हाटक-पटाचा[6] ॥
त्या वाटे मोडावा खल सु-नृपा जेंवि हाट[7] कपटाचा ॥६६॥
कुरु-पति-रथाऽभिमुख रथ चालवितां नीट लोक-नाथानें ॥
कटकें न रोधिति जसीं रंभेचीं शुक-विलोकना थानें ॥६७॥
पार्थावरि नृप उठतां कुरु-सेना वि-प्रभा[8] वदे हा हा ॥
होमी पतंग दीपीं नुमजुनि तेज-प्रभाव देहा हा ॥ ६८ ॥
भूप ह्मणे कां भ्यालां भट हो माझा प्रताप हात पहा ॥
पर-जीवन निःशेष प्राशील प्रलय-भास्वदाऽतप[9] हा ॥ ६९ ॥
जोंणी[10] म्यां कृष्ण सख्या- पार्थासह आजि हरुनि मद वधिला ॥
पावेल भुज-बळें नर न जलधिच्या तेविं तरुनि मंदवधिला ७०
पार्थाहि ह्मणे जरि तूं वीर्यें झालासि पांडुच्या पाहूं ॥
शस्त्राऽस्त्र-बळ तुझें दे यश शारद-चंद्र-पांडु चापा हूं ॥७१॥
हाणी तीन शर नरां चार हयां नव घनप्रभास[11] दहा ॥
तोडी प्रतोदहि ह्मणे तें पाहुनि जिष्णुचा[12] सभासद हा ॥७२॥

---

१ नीच. २ बळावी. ३ रोही-हरिण. ४ हुररेवडी, हुऱ्यो हुऱ्यो. ५ हंसाचें. ६ सुवर्णासारिखा पीतपट, ज्याचा अशा कृष्णाचा. ७ बाजार. ८ कांतिहीन. ९ प्रलयकाळचे सूर्याचें ऊन. १० मद-अवधि-माझ्या पाराला. ११ कृष्णाला. १२ इंद्राचा

पार्थे शर पाठविले भेदाया वर्म वांतसे चवदा ॥
कृपणगृहीं अतिथि जसे नृप-देहीं तेविं वा तसेच वदा ॥७३॥
तितुकेचि पुन्हा झाले विफल जसे दुर्जनीं सदुपदेश ॥
तेव्हां सख्या तुझें बळ कोठें गेलें ह्मणे यदुपदेश ॥ ७४ ॥
पार्थ ह्मणे कवच दिलें गुरुनें वात्सल्य देववि़ल याला ॥
नेतील न शस्त्राऽस्त्रें शक्राऽदि समस्त देव विलयाला ॥ ७५ ॥
परि मी तुझ्या प्रसादें ऐसेंहि अभेद्य कवच खंडीन ॥
दंडीन अरिशि माझी शक्ति तसी कांपवील थंडी न ॥ ७६ ॥
ऐसें वदोनि मंत्रुनि शर कवच-विदारणाऽर्थ जों सोडी ॥
सर्वाऽस्त्र घातकाऽस्त्रें अश्वत्थामा तयासि तों तोडी ॥ ७७ ॥
विस्मित होउनि पार्थ प्रभुसि ह्मणे गुरुहुत-प्रभाव मला ॥
हित अहितहि जेंवि तमीं वाटेंत फणी मणि-प्रभा वमला॥७८॥
योजीन जरि पुन्हा तरि मजवरिच फिरेल अस्त्र बापा हें ॥
साहें क्षण जिंकितसे लीलेनें अरिस दास हा पाहें ॥ ७९ ॥
वश करिल रसिकसा शिर बहु तुकुनिहि काय गा शरठ कविला
काय इतर नरसा हर हाणुनि हृदयीं स्मरें शर ठकविला८०
हय सूतपार्ष्णि सारथि मारुनि खंडुनि समस्त हातेरें ॥
फोडुनि कवच पळें करि पार्थ खळाचें पळांत मातेरें ॥ ८१ ॥
श्येनासीं धृष्टपणें गांठि दळें घालितां जसा चटक ॥

१ कृष्ण. २ कृपाळुपणा. ३ नाशाला. ४ अश्वत्थाम्याचें सामर्थ्य. ५ डोलवून. ६ सरडा. ७ मदनानें. ८ दांडगेपणानें. ९ चिमणा.

व्यसनीं पडे सुयोधन तें पाहुनि सर्व धांवलें कटक ॥ ८२ ॥
पार्थाचा रथ झांकुनि नाना शस्त्रांचिया समूहानीं ॥
चुकविति सुयोधनाच्या प्राणांची सर्व कुरु-चमू हानी ॥ ८३॥
त्याकाळीं जगदीशें पर-धृति-हर पांचजन्य वाजविला ॥
तन्नादें गजवर-मद-नाशक केसरि-निनाद लाजविला ॥ ८४ ॥
प्रभु-शंख-रवें कौरव जेविं गरुड-गर्जनें महासर्प ॥
केले भय नुरविला गांडीवें तिळहि पर-बळीं दर्प ॥ ८५ ॥
कुरुबळ-विमुक्त नररथ जंगमजनमुक्त माध्वसा साजे ॥
गर्जति जयद्रथाच्या हरणारे मृत्युसाध्वसा सा जे ॥ ८६ ॥
कृष्णांहीं निज दरवर वाजवुनि बहु स्वशत्रु कोपविले ॥
कर्णकृपाऽश्वत्थामा- प्रभृतींचे सिंहनाद लोपविले ॥ ८७ ॥
बहुतां कर्णाऽदि-महा- वीरांसीं एक विजय युद्ध करी ॥
बहुतहि करितिल काय क्रुद्धा कंठीरवांसि रुद्ध करी॥ ८८ ॥
भूरिश्रवा प्रभूच्या खंडी करगत नव प्रतोदास ॥
तेणें काळहि कांपवि केवळ न सुमेरुवप्र तो दास ॥ ८९ ॥

---

# अध्याय ११.

येरीकडे वृकोदर सात्यकि पांचाल मत्स्य हे भारी ॥

---

१ सिंहाचा शब्द. २ मध्वमतानुसारी ब्राह्मणसा. ३ मृत्युभयास. ४ सहा. ५ उभयकृष्णानीं. ६ सिंहास. ७ गज.

भांडति कुरुवीरांसीं जोवें महेभासवें[1] महेभारी[2] ॥ १ ॥
खंडी युधिष्ठिराच्या आधीं खरतर शरव्रजें धनुला ॥
हनुला धरुनि निवाविला वात्सल्यें ह्मणुनि हळाचि मग तनुला॥
करुनि प्रसाद गुरुनें दिधली ती गुरुसि दाखवी शक्ती ॥
भक्तिमदुत्तम धर्म प्रेषी द्रोणाकडे महाशक्ती ॥ ३ ॥
द्रोणासि स्वस्ति असो ऐसीं तें सर्व बोलिलीं भूतें ॥
शक्ति महाकृत्यासी चलचल तत्काळ कांपवी भूतें[3] ॥ ४ ॥
शक्ति ब्रह्मज्ञानें ब्रह्मज्ञानें जसीच काळाची ॥
तैंवि द्रोणें हरिली ब्रह्मास्त्रें ती[4] मनुष्यपाळाची[5] ॥ ५ ॥
भस्म करुनि शक्तीतें ब्रह्मास्त्र क्षुब्ध होय तच्छमना॥
ब्रह्मास्त्रानेंचि करी गुरु-वत्सल धर्मराज अच्छमना[6] ॥ ६ ॥
शर-पंचकें विदारुनि कार्य[7] क्रूर क्षुरप्र[8] सोडूनी ॥
गुरुचें धनु मनुजेंद्रे क्षितिवरि पाडी पळांत तोडूनी ॥ ७ ॥
सोडी द्रोण गदेतें तींवरि धर्माहि महा-गदेतें हो ॥
सच्चरित सवंग[10] कुतुक दे नंदन बहु महाग देतें हो ॥ ८ ॥
पडल्या भंगुनि पावुनि सद्वीरमुखें-सुवर्णन गदा त्या ॥
गुरु-शिष्यरणा वर्णिति कवि जेंवि अधन सुवर्ण-नग-दात्या[9]॥
चारी वाजी वधुनि च्छेदुनि धनु केतु भूमिवरि पाडी ॥
भारद्वाज महात्मा धर्मासि शरत्रयें उरीं ताडी ॥ १० ॥

---

१ मोठ्यागजासीं. २ सिंह. ३ पृथ्वीतें. ४ महाशक्ति. ५ धर्मराजाची. ६ शुद्ध अंतःकरण ज्याचें असा. ७ देह. ८ शर. ९ धर्म १० स्वल्प किमतीनें देतें.

विरथ व्यांऽयुध[1] होउनि सहदेव-रथीं चढे पळे धर्म ॥
कर्म असें घडतां त्या कविचा न स्वल्पही मळे धर्म ॥ ११ ॥
भूप पळाल्यावरि बहु नाश रणीं प्राप्त होय राजांस ॥
वध्याचि अहिसा अभिमुख येतां गुरु बंधु सोयरा ज्यासें १२॥
धृष्टद्युम्न घटोत्कच सात्यकि भीमाऽदि वीर धर्मांचे ॥
माथिती कुरु-कटकातें जैसे दुःसह विपाक कर्मांचे ॥ १३ ॥
दूरूनि पांचजन्य- ध्वनि परिसुनि बहुत भय धरी धर्म ॥
सात्यकिसि ह्मणे बापा धांव कसा हो धनंजया वर्म[3]॥ १४ ॥
व्यसनीं सहाय होउनि आप्ताला होय जो परासुं कृती ॥
शक्राऽदि लोकपालां- मध्यें बहुमान्य तो वरा सुकृती १५ ॥
समयीं सहाय होता पुरुष श्रीविष्णुसींच तोलावा ॥
प्रियसख माधव[6] दोघे असतां न बुडो तटासि तो लावा ॥१६॥
धांवा शीघ्र असोंद्या स्नेहरसाचा मनांत ओलावा ॥
माधवजी आजि तुह्मीं मित्र[7] थडीला ह्मणोनि ओ लावा १७॥
आहेत भीम धृष्ट-द्युम्नाऽदिक मजसमीप भय नाहीं॥
बा त्वद्भुजाऽश्रितें म्यां निर्ह्वर पाहों नयेचि नयनाहीं॥१८॥
सात्यकि बोले प्रभुजी चित्तीं चिंता करूं नका कांहीं ॥
हंस-ध्वंस कधीं तरि केला संगर करून काकांहीं ॥१९ ॥
गुरुकराचि शिरोरक्षक भारावह काय ओखटा टोप ॥

१. आयुधहीन. २ द्रोणाला. ३ कवच. ४ मृत. ५ कुशल. ६ कृष्ण सात्यकी. ७ अर्जुन. ८ अनिष्ट. ९ हंसाचा भंग. १० युद्ध. ११ वाईट.

गुरुवर सहाय असतां व्हावा काशास हा खटाटोप ॥ २० ॥
असतां सहाय साक्षात् प्रभु काय धनंजयास मी राजा ॥
कृष्णा नरा क्रिया त्या सुकरा न धनंजया[1] समीरा[2] ज्या ॥ २१ ॥
मी जातांचि करिल कीं तुझिया तो द्रोण विप्र हरणातें ॥
वा सांपडतां सोडिल सप्रहरण[3] कोण विप्रहरणातें[4] ॥ २२ ॥
सांगावें धन-पतिनें निधिचें रक्षण जसेंचि यक्षातें ॥
कथिलें तैसेंचि तुझें विजयें मज आजि आजि-दक्षातें[5] ॥ २३ ॥
गुरु तूंहि अर्जुनहि म्यां आज्ञा तुमची कधीं न मोडावी ॥
सोडावी प्राणांची प्रभुचीच प्रीति पूर्ण जोडावी ॥ २४ ॥
वदुनि असें मान्य करी धर्म-वचन सबहु-मान सत्वर तें ॥
गुरु-कार्यासचि कविचें निज कार्या न बहु मानस त्वरतें ॥ २५ ॥
तो वीर वीरपान[6] द्विज-पूजन करुनि सत्व-राशि कवी ॥
शीघ्र निघे ज्याला बहु गुरु-भक्ति समर-रसत्वरा शिकवी ॥ २६ ॥
व्यूहीं सहसा सात्यकि शिरला जैसा दवाऽग्नि शुष्कवनीं ॥
खंडन करी प्रतिपदीं कटकीं दोषज्ञ जेविं दुष्कवनीं[7] ॥ २७ ॥
सुर ह्मणति अहा शिरला हा या जलधींत काय हो मकर ॥
वा दुसरा जिष्णुचि तूं हूं धर्माऽरातिकाय-होम[8] कर ॥ २८ ॥
व्यूहीं शिरे महाबल करि-हरिण-कुलीं जसाचि हरि शिरतो ॥
कमल जसा लीलेनें द्विरद अरीचें तसाहि हरि[9] शिर तो ॥ २९ ॥

---

१ अग्नीस. २ वाऱ्यास. ३ सशस्त्र. ४ विशस्त्रातें. ५ रणदक्षातें (मज). ६ सुरापान. ७ दुष्ट काव्यांत (वाईटकवनांत). ८ धर्मशत्रूंचे देहहोम. ९ हरण करी.

द्रोण तयाला गांठी रोधी जैसा महाऽचल नदास ॥
गुरुसा समर-प्रेक्षक- पक्ष्मीं[1] नुरवीच तो चलन दास ॥ ३० ॥
सात्यकिला द्रोण ह्मणे त्वद्गुरु शुभ्राऽश्व[2] हात जोडूनी ॥
करुनि प्रदक्षिणा मज गेला केल्या पणासि सोडूनी ॥ ३१ ॥
ह्मणशिल यथार्थ वेचिन सर्वस्वामी सदा समरशील ॥
तरि तूं पावोनि मला स्वगुरु स्वामीस दास मरशील ॥ ३२ ॥
सात्यकि ह्मणे गुरुगुरो स्वस्ति असो तुज सदैव आर्यास ॥
कालक्षेप नसावा विजय-परामर्श-धर्म-कार्यास ॥ ३३ ॥
ज्या वाटेनें गेले गुरु धरिती छात्र त्याचि वाटेतें ॥
आचार्यें पार्थें जें केलें मजहि प्रशस्त वाटे तें ॥ ३४ ॥
एवं वदोनि वंदुनि घालुनि कुरुगुरु रणांऽगणीं उजवा ॥
सात्यकि निघे ह्मणे कुरु- भट हो हूं शंख करुनि मुख सुजवा ॥
कर्णाचें बळ भंगुनि कृतवर्म्यातेंहि संगरीं उडवी ॥
नलिन-वनासि गज जसा त्या कुरु-कटकासि तो तसा तुडवी ॥
मागुनि उठले पांडव सात्यकिच्या रक्षणाऽर्थ जे त्यांतें ॥
भग्न करी कृतवर्मा भ्यावें ज्यां पविकरेंहि[3] जेत्यांतें[4] ॥ ३७ ॥
मुरडे सात्यकि सर्पचि जाणों बल-पुच्छ तुडविलें मागें ॥
भोजातें विरथ करी मर्दी तत्काल तच्चमू रागें ॥ ३८ ॥
पुनरपि परते मार्गी माधव हरिसा शिरे गजाऽनीकीं ॥
अजितचि तो वरिला नर-नारायण-पादुका-रजानीं कीं ॥ ३९ ॥
मथुनि गजघटा मारी शक्र-प्रतिम-प्रभाहि जलसंधा ॥

---

१ डोळ्यांचे पापणींत. २ अर्जुन. ३ इंद्रानेंहि. ४ जिंकणारांस

कीं सर्वदाहि सत्या [1]सत्संधा निष्फळाचि खलसंधा ॥ ४० ॥
गांठी गुरु सात्यकिला तों दुःशासन सुयोधनाहि राया ॥
जैसे वनांत सधना बहु तस्कर वेढिती धन हिराया ॥ ४१
युयुधानें दुर्योधन करुनि विरथ पळविला पळांत रणीं ॥
शोषी बळा शरांनीं जेविं [3]करांनीं नदीजळां तरणीं ॥ ४२ ॥
हांसति धृतराष्ट्रसुता शीघ्र-पलायन-परा सुर विमानीं ॥
हा मंदा तेजस्वी स्वाऽधिक होतां परासु रवि मानी ॥ ४३॥
गुरु-सात्यकि-मुक्ताऽशुगं- पटल न दे लेश मार्ग वातातें ॥
त्या विउनि मिळविलें यश जें भीष्मा आणि भार्गवा तातें॥४४॥
समरीं सारथि मरतां द्रोणासि स्वैरें पळविती घोडे ॥
मोडे सैन्य स्वामि- व्यसनीं स्थिर वीर राहते थोडे ॥ ४५ ॥
द्रोण व्यूह-द्वारीं राहे मग शीघ्र सात्यकि निघाला ॥
धन-पटलांत पवनसा पर-कटकीं तो सुदुर्धर रिघाला ॥ ४६ ॥
काय इतर गज देता जंभाऽरातीभ वाट वीराया ॥
त्या सुज्ञा सेना बहु- संभारा ती भवांटवी राया ॥ ४७ ॥
सात्यकि जातां मथिलें द्रोणें पांचालकटक वहुत रणीं ॥
धृष्टद्युम्नें केला ती नव्हता समय ह्मणुनि न हुत रणीं॥४८॥
चढला होता धांवुनि ईषेवरि नग्न करुनि तरवारी ॥

---

१ साधूची प्रतिज्ञा. २ सात्यकीनें. ३ किरणांनीं. ४ सूर्य ५ बाणाचें आवरण. ६ परशुरामास. ७ स्वच्छंद. ८ शिरला ९ इंद्राचा गज. १० संसाररूप वन. ११ द्रोण. १२ धुरेवर.

परि गुरु वितस्तिमित शर हाणुनियां त्यासि शीघ्रतर वारी ॥
तें पाहुनि कवि वदले झड घाली लावकीं असि ससाणा ॥
गुरु-शिक्षा उग्रत्वचि देती उग्रा जशा असिसें साणा ॥८०॥
अर्जुन-सात्यकि चिन्ताऽकुल धर्म असें वृकोदरासि वदे ॥
आह्मां उत्साह तुझा दे अभय जसें सुरांसि वासव दे ॥८१॥
वधिले शिशुपाळ जरा- संधाऽत्मज वीर संगरीं बहुत ॥
गुरुनें पुढें न झाला जो केला तोचि रण-मखीं न हुत ॥८२॥
भीमा धनंजयांचा घ्यावा क्षम तूं मरुत् समाचार ॥
तत्कुशल-वृत्त मौक्तिक- सम तें मज सितगरुत्समा चार॥८३॥
सात्यकि बळेंचि म्यां कुरु- कटक महासंकटांत शिरकाविला ॥
गेला शरसम समयीं बा द्यावें लागतेंचि शिर कविला ॥
कां पाठवितों कळतें जरि करिल व्यूह नद गडर्प यातें ॥
तूं सेतु तरेल इतर न कुरुबला जेंवि न दगड पयातें ॥ ८५ ॥
तों पांचजन्य ऐकुनि धर्म ह्मणे हा अभाग्य बहुधा मी ॥
कृष्णा पृथा सुभद्रा उत्पात विलोकितील बहु धामीं ॥ ८६ ॥
बा स्पष्ट पावलाचि क्रूराऽरिगणांत वत्स मरणातें ॥
सख्य स्मरोनि करितो अभिमानी कृष्ण तत्सम रणातें॥८७॥
भीम ह्मणे आहे प्रभु- वर सारथि अर्जुनासि भय नाहीं ॥
तूं त्या कृत-प्रतिज्ञा- प्रति शीघ्र विलोकिसील नयनांहीं॥८८॥

१ वीतभर लांबीचे असे. २ पक्षिविशेषीं. ३ खड्गास. ४ ससाणा. ५ अग्नीचा, अर्जुनाचा. ६ वायु. ७ हंसासारिखा जो मी त्याच्या. ८ नाहींसा. ९ अर्जुनाप्रति.

आज्ञा धरुनि शिरीं हा मी जातों सर्व शत्रु पळवीन ॥
मळवीन सुयोधनयश शंखरवें कृष्ण-कुशल कळवीन ॥५९॥
धर्मा देवीच गमे केली भीमें असी प्रतिज्ञा ती ॥
द्विज ह्मणति तुझे होउत अहित वश तुझ्या असीप्रति ज्ञाती॥
पूजुनि नमुनि द्विज-गुरु- चरण निघे पिउनियां नव सुरेतें ॥
हा तो ईशाचि न परा भी जो जन्मे सुमानव-सुरेतें ॥ ६१ ॥
बल जलधि गमे शिरतां जो भीमाहि मत्त तो खरा मकर ॥
वर्षे शर पर-निकरीं जेंवि सुहृद्दत्त-तोखें रामकर ॥ ६२ ॥
तो भीमातें वारुनि गुरुनें नाराच हाणिला अलिकीं ॥
तो अमृत-कनककलशीं भासे कृष्णाहि नीरजीं अलि कीं६३॥
द्रोणमनीं कीं वश हा मज गुरुतें जेविं हरि लगामातें ॥
नमिल ह्मणेन सुखें जा त्वद्गुज परतेज हरिल गामातें॥ ६४ ॥
गुरु हांसुनि ह्मणे या व्यूहीं भीमा तुला न शिरवेल ॥
शिरसिल जरि तरि घालुनि वांचेल दवाऽनलांत शिर वेल ६५
मज वंदुनि मदऽनुमतें शिरला व्यूहांत कृष्ण-सारथि रे॥
शरभापुढें टिकेना सिंहहि मग काय कृष्णसार थिरे ॥ ६६ ॥
अक्षत जरि मी शिरणें तुज या व्यूहीं अशक्य मद्रविती ॥
जाणें करावया जीं कर्मे भलतींच एक मद्रीचि तीं ॥ ६७ ॥
रक्तेक्षण भीम ह्मणे झालासि ब्रह्मबंधु चळलास ॥

---

१ कृष्णार्जुनांचें कुशल. २ सुमानवाच्या वीर्यें. ३ संतोष. ४ ललाटीं. ५ कमलीं. ६ अश्व. ७ वल्ली. ८ अर्जुन. ९ मृग. १० शल्य.

कळलास अधम कीं तूं खळसंग धनुष्य धरुनि मळलास ६८
योग्य नव्हे घ्याया तव अनुमत तो वासवि प्रवेशाला ॥
कुतुकें सभ्य प्रभुहि न बहु मानिति काय विप्र-वेशाला ॥ ६९ ॥
हें किति तुच्छ मदऽनुज स्वबलेंचि धसेल शत्रु-कटकांत ॥
वचकेल काय शिरतां हंसाऽद्य[1]ऽनिरुद्ध गरुड चटकांत ७०
मी भीम त्वदरि, नव्हें त्वत्पूजक सदय तो धवळवाजी ॥
मज मद्गदा[2] ह्मणतसे तेजेंचि खलाऽरि योध वळवा जी ॥ ७१ ॥
आपण पुत्र पिता तूं ह्मणतों द्रव परि न हें तुला लव दे ॥
पद-पतित-रजा देउनि पात्रत्वगुण स्वयें कुलाल वदे ॥ ७२ ॥
ह्मणतों नित्य निजमना कीं या द्विजनायका[3] पिता मान ॥
परि तूं निर्दय इतर प्रणताची काय कापिता मान ॥ ७३ ॥
तूं काय गा स्वधर्मेचि सर्वांची पुरविणार आळ पिता ॥
किति नाग-कालपाश स्वाऽन्यायचि करकरूनि आळपिता[4] ॥
जरि आपणाशि मानुनि शत्रु असें पातलासि कलहातें ॥
तरि या कर्माचें घे देतों मी भीमसेन फल हातें ॥ ७५ ॥
ऐसें बोलुनि सोडी तो द्रोणरथीं उडी गदा घाली ॥
अनिवार्याचि[5] खवळली जसि पाडाया कुडी[6] गदाघाली[7] ॥ ७६ ॥
तों स्व-रथावरुनि उडी टाकुनियां त्या गदेशि गुरु चुकवी
अभिमान त्यजुनि जसा काळगतिस आत्मयोग-पटु सुकवी ॥

१ हंसादिकांनीं रोधिला जात नाहीं असा. २ माझी गदा. ३ द्रोणा. ४ बांधणारा. ५ निवारण करण्यास शक्य नव्हे अशी. ६ शरीर. ७ रोगांची व पापांचीं पंक्ती.

पडतां रथीं गदा तो स्वमुसा पळ वीर विम्र भासेना ॥
कौरव वेष्टिति भीमा तो त्या पळवी रविप्रभा सेना ॥ ७८ ॥
भंगी भीमगदाऽशनि सतुरग-सूत-ध्वजा रथनगा ती ॥
रुद्रचि वृकोदर गमे त्या त्रिपुराचेंचि ते मथन गातीं ॥७९॥
सुखवध्यें त्वदऽपत्यें भीमशरां जेंवि हरिनखां बकरीं ॥
ह्मणुनि तुज ह्मणत होतों कीं खल कुल-मंडपा न खांब करीं॥
भीमें एकैक शरें दृढबाहु सुषेण दीर्घनेत्र असे ॥
वधिले सुदर्शनाऽदि त्वत्सुत दश मृगवरें जसेचि ससे ॥८१॥
द्रोणें पुनरऽपि केलें दारुण शर-वर्ष धरुनि वाटेतें ॥
वर्षे व्रजीं प्रलय-घन- वृंद तसें गुरु-धनुष्य वाटे तें ॥ ८२ ॥
भीम रथावरुनि उडी टाकुनि गुरु-यश करावया गोळा ॥
धांवे यंत्रापासुनि वेगानें जेंवि उसळला गोळा ॥ ८३ ॥
शर-वृष्टींत वृकोदर लेशहि न धरूनि साध्वस रिघे तो ॥
वाटे डोळे झांकुनि वृष त्या लीलेकरूनि सरि घेतो ॥ ८४ ॥
द्रोणरथातें कवळुनि तो नित्य नवा युवा सवाहातें ॥
दूर झुगारी ह्मणवी शतवार सवायु-वासवा हातें ॥ ८५ ॥
गुरु मनिं ह्मणे विलोकुनि हें गरुडहि चित्रसा उगा राहो ॥
ऐसेचि वत्सभुज हो दूर समस्ताऽरि-मद झुगारा हो ॥ ८६ ॥

---

१ निवंतसा. २ भीमाची गदा हाच अशनि (वज्र). ३ रथरूप पर्वतातें. ४ भय. ५ बैल. ६ पावसाची सर. ७ अश्वसहितातें. ८ वायूसह इंद्रातें. ९ हा! शब्दातें.

स्वरथीं भीम बसविला शीघ्र विशोकें[1] जसा तपन[2] अरुणें ॥
नवयानीं गुरुहि बसे ज्या वृद्ध असें ह्मणों नये तरुणें ॥८७॥
द्रोण द्वारीं राहे मार्गें सोडूनि पद विरोध सरे ॥
मारुति ह्मणे विशोका- हूं व्यूहीं शत्रुमद विरो धंस[3] रे ॥ ८८ ॥
भीम करी वीरांचें वृक्षांचें मथन वातसा वाटे[4] ॥
निर्मावा जेंवि वनीं दहनें तो पथ नवा तसा वाटे ॥ ८९ ॥
कल्पांतीं कदन जसें रुद्र तसें तो गर्दीन[5] भीम करी ॥
तीहि गदा कुरुकटकीं शिरतां जैशी नदीं न भी मकरी ॥९०॥
पर-सेना लीलेनें शिरतां तत्काल तो विदारी ती ॥
राम-शरांची बहुधा आली त्या युद्ध-कोविदा रीती ॥ ९१ ॥
दरुनि सात्यकि अर्जुन पाहुनि दे भीम योध हाकेला ॥
धर्माला कळवी कीं आहेत स्वस्ति शोध हा केला ॥ ९२ ॥
तें परिसुनि कृष्ण-सखे सात्यकि-सह गर्जले सुखें फुगले ॥
असतिल मयूर परम-प्रिय-घननादोदयीं कसे उर्गले[6] ॥ ९३ ॥
भीम धनंजय माधव सात्यकि हे वीर गर्जतां चवघे ॥
धर्म ह्मणे शीतल हो कर्ण-युगा[7] या सुधोर्मिची[8] चव घे ॥९४॥
वत्सा जेंवि निववितो इंदु-कर चकोर-दृष्टिला गोरे ॥
तेंवि सुत्दन्नयनां तव भुज यांसि न पापदृष्टि लागो रे ॥९५॥
बा चिंता-तटिनीच्या गिळिले बहु देव दैत्य नर डोहें ॥
श्रीगुरुनेंचि ह्मणावें त्वां कीं स्वाऽश्रित कदापि न रडो हें ॥

१ विशोकनामक सारथ्यानें. २ सूर्य. ३ रीघ. ४ वाटला; ५मदाधगांत श्रेष्ठ. ६उगेच. ७दोन्ही कानांस. ८अमृताच्या लाटेची;

श्रीकृष्ण कृष्ण सात्यकि कुशली आहेत धन्य मी आजी ॥
आजि-क्रतुंत[1] गिळिती रिपुकालीसी करूनियां आजी ॥ ९७ ॥
या तूं ज्यांचा द्वेष्टा कैसे जय पावतील ते जन गा ॥
शक्रा-पुढें टिकावें ऐसें कैंचें प्रचंड तेज नगा ॥ ९८ ॥
आजीसी बहु मान्या गांडीवलता पराऽयुध-ग्रामा[3] ॥
विजया जय देउ जसी कोदंड-लता परांऽयु-धग्रामा[4] ॥९९॥
रवि अस्तासि न जातां मारूनि जयद्रथासि धवल[5]हरी ॥
उठविल काय मुखाच्या जेविं पयोधींत रात्रि-धव लहरी१००
सैंधव मेल्यावरि तरि कौरव-पति करिल काय सामातें ॥
तो दुःख-प्रदहि प्रिय सर्वस्वा वरिल कायसा मातें ॥ १०१ ॥
अंध ह्मणे हा भीमो- त्कर्ष मला संजया परिसवेना ॥
गमला नसेल दुःसह मुनि-धिक्कृति[7]-गंज यापरिस वेनां[8] १०२
कांपविला कीं व्यूह व्याघ्रानें जेंवि कातराऽक्ष ससा ॥
सुत शेष राहिले जे त्यांचाही करिल घात राक्षससा॥१०३॥
चुकवावें हरिणाच्या कैसें क्षुब्धा हरीस कळपानें ॥
वधिल मुलें तो तरुचीं जेविं महाऽनिल हरी सकळ पानें१०४
कुरु-कटकीं भीम करी कर्म कसें काय तें कळीव मला ॥
उग्राहि सूग्र न जिरे बा कर्कोटाऽहि-विष कळी वमला॥१०५
सूत ह्मणे श्रवण करीं कथितों मी भीम-कर्ण-समरा ज्या ॥

---

१ रणयज्ञांत. २ देवीसारिखी. ३ शत्रूंच्या शस्त्रसमूहास. ४ शत्रूचें आयु जाळणारा जो राम त्याला. ५ अर्जुन. ६ चंद्र. ७ धिक्काररूप अवमान. ८ वेनराजाला.

पाहुनि सुर मुनि दट्ले रण-पंडित भीम कर्ण सम राजा१०६
केला तैं रोमांऽचित भीमानें कर्ण वासवें काय ॥
गमले प्रलयीं भिडतो तो अर्णव अर्णवा-सवें काय ॥ १०७॥
नरहरिचे लाजविती जैसे बालाऽर्क-वर्ण नख पविलां ॥
भीमःशर तसेचि तिहीं केला परिभूत कर्ण न खपविला१०८
होउनि विरथ पळाला कर्ण तया घे सुषेण निजे-यानीं ॥
भीम-भुजांनीं केलें त्रस्त सकल सैन्य लब्ध-विजयानीं ॥१०९
भीमाच्या सिंहरवें भ्याले बहु एकही न परे परते ॥
जे शूर मदांध-द्विप हगले बलधैर्यहीन परपर ते ॥ ११० ॥
कळला कर्ण-पराभव झाला हें भीमसेन-सिंहरवें ॥
धर्म ह्मणे जोडावें वत्सा ऐसेंचि यश तुवां बरवें ॥ १११ ॥
कर्ण-पराभव-हर्षें वाजविले शंख बहु अनीकांहीं ॥
त्या आनंदा मांया नाहीं अवकाश जन-मनीं कांहीं ॥ ११२॥
परिसुनि परदररव बहु वाजविती शंख तावकहि मानी ॥
तो प्रभुशंख तव चमू-भा जेवीं प्रलय-पावक हिमानी ॥११३॥
गांडीव-पांचजन्य- ध्वनिही लीलें करूनि लोपविले ॥
भीम-रवें मग योगी पळ तरि नसतील काय कोपविले११४॥

---

१ वज्राला. २ निजरथीं. ३ शत्रु.४ मावयास.५ तुझ्याकडील. ६ घट्ट बर्फ.

# अध्याय १२.

शिरतां अर्जुन सात्यकि भीम व्यूहीं गज-व्रजीं हरिसे ॥
धांवत जाय गुरुकडे दुर्योधन वसति षडरि ज्यासरिसे ॥१॥
द्रोणासि ह्मणे गुरुजी शिरले व्यूहीं कसे तिघे अरि ते ॥
तुमच्या प्रताप-तपनें केले तुच्छ प्रवाह कां न रिते ॥ २ ॥
गेले अर्जुन सात्यकि भीम महाबळ जयद्रथा जवळ ॥
साक्षात् कालांऽतक यम जाणों त्याचा करावया कवळ॥३॥
तुज जिंकिलें तिहीं हें अद्भुत लोकां न काय वाटावें ॥
ग्रीष्में जेविं तडागें तेविं समुद्रेंहि काय आटावें ॥ ४ ॥
हतभाग्य मीच बहुधा आहे माझा विनाश या कलहें ॥
कीं जें तुझें त्रिलोकाऽ लंघ्य तिघांनींच लंघिलें बळ हें॥५॥
आतां काय करावें कैसी होईल सिंधु-राज-गती ॥
झाली त्या पार्थ-मयीं सिंह-मयी जेंवि सिंधुरा जगती ॥ ६ ॥
द्रोण ह्मणे सर्वाऽधिक भीताऽभय-दान सत्य जा वेंच ॥
शिर शिरतिल पर यास्तव म्यां व्यूह-द्वार न त्यजावेंच॥७॥
त्वत्साहित्याविषयीं आहें मी नित्य अनलस राया ॥
जा सैंधव रक्षाया पर दुःसह तूंहि अनल-सम राया ॥ ८ ॥

---

१ कामादि सहा शत्रु. २ ज्याच्याबरोबर. ३ जयद्रथाची गती. ४ अर्जुनप्रचुरा ( सर्वत्र अर्जुन अशी ). ५ गजाला. ६ खर्च. ७ अग्नितुल्य.

दिव्य-कुरु-क्षेत्रपट ग्लेह सैंधव ढळति अक्ष हे बाण ॥
या युद्ध-द्यूर्तांचे जय परिभव सत्य ते मृषा जाण ॥ ९ ॥
मी द्वारीं नसतां गज सरसीसी पर चमू ढवळतील ॥
शत्रु-करांतें सैनिक- पति दत्ताऽभय अमूढ वळतील ॥ १० ॥
जाणें युक्ति बळाचा जी- स्तव कुरु-नायका पुरावा ती ॥
शिवतांचि पराभूति स्वच्छ यशा खाय कापुरा वाती ॥११॥
मानुनि शासन गुरुचें व्यूहा बाहेरुनि क्षितिप तूर्ण ॥
जाय कराया जीवन- काम-जयद्रथ-मनोरथा पूर्ण ॥ १२ ॥
तों वीर उत्तमौजा तद्बंधुहि देखिला युधामन्यू ॥
तत्काल तिघां-करवीं धरवी युद्धाऽर्थ आयुधा मन्यू ॥ १३ ॥
होऊनि उत्तमौजा विरथ युधामन्युच्या रथीं चढला ॥
रथ भंगितां तिहीं बहु कुरु-पति कोपें करूनियां कढला १४
भूप गदा पडताळुनि सिंह गजावरि जसा तसा तूर्ण ॥
धांवे दोघे भ्राते वीर कराया रथा-सकट चूर्ण ॥ १५ ॥
आयु ह्मणे त्यांसि मरण आलें हें टाकुनी उडी दवडा ॥
वधिलचि हा शूलाऽर्तो वाटुनि केला जसा उडीद वडा १६
ते भू-पृष्ठीं पाहिली मग घाली तद्रथीं उडी दरदां ॥
तों झाला पीठ जसा सांपडला चर्वणीं उडीद रदां ॥ १७ ॥

---

१ पणद्रव्य. २ पूर्वींच्या द्यूतांतले. ३ सरोवरासारिखी. ४ पराभव. ५ दुर्योधन. ६ क्रोध. ७ उत्तमौजा व युधामन्यु यांहीं. ८ आयुष्य. ९ शूलरोगपीडितास. १० भय देणारी गदा. ११ दांताला.

परि[1]भूतिनें तळमळे जेविं नखीं विद्ध[2] मानव सुयानीं ॥
भूप चढे शल्यरथीं तेही राजोत्तमा नव[3]-सुयानीं ॥ १८ ॥
पार्थाकडेचि गेले ते त्याचे चक्र-रक्षक रयानें ॥
राया मग दुर्योधन- राजाही युक्त होय वर-यानें ॥ १९ ॥
पुनरपि गांढूनि करी भीमाला कर्ण कौरवां रण गा ॥
सर्वाऽसुर-राज बली जेविं चतुर्दंत-गौर-वारणगा ॥ २० ॥
वृद्ध ह्मणे भग्न करी भीम बळें करुनि संगरा ज्याला ॥
त्यावरि जाया झाला कैसा उत्साह अंग-राजाला ॥ २१ ॥
ज्याच्या भयें न लागे धर्माचें पलहि पातया पातें ॥
तो कर्ण भग्न झाला केला लघु नहुष-पात या पातें ॥ २२ ॥
भीष्म-द्रोण-भयाऽधिक ज्याचें भय मानितो अजातारी ॥
त्या[6] भीम-शक्ति भंगी हरि-भीत गजा न कां अजा तारी २३
जो उपजला स-कुंडल- कवच नव-चमत्कृतिप्रति प्रसवे ॥
रस-वेत्ता दाता ज्यां ब्राह्मण-पद-पूजना-विना न सवे ॥ २४ ॥
देते पर-घूकांतें सुहृदऽब्जाचे प्रभाकर दरो जे ॥
ते सर्वहि ज्या एकें केले हरुनि प्रभा करद राजे ॥ २५ ॥
त्या वीर-वरा कर्णा सर्व सुविद्या-दया-कळाऽवासा ॥
भीम कसा विक्रम-गति रोधक झाला हया कळावांसा[10] ॥ २६ ॥
पुत्रास सखा आश्रय सर्वस्व अभेद्य कर्ण तो कवच ॥

---

१ पराभवानें. २ टोंचलेला. ३ नव्या रथीं. ४ हे धृतराष्ट्रा. ५ कर्णाला. ६ कर्णास. ७ शत्रुरूप घुबडांस. ८ आप्तांच्या हृदयकमलाचे. ९ भीतीला. १० पायखुंटा.

यश बहु रुचे जयाचें जैसें अस्पष्ट-वर्ण तोक-वच ॥ २७ ॥
नुरविल शेष परांच्या मथुनि सकल सित-हयां[1] सकट कटकीं
ज्याच्या भरंवसियानें केली न धरुनि भयास कटकट कीं २८
त्या कर्णासीं कैसा पुनरपि तो भीमसेन समर करी ॥
अत्यद्भुत हें प्रतिभट मर्त्य-करी एक एक अमरें[2]-करी ॥२९॥
आधींच सदय कळलें बंधुत्व कथी स्वयें पृथा नातें
मग केलें युद्ध कसें न करावें साधुनें वृथा नातें ॥ ३० ॥
दोघांत कोण विजयी झाला तें सांग आयकों दे गा ॥
कांहीं काल सुखें कीं दुःखें संसारि-काय कोंदे गा ॥ ३१ ॥
सूत[3] ह्मणे भीम निघे बंधुकडे जावयासि वात-गती ॥
त्याच्या दृष्टि-पुढें पर- शक्ति न हरिच्या जशा शिवा[4] तगती
धांवुनि कर्ण ह्मणे रे दावुं नये पृष्ठ संगरोपरतें[5] ॥
परतें रणींच मरणा ऽवधि जरि खातील अंग रोंप[6] रतें ३३
तुजसीं युद्ध घडो हें स्वप्नींहि न चिंतिलें परानीं कीं ॥
तो तूं भीमा मजला पृष्ठ कसें दाविसी परांऽनीकीं[7] ॥ ३४ ॥
सर्व स्वजीविताऽधिक यशचि सुखाऽस्पद न भाउ परतें रे[8]॥
रण-निज-धर्मापासुनि न मळाया वदनभा उपरतें रे ॥३५॥
शत्रूसि पाठ दाविसि हें तुज कुंतीसुतासि अनुचित रे ॥
क्षत्रिय लब्ध-जयचि कीं खरतर-परशर-विशीर्णतनुचि तरे[9]॥
भीम प्राण हराया अपकारें ताप-सापसा परते ॥

१ अर्जुनासहित. २ ऐरावत. ३ संजय. ४ कोल्ह्या. ५ समरपरावृत्तानें. ६ बाण. ७ शत्रुसमुदायांत. ८ पराङ्मुख न हो. ९ विच्छिन्न.

विनविति गमे करुनि त्या आत्रेया तापसा पसा पर ते॥३७॥
मृदुपूर्व युद्ध रविसुत भीम करी क्रोधपूर्व गा राजा ॥
कांपविती इषु त्याच्या बहु थोडे त्या शुचींत गारा ज्या ३८
भीमातें अच्छादिति वृषशर जे पत्रिपतिसम रयज्ञ ॥
या दोघांचा बहु दे नारदनयनांसि रति समरयज्ञ ॥ ३९ ॥
कर्ण करी स्मित तेणें भीमाला बहुत राग ये रचितें ॥
हास्यचि बहु ताप न विष मानधन न साहतात येरचि तें ४०॥
जरि होय भीम जैसा बहु पुष्पित पळस लालभडक वनीं ॥
कठिणींहि रणीं न पडे त्या गुरुभक्तासि जेविं जड कवनीं४१
तें भीमवपु विनाशर शल्यवपु जसें विना शलल नाहीं ॥
केला इषुनीं त्याचा न शुकाचा जेविं नाश ललनांही ॥४२॥
भीमें आठविला स्त्री- वस्त्रहरण हा निकार भारी हो ॥
कर्णहि मुख्यत्वें जो करणारा हानि कारभारी हो ॥ ४३ ॥
केला पुन्हा मथुनि धनु हय सारथि तो रणस्थ विरथ कवी ॥
वाटे घनरव समरीं कपि रोधुनि तोरणें स्थविर थकवी ४४॥
अन्य-रथीं क्षिप्र चढे मोह प्रकट न करूनि आधिरथी ॥
कीं होवूत न विकल स्वव्यामोहें धरूनि आधि रथीं ॥ ४५ ॥

---

१ दुर्वासास. २ आषाढमासांत. ३ गरुडतुल्य. ४ वेग जाणणारे. ५ प्रीति. ६ करितें. ७ शरावांचून. ८ साळूचें देह. ९ कंटकावांचून. १० स्त्रियांनीं. ११ अपकार. १२ इंद्रजित. १३ मारुती. १४ बहिर्द्वार. १५ वृद्ध. १६ कर्ण. १७ आपल्या मूर्छेनें. १८ मनोव्यथा.

कर्णचि धन्य न होता अन्य तसा मानव क्षम रणातें ॥
देतें कां न क्षतशतें[1]- चित तितउसमान[2] वक्ष मरणातें ॥ ४६ ॥
कर्णपराभव ह्मणवी येउनि कानास हाय हा निबेरा[3] ॥
रोदन वृथा खरें परि साहेल कसी सहायहानि बरा ॥ ४७ ॥
मोहें वाहुनि हृदयीं चिंतेतें वृद्ध जेविं सांगेतें ॥
पुनरपि तद्वृत्त पुसे परिसा संजय तयासि सांगे तें ॥ ४८ ॥
कर्ण पुन्हा क्रोधानें धांवे तें देखतां असें बहुत ॥
वदले तावक पावक- वदनीं झालाचि भीमसेन हुत ॥ ४९ ॥
हय वृषहयांत मिसळी जे वर्णें स्पष्ट आसविल याला ॥
देखुनि तव विजयाची पावे सारीच आस विलयाला ॥ ५० ॥
अपकार तुह्मीं केले जे जे सांतें स्मरोनि तो खवळे ॥
कर्णदवीं घनचि गमे द्याया श्रितचातकांसि तोखं वळे ॥५१॥
एकें मुखें किति करूं अत्यद्भुत युद्धयज्ञवर्णन गा ॥
वाटे प्रवर्तला तो भेदाया मूर्तवज्र कर्णनगा ॥ ५२ ॥
तोडुनि धनु कर्णाची शक्तिहि भंगी जसीच मूढ कवी ॥
कीं जेविं मथुनि मन मुनि विघ्नाची दारुणा चमू ठकवी ॥५३॥
भेदी भीम शरांनीं बहु शीघ्र परा शरासनादानीं ॥

---

१ क्षतशतानें व्याप्त. २ चाळणीसारखें. ३ ह्मातान्या धृतराष्ट्रास. ४ शस्त्रविशेष ( बर्ची ). ५ त्वत्पक्षीय. ६ कर्ण. ७ अस्वलासारखे काळे. ८ आशा. ९ भीम. १० कर्णरूपदवानळीं. ११ आनंद. १२ कर्णरूपपर्वतास. १३ कर्णास.

भिन्नविति वृषा न ते[1] निशि[2]- चर जेविं पराशरास नादानीं॥
करिती ते[3] वृषभ गज व्याघ्र हरि शरभ सुरासुरसम रणा ॥
ब्रह्मरस तसा न गणूं दे वीर रसचि सुरा-सुरस मरणा॥५५॥
भीमें पुनरपि कार्मुक तोडुनि वधिले सु-शंख[4]-धवल-हरी ॥
नवल अरि[5] करी प्रसवे बहुत तदानंद-सिंधु-नव लहरी ॥५६॥
भ्रात्यासि ह्मणे कुरुपति तूंबरक[6] पिटोनि दूर लाव कसा ॥
दुर्जय[7] धांवे व्हाया श्येनापासूनि चूर लावकसा[8] ॥ ५७ ॥
शरपातदेश सोडुनि सेना होती उगीच बाहेरी ॥
जरि जाय एकला अरि- वरि दुर्जय तरि उगीच बा हेरीं[9] ॥
लागे स्वर्ग-फलद शर भीम-क्षेत्रीं सुधीट पेराया ॥
यश साधाया घालुनि अंजन नेत्रीं सुधी टपे राया ॥ ५९ ॥
सातांनीं मग आर्वीं भीम उरीं ताडिला नव शरांनीं ॥
नासाकेश उपडितां गज होय हरीस कां न वश रानीं ६०॥
तो साश्वसूत दुर्जय वधिला तत्काल न करितां गलबा ॥
जाणों भीम ह्मणे घे स्वर्ग त्यागुनि कुसंग हा चल बा ॥६१॥
रडतचि दुर्जय कर्णें त्या समरमखांत घातला उजवा ॥
मौनें ह्मणे कुमार व्यर्थ नयन सुजवितां सुखें सुजवा ॥ ६२ ॥
कर्णें गणिले न विशिख[11] भीमाचे लागले कचाकच ते ॥
नच ते[12]जस्विज नसता पचते तदवयव खलखलां[13] खचते ६३॥

१ भीमशर. २ राक्षस. ३ भीमकर्ण. ४ शंखासारिखे पांढरे घोडे. ५ कर्ण. ६ नपुंसक. ७ दुर्योधनभ्राता. ८ पक्षिविशेषसा. ९ पाहे. १० दुर्जय. ११ बाण. १२ सूर्यपुत्र. १३ गळते.

स्थविर ह्मणे हा कर्णा बळ बहु परि पांडवां पुढें न चले ॥
अंगार[1] सर्व-दुर्धर तदपि चकोरांसि[3] ते सुखें पचले ॥ ६४ ॥
सूत ह्मणे होय पुन्हा कर्ण कलह-रत चढोनि नवयानीं ॥
आश्चर्यचि तें कीं रण-[4] सव दाखविला सुरांसि नव[5] यानीं ६५
कर्णाचे हय चारी मारी खवळोनि तो गदाघातें ॥
भीमवळातें वारूं न शके तो[6] जेंवि भोगदा[7]ऽघातें ॥ ६६ ॥
केतु च्छेदुनि सूतहि वधिला अत्युग्र तेज राया तें ॥
वृष मंदोत्साह गमे आली परिभूति ते जरा यातें ॥ ६७ ॥
राहे कोदंडवळें तो दंड-बळें उभा जसा जीर्न ॥
तेजस्वी नच वांके स्वीकारिल केसरी कसा जीनें ॥ ६८ ॥
भूप ह्मणे रे दुर्मुख द्याया कर्णासि अभय वा धावें ॥
आपण देखत असतां अरिचें स्वसख्यासि न भय बाधावें ६९
केला कीं कर्ण विरथ चापीं गुण आधिरथि रथीं चढवीं ॥
तो शर[10] जसा प्रतापें त्या या जलधीस[11] तूंहि जा कढवीं ७०॥
गेला वाराया जो दुर्मुख देखुनि समक्ष याला हो ॥
प्रेषी शर भीम ह्मणे सत्वर हाही यमक्षया[12] लाहो ॥ ७१ ॥
वाराया गेला तों आपणचि न लागतांहि पळ वारे[13] ॥
जाणों शरां ह्मणे धनु कार्य पुढें नीट हात वळवा रे ॥ ७२ ॥

---

१ धृतराष्ट्र. २ निखारे. ३ चकोरपक्ष्यास. ४ रणयज्ञ. ५ नवा. ६ कर्ण. ७ कर्मफळाचा भोग देणाऱ्या अघातें. ८ ह्मातारा. ९ खोगीर. १० रामशर. ११ प्रसिद्ध सागरास. १२ यमसदनास. १३ मरे.

दुर्मुखरथ सांपडला विरथा कर्णासि आयता राया ॥
दैवत्यक्तासि शके न सखा न पिता न माय[1] ताराया ॥ ७३ ॥
राधेयाला नधरे[2] होतां दुर्मुख परासु रोदन हो ॥
स्नेहगुण असाचि कसा मोहद मज्जनपरा सुरोद[3] न हो॥७४॥
नांदे सुखें सदोदित संसारीं तोचि जो अनय[4] न करी ॥
न निघे इतर जन बुडे व्यसनीं पंकीं जसा अनयन[5] करी७५॥
करि साऽश्रु दुर्मुखाच्या तो कर्ण कवि प्रदक्षिणा देहा ॥
समरीं भीम गमे श्रुति- गो-तर्णक[6] विप्र दक्षिणा दे हा[7]॥७६॥
रडतां प्रहार केले होते ते सर्व उगविले तिपट ॥
निपट प्रखरशरांहीं वाटे चित्तांत पाडिलें विपट[8] ॥ ७७ ॥
सव्यभुजीं भीमाच्या कर्णे नाराच अर्पिले चवदा ॥
चव दाखवुनि वदान्यें[9] स्वरसें[10] ते अतिथि तर्पिलेच वदा॥७८॥
भीम न चळला जरि हत खळखळखळ विपुल भुज वमे[11] रुधिर
गमलें त्यजिता शिरतां रविसुत-नाराच सुजव मेरु धिर ७९
भेदी भीम तिहींच क्रोधभरें त्या वृषास रोपांनीं[12] ॥
जाणों ह्मणती ते हय त्या डोहीं द्रुत तृषा सरो पानीं ॥८०॥
करिती तद्धैर्यातें ते काम-क्रोध-लोभसे नाहीं ॥
वृष निरखिला हरि-नख- क्षत-गजसा नष्ट-शोभ सेनांहीं॥८१॥
ते सत्य सर्प न विशिख कर्णहि न तदीय-सदन[13]-वारुळ तो ॥

---

१ नाटोपे. २ गतप्राण. ३ सुरासमुद्र. ४ अन्याय. ५ अंध. ६ गोवत्स. ७ कर्ण. ८ विपर्यास. ९ दात्याजें (भीमानें). १० स्वरक्तें. ११ ओके. १२ बाणांनीं. १३ त्या सर्पाचें वारूळ ( भीम ).

कीं माणिक्यसर जय- श्रीवरणीं शर मळां नवा रुळतो[1] ८२
बहु रक्त दिसे खेळुनि होय जसा काय बा गुलालातें ॥
पळतां कर्ण स्मरलें भिउनि पळे बाळ बागुलाला तें ॥ ८३ ॥
उच्चैःश्रवःस्वसेसीं भी त्यागुनि न रमते जवन वाजी ॥
प्रकटिति कशा प्रतोदा वांचूनचि परम ते जव नवा जी॥८४॥
तृप्ति वरि सदुत्कर्षें विहित-जय-स्वान नारद नविच कीं ॥
ब्रह्मरसाहि ह्मणतो हरि- जन सुयशा स्वानना रद[2]न विचकीं ॥
कर्ण पळे भीमभयें जैसा राक्षस पराशर-भयानें ॥
तैं आपणा हरि करुनि दाखविलें बा परा शरभ यानें ॥८६॥
भासे भीम भयंकर बहु जैसा देव अंधकारा[3]ती ॥
जे भीत भंग[4]वेला जी कीं ते स्पष्ट अंध कारा[5] ती ॥ ८७ ॥
वृद्ध ह्मणे बहु देतो दुर्योधन परममंद राग मला ॥
सांगे निस स्वयशो- हर कर्ण असेल मंदरा[6] गमला ॥ ८८ ॥
दिधलें देइलहि यशोऽमृत परबल जलधि मथुनि अतिबल हा॥
कलहा करितां मजसीं भंगचि पावेल सामरहि बलहा[7] ॥
लज्जा हानि न झाली त्या मुग्धा मजहि मुग्धता[8]ता कीं ॥
म्यां कल्पिली प्रबलता अल्पबळीं जेंवि दुग्धता ताकीं ॥९० ॥
जय[9]-भीम-वधाविषयीं कर्ण सुयोधन करोत बकबक रे ॥
कैसे करितील तिमि- ग्रासं[10],दहनमेषभंग, बक बकरे ॥ ९१ ॥

---

१ शोभतो. २ दांत. ३ रुद्र. ४ पराजयवेला. ५ बंदिशाळा. ६ पर्वत मंथाद्रि. ७ इंद्र. ८ मूर्ख पित्यास. ९ अर्जुन. १० तिमिनामक महामत्स्याचा ग्रास.

सूत ह्मणे धृतराष्ट्रा बा कारण तूंचि या विनाशाला ॥
शून्या होत्या न तुझ्या सच्छलपर[1] या न याविना शाला९२॥
कपटद्यूतादि कुमत गुरुसुमतसम प्रभावि लेंकाचें ॥
त्वां पकहि शांतनव- व्यासविदुरवचन माविलें काचें॥ ९३ ॥
झाले भीष्मद्रोण- व्यास-विदुर-सदुपदेश तुज कुचळे ॥
कर्ण-शकुनि-दुःशासन- दुर्योधन-मंत्रे[2] अमृतसे रुचले ॥ ९४ ॥
उरलेंही घालिसि बा काळमुखीं स्वकुळ घातलें कांहीं ॥
कां देसी दोष परा त्वां हा केला न घात लेंकांहीं ॥ ९५ ॥
स्वयशोरक्षणचि करिति बहु न तुझे[3] अंगरक्षण नयज्ञ ॥
कीं तत्काळचि देतो सद्गतितें संगरक्षण न यज्ञ ॥ ९६ ॥
भंगे परि न समितितें कर्ण सतीतें जसा न विट लाजे ॥
क्षणभरि ह्मणोत याला ते जन ह्मणतील राहु विटला जे९७
कर्णपराभव कोपें भीमावरि धांवले तुझे सुत ते ॥
दुर्धर दुर्दम दुःसह दुर्मर्षण जयहि जे मदें उत[6]ते ॥ ९८ ॥
भीमें त्या पांचांचे केले तत्काळ पांच विलय महा ॥
कर्ण ह्मणे आयाविना याचा रिपु कोण वांचविल यम हा१००
छेदी धनु हय सारथि मारी खंडी पुन्हाहि चापातें
भीम करी कर्णातें विरथ कथूं कर्म काय वापा तें ॥१०१॥
भासे कर्ण क्षितिवरि झाला सोडूनि गगन रवि पत्ती[7]

१ साधुच्छलप्रधान. २ मसलत. ३ त्वत्पक्षीय. ४ द्रोणादिक. ५ सुद्धातें. ६ उन्मत्त. ७ पादचारी.

आल्या नसतां भीतो मग न गणी सत्वनग-नर विपत्ती १०१
कर्ण गदा भिरकावी क्रोधभरें चावुनी रदनवासा[1] ॥
तीतें वारुनि वर्षे विजयाचा भाउ नीरद[2] नवासा ॥ १०२ ॥
नुरवि करुनि पर कवचा अंगप[3] तितँउ[4] पलसमय[5] मनिं भानें
भीमानें शर गणिले अंगपतित उपल-सम यमनिभानें ॥ ३ ॥
कवच शत-च्छिद्र करुनि दक्षिण भुजहि व्रणोत्थ-शतधार[7] ॥
केला कर्ण शिखरिसख भीमें निज विशिखनिकर शतधार[8] ॥
पुनरपि होय पराङ्मुख वृष होतां शक्ति बाहुची शिथिला ॥
भीमाला मानवली[9] जनता[10] जसि रामबाहुला मिथिला ॥१०५॥
ज्येष्ठाज्ञेनें धांवति रक्षाया कर्ण चित्र उपचित्र ॥
चित्राक्ष चित्रवर्मा चित्रायुध करिति ते रणहि चित्र ॥१०६॥
सर्वहि वधिले भीमें न करुनि बहु युद्ध गलबला कांहीं ॥
आह्मीं विलोकिला तो गरुड जसा रुद्धगल बलाकांहीं ॥७॥
वृष बहु रडे हळहळे होय विदुर-सूक्तिचीच[6] आठवण ॥
हेचि चुकाया घेती स्वांगीं सत्प्रणति[11] करुनि आठ वॅण[12] ॥८॥
बसुनि नवरथीं वृष करि जिंकाया अरिस जो निकर कांहीं ॥
वाटे वर्षे गोव- र्धनगिरिवरि हरि[13] सजोनि करकांहीं[14] ॥१०९॥
व्याकुल करी विदारुनि कर्णा रिपुनाश-कोविदा[15] राया ॥

---

१ ओष्ठातें. २ मेघ. ३ कर्ण. ४ चाळण. ५ पळभर. ६ स्मृतीनें. ७ क्षतांनीं उत्पन्न झालेल्या शतशः रक्तधारा असा. ८ वज्रतुल्य. ९ मान्य झाली. १० जनांचा समूह. ११ साधूंस नमस्कार. १२ घटे. १३ इंद्र. १४ गारांनीं. १५ कुशला.

तैं प्रभु ह्मणे असाचि सु- योधनहृदया शको विदाराया १०॥
कृष्णार्जुन सात्यकि बहु मानवले भीमसेनबाहूतें ॥
त्यांचें आह्मां पाहू तेज सहायांहि दे न बाहू तें ॥ ११ ॥
मेतकुमार विलोकुनि तप्त करी कोप शोक राधेया ॥
तो धात्रीस ह्मणे कां वाढविलें श्रम करूनि राधे या ॥१२॥
मग आपणा ह्मणे धिक् कर्ण त्वामनपहृत-नर-वराधे ॥
दाइस ह्मणे पृथावत् त्यजितां तुज लागता न रंव राधे१३॥
गांठी सुरुचि-वृषविशिख- तति भीमा परमदांऽरुणाऽस्तनगा
घ्याया श्रीकृष्णाला जेविं बकी परम दारुणा स्तन गा१४ ॥
दुःसह भीम कुरुबळीं होय जसा दहन तरकटुन रानीं ॥
गणिलें त्या समयाहुनि हळहळही न बहुतर कटु नरानीं१५
रामाची शक्ति जसी बा भीमाचीहि शक्ति चंवकळ ती ॥
वीररसाची श्रवणें थोडी नेत्रें उदंड चव कळती ॥ १६ ॥
युयुधान उत्तमौजा जिष्णु युधामन्यु कृष्ण हे तिकडे ॥
वदले कर्ण किति कनक-गिरिचे भेदील भीमहेति कडे १७॥
भूरिश्रवा गुरुतनय कृप हे तों सुज्ञ मानवावेच ॥
कवि ह्मणति वाणि वर्णुनि देवा कीं सुज्ञमानवा वेच ॥ १८॥

---

१ सात्यकत्यांस. २ बोलावूं. ३ दाईस. ४ त्वां-अनपन्हृत-नरवर-आधि.नाहीं हरण केली दुर्योधनाची मानसव्यथा अशा तूतें धिक्. ५ शब्द. ६ कर्णशरांचा समूह. ७ शत्रुगर्वरूप सूर्यास अस्ताचल अशा. ८ पेटून. ९ विषही. १० पुष्कळ. ११ भीमाचा खड्ग. १२ मेरुपर्वताचे कडे. १३ हे वाणी. १४ खर्च.

समयीं गुण जाणुनियां शब्देंही सुयश साधु साधुनि वे ॥
हें चित्र जयद्रथकुरु- पतिवदनांतूनि साधु साधु निघे ॥ १९ ॥
भीमशराच्छादित रवि- सुत झाला जेधवां दिसेनासा ॥
भ्याला कुरुपति जाणों त्याची याला न ती दिसे नासा[१]२०॥
भूप ह्मणे धांवा रे ह्मणतां काकासि काय पायस[२] खा ॥
मागें ठेविल माझा नच रक्षाया स्वकाय पाय सखा[३] ॥ २१ ॥
गेले अग्रज-वचनें धरुनि मनीं लाज सात[४] वाराया ॥
ते तोयबिंदु झाले तो तापविला जसा तवा राया ॥ २२ ॥
शत्रुंजयादि तव सुत झाले यापरिस शाजिरे[६] नाकीं ॥
जो हरिभाग[५] वृकाला तो भक्ष्यहि परि ससा जिरेना कीं२३
न विकर्णेतरपातें[७] रणरंगीं भीमसेन गहिवरता ॥
न गदी जगदीश्वरसा गजबजता पडलिया नगहि वरता२४
भीम ह्मणे अर्पावें सर्वस्व तुला न सायक विकर्णा ॥
कीं वृत्ति तुझी रुचली बहु रासिका जेविं साय कविकर्णा२५
योग्या नव्हे प्रतिज्ञा गुर्वाज्ञा जेविं भार्गवा त्यागा ॥
असुख रची खलसंगति जैसी कुग्राममार्ग वात्या[८] गा ॥ २६॥
सोडावीच कुसंगति सर्वार्थद-काय-पाळणारानीं ॥
स्वर्गपरें पुत्राचा बांधावा काय पाळणा रानीं ॥ २७ ॥
साधु बिभीषण कीं तूं जरि खळसंसर्ग करुनि मळले शें[९] ॥
स्पष्ट तुह्मां दोघांस स्पर्श न केला कुसंगमळलेशें ॥ २८ ॥

---

१ नासिका. २ क्षीर. ३ कर्ण. ४ सात बंधु. ५ भीम. ६ शोभायमान. ७ विकर्णाहून इतरांच्या पातानें. ८ वावटळ. ९ शत.

होतासि सखा तूं त्या पुण्यश्लोका[1] अजा[2] मिळाल्याला ॥
दोघांसहि लाभ प्रभु देउनि सद्यश अजामिळा ल्याला ॥२९॥
ऐसें शोचुनि पुनरपि सिंहापरि होय गर्जना करिता ॥
झाला रणोत्सवीं त्या वृक्ष-प्रासादवर्ज[3] नाक[4] रिता ॥ १३० ॥
धर्मास कळे नेला भीमें वृषगर्व[5] सकळ विलयाला ॥
तो सिंहनाद कळवी स्वर्गा[4] जय कोंवि न कळविल याला[6] ३१॥
इकडेहि हृष्ट धृष्टद्युम्नादि व्योम भरिति गजरांनीं ॥
जेंसे यूथपतीच्या विजयोत्कर्षेंकरूनि गज रानीं ॥ ३२ ॥
व्यूहद्वारीं देती जिंकाया गुरुसि वीर तरमुंडी[7] ॥
न धरिति तिळहि तनुपतन- भय जेविं विरक्त धीरतर मुंडी[8]३३
जरि दिव्य-भोग-भोग्या स्वर्गीं पावति सुयोध नव देहा ॥
तरि एकोनदशनमित[9]- सोदर-मरणें सुयोधन वदे हां[10] ॥ ३४ ॥
स्मरलें सुयोधनातें जें जें कांहीं कनिष्ठतात[11] वदे ॥
राया हें फळ तुजला भीम न लोभें कनिष्ठता तव दे॥ ३५॥
ऐक पुन्हा न पृथेला गाय अशी वा सुरप्रसू[12] नाहीं ॥
जें[13] झांकिले शरांहीं आधीं मग भासुर[14] प्रसूनांहीं[15] ॥३६॥
मोहे भीमशरांच्या सर्वत्रहि विद्ध काय होय शतें ॥
तरि विमुख नव्हे गातिल न सकळ सुर सिद्ध काय हो यशतें ॥

---

१ बिभीषणा. २ रामास. ३ वृक्षप्रासादावांचून. ४ स्वर्ग रिकामा झाला. ४ स्वर्ग. ५ कर्णगर्व. ६ धर्माला. ७ मुसांडी. ८ संन्यासी. ९ एकतीस. १० खेदोद्गार. ११ विदुर. १२ देवांस प्रसविणारी. १३ पृथापुत्र. १४ शोभायुक्त. १५ पुष्पांहीं.

पडलें क्षितिवरि उडुसें भीम शरें कर्ण-कुंडल हरीतें ॥
वृषमुख गमे जलधिच्या सांपडलें अग्निकुंड लहरीतें ॥ ३८ ॥
पाडूनि एक कुंडल मग दश नाराच हाणिले अलिकीं ॥
ते शोभले सरोजें पाजाया स्वमधु आणिले अलि कीं ॥३९॥
होउनि मुहूर्त मूर्च्छित कर्ण उठे तन्मनांतही राग ॥
तो पद्मरागनगसा गमला रक्तार्द्र कठिण हीरांग ॥ १४० ॥
केले रोमांचित सुर- नर कर्णें अमित बाण-संधानें ॥
न गणुनि तें तत्कार्मुक केलेंचि च्छिन्न सत्यसंधानें ॥१४१ ॥
वृप घे अन्य धनु ह्मणे शवपूर्णा करिल बंधु समुंदि रसा ॥
क्रोधें वर्षोनि भरू पाहे भीमास अंधुंस मुदिरसा ॥ १४२ ॥
मोठें संकट आलें होतें परि ह्मणाति जों नरपें टळतें ॥
तों जलद-पटलसे त्या वार्तेंसुतें उडविलें शरपटल तें ॥१४३॥
त्याचे तूण उघडले जाणों उग्राहिगर्भ पेटारे ॥
नारद ह्मणे भले हो जाळा दृग्दोषदर्भ पेटा रे ॥ १४४ ॥
पवनें-तपन-सुत गमले शक्र प्रह्लाद राम रावण वा ॥
वाटे गगनीं तच्छर- संघर्षज दहन पामरा वणवा ॥ १४५ ॥
शरपट असे प्रकटिती कीं रवि न दिसे न वा पवन वाहे ॥
एकाहुनि एक अधिक करिति चमत्कार बा नवनवा हे १४६

---

१ नक्षत्रसें. २ ललाटीं. ३ कमलानें. ४ भ्रमर. ५ हिऱ्याचा पर्वत. ६ सत्यप्रतिज्ञ जो भीम त्यानें. ७ सर्व. ८ पृथ्वी. ९ कृपास. १० मेघसा. ११ राजे. १२ भीमें. १३ भीम आणि कर्ण. १४ बाणांच्या घर्षणापासून उत्पन्न झालेला अग्नि.

त्या वृष- वृकोदरांवरि दिव्यकुसुमवर्ष लेख रचिती जी ॥
मुनि आशी बहु, थोडी श्रीपुत्रीं हर्षले खरचिती जी॥ १४७॥
यत्न न चाले ह्मणुनि प्रकट करी कर्ण अस्त्रमायेतें ॥
भीमपराभव इच्छी चित्तीं पसरूनि वस्त्र मायेतें ॥ १४८ ॥
चुरिले वृषविशिखांनीं वायु-सुताचे धनुष्यशरभाते ॥
झाले महाशरभ जरि पहिले हरि त्या मनुष्य-शरभा ते १४९
हय मारुनि तत्सूतहि मर्मी हाणूनि बाण पांच कसा ॥
उतरे ह्मणुनि ह्मणे वृष जाणों त्या जा पळोनि वांच कसा ॥
सूत युधामन्युरथीं चढला सोडूनि पवनतनयातें ॥
जरि होय विरथ विक्षत होऊं दे धैर्य अवनत न यातें ॥१५१॥
भीमें झुगारिली रथ- शक्ति प्रकटावया ठळक लीला ॥
अशनीच मानिली बहु जन-नयनांहीं नभीं झळकलीला १५२
खंडी तिला नव्हे तो वृष नागीला जसा वश शिखंडी ॥
कीं रतिपतिच्या इषुला लीलेनें देव-देव शशिखंडी ॥ १५३ ॥
तों खड्गचर्म घेउनि युद्धासि त्वत्कुमार काळ सजे ॥
ते धन्य पुरुष धर्मी नेणति आयास भीति आळस जे ॥१५४॥
तोडुनि चर्म शरगणा- करवीं तो प्रबळ-बाहु घेरविला ॥
वाटे तेव्हां जैसा गांठूनि मुखांत राहु घे रविला ॥ १५५ ॥
छेदी वृषचापातें भिरकावुनि परम भीम करवाळा ॥

१ देव. २ अजी. ३ ममतेतें. ४ सिंह. ५ भीमा. ६ कसोटीस. ७ नभ्र. ८ मयूर. ९ मदनाच्या. १० महादेव. ११ यमतुल्य. १२ ढाल. १३ भीम. १४ खड्गा.

राया रविच्याहि ह्मणे ओष्ठांला विजयिभीमकर वाळा[1] १५६
हास्य करी कर्ण बहुत शर वर्षे कार्मुकें मग नवीनें ॥
आक्रमिलें भीमें विष[2]- दृगाहि धराया जसें गगन वीनें[3]॥१५७॥
राधेय रथोपस्थीं भीम नभीं देखतां दडाला जी[4]॥
हे तीच भीति गरुडा- पासुनि त्या काळिया जडाला जी ॥
ध्वज तरु भीम शिखी[5] वृष मूलबिलनिलीनसर्पसा राया॥
वाटे प्रवर्तला तो मारुति घननाद[6]दर्प सारांया[7] ॥ १५९ ॥
कर्णध्वजीं विलोकुनि बहु आशीर्वृष्टि[8] करिति सुर भीमीं ॥
सत्पुरुषकथा अद्भुत रसदा ह्मणतों इलाचि सुरभी मी १६०
वा साधु साधु वदले केवळ तद्रंगकाम जे पर ते ॥
बहुधा स्वानुजभाग-[9] स्मृति वारी ह्मणुनि न वधितां परतें १६१
क्षितिवरि येतां झांकी शरपटलें कर्ण पुनरपि तयांतें[10] ॥
रवितेंहि लोपवी हो सुगुणगणें जेंवि सुनर पितयांतें[11]॥ १६२
विरथ विशस्त्र वृकोदर चुकवाया कर्णबाणपात रणीं ॥
विजयहत-गजांत शिरे गगनीं जलदांत जेंवि बा तरणी १६३
अघटितहि करायाचें जें कपिला[12] जें कळे वराहा[13] तें ॥
वाटे जाणे भीमहि कीं उचली गज-कळेवरा हातें ॥ १६४ ॥
त्या गजकलेवरातें कर्ण च्छेदुनि चहूंकडे विखरी ॥

१ सुका. २ विष-दृग्-अहि-विषदृष्टि सर्प. ३ वि-इन-पक्षि-श्रेष्ठ गरुडानें. ४ अजी. ५ मोर. ६ इंद्रजिताचा गर्व. ७ संपवाया. ८आशीर्वादरूपवृष्टि. ९ अर्जुनाचा भाग आहे अशी आठवण. १० भीमातें. ११ पित्यातें. १२ मारुतीला. १३ यज्ञवराहाला.

वाटे पविप्रहारें केला विध्वस्त वासवें शिखरी ॥ १६५ ॥
रोधिति वृषशरपटलें भीमबळा जेंवि यामुनां गांगें ॥
तरि बा झुगारिलीं जीं विच्छिन्नें काय तींच नागांगें ॥ १६६
तेंचि झुगारी जें ये रथचक्र तुरंग गज- कुणप हाता ॥
रोमांचित होय अरिहि जो भीमीं सत्ववर गुण पहाता १६७
तें तें कर्णीं पावे पाषाणीं जेंवि भंग ढेंकूळ ॥
वृषमत्तेभ शररदन भीमवपु गमे तयापुढें कूळ ॥ ६८ ॥
मग भीम क्रोधभरें चावुनियां दांत ओंठ मूठ वळी ॥
चित्तांत ह्मणे घालूं मत्तवृषीं आजि काळ मूठवळी ॥ १६९ ॥
तों स्मरला अर्जुनपण आटोपी ह्मणुनि भीम हातातें ॥
प्रबळहि कुपितहि सुपुरुष धर्मातें द्विरद भी महातातें ॥
कर्णहि कुंतीवचन स्मरला ह्मणवुनि वधी न भावातें॥ १७०
त्यजिलें सर्वस्वहि परि न पळहि सत्या बुधें नभा वातें ॥
जवळि भिडोनि कुरुपते डिवंची भीमासि कर्ण कोदंडें ॥
सद्वाजिस प्रतोदें की केला स्पर्श अहिस तो दंडें ॥ १७२॥
कृष्ण करिरदासि तसा घे त्या चापास भीम हिसकूनी ॥
तेणें कर्णासि शिरीं हाणी न वधी वधासहि सकूनी ॥ १७३॥
वाटे महातरंगें- करुनि थडक अगवासि अर्णव दे ॥

१ पर्वत. २ यमुनाजलास. ३ गंगोदकें. ४ गजशरीरें. ५ शव. (प्रेत), ६ कर्णरूप मदोन्मत्त हत्ती. ७ बाणरूप दंत. ८नदीतट. ९ क्रोधयुक्त. १० गज. ११ टोंची. १२ सत्-वाजिस-उत्तम अश्वास. १३ चाबुकानें. १४ कुवलयापीडनामक गजाच्या दंतास.

साहुनि धनुःप्रहार स्मित करुनि वृकोदरासि कर्ण वदे१७४॥
तूबरका औदरिका टाकुनि आलासि का महानस रे ॥
भ्याडा अणिकांत सरो दुसरा वीरांत काम हा न सरे ॥
बहु-अशन-सूदताडन- पंडित तूं रण-मखीं न कोविद रे ॥
भीरु जयश्रीस तसे कन्येला वर जसे नको विद्रे ॥ १७६ ॥
मजसीं भिडसी भ्याला सिंहासीं जेंवि विप्रताप ससा ॥
बाळा तपोवनाश्रित हो तूं रणभीरु विप्र तापससा॥ १७७॥
किंवा हो अनुजाश्रित तोचि तुझें करिल आजि असवन ॥
मूढा मृगें शिरावें मृगराजवनीं त्यजूनि न स्ववन ॥ १७८ ॥
भीम ह्मणे राधेया जरि असकृत् भंगिलें तुला आजी ॥
निर्लज्जा तरि ह्मणसी मज ठावी काय तुज मुला आजी ॥
ये रे भुजयुद्ध करूं हो जैसा बकहिडिंबकीचकसा ॥
असतां असु त्रिदोषी जेंवि बडबड त्यजील नीच कसा१८०॥
भीमाचें मत जाणुनि राहे राधेय मूकसा उगला ॥
कीं भुजयुद्धोत्साहें वद्दु अकुलज धनमदें तसा फुगला१८१॥
तों प्रभु ह्मणे सख्या हूं कांहीं इकडेहि शर उडीव कसा ॥
विरथीं वृकोदरीं तो घालितसे वृष झषीं उडी वकसा१८२॥
प्रेरी अति त्वरेनें प्रभु पार्था पार्थही शरसमूहा ॥
कर्णाहि सूता सूताहि अश्वांतें तें ह्मणे कुरुचमू हा ॥ १८३ ॥

१ नपुंसक. २ पोटभरू. ३ पाकशाळा. ४ भक्षण. ५ पंडित. ६ विद्रूप. ७ पराक्रमहीन. ८ असु-अवन-प्राणरक्षण. ९ संग्राम. १० मत्स्यीं. ११ बकासारिखा.

सात्यकिरथीं वृकोदर चढला राधासुतापसरणीं हो ॥
ह्मणति यशस्वी या कीं मथित-विराधा सुतापस रणीं हो ॥
जो शक्रेंहि पराचा नाशाया मद वळाविला पार्थ ॥
तो नाराच प्रेषी कर्णावरि तद्बला-विलापार्थ ॥ ८५ ॥
त्यांतें खंडुनि गुरुसुत वारी बाधा जसी अहिमगुरुंजा ॥
विकळ करुनि पळवी तें मित्र प्रभुचें महामहिम गुरुंजा॥८६ ॥

---

# अध्याय १३.

सात्यकि आला पाहुनि देव बहु महत्त्व देत नावाजी ॥
हें किति यास भुजाधिक जे वाहति कीशकेतनीं वाजी ॥१॥
पार्था सख्या तुझा प्रिय- शिष्य सखा पातला पहा यातें ॥
या कुरुबळवेगातें तूं कीं क्षम एक हा सहायातें ॥ २ ॥
शिरतो पारावारीं परि कैंचा वेग बा असा मकरा ॥
आजि कळेलचि भावि स्वक्षय दुर्योधना असामकरा ॥ ३ ॥
श्वेताश्व ह्मणे प्रभुजी कांपति चळचळ अरी पहाते जा ॥
तो सात्यकिवारि उठला कीं हो भूरिश्रवा महातेजा ॥ ४ ॥

१ कर्णपलायनसमयीं. २ विराध राक्षसास मारणाऱ्या रामास. ३ त्याच्या स्त्रियांस विलाप देण्यासाठीं. ४ सूर्योद्भव. ५ अश्वत्थाम्यास. ६ अर्जुनरथातें. ७ सात्यकि. ८ सागरांत. ९ सुसरीस. १० सख्य न करणारास.

झाला युयुधान परि- श्रांत न भूरिश्रवा समरयासीं ॥
समबळसाहित्यांसीं[1] गांठि वरी विषम बा समर यांसीं॥५॥
सिंधु तरुनि न बुडो हा खाउनियां गोष्पदीं गटकळीला ॥
बा बहु करीत आले त्वन्नामपदाश्रयें गट कळीला ॥ ६ ॥
त्वत्करुणामृतपूरीं सर्वसुखें प्रणतयाद[2] वागावें ॥
केवळ न सात्यकिमुखा अजित असें ह्मणति यादवा गावें ७
तों तो कौरव्य[3] ह्मणे मृग होउनि सिंहदृष्टिविषय[4] मरे ॥
तसि माधवा मदरिगति कीं मामक तेज बाण विष यम रे ८
तुज पशुतें कुरुपतिदृक्- दुर्गादेवीपुढेंचि कापीन ॥
होईल सुप्रसन्ना कीं तूं आहेसि बहु निकां पीन ॥ ९ ॥
कर जा वराप्सरांसीं अर्पुनि मन्मार्गणा शिर विलास॥
लाजो रडो युधिष्ठिर जेणें व्यूहांत तूं शिरविलास ॥
निःसंशय धर्मार्जुन कृष्ण समर सोडितील शोकानें ॥
स्पष्ट निरुत्साह सकल होइल हें आयकेल जो कानें ॥ ११॥
हांसुनि शैनेय[11] ह्मणे कौरव्या यमहि भय न शिववि ल यां[12] ॥
न करुनि निरायुध रणीं नेइल न ज्वलन-नयन शिव विलया
कोणासि भिवविता हो हा यादव अजितदास कळलें कीं ॥
जेव्हां होय भजक दे भाग्य पिता अजि तदा सकळ लेंकीं ॥

---

१ समवेगासीं. २ भक्तरूप जलजंतु. ३ भूरिश्रवा. ४ सिंहदृष्टीला गोचर. ५ हे सात्यके. ६ माझें. ७ दुर्योधनाची दृष्टिरूप दुर्गादेवी तिजपुढें. ८ चांगला. ९ पुष्ट. १० माझ्या बाणास. ११ सात्यकि. १२ मला.

मज तव गर्जित शारद- घनगर्जितसेंचि हांसवीतें हो ॥
या गर्जनेसि होइल फल तरि पय कां न कांसवीतें हो १४
रे कौरवाधमा तुज वधिल्यावांचूनि मी न परतेन ॥
होते जे जे झाले शैनेयेषुं बक मीन पर ते न ॥ १५ ॥
येणें तो तेणें हा बोलुनि बहु तीक्ष्ण वचन कोपविला ॥
साहेल कोण हो अति- कठिणाही तीक्ष्णवच नको पँविला
भिडले अत्यावेशें ते सात्यकि सौमदत्ति बहुत रणीं ॥
तच्छरनिकरें केला छिन्न तसा राहुनें न बहु तरणी ॥ १७ ॥
विरथ निरायुध होउनि शुद्ध नियुद्धीं प्रवर्तले मग ते ॥
जरि नसते धर्मज्ञ ब्रह्मज्ञ कुलीन कां न डगमगते ॥ १८ ॥
कृष्ण ह्मणे श्रांत दिसे सात्यकि कौरव्य नागविल याला ॥
पार्था पत्रिपतिपुढें पावेना काय नाग विळयाला ॥ १९ ॥
रक्षावा व्यसनीं त्वां माधव आला तुझ्याचि कार्याला ॥
स्वजनपरित्राणाहुनि अन्य व्रत मत नसेचि आर्याला ॥२०॥
अर्जुन ह्मणे गमे मज देतो मत्तेभ यूथँपा टकरा ॥
प्रभुजी सात्यकिरक्षण संकट मोठें तुह्मीच वाट करा ॥ २१ ॥
कृष्णार्जुन वदति असें तों त्यांचा करुनि बाहुसमर गडी ॥
विधुसम मृदु होय तया कौरव्यँ क्रूरराहुसम रगडी ॥ २२ ॥
आपटिला भूपृष्ठीं केश धरुनि वोढिला जना गमला ॥
वधिलाचि भूरिदक्षिण तार्क्ष्य क्षण वृष्णिवीर नाग मला २३

१ होवो. २ सात्यकीचे बाण. ३ वज्राला. ४ बाहुयुद्धीं. ५ गरुडापुढें. ६ यूथपतीस. ७ भूरिश्रवा. ८ गरुड. ९ सात्यकि.

ईश्वरवरलाभ जया तो काळावारि करील सत्तेतें ॥
कीं सौमदत्ति हाणी सात्यकिवक्षःस्थळींहि लत्तेतें ॥ २४ ॥
कृष्ण ह्मणे मजपासुनि जें शासन होय कालियाऽहीतें ॥
झालें त्वन्नाथवरें यापासुनि देवि[1] कालि याही तें ॥ २५ ॥
पाहे असिनें सात्यकि-मस्तक खंडावयासि जों सुकवी ॥
भ्रमवी कुलालचक्रा- परि शिर चिर खड्गपात तो, चुकवी ॥
तों प्रभु ह्मणे अरे रे श्वेताश्वा वीरनायका पावें ॥
बा त्वत्समक्ष अरिनें सात्यकिशिर आजि काय कापावें ॥२७॥
अर्जुन शलाग्रजातें[2] चिंतुनि चित्तांत मानवे शतदा ॥
तद्दक्षिणभुज खंडी हा ह्मणती सर्व मानवेश[3] तदा ॥ २८ ॥
केवळ जडली होती जरि दृष्टि जयद्रथीं तरि सुजातें ॥
पार्थें प्रिय सोडविला तोडुनि त्या भूरिदक्षिण- भुजातें ॥२९॥
सांगद[4] सखड्ग तो कपि- केतुशरश्छिन्न वीरभुज गमला ॥
सहसा खगपति-खंडित- भोग[5] तदाननविमुक्त भुजग मला ३०
सोडुन सात्यकिस ह्मणे कौरव रे पांडुपुत्र कपिकेतो ॥
धर्म कृपादिगुरुकथित हा कीं अन्योक्त जीर्ण[6] न पिके[7] तो ॥
यादवसहवासें तूं झालासि तसाचि कर्म हें स्वमतें ॥
तुजला नसेल सुचलें रुचलें बहुधा कुकार्य कृष्णमतें ॥ ३२ ॥
अन्यासीं रण करितां माझा भुज खंडिला कसा सहसा ॥
धर्मासि काय कथिसिल शास्त्रें बुडवूनि गुरुयशासह सा[8]॥३३॥

१ हे कालिदेवी. २ भूरिश्रव्यातें. ३ राजे. ४ बाहुभूषणसहित. ५ सर्पाचें शरीर. ६ जुना. ७ फळ देणारा नाहीं. ८ सहा.

जें श्रितरक्षण-दक्ष प्रभुसखनर वीरकर्म निंदी तें ॥
जननीतितें भजे सुर- वल्लीतें त्यजुनि जेंवि सिंदीतें ॥ ३४ ॥
पार्थ ह्मणे कौरव्या वृद्धपणीं स्पष्ट बुद्धि मंदावे ॥
कुळजांहीं जीर्ण-पुरुष ते पुण्ययशोर्थ मात्र वंदावे ॥ ३५ ॥
भगवन्मतासि भगवन्- मतनिष्ठा मजहि लाविसी बोल ॥
जो लक्षसुज्ञमान्य श्रित¹-रक्षण-धर्म मानिशी फोल ॥ ३६ ॥
माझा साक्षाद्दाक्षिण- भुज सात्यकि हा कसा न रक्षावा ॥
समरीं सहाय जो जन तो प्राणाहूनि अधिक लक्षावा ॥३७॥
त्वां आत्मा निंदावा कीं जो असमर्थ भुजहि राखाया ॥
योग्य श्रिता-वनाक्षम² कीं परमाऽसाध्य-रुज³ हिरा खाया ३८
स्वभुजावन जड ज्याला श्रितरक्षण काय तो करिल काचा ॥
तो धन्य जया आश्रित उत्संगावरिल काय तोकाचा⁴ ॥३९॥
कौरव्य न दे उत्तर जाणों पार्थोक्ति नायके कांहीं ॥
त्याचा नरोक्तिंहीं⁵ मद सर्पाचा जेंवि जाय केकांहीं ॥ ४० ॥
करुनि शरासन⁶ मग तो होय प्रायोपविष्ट मौन धरी ॥
योगबळें विधिलोका- प्रति जाया उपनिषद्विचार करी ॥४१॥
कुरुनीं केली कृष्णा- ऽर्जुननिंदा फार न कथवे गा ती ॥
ज्यांला देवर्षींचे कामाद्यरिमीनबक⁷ थवे गाती ॥ ४२ ॥
लेश विषाद न दे कुरु- कृतनिंदासारवर्ष वीरा⁸ या ॥

१ आश्रितसरक्षणधर्म. २ आश्रिताचें रक्षण करण्याविषयीं असमर्थ. ३ रोग. ४ बाळाचा. ५ अर्जुनाच्या भाषणांनीं. ६ बाणांचें आसन ७ काम-आदिअरि-मीन-बक. ८ अर्जुनास.

त्या भूरिदक्षिणासहि न कुरुकृतस्तवन हर्षवी राया ॥ ४३ ॥
पार्थ ह्मणे कौरव्या जें मद्यश लेशही नसे मळलें ॥
सर्वांसि विदित असतां तुज एकासचि कसें नसे कळलें॥४४॥
जो माझ्या शरैविषयीं असतां प्रबलहि धरील हननाशा ॥
न शकावाच कधीं तो शत्रु कराया मदीय-जन-नाशा ॥४५॥
खड्गें सात्यकि-मस्तक- खंडन करितां तुझा भुज-च्छेद ॥
हा जरि अधर्म ह्मणतां या कर्मं बहुत पावतां खेद ॥ ४६ ॥
विरथ विशस्त्र सुभद्रा-सुत तुमचें धर्मतोक सामान्य ॥
केला तुह्मीं तशाचा वध कीं हो धर्म तो कसा मान्य ॥४७॥
ऐसें जिष्णु वदे तें ऐकुनि तो स्पर्शला शिरें महितें ॥
उडवी तयाकडे भुज वामभुजें पक्षिपति जसा अहितें॥४८॥
किमपि न वदतां प्रेमें कृष्णसख ह्मणे तया अगाधाला ॥
पाहुनि तुला मदात्मा ऐसा न सुराश्रया अगां धालां ॥४९॥
धर्मी भीमीं नकुळीं सहदेवीं प्रीतिरीति परमा जी ॥
तीच तुझ्या ठायीं बा आहे मति तुज ह्मणे न पर माजी॥५०॥
तूं माझ्या कृष्णाच्या आज्ञेनें पुण्यलोक पाव कसा ॥
हो सुगतिपात्र शिबिसा तेजस्वी चंद्र-सूर्य-पावकसा ॥ ५१ ॥
प्रभुहि ह्मणे कौरव्या घे देतों सुवर वरदंवर गा मी ॥
साधो वैकुंठाप्रति जा हो मत्तुल्य पक्षिवरगामी ॥ ५२ ॥

१. बाणाच्या प्रदेशांत. २गंभीराला. ३ मेरुपर्वताला. ४तृप्त झाला. ५ वरदश्रेष्ठ. ६ माझ्यासारिखा. ७ गरुडावर बसून फिरणारा.

साधु ह्मणति हा घनसा दाता सततांऽग्निहोत्र-याजी या ॥
निजलोकीं अवलोकुनि चतुराननही ह्मणेल या जी या ॥५३
इतुक्यांत सांसि सात्यकि धांवे कापावया शिर तयाचें ॥
ब्रह्मीं गुरुप्रसादें न पुन्हा तापावयासि रत याचें ॥ ५४ ॥
वारी कृष्ण धनंजय भीम तरी क्रूर तो तयास वधी ॥
सात्यकिधी त्या वीरीं तैशी वृत्रीं जसीच वासवधी ॥ ५५ ॥
वारित होते कर्ण द्रौणि जयद्रथ कृपादि हाकांहीं ॥
परि तो त्यजिता झाला न शलाग्रज-वध-दुराग्रहा कांहीं ५६॥
जरि सर्व ह्मणत होते रे युयुधाना नको नको परतें ॥
हरिलेंचि भूरिदक्षिण- शिर वारण ऐकिलें न कोपरतें ॥५७॥
सात्यकि विश्वमुखें त्या कर्मकलंकें उदंड निंदुनि घे ॥
संकोचांतुनि बाहिर बहुधा तें पासुनीच इंदु निघे ॥ ५८ ॥
जो सात्यकिहत यूथप हरिसा अत्युग्र पूर्ण उत्साहें ॥
कुरुवीरांसि ह्मणे विष पीतां करितां मदीय कुत्सा हें ॥५९॥
धर्म-कथा धार्मिकसे कथितां न विचारितांहि अन्याया ॥
न वधावा न वधावा ह्मणतां आपण करूनि अन्याया ॥६०॥
जेव्हां केलें विरथ-वि- शस्त्र-सुभद्रा-कुमार-वध-कर्म ॥
तेव्हां गेला होता सोडुनि कोठें तुह्मांसि हा धर्म ॥ ६१ ॥

---

१ निरंतर अग्निहोत्रहवन कर्ता. २ खड्गासह. ३ वृत्रासुराविषयीं. ४ इंद्रबुद्धि. ५ भूरिश्रव्याच्या वधरूप दुराग्रहास. ६ हे सात्यके. ७ निवारण. ८ रागीट अशानें. ९ गजपति.

जो मज पाडुनि समरीं हाणुनि माझ्या उरांत लात अरी ॥
तन्मथन मत्प्रतिज्ञा ती म्यां केली वधूनि यासि खरी ॥६२॥
जें कर्म अमित्राला पीडाकर होय सर्व तें कार्य ॥
रामायणांत वदला ह्मणती कवि आद्य[1] ज्यासि तो आर्य॥६३॥
ऐसें सात्यकि बोले उत्तर इकडील कर्णही न करी ॥
वाटे झाले परिसुनि हरिगर्जित शक्तिवर्णहीन[2] करी[3] ॥ ६४ ॥
खलदुर्जय बलजलधि च्छलरहिताचार जलदसा दाता ॥
नलसम शुचि शलपूर्वज हलभृदनुजलोक[4] पावला ताता॥६५॥
शिनिनें स्वयंवरीं जें श्रीवसुदेवार्थ देवकी हरिली.
तें बहुत सोमदत्तें आत्मपरिभवव्यथा मनीं धरिली ॥ ६६ ॥
बहु वीरमंडळीं यश जिंकुनियां युद्ध-सत्वरा शिनि घे ॥
श्रीरुद्रासि शरण तो विजयार्थी शुद्धसत्वराशि निघे ॥६७॥
त्रिचकूं न देचि इतरां दात्यांपरि जो दयालु देव रद ॥
तो आशुतोष दर्शन देउनि वद वर असें वदे वरद ॥ ६८ ॥
तो सोमदत्त नमुनी स्तवुनि प्रेमें परोपरि भवातें ॥
मागे शिनिपुत्राच्या मत्पुत्र रणीं करो परिभवातें ॥ ६९॥
मत्सुत-करें वरावें वरिलें जें काय हो यश शिनिकरें ॥
नासे तव प्रसादें ताप न नाहींच होय शशि-निकरें[7] ॥ ७० ॥
प्रभु एवमस्तु ऐसें[8] बोलुनि दे प्रार्थिला वर प्रणता ॥
हें किति देता जरि तो बल कालपराभवार्थ द्या ह्मणता७१

१ वाल्मिकि. २ शक्ति-वर्ण-हीन. ३ हस्ती. ४ विष्णुलोक. ५ हे धृतराष्ट्र. ६ सत्यक. ७ चंद्रसमूहें. ८ एवं-अस्तु-असें असो.

शिनिनें जेसा परिभव केला होता रणीं स्वतालाचा ॥
तैसाचि भूरिदक्षिण करि ईशवरें तदंगजाताचा ॥ ७२ ॥
यास्तव सात्यकि भंगे कीं जाया तदरिखेद हर पावे ॥
नातरि तयापुढें तों शत्रूचे सर्व वेद हरपावे ॥ ७३ ॥
ब्रह्मद्रव्य ज्ञानि- द्रव्य गुरुद्रव्य रक्षिति न हरिती ॥
ब्रह्मण्य सत्यवादी दीनजनीं तातसे दया करिती ॥ ७४ ॥
बहु शांत दांत दाते अविकत्थन धर्मनीतिनिष्ठ तसे ॥
सत्पुरुष तेचि यादव ज्यांपासीं जय सदैव तिष्ठतसे ॥ ७५ ॥
अजितपदाश्रित सर्वहि यादव अजितचि सुरासुरजनां कीं ॥
गाती यांसि सजुनि बहु मधुररव नवे नवे मुरज नाकीं ७६॥
त्यांसीं कैसा लावूं दिधला त्वां पुत्रवत्सला दावा ॥
काय ह्मणों वृष-दुर्वह- हस्तिभरें केविं वत्स लादावा ॥ ७७॥

---

# अध्याय १४.

अशि यूपकेतुची गति होय मग ह्मणे सिताश्व देवा हूं ॥
श्रीरुद्रचरणकमलीं शीघ्र जयद्रथशिरोब्ज दे वाहूं ॥ १ ॥
थोडा उरला वासर बा सरसिजलोचना तुरग हाकीं ॥
मारावाचि खल अनुप- कारज्ञ खराखुरा उरग हा कीं ॥ २॥

---

१ तत्पुत्राचा. २ निंदापरस्तुती न करणारे. ३ मृदंग. ४ भूरिश्रवा. ५ जयद्रथाचें शिरःकमळ. ६ सर्प.

बा कैंव्हांही झालें यामागें जें मुधा न दासाचें ॥
तें आजहि प्रतिज्ञा- वच होचि दयासुधानदा साचें ॥ ३ ॥
तो भक्तवत्सल प्रभु तीं पार्थाची मनांत मात लिही ॥
रथ चालवी त्वरित तें पाहुनि लाजे मनांत मातलिही[2] ॥ ४ ॥
कुरुवीर धांवले बहु येतां नररथ जयद्रथा जवळ ॥
कुरुपति कर्णासि ह्मणे न परमुखीं सिंधुराज[3] हो कवळ ॥५॥
प्रकट करीं बळ चिंतित होतों बहु दिवस या समरसमया ॥
सुकवि ह्मणोत महाद्भुत सावा नाहींच यांसम[4] रस मया ॥६ ॥
हा पण कीं अस्तासि न रवि जातां सिंधुराज मारावा ॥
अल्पावशिष्ट वासर वेंचे तों मात्र पार्थ वारावा ॥ ७ ॥
जातां वृथा प्रतिज्ञा पावेल श्वेतवाह विलयाला ॥
ज्वलनीं शिरतां सत्य- त्राणा कावे कोण राहविल याला॥८॥
होतील बंधु शोकें धर्म पवनपुत्र[6] बुद्धिबळहीन ॥
जलहीन मीनसे ते चवघेही वांचतील पळही न ॥ ९ ॥
पावेल हरिहि तापा- पासुनि बहु जेविं आज्यप[7] दराला ॥
एवं सुखेंचि येइल निष्कंटक सर्व राज्य पदराला ॥ १० ॥
शल्य कृप द्रौणि सहित करिशिल तूं स्पष्ट रत्नसानुजया[9] ॥
सेना तव साहित्या योजिन मी करुनि यत्न सांनुज[10] या ११
कर्ण ह्मणे कुरुराजा मज गमला भीम अहिमकरसाच[11] ॥

---

१ खोटें. २ इंद्रसारथिही. ३ जयद्रथ. ४ या युद्धरसासारिखा. ५ मयासुरास. ६ भीम. ७ उत्तम घृत अथवा लोणी. ८ भयाला. ९ मेरुजयातें. १० बंधूंसह. ११ सूर्यासारखा.

त्याचे सायक नायक उग्राचे शुद्ध आहे मकर साच ॥ १२ ॥
अमरांतेंही मर्म च्छेदुनि ह्मणतील करुनि आ वांका ॥
बहु विकळ मी असावें ह्मणुनचि आहें धरूनि आवांका॥१३
मज बळ न चालवाया निजकर पाद-क्षताऽकुला लेश ॥
भीमा मी दाखविता विधिस जसा दक्षता कुलालेश ॥ १४ ॥
परि समयीं न चुकावें ह्मणुनि यथाशक्ति करिल संगर हा ॥
दैवीं जय प्रतिष्ठित आहे तूं धरुनि धैर्यसंग रहा ॥ १५ ॥
मी युद्ध करित असतां संजय न धनंजयासि गांवेल ॥
अभिमुख वात वहातां तरुला व्यापील काय गा वेल ॥१६॥
ऐसें जों कुरुपतिसीं उत्साह बळें धरूनि कर्ण वदे ॥
नर शर-जालें मथित्यां बहु गरळें जेविं ताप अर्णव दे ॥१७॥
छेदी पार्थ तडातड द्विरदांचे कुरुबळीं शिरोनि कर ॥
झांकी क्षितिला विखरुनि वीर धनुर्बाणभुजशिरो-निकर १८
किंबहुना बहु शोणित- पूरीं योधबळ वाहवी राया ॥
तेव्हां सुरर्षि वदले सद्यश यो धर्वलवाहवीरा या ॥ १९ ॥
कुरुकटक जलदपटलचि शिरतां अर्जुनसमीर वितुळे तें ॥
त नृप रक्षतुळेतें पावे तो विक्रमी रवितुळेतें ॥ २० ॥
जेविं क्षम लीलेनें सर्व परमदा पिनाक साराया ॥
नरचाप तसाचि परा उग्र परम दापिना कसा राया ॥ २१॥

---

१ अवसान. २ कुशलता. ३ श्रेष्ठ कुंभार. ४ हा मी, कर्ण. ५ सांपडेल. ६ शुंडादंड. ७ समूह. ८ अर्जुनवीराला. ९ राक्षसतुळेतें. १० शिवचाप.

दुर्योधन दुःशासन कर्ण कृप द्रौणि शल्य हे मानी ॥
पार्थी वहुशस्त्रांनीं वर्षति पात्रीं जसेंचि हेमानीं ॥ २२ ॥
विजयासि बाण हाणिति ते सर्वहि एकदाचि कडकडुनी ॥
गमलें अमृतरसातें केली जिकावया निकड कडुनीं ॥ २३ ॥
करिती प्रसन्न व्हाया जो सादर नारदादिभक्त पसे ॥
त्या प्रभुच्याही मर्मीं हाणिति शर दशमुखादि रक्षपसे ॥२४॥
परशरशतें त्यजि न धृति विजय सुयति जेविं अंतरायशतें ॥
रामयशासीं तुळितां न धरी तिळमात्र अंतरा यश तें ॥२५॥
दुर्योधन दुःशासन शल्य कृप द्रौणि भंगतां क्रुद्ध ॥
कर्ण पुढें होय करी अत्यद्भुत शक्रसूनुसीं युद्ध ॥ २६ ॥
सात्यकिचे भीमाचे पावुनि वित्रास होय होत रणीं ॥
ह्मणती वाटे झाला प्रियसुतमित्रा सहाय हा तरणी ॥ २७ ॥
पार्थ न साहे जें वृष कृष्णीं क्षत करुनि होय अधिक रणीं ॥
वेदांती परविरचित दूषण पांडित्य जेविं अधिकरणीं ॥२८॥
शरजाला-सह सहसा पाडी तोडूनि पार्थ तो धनुतें ॥
तों सज्य दुजें केलें निमिषार्धें त्या समस्त-योध-नुतें ॥ २९ ॥
कर्णें शरवृष्टि पुन्हा केली तिस विसकटूनि माराया ॥
पविसम सायक सोडी रचितनिर्लिंपार्थ पार्थ वाराया ॥ ३० ॥
जों हांसत पार्थ ह्मणे अर्पुनि बाणांस अंग पावन हो ॥

---

१ सत्पात्रीं, ब्राह्मणीं. २ विषांनीं. ३ राक्षससे. ४ विशेष त्रास. ५ भेदा. ६ विघ्नशतें. ७ सिद्धांतप्रतिपादनांत. ८ संपादित आहे देवांचा कार्यार्थ जेणें असा.

छेदुनि दुर्वार शर द्रौणि करी क्षिप्र अंगपावन हो ॥ ३१ ॥
केला पार्थ वृषें वृष पार्थें शतदा शरीं दिसेनासा ॥
साध्वस न धरिति जाणों साग्रा दोघांसही दिसे नासा॥३२॥
तों स्वभटांसि नृप ह्मणे वृष विजया न वधितां न परतेल ॥
साहित्य करा दीपचि हारि तम त्या पाहिजेच पँर तेल ३३
मग नँगभित्सुत मारुनि हँरि सारथि कर्णकीर्तिला मळवी ॥
त्यातें अश्वत्थामा सत्वर वाहोनि निजरथीं पळवी ॥ ३४ ॥
गुरुसुत कृप मद्रप वृष- सेन झटति पार्थशर सहात रणीं ॥
इच्छिति सर्व असें कीं अस्तंगत होउ शीघ्र हा तरणी ३५
सिंधुपतीच्या जाऊं नच द्यावा पार्थ हा निकट कांहीं ॥
तुमच्या असाचि निश्चय केला साहोनि हानि कटकांहीं ३६
बहु वर्षतां परांस न नर मानी जेविं न नग मेघांस ॥
भासे धनंजय धनं- जँयचि सकळ शत्रुजन गमे घांसँ ॥३७॥
गमलें आंगें करितो रतिरमर्ण-क्षयकराक्ष समरा या ॥
कीं श्रीमद्रामातें वेढुनि झटतात राक्षस मराया ॥ ३८ ॥
हय-गज-भटांसि नरशर- अहि द्याया मृत्यु रोकडा डसले ॥
मग हृदयीं हरिरवसा कुरुपमनीं फार तो कडाड सले ॥३९॥
गरुडें गांठावा हरि गरुँदनिलें जेविं जलधि उडवूनी ॥
बा गांठिला जयद्रथ तेविं नरें बहुत सैन्य बुडवूनी ॥ ४० ॥
कपिवरि एक हयावरिं वँसु हँरिवरि तीन अर्जुनावरि सा ॥

---

१.कर्णरक्षण. २ भय. ३ परंतु ४ अर्जुन. ५ अश्व. ६ अग्निच. ७ गवत. ८ शिव. ९ पक्षवातानें. १० आठ. ११ कृष्णावर.

शर योजी सैंधव विग- तायु शरभहंतुकाम तो हरिसा॥४१॥
ते छेदुनि पार्थें क्षत- तनु केला बाण साठ सोडूनी ॥
तत्काळ पाडिले शर- युग्में तत्सूतकेतु तोडूनी ॥ ४२ ॥
तों प्रभु ह्मणे सख्या हा व्याघ्रीच्या जेविं सार थानींचा ॥
वधिसिल कसा न करितां भग्न रणीं प्रथम सा रथा नीचा ४३
तुज थोड्या तरि व्हाया जिंकाया सा रथांसि सा घटिका॥
थोडा उरला वासर सन्मान्या पण तुझा न हो लटिका॥४४॥
सैंधव आजि कसातरि तुजकरवीं पाहिजेच मारविला ॥
यास्तव मी योगें तम निर्मुनियां झांकितोंचि या रविला॥४५॥
वाटेल सैंधवासह सर्वांसहि सूर्य सत्य मावळला ॥
चुकला मुकला अर्जुन भलतें शोकज्वरांत चावळला ॥४६ ॥
चुकलें मरण ह्मणुनि बहु हर्षेल न आपणास रक्षील ॥
हांसेल ह्मणेल भलें झालें पार्थासि वन्हि भक्षील ॥ ४७ ॥
त्या रंध्रींच अधम-शिर उडवीं शंका धरूं नको कांहीं ॥
करितांचि शोक विरह- ज्वरभर चित्तीं धरून कोकांहीं४८॥
पार्थ अवश्य ह्मणे प्रभु झांकी निर्मुनि महा तमा रवितें ॥
अरिस नरकुंजरीं हरि- तेजचि होउनि महांत मारवितें॥४९॥
करुनि तमें तरणीतें पुरवाया श्रित-मनोरथा पिहित ॥
यद्यपि दुर्घट होतें प्रभु लीलेनें करी तथापि हित ॥ ५० ॥
बहु जोडिलें सुयशधन ऐसा हा भरुनि हाट कपटाचा ॥

---

१ जयद्रथ. २ सिंहसा. ३ चक्रवाक पक्ष्यांनीं. ४ आच्छादित. ५ बाजार.

महिमा सहस्रवदना- हि न वदवे दिव्यहाटकपटाचा[1] ॥ ५१ ॥
तरणि न दिसतां लावी सकळ कटक तोहि दृष्टि गगनींच ॥
त्या आपणाहुनि बहुत हर्षभरें होय मेरुनग नीच ॥ ५२ ॥
देव ह्मणे सिततुरगा[2] देखतसे सिंधुपाल तो खांत[3] ॥
तन्मस्तक खंडुनि मज बा लक्ष्मणसाचि घाल तोखांत[4] ॥५३॥
प्राप्तस्मरहरवर नर खरतर शरवृष्टि करुनि कुरुसैन्य ॥
मारी सुदूर सारी चापबळें अचळकुळ जसें वैन्य[5] ॥ ५४ ॥
आनाभि[6] बुडति चक्रें ऐसें क्षितिवरि पळांत पळ[7] सांचे ॥
वाटे खुरें विखुरले रणरंगीं पुष्पराशि पळसांचे ॥ ५५ ॥
शौरिसख[8] करी सहसा द्रौणि कृपाचार्य गाढ विद्ध रणीं ॥
बहु कांपवी पतद्गज-[10] वृंदभरें पार्थ गाढविद्ध[9] रणीं ॥ ५६ ॥
वृषवृषसेनधनुष्यें खंडी भ्रमवी सुयोधनमनातें ॥
मद्रपसूतासि वधी कारिति भयें बहु सुयोध नमनातें ॥ ५७ ॥
शरवर्षें रथरक्षक सकळ विकळ करुनि पळविले वधिले ॥
कार्यार्थ सुचों न दिले त्या वध्य-जयद्रथा मनामधिले ॥५८॥
मग घे शर जो होता अर्चित[11] दुःसह अरीस भात्यांत ॥
वज्रास्त्रें मंत्रुनि बहु आणी पहिल्यापरीस भा त्यांत ॥ ५९ ॥
देव ह्मणे ऐक अशी झाली हा जन्मतां नभोवाणी[12] ॥

---

१ सुवर्णापरी पीतपट ज्याचा असा जो कृष्ण त्याचा. २ हे अर्जुना. ३ आकाशांत. ४ हर्षांत. ५ पृथुराजा. ६ नाभिपर्यंत ७ मांस. ८ अर्जुन. ९ दृढ. १० पतन पावणारा हत्तींचा समूह, त्याच्या भारें. ११ अगाध ज्ञान. १२ आकाशवाणी.

हें सुत-रत्न निजकुळा वृद्धिप्रद जेविं वारिजा[1] पाणी ॥६० ॥
होईल शूर मानी बहु संपत्ति प्रसिद्ध जोडील ॥
परि समरांत अलक्षित[2] अरि याच्या मस्तकासि तोडील ६१॥
सुतशोक जसा न तसा दुःसह संताप भो सखे दव[3] दे ॥
याचा पिता बृहद्रथ ऐसें होऊनि तो सखेद वदे ॥ ६२ ॥
क्षितिवरि जयद्रथाचें पाडिल मस्तकसरोज जो जन हो[4] ॥
शतधा त्याचेंहि फुटो मस्तक तो श्वापदांसि भोजन हो ६३
जपतो तपतो तप तो कीं निजवाचा कधीं न हो वंध्या ॥
संप्रति[5] स्यमंतपंचक देशाबाहेर करितसे संध्या ॥ ६४ ॥
याचें[6] मस्तक याच्या जनकोत्संगीं[7] हळूच पाडावें ॥
कंदुकसें[8] गगनपथीं वरिचेवरि शरकरेंचि ताडावें ॥ ६५ ॥
अर्जुन ह्मणे बहु बरें गांडीव-गुणीं सुबाण तो जोडी ॥
सोडी सणणणणणणण वध्य-जयद्रथ-शिरोंबु-रुह तोडी ६६॥
नेलें करें कमळसें शरनिकरें सांवरूनियां शिर तें ॥
अंकींच उतारिलें वा हिताचि अहित दैव जेधवां फिरतें ॥६७॥
बैसोनि करित होता जप तुमचा स्वस्थचित्त तो व्याही ॥
प्रभुयश किति वर्णिल कवि करु आर्या लक्षकोटि ओव्याही६८
अंकीं काय गुरु असें ह्मणुनि पहावें परंतु मन भुललें ॥
उठतां जप करुनि पडे क्षितिवरि सुतशीर्ष तच्छिरहि उललें ६९
प्रभुनें यापरि तुमचा जांवाई आणि खपविला व्याही ॥

१ कमलास. २ अवचित. ( न पहातां ). ३ वणवा. ४ होवो.
५ आतां. ६ जयद्रथाचें. ७ बापाच्या मांडीवर. ८ चेंडूसारखें.

भगवत्क्षोभें नव[1]कुश शमविल गरुडाहि न पवि [2]लाव्याही ७०
ब्रह्मादि सर्व भूतें तें पाहुनि अतुलविस्मया वरिती ॥
करिती बहु नर [3]हरि-नुति तद्ध्यानचि भक्त दृढ मनीं धरिती॥
अक्षौहिणी खपविल्या या युद्धीं श्वेतवाहनें आठ ॥
[4]कार्मुकवेद हरिहर स्तवराजाहि [5]राजया [6]जया पाठ ॥ ७२ ॥
मग जगदीश सुहृत्तम पुरुषोत्तम त्या तमासि आटोपी ॥
हा टोपी घालिल जल- निधिसहि मशका म्हणेल आटो पी ॥
दि[7]नमणि दिसतां देव- क्यात्[8]मजमाया असें दयां उमजे ॥
कपटें जिंकोनि करित होते वृद्धांसम[9]क्षेंही [10]धुंम जे ॥ ७४ ॥
केलें तव तनयांनीं पाहुनि सैंधव [11]परासु रोदन हो ॥
भ्रमद कविमतें स्नेहचि ऐसा सेवनपरा [12]सुरोद न हो[13] ॥७५॥
श्रीकृष्णें प्रथम मग श्वेताश्वें शंखराज वाजविला ॥
भीमाच्या सिंहरवें कल्पांत[14]-पयोद-नाद लाजविला ॥ ७६ ॥
त्या नादें धर्माला विजयें अरि मर्दिला असें कळलें ॥
टळलें दुस्तर संकट कृष्णपदध्यान जयफळें फळलें ॥ ७७ ॥
होऊनि जयोन्मत्त द्रोणासि न वचकतीच भट कांहीं ॥
हर्षें बहुविध वाद्यें वाजविलीं धर्मराज-कटकांहीं ॥ ७८ ॥
गुरु मारावाचि म्हणति पांचाळप्रमुख सकळ वीरमणी ॥

---

१ कोमलदर्भ. २ लावापक्ष्यासही. ३ कृष्णाची स्तुती. ४ धनुर्वेद. ५ हे धृतराष्ट्रा ६ अर्जुनास. ७ सूर्य. ८ कृष्णमाया. ९ भीष्मादिकांसमक्ष. १० धुंदाई. ११ गतप्राण. १२ मद्यसागर. १३ होवो. १४ प्रलयकालच्या मेघाचा नाद.

उत्साह-शक्ति योधा श्रम भर्त्या जेविं न कळवी रमणी७९॥
अस्तातें रवि जातां जगदेकयथार्थसंध सितवाजी ॥
निज-विजयश्रीस हरी सांपडली पथ चुकोनि कितवा जी८०

# अध्याय १५.

बहु शर वर्षति कृपगुरु- सुत घालुनि शक्रसूनुला मध्यें ॥
ज्याच्या धनुला झालीं दैत्यांचीं उद्धतें बळें वध्यें ॥ १ ॥
चित्तीं पार्थ ह्मणे कृप गुरु गुरु-सुत हाहि गुरु असामान्य ॥
निष्ठुर कैसें व्हावें द्रोणेतर जन नसे असा मान्य ॥ २ ॥
शर मंदवेग तो गुरु- वत्सल रक्षावया स्वयश हाणी ॥
परि तन्मति गडबडली स्त्री बहु कार्यांत जेविं न शहाणी३॥
त्या विप्रयुगीं न पडति जन्हि पार्थ-प्रहित मंद रोप रिते ॥
गाववित अमृतरुचि शुचि गुणवश यश मेरुमंदरोपरि ते॥४॥
पार्थशरार्त कृप कृपण- सम समयज्ञहि करून आ रडला ॥
पडला मूर्च्छित जैसा बहु बाल व्यालदष्ट आरडला ॥ ५ ॥
वाटेल तत्तनुपुढें बहु कांटे काय काढिले पणसें ॥
आलें कृपासि पन्नग- पाशीं रघुनायका ढिलेपणसें ॥ ६ ॥
मेलाचि असें मानुनि सूतें रथ तूर्ण काढिला मागें ॥

१ जगतामध्यें एक सत्यप्रतिज्ञ. २ कृप, अश्वत्थामा यांचे ठायीं. ३ बाण. ४ विफल. ५ सर्पदंशित. ६ फणसनामक फळानें.

केला गुरु शोक प्रभु- पाशीं त्या अर्जुनें महाभागें[1] ॥ ७ ॥
गुरु माय बाप ईश्वर तरले गुरुचीच धरुनि नर कास ॥
मजसम मीच कृतघ्न प्रभुजी पावेन मरुनि नरकास ॥ ८ ॥
स्मरतां कृप-गुरु घालिल मज बहु अभिमन्युपरिस शोकांत ॥
ज्याला गुरुचा वध मत[2] अधमतम असा नसेल लोकांत ॥ ९ ॥
करितां विलाप दाटे बाष्पाच्या[3] पार्थकंठ वेगानें ॥
कीं गुरुशोकीं सुजना स्वर्गींहि न काल कंठवे[4] गानें ॥ १० ॥
तोंचि जयद्रथ-मथन- व्यथित-हृदय कर्ण धांवला कोपें ॥
सात्यकि होय पुढें हो पार्थ ह्मणे यास हें नव्हे सोपें ॥ ११ ॥
रथ चालिव वालिवधा- द्यतुलयशा[5] यादवास[6] राखावें ॥
सुरभी ह्मणेल काय व्याघ्रें स्वसमक्ष वांसरा[7] खावें ॥ १२ ॥
देव ह्मणे वत्स गमे प्रेमें परि हा निका महर्षभ[8] रे ॥
समयीं गुरु-भक्त-मनीं दुर्धर-अरि-हानि-काम हर्ष भरे ॥ १३ ॥
एकचि सात्यकि आहे कर्णाच्या परिभवास पर्याप्त[9] ॥
करिती साहित्य तुझें चक्रत्रातेहि वीरवर्याप्त[10] ॥ १४ ॥
घालिन गांठि करूं दे आधीं हरिदत्तशक्तिचा[11] वेचं[12] ॥
व्याघ्री नागी कृत्या तशि अरिला शक्रशक्ति चावेच ॥ १५ ॥
शक्ति दिली देऊं[13] दे न सुतवधें अयश अर्जु नाकेश[14] ॥

१ मोठा भाग्यवान अशा. २ मान्य. ३ अश्रूंच्या. ४ क्रमवे. ५ वालिवधादिक अनुपम यश मिळविलेल्या (कृष्णा). ६ सात्यकीस. ७ वत्सातें. ८ मोठा बैल, ९ पुरेसा. १० वीरश्रेष्ठ असे सुहृद्. ११ इंद्रदत्तशक्तीचा. १२ खर्च. १३ संपादू १४ इंद्र.

सर्वस्व वुडो न तुझा एकहि हो वक्र अर्जुना केश ॥ १६ ॥
स्वच्छगुणा तूं ठाउक असती सुरनायका पुरारीस[1] ॥
प्राकृत जाणेल कसा बा जाणे काय कापुरा रीसं[2] ॥ १७ ॥
वालिन गांठि वृषासीं त्याच्या येतांचि समय मरणाचा ॥
मग चिंता कां घेइल पथकर जरि दाससम यमरणाचा॥१८॥
सात्यकिला विरथ करिल यूपध्वज[3] हें भविष्य जाणोनी ॥
प्रभु कल्पविला दे निज रथ दूरिल दररवेंचि आणोनी १९॥
त्या अजितरथीं सात्यकि शक्ररथीं रामभद्रसा[5] वेवे ॥
कर्णाभवते बहु उर- गाभवते जेविं गरुड कावे[6] वे ॥ २० ॥
रक्तें न्हाले झाले योग्य सखे पुष्पितां[7] पलाशनगा ॥
गंधर्व ह्मणति एका रावव एका ह्मणा पलाशन[8] गा ॥ २१ ॥
वृपसात्यकिरणसमयीं प्रेक्षकनिकरीं न देहभान वसे ॥
दानवसेनापतिसे गमले कीं देवसे न मानवसे ॥ २२ ॥
विरथ करूनि पळोंदे वृष न करी नैकवाणविद्धांत[9] ॥
मुख्य धनुर्धर कृष्णा- र्जुन सात्यकि हाचि होय सिद्धांत२३
भीमाऽर्जुनभाग ह्मणुनि तव-सुत[10] राधेय मारिले नाहीं ॥
लीलेनेंचि निवटिता दुर्घट नव्हतेंचि माधवा कांहीं ॥ २४ ॥
भूपरथीं जाउनि वृष सोडी अत्युष्ण दीर्घ सुसकारे ॥

---

१ सदाशिवास. २ आस्वल. ३ कर्ण. ४ सिद्ध करविलेला. ५ रामचंद्रासारिखा. ६ चेढे. ७ प्रफुल्लित अशा पळसाच्या झाडास. ८ मांसभक्षक- राक्षस. ९ अनेक बाणांनीं विद्ध जो त्याचा अंत. १० तुझा पुत्र. ११ सात्यकीला.

हलाचि ह्मणे हा दैवा कां केला तपनसुतहि फुंसका रे २५
कृतवर्मा गुरुनंदन इतर महारथहि भांडलें सर्व ॥
परि एकेंचि धनुष्यें त्यांचा साराहि सारिला गर्व ॥ २६ ॥
सात्यकि कुरुकटकाचा पवन घनाचा तसा करि भणाण ॥
पुसतां कसें श्रुत असे आपणचि कृपा पुढें तरि ह्मणा णं २७
तों दारुकानुजानें सिद्ध करुनि आणिला सुरथ राजा ॥
प्रभुनें तो केला त्या योग्य न शक्रादिही सुर थंरा ज्या २८
माधव चढे नवरथीं आज्ञा दे दारुकास मातलिला ॥
जेविं श्रीराम मथुनि खचरचमूला उदंड मातलिला ॥ २९ ॥
सात्यक्यवनयशाचा पांघुरवी देव दारुका शेला ॥
प्रभु कार्वि न तारी जड- ही लावुनि देवंदारु कासेला ॥३० ॥
तैसाचि कर्णहि चढ विधिवत्कल्पित-रथीं विमान-समीं ॥
झाले विमनस्क सकल तत्वज्ञहि जाहलों विमानस मी ॥३१॥
भीमें वधिले दुर्मुख- मुख तव सुत एकतीस त्र्यां कथिले ॥
भगदत्त-भीष्ममुख बहु- शत विजयें सात्वतें रणीं मथिले ३२
या बहुलक्षजनाला बा हेतु तुझाचि अपनय मराया ॥
बहु काम कोप लोभचि खर न प्रळयाग्नि तपन यम राया ३३॥
अनुजा ला भीम ह्मणे विरथ करुनि गांजिलें मला कर्णें ॥
तें त्र्यांचि साहिलें बा आइकता नच दुजा भला कर्णें ॥३४॥
तूबरका औदरिका मूढा संग्रामकातरा बाळा ॥

---

१ अशक्त. २ कृपा पुढें ण ह्मणजे कृपाण असें ह्मणा. ३ ज्या स्थितीस. ४ काष्ठविशेष. ५ सात्यकीनें. ६ दुर्नीति

ऐसें पुनःपुन्हा मज वृष[1] वदला अर्जुना असत्काला ॥ ३५ ॥
ऐसें ह्मणेल त्यातें मारावें तत्क्षणीं न सोसावें ॥
हें त्वांचि मत्प्रतिज्ञा-वच दीनापत्यसेंचि[2] पोसावें ॥ ३६ ॥
जसि आपली तरि बुडों दे बुध पंकांत गाय न पराची ॥
गानपटुसखा समयीं सांवरितो तान गायनपराची ॥ ३७ ॥
नेला वृषाकडे रथ कथितां अवमान हा निज गदीशें[3] ॥
सोसावी स्वजनाची कैशी नव मानहानि जगदीशें ॥ ३८ ॥
पार्थ ह्मणे ऐक वृषा जय अपजय वासवींहि आढळला ॥
नहुष महाराज मदें इंद्रपदाहुनि न काय गा ढळला ॥ ३९ ॥
आतांच कीं न वधितां सात्यकिनें सोडिलाचि हा नीचा ॥
सत्वर पावसिल फळा केल्या सत्कुलज-मान-हानीच्या॥४०॥
बहुदा विरथ करुनि तुज भीम न कांहींच बोलिला खोटें ॥
जो टेंक धरुनि भिडला ज्याचें यश वीरमंडळीं मोटें ॥ ४१ ॥
करुनि यदृच्छेनें[4] त्या आर्यातें[5] एकदा विरथ अकुळा[6] ॥
उपहासिलें कसें त्वां हांसावें काय बब्बुलें[7] वकुळा ॥ ४२ ॥
वधिला सौभद्र तुह्मीं बहुतांहीं मत्तकरिसमानाहीं ॥
कर्म सुदुर्जरें खर- गररसपानाहिपरिस माना हीं ॥ ४३ ॥
केलें जेणें वैरी व्याघ्रें विपिनीं विशाळ वृपसे न ॥
तो अभिमन्यु जसा प्रिय मज तुज जो प्रिय तसाचि वृपसेन[8]

१ दुष्टाच्या काळा. २ दीन-अपत्य-निराश्रित मूलसें. ३ गदी-ईश-भीमानें. ४ सहज, दैववशात. ५ भीमातें. ६ हे कुलहीना. ७ बाभळीनें. ८ नामविशेष ( कर्णपुत्र. )

कथितों यथार्थ करितों शपथ स्पर्शोनि आयुधा त्यातें ॥
वधिन तुजपुढें दुर्मिळ यश देतां नवाहि आयु धात्यातें ॥४५॥
आधीं सुतशोकास्य प्रेक्षीं मग दूर काय कालास्य ॥
करितील शिवा चुंबुनि तुजभवत्या जेविं बायका लास्य ४६
उरकुनि घे कार्य उचित ठेवाया न वृषसेनजनकीं जें ॥
आमरण कष्ट न सुटति वहु परवश न वृषसे न जन कीं जें ४७
प्रकटे महाप्रतिज्ञा सर्वत्रहि कुरुबळांत झटकरि ती ॥
भट करिती हा हा कीं न करिल तिस देवदैत्य-कटक रिती ४८
रवि मावळला वाटे गेला देशांतरीं धरुनि शोक ॥
कोक वरडति न रडतिल तेजस्व्याश्रयलयीं कवण लोक ४९
जें सुख सुखमूर्ति वरी देउनि विजयासि सुपरिरंभातें ॥
नच वरिती शतवत्सर शुक वश झाल्याहि उपरि रंभा तें ॥
भगवान् ह्मणे प्रिय-सख्या जीतें तरलासि तूं प्रतिज्ञा ती ॥
इतराला न तरवती झाले गतगर्व संप्रति ज्ञाती ॥ ५१ ॥
मोठीं मोठींहि बळें लवतिल तुजला न कां बळेशाला ॥
जरि लांब रुंद बळकट होतिल सम काय कांबळे शाला ५२
मज तो तसा दिसेना जो एकाकी धसेल या कटकीं ॥
त्वत्तुल्य त्वदधिकही बहु मेळविले सुयोधनें भट कीं ॥ ५३ ॥

---

१ वृषसेनातें. २ ब्रह्मचातें. ३ कोल्ह्या. ४ नृत्य. ५ हे वृषसेनाच्या पित्या कर्णा. ६ कार्ययोगानें. ७ तेजस्वी आश्रयाच्या नाशीं. ८ उत्कृष्ट आलिंगनातें. ९ बळवंताला.

हें कर्म कराया जरि शक्राचें सैन्य एक कट करितें ॥
होतें भिडतां यासीं सर्पासीं जेंवि भेंक[1]-कटक रितें ॥ ५४ ॥
हें भुजयुग कुतुक[2] करिल अणिकहि पावेल कर्ण विलयाला ॥
भाट करुनि मज याचा जय याहुनि अधिक वर्णविल याला[3]
पार्थ ह्मणे न विसरवे पळ तव पदनीरजांप्रति[4] ज्ञात्या ॥
देवा सुफळा करितें हें करिती धीर ज्या प्रतिज्ञा त्या ॥५६॥
केला धन्य त्रिजगीं तुझिया हा वासवि[5] प्रसादानें ॥
संतानें[6] जन्म-सुदु- र्गतिचा आवास[7] विप्रसा दानें ॥ ५७ ॥
तूं ज्याचा नाथ तया जरि जय तरि काय नवल वण्याला
प्याला त्या अरिजीवन किति सागर काय नव लवण व्याला
जे त्वच्चरणाश्रित ते गरुडाचि शमन[8]- करवाल कालाहीं[9] ॥
शिर दूर वळें त्याच्या लाविल यम न कर वालकालाही[10] ५९
झाले कृतार्थ तरले अगणित या पाद-पल्लव-ध्यानें ॥
व्यर्थ फुगविले न गणुनि तुज जगदीशासि गल्ल[11] वध्यानें[12]॥६०॥
शतकोटि मिळविले जरि शतकोटिधरहि[13] सुयोध नव धरणी ॥
वरिलचि तव-प्रसादें धर्मा होइल सुयोधनवध रणीं ॥६१॥
जयहि प्रभावहि तुझा प्रेष्यां[14]- दीनास मानदा[15] मानें[16] ॥

---

१ बेडुकांचा समुदाय. २ कौतुक. ३ पार्थाला. ४ त्वत्पाद-कमल. ५ अर्जुन. ६ कल्पवृक्षानें. ७ गृह. ८ यमाचा खड्ग. ९ कृष्णसर्पही. १० केशालाही. ११ गाल. १२ वधार्ह—वधास योग्य जो त्यानें. १३ वज्रधरही. १४ दासास. १५ मान देणाऱ्या. १६ मानानें.

गौरविसि घेतलें त्वां बांधुनि दीनासमान दामानें[1] ॥ ६२ ॥
प्रभु हास्य करुनि हरुनि श्रितताप परतवी रथा राया ॥
न शकति जयापुढें खल- संगति पापरत वीर थाराया ॥६३॥
समरांजिरांत[2] हय करि नर-वर बहु-लक्ष मारिले होते ॥
जेणें त्यासि मुकुंदें दाखविले सर्व तारिले हो ते ॥ ६४ ॥
स्वकटकसमीप जाउनि जगदीशें पांचजन्य वाजविला ॥
आज विलापें राया त्वां शोक तसाचि हर्ष माजविला॥६५॥
धर्म धणी[3] ब्रह्माच्या बहु घे घालुनि उडी सुखेंवेची[4] ॥
यज्ज्ञानार्थ[5] महाजन सर्वस्वासह कुडी[6] सुखें वेंची[7] ॥ ६६ ॥
धर्में दोघे कृष्ण प्रेमें आलिंगिले जसे तातें ॥
तत्स्पर्श[8] तन्मनातें बहु सुखवी जेंवि मेघ शेतातें ॥ ६७ ॥
आनंदाश्रुपरिप्लुत होय प्रभुचें पुसी वदन पदरें ॥
जेणें रमाधराहुनि शबरीचीं मानिलीं मधुर बदरें[9] ॥ ६८ ॥
मग तें पुसिलें ज्यातें देखुनि शतदा वदे अचलकन्या[10] ॥
पाहे हें पुत्रमुख स्त्री जी सर्वस्त्रियांत ती धन्या ॥ ६९ ॥
प्रभुसि ह्मणे वधिला कीं अधम नराकार पाप रासभ[11] जो ॥
व्हाया कृतघ्न विसरुनि तुज न स्वप्नींहि हा[12] परास भजो ७०
येणेंचि सिद्धि कळली जाणति एकेंहि बायका शीतें ॥
सद्यःपरमार्थद हे पाय न लाजविति काय काशीतें ॥ ७१ ॥

---

१ दांव्यानें. २ समरांगणांत. ३ तृप्ती. ४ उत्तम आलिंगनाची. ५ ज्याच्या ज्ञानार्थ. ६ देह. ७ खर्ची. ८ त्या उभयतांचा स्पर्श. ९ बोरें. १० पार्वती. ११ गाढव. १२ हा मी.

वा बाळ मीन येतां छायेंत सुखें ह्मणेल बक राहो ॥
देइल पाय हरिशिरीं[1] होतां तुमचा प्रसाद बकरा हो ॥ ७२ ॥
स्वपदीं पांडव बसतिल करुनि अरीतें परासु वासवसे ॥
शिशु-पशुहित हा लोकीं पदपद्माचा बरा सुवास वसे ॥७३॥
शक्रहि जयद्रथातें आजि असा पण करूनि न खपविता ॥
वरिली तव दृक्पातें[2] वारितें[3] झालेंचि हेंहि नख पविता ॥७४॥
कृष्ण ह्मणे धर्मा तूं सिद्ध कपिलसाचि करुनि सुतपातें[4] ॥
क्षोभविलासि खळांनीं स्वांतार्थ प्राणतुल्यसुतपातें[5] ॥ ७५ ॥
तुझिया वधिला सैंधव बहु अपराधी ह्मणून कोपानें ॥
सत्पुरुषलंघनें मी कां गरळाचीं ह्मणूं नको पानें ॥ ७६ ॥
त्वत्क्षोभा साहेसें कैंचें सामर्थ्य सैंधवीं अल्पीं ॥
कल्पीं रविसा पडला इच्छामरणहि नदीज[6] शरतल्पीं ॥७७॥
करिल क्षोभ तुझा बा धर्मा उरल्याहि खळजना भसित[7] ॥
हें न चुकेलचि होइल जरि शिव घननीळ[8] जलजनाभ[9] सित ७८
तों नमिति भीम सात्यकि त्या दोघां जेंवि नर्मदा[10] यादां[11] ॥
प्रभुची पदयुगली दे कीं जैसी माय शर्म[12] दायादां[13] ॥ ७९ ॥
तातापरि धर्म प्रभु बहु त्या क्षतविग्रहांसि[14] कुरवाळी ॥

---

१ सिंहशिरीं. २ दृष्टीनें. ३ वज्रपणा. ४ उत्तम तपातें. ५ प्राणासारख्या अभिमन्यूच्या पतनानें. ६ भीष्म. ७ भस्म. ८ मेघासारखा काळा. ९ विष्णु. १० नर्मदा नदी. ११ जलजंतूंस. १२ सुख. १३ पुत्रांस. १४ ज्याच्या शरीरांवर क्षतें पडलीं आहेत अशांस.

बोले सत्य मनोहर साधु न अमधुर जसा न कुरवाळी ॥८०॥
आले कुरुबळजलधि- स्थ यशो-मौक्तिक हरूनि हे मकर ॥
भुजहो वेष्टावे धन- रुचिनीं जसे वदान्य हेमकर ॥ ८१ ॥
ऐसें प्रेमें गद्गद बोलत आलिंगिले सुचिर दोघे ॥
वाटे भुजंग भोगें वेष्टुनि त्या चंदनासि सुख तो घे ॥ ८२॥
यश भीम-माधवांचें वर्णी घे धर्म भाटपण साचें ॥
प्रकटी अंग तयाचें तैं कंटक जेंवि दाट पणसाचें ॥ ८३ ॥
मुक्त अजगरापासुनि केला कृष्णेंचि तो जसा नंद ॥
धर्महि महांधिपासुनि सोडवितां होय साश्रु सानंद ॥ ८४ ॥
रडला कुरुराजगळां अभिमानें शोक घोर पडला हो ॥
कोण ह्मणेल चतुर नर मकररणीं विजय घोरपड लाहो८५
हाय ह्मणत दुर्योधन जाय द्रोणाकडे ह्मणे गुरुजी ॥
पार्थें खरी प्रतिज्ञा केली कीं आजि ती तशी गुरुँ जी८६॥
अक्षौहिणी सितहयें नेल्या कीं सात आठ विलयाला ॥
हे क्षिति जो म्यां केला हा बहुजनघात आठविल याला८७
सुस्तवभाजन हा जन दुःसह धिक्कार यास हा वेना ॥
मारी क्षणांत कीं उप- हासा हिंक्कारया सहावेना ॥ ८८ ॥
केला शरतल्पांगी-कार बळें काळदुर्जयें भीष्में ॥

१ कु-रव-अळी-स्वभावतः भ्रमर अमधुर शब्द जसा नाहीं. २दा-नशूर. ३ मोठा अंतःकरणास होणारी व्यथा, तीपासून. ४ आप ल्या मित्रांसह. ५ सुसरीच्या युद्धांत. ६ प्राणिविशेष. ७ मोठी. ८ अर्जुना. ९ उत्तम स्तुतीचें पात्र. १० उचकीच्या वेगा.

परिभव वरिला त्वांही परसेनासिंधुजीवनग्रीष्में ॥ ८९ ॥
जरि न करिता उपेक्षा माजी सर्वस्वहानि कां होती ॥
साधूंस मता समता सत्कीर्ति[1] उपेक्षिलीत कां हो ती ॥९०
प्रिय पार्थ न मी देतां परिभव तिदां[2] कशास हा याला ॥
द्या मरणाज्ञा अनुचित सुकुलज निंदाकशा सहायाला ९१
द्रोण ह्मणे वागिषुनीं[3] कां मातें पीडितोसि विधून ॥
वदलों प्रथमचि अर्जुन दुर्जय दुस्तर नव्हेचि सिंधून[4] ॥ ९२ ॥
करुनि निमित्त शिखंडी भीष्म महाराज अर्जुनें मथिला ॥
या कर्मे उमजावें कीं पार्थ अजय्य मज खरा कथिला ९३॥
जैं देव-दनुज-दुर्जय देवव्रत देव पातला पतन ॥
कळलें सर्व बुडालों न करिल ईश्वराहि आपणा जतन ९४
संप्रति झाले पवि-रवि- सम समरीं पार्थबाण ते फांसे ॥
ज्यां शेवटवरिहि शकुनि- मामा ढाळूनि खदखदां हांसे ९५॥
त्वां कां न ऐकिलें जें विदुर वदे सूक्त[5] अनय न करा तें ॥
तो च्युतचि डोळसाच्या[6] जो झिडकारील अनयन करातें ९६
भरतसभेंत सती त्वां आणविली करुनि हानि रीतीची ॥
वृद्धांसमक्ष फरफर फेडविलि दुराग्रहें निरी तीची ॥ ९७ ॥
त्याचें फळ हें केलें न सुटे, ह्मणती सुरर्षिमुख[7] सुकवी ॥
असतें प्रथम सुविकसित[8] परि वहु केला अधर्म मुख सुकवी[9]

१ सत्कीर्ती. २ तीनदां-सर्वदां. ३ वाग्बाणांनीं. ४ सागराहून उणा. ५ चांगलें भाषण. ६ आंधळा. ७ नारदप्रमुख. ८ चांगलें प्रफुल्लित. ९ वाळवी.

जे नित्य पुत्र-धर्मी रत त्यांचा द्रोह करिल बा कोण ॥
ब्राह्मण आपण ऐसें बोलोनि दहांत जो नव्हे द्रोण ॥९९॥
होता अश्वत्थामा कृप मद्रप तूं तुझा सखा कर्ण ॥
ह्मणसि उडविलें पार्थें शिर वातें जेंवि वाळलें पर्ण॥१००॥
मानी[1] कीं तूं श्रितवध कथितां आह्मांस कां न लाजसि रे॥
दद्यूतींच कसी द्याया विदुरसदुक्तीस कां न लाज शिरे॥१०१॥
असतां सजीव सायुध सन्निध सोत्साह शूर सावध रे॥
राव धरेश्वर बहुशत केला ऐकेंचि बा कसा वध रे ॥१०२॥
ज्यापासुनि[2] कनकध्वज रवि-भीष्माचा न कुरुबळीं झळके॥
जळके नगसे झालों आह्मी अपकीर्तिकज्जलें मळके ॥१०३॥
भीष्मामागें न दिसे मज कोणी जो तरेल उर्वरितें[3] ॥
हीं गंधर्वपुरेंसीं दिसती कटकें उगीच उर्वरितें[4] ॥ १०४ ॥
कुरुबळकलेवराचा परिपालक भीष्म तो खरा जीव ॥
रविदर्शनेंचि पावे तपतांहि ग्रीष्म तोष[5] राजीव[6] ॥ १०५ ॥
स्मरतो मज क्षण क्षण धृष्टद्युम्न स्वमृत्युचा हेतु ॥
जलधिविलंघनसाधन कपिकृतहि न काय जाहला सेतु॥१०६॥
त्यासहि सूचीहि गमे अतिदुःसह न करवाल वीरा ज्या ॥
जसि वाँळवी[7] दर्वशिखा[8] तसि न तरुप्रकर वाळेवी राजा॥७॥
तूंहि व्याकुळ करिसी मज हृदयीं शब्दबाण हाणोनी ॥

१ अभिमानी. २ जेव्हांपासून. ३ महाशत्रूंतें. ४ उरलेलीं. ५ आनंद. ६ कमल. ७ कीटकविशेष. ८ वणव्याची ज्वाळा. ९ सुकवी.

यास्तव नृपा प्रतिज्ञा करितों मी ऐक सत्य जाणोनी ॥१०८॥
मारुनि पांचाळ सकल मी क्रव्यादांसि मांस वाढीन ॥
करिन खरें स्ववच कवच हें अंगांतुनि तरीच काढीन १०९
मज न मत अरिवधें यश अश्वत्थामा न साधु निकरानें ॥
हित ह्मणुनि जडाहि दिला अश्वत्थामा न साधुनिकरानें॥११०॥
पुत्राला कळवावा त्वां माझा भाव हा निरोपांनीं ॥
कीं सर्व सोमकांची स्पष्ट करावीच हानि रोपांनीं ॥ १११ ॥
ब्राह्मण बहु मानावे तुज वारंवार हाचि उपदेश ॥
कीं ब्रह्मक्षोभें अहि झाला जो न्हुप नाकसुपदेश ॥११२ ॥
हा जातों हरिशील प्रकटुनि व्याया परा शशकशील ॥
जा तूंहि कराया जरि पांडुसुतांचा विनाश शकशील ११३
गेला पांडव-सृंजय- वीरांचें सर्व तेज हरित रणीं ॥
द्रोण परबलांत गमे मृगकुलतिमिरांत जेंवि हरि तरणी ११४

---

# अध्याय १७.

कुरुपति कर्णासि ह्मणे होउनि सैंधववधें सखेद वदे ॥
देतो ताप परिभव द्विरदा वेदुनि जसा सखे देव दे ॥ १ ॥
केला जयद्रथाचा कृष्णसहायें बळेंचि घात पहा ॥

---

१ हटानें. २ साधुसमूहानें. ३ पांचाळांची. ४ बाणांनीं ५ स्वर्गस्थानाधिपती असा. ६ सिंह. ७ सूर्य. ८ गजास. ९ वणवा.

झाला दुःसह अर्जुन- शरदर्काचा[1] प्रताप आतप हा ॥ २ ॥
हांसातिल सर्व जरि तरि सोसुनि हा दाह वेचुना काय[2] ॥
नाकास लाविला तो मानधना साहवे चुना काय ॥ ३ ॥
गुरुनेंचि घात केला व्यूहीं प्रिय शिष्य पार्थ शिरकविला ॥
हें काय बरें असतें वचन जसें रक्षणार्ह[3] शिर कविला ॥४॥
गुरु अभय सैंधवा दे द्वारव्यूहीं तदंतकालाही[4] ॥
सदनीं शिरल्यावरि कां रोविल मर्मी न दंत कालाही[5] ॥५॥
सैंधव पार्थी पावुनि जेंवि दनुज पाकशासना[6] शमला ॥
जाऊं देतां[7] याचा तापविता बा कशास नाश मला ॥ ६ ॥
कर्ण ह्मणे न वद असें करिती आचार्य-जनक-कुत्सा जे ॥
त्यांसचि पशु ह्मणतिं कवि न जरि पुच्छ विषाण[8] घनकंकुत् साजे
बापा प्रवर्तलासि स्वाहित जाणोनि कां गरा खाया ॥
वृद्ध[10] यथाशक्ति समर करितो नेणेचि आंग राखाया ॥८॥
सामर्थ्यें न विलंघिल कां वृद्धा वाडवा[11] युवा[12] राया ॥
वेगीं टिकेल कैसें मोठेंही झाड वायु वाराया ॥ ९ ॥
अत्यद्भुत रथ सारथि चाप ध्वज तूण कवच अधिकरणीं[13] ॥
ज्या साहित्य असें त्या पार्था न ह्मणेल कवण अधिक रणीं
वृद्ध द्रोण ब्राह्मण वाराया अर्जुनासि अक्षम हा ॥

---

१. शरदृतूंतील सूर्याचा. २ शरीर. ३ संरक्षण करण्यास योग्य. ४ त्याच्या नाशकर्त्या अर्जुनालाही. ५ काळसर्प. ६ इंद्रास. ७ जयद्रथास आज्ञा देता तर. ८ शिंगें. ९ मोठें कोळें. १० द्रोणाचार्य. ११ ब्राह्मणास. १२ तरुण. १३ ज्या स्थानीं.

आतां कैंचें तें बळ तरुणपर्णी जरिहि युद्धदक्ष महा ॥ ११ ॥
सुकरोन्मूलन होइल पहिल्यापरि काय नग जरां ज्याला ॥
किंबहुना सावरवे पहिल्यापरि काय न गजराजाला ॥ १२ ॥
झालें अनुकूल परां देतें जय संकटांत वागवितें ॥
भागवितें आह्मांला स्पष्ट प्रतिकूल दैव नागवितें ॥ १३ ॥
बल भंगे भंगाया पटु जें सर्वांसि वासविसकट तें ॥
जैसें करिकुल येतां गंधद्विपदानवास विसकटतें ॥ १४ ॥
अनुकूल दैव असतां न समर्थ करावयासि हानि यम ॥
होतां तें प्रतिकूल प्रबलहि दुर्बलचि होय हा नियम ॥ १५ ॥
अहि डसविले बुडविला भीम दिलें उग्र विष मराया तें ॥
जैतुगृहदाह द्यूतहि झालें दैवेंचि विषम राया तें ॥१६ ॥
दृढ चित्त करुनि तूं निज रणधर्मप्रवण हो मरायास ॥
याहुनि दुसरा सुफलद आवश्यक कवण होम रायास ॥१७॥
मित्राच्या उपदेशें सोदर-सैंधववधें दुरभिमानी ॥
होय मराया सिद्ध स्वासाधुप्रकृतिला सुरभि मानी ॥ १८ ॥
पांडवसेनेसि मथी कुरुपति सर्वप्रजांसि अंतकसा ॥
अभिमानी आह्मांचा साहेल असोनि शक्ति अंत कसा ॥१९॥
भीम घटोत्कच सात्यकि धर्म यम द्रौपदेय ताडून ॥

---

१ उपटावयास सुलभ. २ वृक्ष. ३ वृद्धपण. ४ देह. ५ अर्जुनासहवर्तमान. ६ मत्त गजाच्या मदाचा वास. ७ लाक्षागृहांतील दहन. ८ बंधु व जयद्रथ यांच्या वधेंकरून. ९ आपल्या असाधु प्रकृतीला. १० नकुल व सहदेव.

केले विद्ध[1] सपुत्र द्रुपद विराटादि वीर झाडून ॥ २० ॥
कुरुपतिबाणत्रासें मोठे मोठेहि वीर कचकरिती[2] ॥
सेना कांपे याचा धरुनि प्रभुचा[3] जसाच वचक[4] रती[5] ॥२१॥
धांवे धर्म क्रोधें लक्षुनि दुर्योधनासि कुपितातें[6] ॥
ध्याया तुज जें पावे घननादाचा कुलघ्न कुपिता तें[7] ॥ २२ ॥
न गणिति सुरासुरांचे भद्रासन-काम इंद्रसे नातें ॥
ध्वज धनु खंडुनि ताडी भाळीं कुरुराज इंद्रसेनातें[8] ॥ २३ ॥
भीमाग्रज सज्ज करुनि नवचाप[9] हतोसि ह्मणुनि शर सोडी॥
तो डीन-पटु[10] भुजगसा तोडी कुरुराजकवच उर फोडी॥२४॥
मूर्च्छा जसीच सहसा झाली मोठी तसीच हाक रणीं ॥
मेला दुष्ट दुरात्मा करिता झाला असीच हा करणी ॥ २५ ॥
तों गुरु धावे परिसुनि पांचाळाच्या रणांत हाकेला ॥
चित्तीं ह्मणे वधें तरि नुत[11] किन्नरचारणांत हा केला ॥२६॥
येतांचि द्रोण उठे दुर्योधन सुप्त सर्पसा हरिसा ॥
परि सार्थक काय कसे वांचों देतील पोषिले अरि सा[12] ॥२७॥
तो तिष्ठ[13] तिष्ठ ऐसें ह्मणत रण तमीं करावया धांवे ॥
पांचाळ सकळ उठले कीं धर्मा शत्रुशर न बाधावे ॥ २८ ॥
पांचाळांवरि सहसा सरसावे द्रोण कुरुप[14] राखाया ॥

---

१ क्षतयुक्त. २ मागें सरती. ३ शिवाचा. ४ भय. ५ कामपत्नी. ६ रागीटातें. ७ दुःख. ८ धर्माच्या सारथ्यातें. ९ नूतन धनुष्य. १० उड्डाण करण्याविषयीं कुशल असा. ११ स्तुत. १२ सहा ( कामक्रोधादि शत्रु ). १३ उभा रहा. १४ दुर्योधन.

कीं गुरु समक्ष असतां काळहि न शकेल गुरुंपरा खाया २९
उठली आचार्यावरि सारीही एकदाचि अरिसेना ॥
हरिसे नाद करिति ते कोणीहि परस्परोक्त परिसेना॥३०॥
रात्रौ दाटे वाटे लयकालाचाचि अंधकार गडी ॥
बहु पांचाळ-समूहा द्रोण जसा रुद्र अंधका रगडी ॥ ३१॥
भूषामणि शस्त्रद्युति घनतिमिरांही करी लखलखाट ॥
ह्मणुनि गमे होउनि गत- मद चितेची धरील खल खाट३२
द्रोणाच्या सारथिला मारी शरवृष्टि करुनि शिबि राजा ॥
त्यातें आचार्य ह्मणे स्वर्गासचि जा पुन्हां न शिबिरा जा३३
कालिंगभूप-नंदन धांवे कीं भीम होय तातारी ॥
तद्बल तयापुढें किति अशनिपुढें काय कोयता तारी ॥३४॥
स्यंदन सोडुनि धांवुनि त्या कालिंगासि मुष्टिनेंचि वधी ॥
कर्णानुजही मर्दुनि तो बहु खलकाल तोषवी शिवधी ॥३५॥
कर्णें झुगारिली जी शक्ति खरत्वें सखीच अशनीची ॥
कीं आगस्कृदरक्षक तक्षककन्याच दृष्टिच शनीची ॥ ३६॥
तीच धरुनि भीमें त्या कर्णावरि टाकिली महावेगा ॥
फिरली कृत्याच गमे कर्णास न तीकडे पहावे गा ॥ ३७ ॥
खंडी नयरीतीतें होउनि जो काय वश कुनीतीतें ॥
स्वसहाय- वृपहितार्थी तो कां खंडील न शकुनी तीतें ॥३८

१ गुरुभक्तास. २ एकमेकांचें बोलणें. ३ प्रलयकालाचाच. ४ बाज. ५ पित्याचा शत्रु. ६ भीमापुढें. ७ वज्रापुढें. ८ शिवाचि मति. ९ तीक्ष्णत्वें. १० अपराध करणारांचें रक्षण करणारी नव्हे.

स्वरथीं बैसोनि पुन्हा आह्मांवरि भीम धांवला अरिसा ॥
त्यावरि कुमार उठले तेव्हांचें वृत्त सांगतों परिसा ॥ ३९ ॥
आच्छादित होते शर- पटलें टाकुनि समक्ष यांतें हो ॥
तों पाठविले दुर्मद हय सारथिसह यमक्षैयातें हो ॥ ४० ॥
दुष्कर्णरथीं दुर्मद बैसे दोघे कृती परि लवायु ॥
भीम तसेंचि परांचें मथन घनांचें जसें करिल वायु ॥४१॥
धरणींत बुडविला रथ त्याचा भीमें गदाप्रहारेंच ॥
ते मुष्टिनेंचि वधिले उतरिल शतमन्युचाहि हा रेंच ॥४२॥
होते वृष गुरुसुत नृप कृप बाल्हिक सोमदत्त साक्षी बा ॥
सम दिसतो परि तेजें भीम परा असम दत्तसा क्षीबाँ ॥४३॥
पळ काढिलाचि तुमच्या पाहुनि तें कर्म तडक लेंकांहीं ॥
गमला रुद्र वृकोदर धाकें काळीज तडकलें कांहीं ॥ ४४ ॥
द्रुपद विराट युधिष्ठिर पूजिति होऊनि मुदित भीमातें ॥
त्या अंधकासुरवधीं विधि वासव जिष्णु जेंवि भीमातें॥४५॥
सद्रोणकुमार पुन्हा वेष्टिति कोपें वृकोदरा अरिला ॥
जैसे निजयूथपयुत मदमत्त द्विप वधावया अरिला ॥ ४६ ॥
सात्यकिस सोमदत्त क्रोधें दाबुनि ह्मणे अरे मत्ता ॥
मायगेता न असिलता त्वां धर्मालाचि मारिली लत्ता ॥४७॥
मी आजि तव शिरातें विसराया तनयहानि कापीन ॥

---

१ भीमातें. २ यमनगरातें. ३ कुशळ. ४ अल्पायु. ५ इंद्राचाहि. ६ दत्तात्रेयासारखा. ७ मत्ता. ८ शिवातें. ९ मरणोन्मुख.

जो ऋक्षचर्म-परिवृत ज्यांत नसे शस्त्रसंग्रहीं तोटा ॥ ६६ ॥
त्याचे वाहक गजसे परि जातीनें नव्हेत गज वाजी ॥
क्षण ज्यांपुढें गगनमणि- रथ-तुरगाच्या नव्हे तग जवा जी ॥
एवं भयंकररथीं पाहुनि रात्रौ रणांत उग्रास ॥ ६८ ॥
भ्याले कौरव गमले ते त्या काळापुढील सुग्रास ॥ ६९ ॥
कटकीं होते वाजी वारण जे काय बहु मदें उतले ॥
ते त्यापुढें न तमले हगले तत्काळ गर्जतां मुतले ॥ ७० ॥
द्रौणि घटोत्कच दोघे न धरिति ते शुद्धसमरस त्रास ॥
आरंभिति जोडाया यश लोकीं युद्धसमर-सत्रासें ॥ ७१ ॥
संध्यादिक-बळ राक्षस ते जैसे धूमयोनि करकांहीं ॥
बहु वर्षले शिळांहीं बा वदवेनाचि तो निकर कांहीं ॥७२ ॥
केलें पलायन मनीं धरिला संकोच न तव तनयांहीं ॥
संपादिलें न नाकीं होउनि धर्मासि नत वतन यांहीं ॥ ७३ ॥
किंबहुना कर्णहि त्या खचर-त्रासें पलायन करी हो ॥
गंधद्विपगंधानें भंगेचि महाबलायन करी हो ॥ ७४ ॥
या राक्षसासि एक द्रौणि न भी होय रामसा मान्य ॥
केलें घटोत्कच-तनय- मर्दन हें काय काम सामान्य ॥ ७५ ॥
तो अंजनपर्वाभिध वा अन्य तसा न वीर मायावी ॥
योधीं तद्वधकीर्ति न जेवि समुद्रीं नवी रसा यावी ॥७६ ॥

१ आस्वलाच्या चर्मानें वेष्टित. २ घोडे. ३ समररूप यज्ञास. ४ मेघ. ५ गारांनीं. ६ मोठ्या बळाचें स्थान. ७ हत्ती. ८ नामविशेष ( घटोत्कचपुत्र ).

अंजनपर्वा याचा घननाद जसा दशाननाचा हो ॥
द्रौणिस भीमसुत ह्मणे जोडुनि शिशु-वध-यशा न नाचा हो७६
झालाचि आजि वृद्धा त्या द्रोणा ब्राह्मणासि शोकद हा ॥
यां गुरुधर्म-हितकरा परि ह्मणतिल धन्य धन्य लोक दहा७७
द्रौणि ह्मणे वत्सा जा इतरांसीं अमरविक्रमा भीडें ॥
पुत्रें पिता कदापि न पीडावा सोडुनि क्षमा भीड ॥ ७८ ॥
न तुझ्या ठायीं माझा रोप असे सर्वदाहि अनुराग ॥
परि येतां तापवितो व्यापुनि बाहेर आंत तनु राग ॥ ७९ ॥
नसता विवेक कांहीं बा घडतो आत्मघातही कुपिता ॥
सुपिताहि क्रोधाच्या आवेशेंकरुनि होतसे कुपिता ॥ ८० ॥
रात्रिचर ह्मणे द्रौणे न पृथग्जनसा रणांत कातर हा ॥
भीमसुत ह्मणायाचा शक्राहि उगीच कीर्ति गात रहा ॥८१॥
जे समरीं अनिवर्ती पांडव त्यांचा कुमार हा वडिल ॥
आणिल मनांत तरि यम- कासर-चर्मे स्वदुंदुभी मढिल ॥ ८२ ॥
असता तरि ह्मणता मज पाहुनि रक्षोधिपाशि रावण हा ॥
घटकर्णाच्या करिता निजचरणप्रणमनें शिरा वण हा ॥८३ ॥
कठिण रणश्रद्धाव्रत हें सत्य मनांत चिंतित उज्जीव ॥
जाणे आयुष्यातें सलिल शरीरा निजा तितंउ जीव ॥ ८४ ॥

१ शोकदेणारा. २ अंजनपर्व्यास. ३ गांठ घाल. ४ प्रीति. ५ क्रोध. ६ दुष्ट पिता. ७ भयचकित. ८ माघारां फिरणारे नव्हत असे. ९ ज्येष्ठ. १० राक्षसाधिपास. ११ घट्टा. १२ चाळण.

दापी असें दरवडा सार्थाच्या जेविं अक्षमा[1] त्राता ॥
सोडी ज्या ज्या बाणा छेदीच द्रौणि अक्षमात्रा त्या ॥८५॥
होउनि गुप्त घटोत्कच मायेनें होय तो खरा शिखरी[2] ॥
वाटे निजोक्ति करितो द्याया स्वजनासि तोखराशि[3] खरी॥८६॥
वर्णू तो कज्जलसख शस्त्र-प्रस्रवण[4] काय पर्वत मीं ॥
त्या अतिभयंकरानें वीर बुडविले पळांत सर्व तमीं ॥ ८७ ॥
अतिवर्षीं बल्लवसे बहु आह्मी आरडों गरल यातें ॥
नमितें नेता कुरुबल बाला तो आरडोंगर लयातें ॥ ८८ ॥
झाला तो मायानग गुरुनंदन-मुक्तशर-निकर-पविला ॥
त्या ब्राह्मण-प्रताप- ज्वलनें खलपलभुगगम[5] करपविला॥८९॥
मग होय नीलतोयद सोडी असि-शूल-शर[6]-गदा-धारा ॥
गेलों शरण गुरुसुता सर्व जसे गोप त्या सदाधारा[7] ॥ ९० ॥
तो नीलमेघ गुरु-सुत- योजित-वातास्त्र-सायकें वितुळे ॥
सुरभीच्या सायेसीं यम-महिषीचीहि साय कैंवि तुळे ॥ ९१ ॥
घटजें सिंधूदरसें[8] केलें जीवन हरूनि कटक रितें ॥
नातरि घटोत्कचाचें तें बळ आह्मां पळांत गट करितें ॥ ९२ ॥
जरि शतसहस्र मथिले बहु राक्षस धांवले तरि नवेच ॥
द्रौणि ह्मणे न नृपा भी मी यांचा निश्चयें करिन वेचं[9] ॥ ९३ ॥

१ अशक्त अशा. २ पर्वत. ३ हर्षातिशय. ४ शस्त्रें प्रसवणारा. ५ दुष्टराक्षसरूपी पर्वत ( घटोत्कच ). ६ खड्ग, शूल, बाण, गदा, यांच्या धारा. ७ श्रीकृष्णाला. ८ समुद्राचें उदरसें. ९ खर्च.

कुरुप ह्मणे मिरविन या कंठीं तव कीर्ति-रत्नहारा मीं ॥
संप्रति तुझ्या भुजीं बा होता पूर्वी प्रयत्न हा रामीं ॥ ९४ ॥
रामीं सीतासी दे राहों धर्मींहि न महि मामा जो ॥
त्या नृप ह्मणे तुजपुढें अहितांचा आजि न महिमा माजो९५
साठ सहस्र स्यंदन निज लक्ष तुरग मथावया अरि घे ॥
रीघेंचि पांडवकटकीं ग्रीष्मीं कक्षांत जेविं दाव रिघे ॥ ९६ ॥
पडयुतपत्तिसमेत त्वत्साहित्यासि कर्ण पाठवितों ॥
आठविन परांचें असु- हरण वसुहरण जसेंचि आठवितों९७॥
द्रौणि-शरांहीं व्याकुळ करितांचि युधिष्ठिरादि-मदरींतें ॥
मारुनि द्यावें सद्यश मद्धित-निरतें तुवांचि पदरीं तें ॥ ९८ ॥
गेला धर्मवधा जो हेतु नृपा या इलादि-लाभाचा ॥
जेणें कुबुद्धि कृत्या जी हे खाया इला दिला भाचा ॥ ९९ ॥
राक्षस दश-बाणांनीं विकल करुनि गुरुसुतासि धनु तोडी ॥
द्रौणि नवें धनु घेउनि साला जलदासि वातसा झोडी १००॥
त्रिपुराला रुद्र जसा खचरवळाला तसाचि तो भाजी ॥
जीच सुरांत हराची याची आह्मांत तीच शोभा जी॥१०१॥

---

१ पृथ्वी. २ शकुनिमामा. ३ प्रवेशच. ४ गवतांत. ५ वणवा. ६ साठ हजार पत्तीनीं युक्त ( पत्तीचें लक्षण ) श्लोक—एकोगजोरथश्चैकोनराः पंचपदातयः ॥ त्रयश्चतुरगास्तज्ज्ञैःपत्तिरित्यभिधीयते ॥ १ ॥ अर्थ— १ हत्ती. १ रथ. ५ मनुष्यें. ३ घोडे. मिळोन एक पत्ति जाणावी. ७ माझ्या हिताविषयीं तत्पर अशा तुवां. ८ पृथिव्यादि लाभाचा. ९ घटोत्कच. १० अजी [ धृतराष्ट्रा ].

स्वबल-विनाश-क्षोभें भीमसुतें रुद्रनिर्मिता अशनी ॥
पाठविली द्रौणिप्रति जी कृत्या दर्शितारिच्या अशनीं[१]१०२॥
उग्रत्वमदें जीसीं करिल क्षणमात्रही न वाद शनी ॥
तें दाहकत्व न दवीं तक्षकभुजगाचिया न वा दशनीं[२] १०३॥
ऐशीतेंहि धरी वा तो द्विजवर गरुड जेविं भुजगीतें ॥
ख्यात जगीं स्वयशाच्या त्याचे हरबाहु तेविं भुज गीतें ४॥
गुरुपुत्रें खचरावरि तीच अशनि योजिली महावेगा ॥
फिरल्या कृत्येसि तसें तीस न त्या राक्षसा पहावे गा १०५॥
घाली उडी तळीं तो राक्षस जों तों पडे रथावरि ती ॥
घाली सगरसुतगणीं कपिलाची[३] दृक् जसें तसें करिती १०६॥
देखुनि जाणत होते अशनीची ख्याति लटिक वरि कवि जे॥
ते वदले न सखी तूं ईची होसील बटिक वरिक विजे[४] १०७॥
अशनी क्षितींत शिरली सूताश्वासह रथासि जाळून ॥
धृष्टद्युम्नरथीं तो राक्षस बसला स्व-मृत्यु टाळून ॥ १०८ ॥
विजयश्री पांचाळा तैसीच निशाचरा गमे घरची ॥
कीं ते शरवृष्टीतें तेविं उदकवृष्टितें न मेघ रची ॥ १०९ ॥
गुरुपुत्रें त्या त्या बहु कांपविलें जेविं नीरदा[५] वातें ॥
द्विजबळ परप्रतापा त्या जैसें होय नीर[६] दावातें[७] ॥ ११० ॥
तेथें बहु बळ घेउनि सुतसाहित्यासि भीम ये राजा ॥
मुख्या सबळ-त्वरसुत- हानि हर-मख-क्रियाहि येरा ज्या[८]११॥

---

१ भक्षणीं. २ दांतांत. ३ कपिलहामुनीची. ४ हे विद्युल्लते.
५ मेघास. ६ पाणी. ७ दावानळातें. ८ ज्यास ( भीमास ).

गुरुसुत वधी घटोकच- भीमार्जुन यां समक्ष यातूंतें ॥
बा तत्वतःस्वपर-बल जें पाठविलें यमक्षया तूं तें ॥ ११२ ॥
तो विष्णु-जिष्णु-देखत खचरा सकळाहि लोळवि प्रखरा ॥
वाटे निपट खवळला प्रळयाग्नीचाचि लोळ विप्र खरा॥११३॥
जाणों हराचि ह्मणे हूं घे वहु फटकाळ कूट हा निकर ॥
कीं तें तेविं खचर-बळ जेविं निपट काळकूट हानिकर ११४॥
मारुनि रात्रिचर-कटक रुधिर-नदी खळखळाट वाहविली ॥
चळवळ घटोत्कचाची मर्मी वेधुनि मुहूर्त राहविली ॥११५॥
नाराचांनीं पांडव धृष्टद्युम्ना-समेत खडकून ॥
द्रुपदसुत शरभ केला भस्म दवें जेविं शलभ धेडकून ११६॥
मारुनि त्या सुरथाचे बहुसुत शत्रुंजयादि झाडून ॥
द्रोणात्मजें श्रुतांव्हय- राजातेंहि क्षणांत पाडून ॥ ११७ ॥
पुनरपि यमदंडोपम बाणातें परम तूर्ण सोडून ॥
मूर्च्छित रणीं घटोत्कच केला तत्काळ हृदय फोडून॥११८॥
धृष्टद्युम्न पळवि करि पडतां तो शूर पळ विलापाला ॥
वात्येनें दव दहना- पुढुनि गमे दूर पळविला पाला ॥ ११९ ॥
होते युधिष्ठिराच्या कटकीं भीमादि वीर्यसागर जे ॥
त्यांतें भंगुनि गुरुसुत सोडुनि मत्तेभ सिंहसा गरजे ॥१२०॥

---

१ राक्षसांतें. २ अश्वत्थामा. ३ पेटून. ४ श्रुतनामक. ५ काळदंडासारख्या. ६ वाहुटळीनें.

# अध्याय १७.

मारुति पार्षत सात्यकि धर्मादिक वीर विप्र-भावातें ॥
मानवले ग्रहवृंदीं बहु जेंवि कवी रविप्रभावातें ॥ १ ॥
जरि सर्वांगीं केले हो ते गुरुपुत्र-शरशतें विद्ध ॥
तरि धर्म भीम सात्वत पार्षत युद्धासि जाहले सिद्ध ॥
पुनरपि बहुयुद्ध करी सात्यकिला सोमदत्त माराया ॥
कीं फार खवळला सुत- शोकें तो भरतसत्तमा राया ॥ ३ ॥
मागें पदहि न येतां सात्यकि-शर भीमसेनपरिघ सरे ॥
बसतां उरीं शिरीं ते धैर्यापासूनि धीर परि घसरे ॥ ४ ॥
बाल्हीक वृद्ध परि बहु मानी साहेल कां पतन यांचें ॥
कांपे कोपे तों तों जों जों धरि देह कांप तनयांचें ॥ ५ ॥
तो काळवार्षि-घनसा सात्यकिवरि तीव्र विशिख-वृष्टि करी ॥
भीमालाहि न मानी जैसा हरिला मदांध-दृष्टि करी ॥
शक्तीतें भीमाच्या वज्रसमोरींहि होय शिरकविता ॥
ती त्याचें कांपावि जसि आणुनि नेत्रांसि तोय शिर कविता ॥
वृद्धहि महाप्रतापी वा नव्हता तो मनुष्यदेव ढिला ॥
त्या भीम गदेनेंचि स्वर्गति न धरुनि धनुष्य दे वढिला ८॥
मस्तक बाल्हीक-महा- राजाचें पांडुसूनु चेंडु करी ॥
न करिल अपत्य मख किटि-सम पोपुनि पंकिलें कुचें डुकरी ॥
तव नागदत्त दृढरथ इत्यादि तनूज धांवले दश गा ॥

१. मुलाचें. २ गज. ३ वज्रासारख्या कठिन उरांतही. ४ उदक. ५ राजा. ६ वडिलाला. ७ यज्ञवराहतुल्य. ८ स्तनपानानें. ९पुत्र.

यश गा तूं परि गमले ते त्या भीमाहरी पुढें शश गां १०॥
मेले ज्या धरुनि खचर- पतिचें त्या तव कुमारदश लीला ॥
लाजविति पृथापुत्रा स्वयशें जैसे उमारद शशीला ॥ ११ ॥
भीमानें तव दश सुत दश बाणांनींच जेंवि वा वधिले ॥
पंचांनीं पांच शकुनि- बंधुहि जे शत-महारथां मधिले ॥१२॥
धर्महि बहुकुरुकटक- क्षय करित क्रुद्ध-कालसा सुटला ॥
तुटला मर्यादावधि कल्पांतीं नीरनिधि जसा फुटला ॥१३॥
त्यावरि नृपोक्तिनें गुरु-कन्येनें जेंवि काशिराजाच्या ॥
पाठविला भीष्मावरि अभय-वर दिला निका शिरा ज्याच्या
वायव्य अस्त्र वारुण याम्यहि आग्नेय ऐंद्र गुरु योजी ॥
त्यात्यातें प्रत्यस्त्रें हरुनि ह्मणे धर्म अन्यही यो जी॥ १५॥
मग सावित्र त्वाष्ट्र प्राजापत्यप्रयोग जो केला ॥
त्यातेंही प्रत्यस्त्रें शमवुनि निष्कंप नृप पुढें ठेला ॥ १६ ॥
ब्रह्मास्त्रातें योजी तो ब्रह्मास्त्रेंचि करुनि विप्रभ या ॥
गर्जे युधिष्ठिर प्रभु समरीं न धरीच लेश विप्र-भया १७॥
सैनिक-मुख्य स्तविते झाले गुरुतें तसेचि शिष्यातें ॥
दे ताप तव सुतातें तो धर्मोत्कर्ष जेंवि तिष्यातें ॥ १८ ॥
गुरु धर्मातें सांडुनि पांचाळांचेंचि वहुत कदन करी ॥
ते त्यापुढें न मिरविति गर्व हरिसमक्ष जेंवि मदन-करी १९॥
जैसें पांचाळ-कटक- कदन कलशसंभवें स्वयें केलें ॥

---

१ अगा राया. २ पार्वतीचा दंत. ३ समुद्र. ४ येवो. ५ धर्मराजाचा अथवा धर्मकृत्याचा उत्कर्ष. ६ कलियुगातें. ७ मदनहस्ती. ८ द्रोणानें.

तैसोंचि कौरवांचें बळ भीमें अर्जुनें लया नेलें ॥ २० ॥
भीमार्जुन-शर-निकरें तिमिरें निद्राभरेंहि मोहातें ॥
पावे भंगे तव बळ मरण-त्रासें ह्मणे नमो हातें ॥ २१ ॥
गुरु-नृप-वचेंहि कुरुबळ जेंवि पवनें-नुन्न अभ्र मुरडेना ॥
सेना किति पतिरक्षा- क्षम होतां काय अभ्रंमु रडेना ॥ २२ ॥
कुरुपति कर्णासि ह्मणे नाशों देतोसि काय गा यश तें ॥
वेढिलि चमू परबळें जेंवि वृकांच्या वनांत गाय शतें ॥ २३ ॥
दुर्लभयशःप्रद समय हा न वृथा मित्रवत्सला जावा ॥
सन्मैत्रीच्या कासे लागलिया सुरभि-वत्स लाजावा ॥ २४ ॥
कर्ण ह्मणे शक्ति असे कृष्णाद्यखिला बलाऽविलापार्था ॥
जिंकिन रक्षाया जरि येइल वज्री बलाविला पार्था ॥ २५ ॥
देतों तुज जय मारुनि विजयास अमोघ-शक्तिनें आजि ॥
करितों तसीच केली जसि महिष-वधार्थ शक्तिनें आजि ॥
अर्जुन मरतां होतिल वश्य तुला दीन होउनि अवश्य ॥
किंवा पुन्हा वनाला जातिल पांडव जटाधर अवश्य २७॥
असतां कर्ण व्याकुळ कां स्वस्थ त्यजुनि तूं विषाद रहा ॥
पांडव-बळ किति न धरिल पीतांहि हळाहळा विषा दरें हा॥
मज हरिपुढें टिकेल न पळही पांचाळ-वाहिनी कुतरी ॥
शिरतां बुडेल मद्धळ- जलधींत समग्र यदु-चमू कुंतरी॥२९॥

---

१ हस्तानें. २ वातप्रेरित. ३ ऐरावताची स्त्री. ४ संग्राम. ५ वश व्हावयाचे नव्हत ते. ६ भय. ७ कर्ण. ८ भग्न नौका.

देतां तुलाचि भजतिल पळही पर मानदा न वसुधेतें ॥
बा पावले करुनिही कष्टा परमा न दानव सुधेतें ॥ ३० ॥
हसुनि कृप ह्मणे कर्णा तूं नाथ ह्मणुनि सनाथ हा राजा ॥
तव शब्दचि तेजस्वी तूं यासिच ह्मण करा प्रहारा जा ३१
करिसी असें विकत्थन परि न पराक्रम दिसे न फल कांहीं ॥
तव निटिलीं न विजयलिपि वरिली पांडव-ललाट-फलकांहीं
ते ते भंगद झाले पांडु-सुतांसीं रणीं समागम जे ॥
जीभ तुझी नृपति पुढें करिती बहु नववधूसमा गमजे[1]॥३३॥
गंधर्वें प्रभु धरिला तेव्हां आधींच कीं पळलास ॥
तें पाप क्षालाया तूं दवदहनीं न कां जळालास ॥ ३४ ॥
कर्णा उगेचि कर्ण- प्रिय बोल वदों नकोच कीरा[3] हे ॥
उचित न वीरास तुझी त्या गोग्रहणीं न कोंचकी राहे॥३५॥
जरि कळलें एकाही पार्थाचें तेज नावरायाचें ॥
तरि सर्व वधिन ह्मणसी वुडविसिलाचि तेज नाव रायाचें ३६
शूर भुजांनीं क्षत्रिय शब्दांनीं विप्र पार्थ चापानें ॥
केवळ मनोरथांनीं कर्णा तूं शूर न प्रतापानें ॥ ३७ ॥
व्यर्थचि गर्जन करितें तव मुख हें जोंवि शारदाभ्र[6] महा ॥
वाटे अनर्थक बहुत बडबडसी जें विशारदा भ्रम हा ॥ ३८ ॥
अर्जुन वर्जुन गर्जुन अर्जुन घे क्षण उगेंच थोरपण ॥

---

१ बडबड. २ कपाळीं. ३ पोपटा . ४ पगडी. ५ न आवरायाचें. ६ शरदतूंतील मेघ. ७ शहाण्यास. ८ संपादून.

जिंकिन बृहस्पति ह्मणुनि करिलचि वाचाट चाट पोर पण ॥
तदधिक कवण सुखविला हर जेणें करुनि अति-समरयज्ञ ॥
केंचा श्रेष्ठ मग खगं त्रिजगींहि न पक्षिपाति-सम रयज्ञ ॥ ४० ॥
त्या कृष्णसारथिपुढें होशिल मूक न जराकं बकंशील ॥
कीं गरुडशील तो तूं सूता केवळ वराक बकशील ॥ ४१ ॥
कर्ण ह्मणे घन गर्जति समयीं तैसेचि सर्व योध रणीं ॥
करणी करूनि दाविति ह्मणते तें फलद पर्व यो धरणी॥४२॥
उत्साहें वीरांहीं करुनि विकत्थन यथेष्ट गर्जावें ॥
फल न दिसतां बुधांहीं काय प्रारब्धकर्म वर्जावें ॥ ४३ ॥
द्रवतेंचि दैव असतां निश्चय नसतां मनांत निर्वेदं ॥
तूं द्विज आह्मांत तसा जैसा वैदिकजनांत निर्वेद ॥ ४४ ॥
दैवें न पावले रण- रंगीं बहु-बळहि काय नास तसे ॥
म्यां पांडव वधिले तरि यांत तुझें सांग काय नासतसे ४५
न वृथा गर्जति शारद- वारिदसे रणमखांत शूरवर ॥
विप्रा कृपा पहावें ऐसें दवडूनि दृष्टि दूरवर ॥ ४६ ॥
गर्जति पंडित निज बळ समजुनि तूं वदसि न समजोनीच ॥
वीराशयासि वीरचि समजे नुमजेचि न सम जो नीच॥४७॥
मी मारिन कृष्णार्जुन ऐसा उत्साह मानसीं धरितों ॥
ह्मणुनि द्विपयूथपवध- कामुक हरिसाच गर्जना करितों॥४८॥

---

१ वाचाळ. २ चाटाळ. ३ पक्षी. ४ गरुडतुल्य. ५ वेगवान. ६ अल्पहि. ७ बडबडशील. ८ अर्जुन. ९ नीच. १० बकपाक्षि-सदृश. ११ जल्पन. १२ कंटाळा.

सानुग सकृष्ण पांडव मारुनि देइन सुयोधना वसुधा ॥
हें गर्जन-फळ पाहें ह्मणतिल माझें सुयोधं नांव सुधा ॥४९॥
गौतम ह्मणे तुझे हे न ग्राह्य मनोरथ-प्रलाप मला ॥ ॥
गमला कृष्ण प्राकृत धर्महि ज्या स्पष्ट तो पशु भ्रमला॥५०॥
कृष्णाश्रितांसि सकळें कल्याणें करुनि दे वशें समज ॥
श्रीसी ह्मणे जयश्री काय वरिल भरुनि देव शेंस मज ५१
श्रीकृष्णार्जुन जेथें तेथें सादर सदैव जय नांदे ॥
राजर्षि धर्म विस्मय देवर्षि-महर्षि-योगि-नयनां दे ॥ ५२ ॥
भीम नकुळ सहदेव ख्यात सकळ साधु-शूरजन-महित ॥
यांचे संबंधीही शक्रसम द्रुपद-मत्स्यपतिसहित ॥ ५३ ॥
त्यांतें जिंकाया तूं बहु हुटहुटलासि योग्य अनय न हा ॥
लावूनि सनयनासीं स्पर्धा न ह्मणेल काय अनयन हा ५४
कर्ण ह्मणे जरि पांडव दुर्जय तरि शक्र-दत्त-शक्तीनें ॥
अर्जुन वाधिन न मथिला हो काय तसाहि मत्त शक्तीनें ५५
त्याविण कृष्ण युधिष्ठिर तदनुज सुसमर्थहि तरि पोकळ तो
न कुरूत्कर्ष तुज रुचे आशय शब्देंचि हितरिपो कळतो ५६
न रणा तूं योग्य ह्मणुनि हा केशवसारथे रडायास ॥
काय भिवाविशिल देउनि हाके शवसार थेरडा यास ॥ ५७ ॥

---

२ कृप. २ कुंकुमाक्षतांचा लेप कपाळीं करितात ती शेस.
३ उत्कंठित झालास. ४ अंध. ५ हाय हाय. ६ महिषासुर.
७ देवीनें. ८ कौरवांची वृद्धी. ९ हितशत्रो.

अप्रिय वदसिल पुनरापि तरि खड्गेंकरुनि जीभ कापीन ॥
सुकृतचि हें[1] कीं कोणी निंदकसा त्रिभुवनांत पापी न॥५८॥
दैवचि कारण भीष्म- प्रमुख-महावीर-देह-पतनाचें ॥
अधमा कृपा नृपाच्या होउनि अहित-स्तवीं न रत नाचें ५९
अश्वत्थामा धांवे कर्णावरि दिव्य खड्ग उपसून ॥
तक्षक जेंवि डसाया मर्मी दंष्ट्रा समूळ खुपसून ॥ ६० ॥
त्यासि ह्मणे या सिंहा बोलावे बोल हे तुवां कोल्या ॥
मारुतिशि माकडानें दाखविल्या स्वांतहेतु[3] वांकोल्या॥ ६१ ॥
वदतां प्रभुपांडवगुण ईश्वरसम वेदसमहि मामातें ॥
निंदिशि सत्पुरुषाचा दुष्टा दूषूनि न महिमा मातें ॥ ६२ ॥
केला जयद्रथाचा जिंकुनि तुज अर्जुनें वध मघासीं ॥
सन्मान्य तो गणावा दशदर्भीं सूत तूं अधम घासीं ॥ ६३ ॥
युद्ध हरासीं केलें त्वां आयकिलें न काय मत्ता तें ॥
तूं मारिशील त्याला न अतिक्रमिलें जयासि मर्त्तातें ॥ ६४ ॥
जें जेय जाणे त्याचा न शतांशहि तुज कळे वराकास ॥
घालिसि भस्म कराया पार्थशरें निज कलेवरा कास ॥ ६५ ॥
हित कथित्या आप्ताची नीचा ह्मणतोसि जीभ कापीन ॥
तरि वधिन तुला देइल विप-कामा सुरभिचेंहि आपीन ॥६६॥
हा उडवितों तुझी मी बकऱ्याची जेवि शीघ्रतर मुंडी ॥

१ जिभेचें छेदन. २ कृपाला. ३ आपल्या मरणास कारण अशा. ४ कृपातें. ५ तृणीं. ६ माझ्या पित्यानें (द्रोणानें). ७ अर्जुन. ८ नीचास. ९ कास.

ऐसें बोलुनि देता झाला गुरुपुत्र शीघ्र तरमुंडी ॥ ६७ ॥
हां हां ह्मणे सकृप कृप नृप कृपण जसें धना तसें धरि त्या
कीं गतसारा सरिता तेविं पडाव्या स्ववाहिनी न रित्या ६८॥
कर्ण ह्मणे सोड नृपा योग्यचि हा होय शासना सत्य ॥
द्विज-मद-गद शमवु सखा जोडुनि या हो यशास नासत्य६९॥
द्रौणि ह्मणे कुमति तुला तैसी आह्मांसि न क्षमा सोडी ॥
मोडील अर्जुन तुझ्या दक्षाच्या वीर भद्रसा खोडी ॥ ७० ॥
भूप ह्मणे गुरुपुत्रा क्रोध त्यजुनि प्रसन्न हो पावें ॥
सर्वांहीं एकमतें जोडुनि यश मज तुह्मींच ओपावें ॥ ७१ ॥
कृपहि विनवितां होउनि मृदु कर्णाला ह्मणे तुझा गर्व ॥
सर्व श्वेताश्व हरिल त्या खलरतिजानिचा जसा शर्व ॥७२॥
द्रौणिकृपांतें जोडुनि कर जों यत्नें नरेंद्र समजावी ॥
तों ये युधिष्ठिर-चमू जी लंघुनि सिंधु कीर्तिसम जावी॥७३॥
कर्ण पुढें होय तया पाहुनि ते वीर ह्मणति या कलहा ॥
जो हेतु नीच दुर्मति दुर्जन दुर्योधनाप्त तो खल हा ॥ ७४ ॥
मारा द्या कोठें हा पाडा तोडूनि हूं करा चूर्ण ॥
ऐसें गर्जुनि पांडव संजय पांचाळ धांवले तूर्ण ॥ ७५ ॥
त्यां सर्वांसहि ताडुनि भग्न करी जेविं वात मेघास ॥
त्या काळमुखीं पडला पांडवभटसंघ तो गमे घास ॥ ७६ ॥
अर्जुन धांवे कोपें रोपें त्याच्याहि तो करा ताडी ॥

---

१ अश्वत्थाम्याचा गर्वरूप रोग. २ कर्ण. ३ अश्विनीकुमार. ४ दुष्ट मदनाचा. ५ शिव. ६ कर्ण. ७ तृण.

नाडी करूनि विकळा पळभरि गांडीवचापही पाडी ॥ ७७ ॥
धरि कोप अजितसारथि वाटे आतांच नागविल याला ॥
गरुडातिक्रम करितां पावेल कसा न नाग विलयाला ॥७८ ॥
झालें तसेंचि राया केला विरथ क्षणांत तो मानी ॥
त्यजिला असताचि करुनि तदवनपण[2] शक्र-सूर्य-सोमानीं ७९
कर्ण कृपरथीं चढला पार्थापासूनि फार तो भ्याला ॥
कीं त्यासि यशाहुनि बहु- मत जीवित जेविं वित्त लोभ्याला॥
धांवे धनंजयावरि दुर्योधन मित्र-परिभव-क्षोभें ॥
तों कृप भाच्याशि ह्मणे प्रभुला रक्षूनि सद्यशें शोभें ॥८१॥
आटोपुनि गुरु-पुत्र प्रभुसि ह्मणे ऐक भविकवचन[3] रहा ॥
विजयापुढें ह्मणेलचि अंगीं घालुनिहि पविकवच[4] नर हा ८२॥
असतां सजीव मी तुज योग्य नव्हे अर्जुना-सवें युद्ध ॥
वारुनि किरीटिला यश द्याया तुजलाचि जोडितों शुद्ध॥८३॥
भूप ह्मणे शक्ति असे परि न ह्मणसि अर्जुनासि मारीन ॥
स्नेह मनीं आहे तो न ह्मणों दे ह्मणुनि ह्मणसि वारीन॥८४॥
आचार्य पुत्रवत् परि- रक्षण करितो रणांत मद्रींचे ॥
तूंही सांडों देसी पुण्य यशोधन बळेंचि पदरींचें ॥ ८५ ॥
नकळे करिसी तूं मम शत्रूपेक्षा रणांत धर्माच्या ॥
प्रेमें कीं कृष्णेच्या कीं मांद्यें[5] आमुच्याचि कर्माच्या ॥ ८६ ॥
करिते प्रवाह मिळतां गंगा मलिनाहि धौत[6] मीना कीं ॥

१ अर्जुन. २ कर्णरक्षणाचा पण. ३ कल्याणदायक भाषण.
४ वज्रकवच. ५ मंदपणानें. ६ स्वच्छ.

सत्संगति श्रिता तसि अदिति-सखी होउ गौतमी नाकीं॥८७॥
द्रौणि ह्मणे सत्य वदसि पांडव आह्मांस फार आवडती ॥
सन्मति गुरुसि बहुमता जैसी रामेश्वरासि कावड तीं ॥८८॥
त्यासि द्रोण बहु प्रिय जैसा तैसाचि मीहि कुरुपा हें ॥
काय प्रेम वदावें तनु जीवितसे सुशिष्य गुरु पाहें ॥ ८९ ॥
परि त्यांहीं आह्मीं त्या प्रेमासि रणांत सोडिलें पाणी ॥
करितों तुझेंचि जैसें करिती विधिचेंचि शासन प्राणी ॥९० ॥
कर्णादि सर्व आह्मी नित्य यथाशक्ति करितसों युद्ध ॥
काय करावें दुर्जय धर्म त्रिजगीं तसा नसे शुद्ध ॥ ९१ ॥
प्रकृतिकुटिल पापाचल खल तूं मानिसि तसेंचि अन्यासी ॥
पाहे जडरूपचि जड तें सर्व ब्रह्मरूप संन्यासी ॥ ९२ ॥
शिरतों पांडव-कटकीं शिरला एकार्णवीं जसा कोल ॥
जातों युद्ध कराया शत्रुशर बरे न हे तुझे बोल ॥ ९३ ॥
सृंजय-पांचाळ-कटक आजि स्वरुधिर-नदींत वाहेल ॥
पाहेल धर्म अश्व- त्थाममय सकळ सांचेत राहेल ॥ ९४ ॥
ऐसें बोलुनि गुरुसुत गांठुनि पांचाळसोमकांस वदे ॥
हूं वर्षा शस्त्रांहीं द्यावे सोडूनि सोम कां सवदे ॥ ९५ ॥
स्वीकारी घनतेला पर-निकर द्रोणतनय नगतेला ॥
कीं शोभला अयशा भी सुकुलज जेंवि जडित नग तेला९६

१ अश्वत्थाम्याची आई. २ गंगेची कावड. ३ आज्ञा. ४ वराह.
५ मेघपणाला. ६ शत्रूसमूह. ७ पर्वतपणाला.

परदलनीं द्रौणि गमे घन-निकरीं निकर तो मरुत रचितो ॥
कीं करितो शर-दहनीं पांचाळ त्रिपुर-होम रुद्रचि तो९७ ॥
तों धृष्टद्युम्न ह्मणे कथिला तुज धर्म काय हा तातें ॥
दुष्टा दुर्बल-दलनीं फळ आलें सांग काय हाता तें ॥ ९८ ॥
असशील शूर तरि ये चापीं शर शीघ्र जोडुनी भीड ॥
कविनें कवि-राजाशीं सांगावा वाद सोडुनी भीड ॥ ९९ ॥
ऐसें बोलुनि हाणी द्रौणिप्रति अतितरोग्ररोपानीं ॥
गुरुसुत ह्मणे रहा क्षण पाठवितों मृत्युमार्गसोपानीं ॥ १००॥
खर-तर-वर-शर-विद्ध द्रुपदसुत ह्मणे तयासि हा मूढा ॥
कशि आयकिली नाहीं काय मदुत्पत्तिची कथा गूढा १०१
आधीं मी द्रोणाला मग मारावें तुला असें आहे ॥
हा हेत पिसाचा हे भुज पुरवितिल न विलंब या साहे१०२
धर्मीं करिसी द्वेष प्रेमा दुर्योधनीं खळीं अधर्मीं ॥
त्यजिलें स्वकर्म ऐशा भ्रष्टाचा कां करूं नको वध मी १०३॥
अश्वत्थामा कोपें लक्षीकृत[2]-काम रुद्रसा पाहे ॥
गमले नसतिल लक्ष्मण घनरवसे[3] कां मरुद्रसापा[4] हे ॥१०४॥
स्नात क्षतजें झाले आयकिलाही न हा निकर वीरें ॥
पळसें वरिलि वरावी कां न असुनि हीन हानि करवीरें[5] १०५
त्या दोघांतें युद्धीं मानवले अर्जुनादि भट सारे ॥
सुर वदले दाखवितो रंगांत नटासि नृत्य नटसा रे ॥ १०६ ॥

---

१ अत्यंत कठिन बाणांनीं. २ मदनावर ज्यानें लक्ष धरलें. ३ मेघनादसे. ४ मरुत्-रसा-प-देवेंद्रास. ५ कण्हेरपुष्पानें.

एक मुहूर्त महारण झाला मग मोह तो जसा बोधें ॥
क्रोधें केला भग्न द्रोणाचार्यात्मजें महायोधें ॥ १०७ ॥
केला रथिशतकाचा बाणांच्या एकवेळ विलय शतें ॥
तुमच्या कटकीं ऐसें द्रौणिविना कोण मेळविल यश तें १०९
वधिलें महारथत्रय मग गुरुपुत्रें शरत्रयेंचि रणीं ॥
द्रौणिशरीं तेज अहित- हर रविच्या तिमिरहर जसें किरणीं॥
केला बहु पांचाळ- क्षय हरिसारथिसमक्ष खवळून ॥
हतशेप बहु पळालें त्या विरथद्रुपदसूनुजवळून ॥ ११० ॥

---

# अध्याय १८.

न धरिति भीम धनंजय येतांही द्रोण जवळ लेखा ते ॥
गमळे विश्वप्रळयीं काळांतक जेविं खवळले खाते ॥ १ ॥
गमला शिरतां पांडव- सैन्यसमुद्रांत मत्त मगर मला ॥
सात्यकि-शर-दर्शित-पथ- सद्गतिशीं सोमदत्त मग रमला ॥२॥
कुरुवृद्धवधक्रोधें बहु कौरव-योध धांवले शमना ॥
सात्यकि न स्पर्शों दे तदिषु तसा भीरुभाव-लेश मना ॥३॥
शक्राचा रुद्र जसा सात्यकिचा धर्म होय कैवारी ॥
विघ्नें विघ्नेश्वरसा कौरव-कटकें पळांत तें वारी ॥ ४ ॥
कुरुबळ मथितां धांवे धर्मावरि तो सु-शिष्य-नाक-द्रू ॥

१ उत्तम शिष्यांस कल्पद्रुम असा द्रोण.

प्रसवे तच्चापलता बाणगणा जेंवि दुर्जना कद्रू[२] ॥ ५ ॥
धर्म न साहे समरीं द्रोण स्वध्वज धनुष्य खंडी तें ॥
तो बाण-सहस्त्रीतें योजी देवेश[३] जेंवि चंडीतें ॥ ६ ॥
त्या बाण-सहस्त्रीनें गुरु केला विकळ दोन घटिका हो ॥
सावध होऊनि ह्मणे प्रेमा होइल जनांत लटिका हो ॥ ७ ॥
योजी अजातरिपुवरि वातास्त्रातें रणांत तो विप्र ॥
त्याचें स्तंभन[४] धर्म प्रत्यस्त्रें करुनियां करी क्षिप्र ॥ ८ ॥
तों कृष्ण ह्मणे धर्मा गुरुसीं रण तूं करूं नको परत ॥
जपतो नित्य तुला हा त्वद्ग्रहणीं पण करून कोपरत॥ ९ ॥
याचा अंतक धृष्ट- द्युम्न उद्यां यासि तोचि मारील ॥
त्यावांचुनि यासि रणीं साक्षात् पविपाणिही[५] न वारील १०
राजानें राजासीं भांडावें तद्वितरांस वरजावें ॥
त्वां हे सेना घेउनि राजा धृतराष्ट्र-सूनुवर जावें ॥ ११ ॥
भीमार्जुन कौरवबळ वधितिल यांला सहाय मी आहें ॥
परकटक मुखीं भरिलें काळाजगरें[६] करूनियां आ हें ॥ १२ ॥
ऐसें हित सांगे जो मधु-कैटभ-संकटीं अंजा[७] तारी ॥
देउनि मान प्रभुला गेला भीमाकडे अजातारी ॥ १३ ॥
पूर्वीं जेंवि सुरचमू भ्याली पाहोन अंधकारा[८] तीं ॥
कौरव-पांडव-सेना भ्रमली पाहोन अंधकारा ती ॥ १४ ॥
दुर्योधनें विनविले धरिती बहु दीपिका पदात[९] रणीं ॥

१ सर्पजनना. २ सर्पमाता. ३ शिव. ४ रोध. ५ इंद्रही.
६ काळ-अजगरें. ७ ब्रह्मदेवास. ८ अंधकासुरास. ९ पदाति.

गमले दीप-मिषें सुत- मित्रार्थ प्रगटला तदा तरणी ॥ १५ ॥
नारद-पर्वत-वचनें दिग्देवी अप्सरा भुजग यक्ष ॥
दीप धरिति विद्याधर गंधर्व सुरर्षिही बहुत लक्ष ॥ १६ ॥
पांडव-कटकींहि धरिति सर्वहि पादात सुजन दीपातें ॥
कोण न देइल समयीं असतां श्रमत्यास भुज नदीपातें ॥१७॥
दीपक सुगंध तैलें क्षिति-गगन-तळीं अनंत पेटविले ॥
स्वंभर उणा करित्यांतें सुमणि अनंतेंचि काय भेटविले १८
प्रतिगज सप्त प्रतिरथ दश दीप प्रतिहयास एक रणीं ॥
ऐसी अचाट यांची लोकीं कोणासही न ये करणी ॥ १९ ॥
व्यूह रचुनि बंधूंतें सांगे व्हायास यश सुयोधन हो ॥
यत्नें गुरु रक्षावा द्रुपदसुताल्लाचि वश सुयोध न हो ॥२०॥
धृष्टद्युम्ना गुरुसुत कर्ण जया भस्म करिल रोपांनीं ॥
भीमा मी मर्दिन मग मारावे शेष-शत्रु गोपांनीं ॥ २१ ॥
गुरुसचि रक्षा ह्मणजे विजयश्री निश्चयेंचि मज वरिल ॥
रवि-वरिल घन-पटलसें सर्वहि संकट टळेल मजवरिल ॥२२॥
गुरुचक्रगोप होउनि कृतवर्मा शल्य यत्न हे मानी ॥
करिती बहु कीं शोभा सुयशानीं ती न रत्न-हेमानीं ॥२३॥
धर्महि गुरुलाचि वधा ऐसी आज्ञा करूनि सैन्यातें ॥
धांवे आपणाहि यशें जो दे साधारणत्व वैन्यातें ॥ २४ ॥
कीं तो झाला तुमच्या तनयाचा विप्र कारभारी हो ॥

---

१ आपला भार. २ शेषानें. ३ अर्जुनास. ४ गुरूचे चक्र-रक्षक. ५ पृथुराजास.

केले तुह्मी धरुनि पथ अनयाचा विंप्रकार भारी हो ॥ २५ ॥
केला धर्म विरथ कृत- वर्म्यानें खंडिलेंहि कवच रणीं ॥
तें सर्व भस्म करिता परि त्याची बहुत भक्ति तवचरणीं २६॥
शक्रें बळसा वधिला सात्यकिनें सोमदत्त-सुत भूरी ॥
त्यांचि करविले स्वपरां- करवीं काळाऽनळांत हुत भूरी २७
सात्यकिवरि गुरुनंदन धांवे त्यावरि घटोत्कच पलाश ॥
झाले रक्तस्नात द्विज राक्षस जेविं पुष्पित पलाश ॥ २८ ॥
मूर्च्छित केला द्रौणि प्रथम क्षणदाचरें दशशरानीं ॥
वदले पर पशुहि बरा कीं व्याघ्राच्या शिरे न शश रानीं २९
मग सावधान होउनि गुरुपुत्रानें धृतोग्रकोपानें ॥
मृतसाचि पाडिला तो राक्षस एकाचि तीव्ररोपानें ॥ ३० ॥
मूर्च्छित होतां राक्षस तो मागें शीघ्र काढिला सूतें ॥
कीं पर्वतता घेउनि देईलचि अशनिता ढिला सूतें ॥ ३१ ॥
भीमें सुयोधनाचें ध्वज-कार्मुक-खंडन प्रथम केलें ॥
तच्चाप-पंचक लया कुरुपतिनें मग अनुक्रमें नेलें ॥ ३२ ॥
त्यावरि खंडी त्याच्या शक्तीतें भूमिप त्रिधा राजा ॥
पविधाराधिक तीव्रचि गमल्या त्वत्पुत्र-पत्रिधारा ज्या ॥ ३३ ॥
स्वशिरीं फिरवुनि निरखुनि रविमंडल भीम तो गदा घाली ॥
कुरुपतिरथीं पडे ती जेविं गळां तीव्र भोगिदाघाली ॥ ३४ ॥

१ विपरीताचार. २ धर्माची. ३ बळासुरसा. ४ बहुत. ५ मांसभक्षक. ६ पळसवृक्ष. ७ राक्षसें. ८ तीक्ष्णबाणानें. ९ सुर्यातें. १० तुझ्या पुत्राच्या बाणधारा. ११ तीव्रभोगिदात्री पातकपंक्ती.

प्रथम उडी घाली क्षिति- वरि तव सुत मग गदा रथावरि ती॥
नातरि हय-सूत-रथां- सह नृपतनु सगरसुत[1]-पथा वरिती ३५
नंदक-रथीं कुरुपति स्वीकारुनि मानसत्वरा गेला ॥
मेलाचि सर्व वदले कीं रुद्रसमान-सत्व रागेला ॥ ३६ ॥
कर्णें सहदेव विरथ केला मग खड्ग-चर्महि नाहीं ॥
तद्यत्नांहीं कष्टचि मेळविला जेविं धर्म-हीनाहीं ॥ ३७ ॥
पूर्वी जी भीमाची सहदेवाचीहि तीच गति केली ॥
जरि तो[2] परनर-कुंजर- निकरीं साक्षात् मृगाधिपतिकेली[3]३८॥
बाळा न विशिष्टासीं कोणीहि कधींहि करुनि युद्ध तरे ॥
झालासि बहु पृथेच्या लाडें भावाचियाहि उद्धत रे ॥ ३९ ॥
प्राणचि कुंतीचा तूं यास्तव केलासि आजि म्यां मुक्त ॥
जिष्णुकडे जावें त्वां अथवा कुंती कडेचि हें युक्त ॥ ४० ॥
ऐसें हांसोनि वदे कुंतीचें वाक्य आठवी न वधी ॥
कीं सत्यसंध[4] दाता तो कर्ण महायशा नव्हे नैवधी[5] ॥ ४१ ॥
कर्ण शिरे परकटकीं जैसा जलधींत सुत हिमाद्रीचा ॥
मग जनमेजयनामक- पांचाल्य-रथींच सुतहि माद्रीचा ॥४२॥
सहदेव मनिं ह्मणे हा जन तव नुति[6] काय न शिकला पीडा
ऐसी नसो असो मृति पाव प्रणतासि शशिकलापीडा[7] ॥४३॥
गुरुवरि विराट धांवे त्यासि रणीं विरथ मद्रपाळ करी ॥

---

१ स्वर्गपथास. २ सहदेव. ३ सिंहासारिखा क्रीडा करणारा.
४ सत्यप्रतिज्ञ. ५ क्षणिकबुद्धि. ६ स्तुति. ७ चंद्रशेखरा शिवा.

तदनुजनि शतानीकहि ये हरिवरि जेवि चपळ बाळ-करी४४
स्याहि शतानीकाला येतांचि रणांत शल्य तो खपत्री ॥
दे बहु कुरुपतिस जसा असुरवधें शतमखास तोख पवी॥४५॥
मृतबंधुरथीं बैसे वीरवर विराट हाक दे वर्षे ॥
पर्वत ह्मणे न दुर्लभ मोक्षहि या काय नाक देवर्षे ॥ ४६ ॥
कांपे थरथर सुटतां शल्याचा वज्रसा सुरोप मही ॥
बसतांचि उरीं झाला मूर्च्छित मत्स्येश तो सुरोपमही ॥४७॥
सारथि तेथुनि मागें त्यासि ह्मणत हाय हाय काढी गा ॥
शल्य परबळा उडवी पवन जसा कापसाचिया ढीगा ॥४८॥
शल्याकडेचि रथवर चालविला सर्वखळविलापार्थ ॥
जेणें स्वसम अजित या सुयशें सर्वत्र कळविला पार्थ ॥४९॥
वारिल न प्रळयींचा पळही येवोनि आड वारा ज्या ॥
त्यास अलंबुष राक्षस वाराया होय आडवा राजा ॥ ५० ॥
विरथ क्षणांत केला गेला तत्काळ तो पळी शरण ॥
रुद्र-प्रातिवीरासीं करिल तसा काय हो पलाश रण ॥ ५१ ॥
पळवुनि पलाश पार्थे पवनें तरुसे उदंड लोळविले ॥
बोळविले परलोकीं बहुतांकरवीं स्वहस्त चोळविले ॥ ५२ ॥
नकुळ-सुत-शतानीकें तव नंदन चित्रसेन जो चुलता ॥
केला विरथ न जाता कृतवर्म्या शरण निश्चयें डुलता ॥५३॥
पाडी वृषसेन उरीं हाणुनि शर वज्रभासुर द्रुपदा ॥

१. विराटाचा कनिष्ठ बंधु. २ इंद्रास. ३ वज्र. ४ पर्वतनामा ऋषी. ५ देवासारिखाही. ६ तृणा. ७ राक्षस. ८ तेजस्वी.

पळवी सूत ह्मणे हा कृष्णा श्रित-वल्लभा. सुरद्रुपदा[1] ॥ ५४॥
सोमकचमू पळे घन- तिमिरींही गमति हित न दीप तिला ॥
अंधारालाचि भजति जेविं असुर शक्रजित नदीपतिला ५५॥
दुःशासनें विरथ जों केला प्रतिविंध्य तों अनुज अवघे ॥
झाले सहाय कलिजित- धर्मा भुज विष्णुचे जसे चवघे॥५६॥
शकुनि करी नकुळाला मूर्च्छित मग नो नृपा तव श्याला[2] ॥
पळवी सूत ह्मणे हो या काळमुखीं न पात वश्याला ॥ ५७ ॥
करिती महारण बळी शतमख शंबर[3] तसे कृप शिखंडी ॥
भैरव[4] वैर वहाती ते जेंवि महासरीसृप[5] शिखंडी[6] ॥ ५८ ॥
कार्मुक-कर्तन-कुपितें त्या आचार्यें कृपें नृपेंद्र-हितें ॥
केला मूढ शिखंडी युद्धीं बहु मानलें सुरांसहि तें ॥ ५९ ॥
तेव्हां इकडिल तिकडिल झाले बहु युद्धभूमिवर कडबा ॥
केलें त्वां मसण कुरु- क्षेत्र असे शुद्ध भूमि वरकड बा ॥६०॥
धृष्टद्युम्न गुरुवरि द्विरदावरि सिंहसा उठे रागें ॥
पांडव पांचाळ सकळ रक्षाया त्यासि धांवले मागें ॥ ६१ ॥
द्रोणातें रक्षाया सकळ तुझे पुत्र सर्वही जपले ॥
खपले ते खपलेचिं प्रभुजि बहु बरेचि शेषही टपले ॥ ६२ ॥
सेनासमूह गमले अन्योन्य जिगीषु[7] दोन अर्णवसे ॥
धृष्टद्युम्न-समीपचि सात्यकि गुरुच्या समीप कर्ण वसे॥६३॥

---

१ कल्पतरूच्या स्थाना. २ शकुनीला. ३ शंबरासुर. ४ भयंकर. ५ मोठा सर्प. ६ मयूर. ७ जिंकण्याची इच्छा करणारे.

प्रथमचि धृष्टद्युम्ना दे सोडुनि बाण विप्र तापातें ॥
कीं खंडी चापातें पापातें जाणवि प्रतापातें ॥ ६४ ॥
वाटे वधिलचि गुरुला जैं कोपें सज्ज तो नव धनु करी ॥
क्षितिसि नखांहीं हरि जों करिचा चित्तांत ये न वध नुकरी ॥
सोडी घोर शरव्रज बहु भ्याले कुरुपमुख-कळा बदले ॥
समरें[1] द्रोणायास्तु[2] स्वस्ति असें देव दानवाहि वदले ॥ ६६ ॥
कर्णें द्वादशधा तो[3] केला जैसा अही नभोगामी[4] ॥
तें पाहुनि रोमांचित झालों राया अहीनभोगा[5] मी ॥ ६७ ॥
द्रोण द्रौणि सुयोधन कृतवर्मा शल्य शकुनि हे सारे ॥
युगपत् ताडिति ह्मणती हूं मारा दुष्ट सर्प ठेसा रे ॥ ६८ ॥
युगपत्[6] सर्वांचींही द्रुपदात्मज सकवचें उरें भेदी ॥
आधीं द्रुमसेनाचें मस्तक मग कर्ण- कार्मुक च्छेदी ॥ ६९ ॥
पुच्छाचें हरिस तसें धनुचें कर्तन[7] असह्य कर्णास ॥
प्राशील त्यास गमतो सिंधूच्या जेविं घटज[8] अर्णास[9] ॥ ७० ॥
सक्रोध योधमणि तो शीघ्र करुनि सज्ज कार्मुका सारीं[10] ॥
धृष्टद्युम्ना अरिवरि करि खर-शर-वृष्टि वार्मुकासारीं[11] ॥ ७१ ॥
तों सात्यकि कर्णावरि वासव बळिवरि जसा तसा आला ॥
झाला दारुण रण सम गमले कोणास कोणहि न भ्याला ७२

१ युद्धीं. २ द्रोणाकारणें कल्याण असो. ३ बाणसमूह. ४ आकाशगामी. ५ उत्तम भोग भोगणाऱ्या. ६ एककालीं. ७ कापणें. ८ अगस्ति. ९ उदकास. १० श्रेष्ठा. ११ घनवृष्टितुल्य.

अस्त्रें त्वत्पुत्रांचीं कर्णाचींही निवारिलीं क्रोधें ॥
वृषसेन पाडिला शर हाणोनि उरांत त्या[1] महायोधें ॥ ७३ ॥
सुत-शोक-तप्त होउनि सात्यकिसीं कर्ण करि महायुद्ध ॥
शुद्धयशा वृषसेनहि झाला तितुक्यांत त्या रणीं बुद्ध ॥ ७४॥
सात्यकिला दाखविती ते वृष वृषसेन बाप लेंक बळ ॥
ह्मणती काळमुखीं हो रिपुवपु कीं देह आपलें कवळ ॥ ७५ ॥
सात्यकिनें सहसा त्या दोघांचेही सुबाण सोडून ॥
तत्काळ पाडिले हो हस्तापासाव चाप तोडून ॥ ७६ ॥
ते सात्यकितें ह्मणती शर सोडुनि सजुनि चाप नव दोघे ॥
अभिमन्युचा ह्मणे मग कां हाय तुझाचि बाप न वदो घे ॥७७॥
सात्यकिसीं रण करितां ऐकुनि गांडीवनाद कुरुपातें ॥
कर्ण ह्मणे हा[2] येतो जय साधाया स्वकार्य गुरुपातें[3] ॥ ७८ ॥
त्या सौभद्रापरि हे सात्यकि पांचाळ वेढिले असती ॥
बहु आह्मी देतों या दोघांला आजि यमपुरीं वसती ॥ ७९ ॥
पार्थास कोंडिलें हे दोघे आह्मी असें न समजावें ॥
तिकडेचि त्यासि समरीं रोधाया बळ समुद्र-सम जावें ॥८०॥
हें प्रिय हित मित्रवचन परिसुनि नृप शकुनिला ह्मणे मामा॥
नामा अन्वर्थ करा शीघ्र उठा सफळ हो करा कामा ॥ ८१ ॥
देउन कां सांपडतां अनिल पशु कचीस[4] मान होमा मी ॥
जा वासविवर मान्या देवींत शची-समान हो मामी ॥ ८२ ॥

१ सावध. २ अर्जुन. ३ द्रोणाच्या पातानें. ४ फजितीस, कचाटीस.

अयुत गज अयुत रथ घे जे साक्षात् सिंह परमहेभाचे ॥
दुःशासनादिक दिले तुज समर-सहाय परम हे भाचे ॥ ८३ ॥
त्या पांडुसुतां असुरां हरिसा सोडोनि उग्र शर भाजी ॥
तीं सत्वें कवण यशें ख्यातें होतिल वशें न शरभा जीं ॥८४॥
या बहुमानें फुगला गेला धांवोनि अर्जुनावरि तो ॥
ज्याचा सुकृती मरणा कीं कुकृती शत्रु अर्जुना वरितो ॥८५॥
जाउनि धनंजयावरि झाले भट सर्व शलभसे नाहीं ॥
कैसा तरी करावा सिंहाचा भंग कलभ-सेनाहीं ॥ ८६ ॥
शकुनि विरथ होय वसे वर्ण जपत चारि पुत्रयानींच ॥
भंगिन ह्मणे परास न जिंतुनि मनिंच्या रिपु-त्रया नीच ॥८७॥

# अध्याय. १९

रविचा चहुंकडुनि तमें मंदप्रभ न कर वेढिला होतो ॥
सात्यकि तसाचि कौरव- कटकाला न करवे ढिला हो तो॥१॥
अर्जुन तसाचि सात्यकि बहु मारुनि शेष कुरुकटक पळवी ॥
पळ वीर पुढें न उरे सर्वांचींही मुखें रणीं मळवी ॥ २ ॥
सात्यकिला माराया खातचि धांवे तुझा तनय दांत ॥
परि होय विरथ याचें प्रागल्भ्य तुह्मां अशा अनयदांत ॥ ३ ॥

१ शत्रुरूप गजाचे. २ इंद्रसा. ३ तृणाला. ४ करिशावकसेनांनीं. ५ पार्थ मरो हे चार वर्ण. ६ अन्यायवर्ती जे त्यांत.

होउनि विरथ सुयोधन कृतवर्मरथीं चढे कढे कोपें ॥
सोपें द्यूतचि परिभव वीरांचा कठिण संगरीं रोपें ॥ ४ ॥
क्रोधाविष्ट सुयोधन वदला राधासुतासि परिसा तें ॥
गुरुतेंहि दोष लावी खापर वा परम जेविं परिसातें ॥ ५ ॥
वधितां विजय जयद्रथ समर तुह्मींच स्वयें प्रवर्तविला ॥
कदन उगेंचि पहातां कां स्वोत्साह-प्रवाह पर्तविला ॥ ६ ॥
शक्त असोनि निरखितां निज-कटक-कदन अशक्तसे परसे ॥
चाळवितांहि न पेटां केले आर्द्रेंधनें जसे पर्से ॥ ७ ॥
समयीं सोडावें मज ऐसें तुमच्या मनांत जरि होतें ॥
जिंकू पांडुसुतांतें ऐसें वदलां कशास तरि हो तें ॥ ८ ॥
जरि भरवंसा न देतां पडती वुर्द्धास भूल काशाला ॥
येतें तुह्मांसि भापण बहु नीरस जेंवि फूल काशाला ॥ ९ ॥
जरि ठेवितां कर श्रुति- वरि करितों वैर हें कशाला हो ॥
परिभूति रुचे कवणा बाळहि न ह्मणेल वपु कशा लाहो ॥
करणें नसेल माझा त्याग यशचि बहु गमेल जरि शुद्ध ॥
तरि व्हा सिद्ध करा निज- शस्त्रास्त्र-पराक्रमानुगुण युद्ध ११
मौनचि धरिलें द्यावें उत्तर वा त्यास काय काय तिहीं ॥
न दुरुक्ति मनिं धराव्या सुजनांहीं जेंवि बायका यतिहीं १२
पांडव-कटकीं शिरले क्रोधी गुरु कर्ण कारि-कुळीं हरिसे ॥
झाले दुःसह सर्वां केवळ ते प्रळय-पावकासरिसे ॥ १३ ॥

---

१ बाणानें. २ पेटत नाहीं. ३ ओल्या काष्ठानें ४ आगस्त्या ५ दर्भविशेष. ६ पराभव. ७ चाबुक.

बहु वधिले वीर रणीं बहुत पळविले कुलीन योध रणीं ॥
धर्म ह्मणे परतावें जाउ करा पावली न यो धरणी ॥ १४ ॥
विजय ह्मणे श्रीकृष्णा भ्याला प्रभु धर्मराज कर्णाला ॥
जेंवि महाविष-दृष्टिहि अहि महिवरि देखतां सुपर्णाला ॥१५॥
मज हा परिभव दुःसह लावियला जेंवि पाय सापाला ॥
ने रथ मी यासि वधिन विपतरुचा प्रभुसि कायसा पाला ॥
कृष्ण ह्मणे बा दीना माघहि दे कंप न जितका शीतें ॥
तितका देतो यश हा राहों देईल न जितकोशी तें ॥ १७ ॥
तूं एक कीं घटोत्कच आह्मांत समर्थ कर्ण-मदनाशा ॥
विफळा करो पराशा भीम-तनय जेंवि रुद्र मदनाशा ॥१८॥
कीं प्रियसख्या असे त्यां- पाशीं ती दिव्य शक्ति माधवनी॥
कर्ण रणीं कांपवितो बहु मज वृषभासि जेंवि माघ वनीं १९
ने ह्मणसी काय तुला गमला हा वासुदेव वेडासा ॥
वाम अकार्यक्षमही भुज भुजग-मुखीं न देववे डासा ॥ २० ॥
बा जें स्वयें करावें तें सुमहत्कार्य जरि सुतें केलें ॥
तरि त्यांत सत्यसंध- त्व स्वयश व्यर्थ काय गा गेलें ॥२१॥
वत्सा घटोत्कचा ये ऐसें तो पुष्कराक्ष जों बाहे ॥
वाहे नरनारायण-चरणीं मस्तक पुढें उभा राहे ॥ २२ ॥
हा आलों मज आज्ञा काय असें राक्षसेंद्र वदला हो ॥
कृष्ण ह्मणे वत्सा हो कर्णांतक धर्म राज्यपद लाहो ॥ २३ ॥

१ गरुडाला. २ जयेंकरून शोभणारा. ३ मदनाची इच्छा. ४ कर्णापाशीं. ५ वासवी शक्ती. ६ डावा. ७ दंशास. ८ कृष्ण.

शस्त्रास्त्र-राक्षसाऽसुर- माया-बळ जलधि पुत्र तूं पहिला ॥
कर्णाद्यरिक्षय करुनि साधुनि दे निज-पित्यासि या महिला ॥
जिष्णु ह्मणे सत्पुत्रा हो गुहसा सूतपुत्र तारकसा ॥
आह्मां तूं ज्येष्ठ तुझे प्रतिविंध्याद्यनुज पांच तार कसा २५
राक्षस ह्मणे बहु वरें मारीन रणांगणांत कर्णातें ॥
सुरवर कवीस ह्मणतिल रक्षः[१]कृत कर्ण-कदन वर्णा तें ॥२६॥
आज्ञा द्याल तुह्मी तरि देइल गुरुलाहि हा निधन दास ॥
रात्रौ मजसीं भिडतां होईल प्राप्त हानि धनदास ॥ २७ ॥
ऐसें वदतां त्यातें कर्णावरि कृष्ण पाठवी राया ॥
देती भिवोनि कौरव- सेना समरांत पाठ वीरा या ॥ २८ ॥
त्यावरि अलंबुष खचर कुरुराजें धाडिला जटासु[२]रज ॥
त्यासि घटोत्कच मारी त्या वायुपुढें महाभटासु रज ॥ २९ ॥
कुरुपति-रथीं अलंबुष शिर ठेवुनि भीमसूनु पाय नमी ॥
विनयें ह्मणे पहाया आलों आणूनि हें उपायन मी ॥ ३० ॥
वर्षे दुजा अलायुध रात्रिचर महोप[३]लायुधग्रामा ॥
पीडी भीमासाहि घनँ- नाद जसा खळब[५]लायुधग्रामा ॥३१॥
कृष्णें घटोत्कच रणीं रक्षाया भीमसेन आठविला ॥
रामें घननादावरि लक्ष्मणसा तो बलाऽब्धि पाठविला॥३२॥
वैद्युतँ-पावक तरुला तैसा तो त्या अलायुधा कवळी ॥

---

१ घटोत्कचानें केलेलें. २ जटासुरपुत्र. ३ महापाषाणरूप आ-युधसमूहा. ४ इंद्राजित. ५ शत्रुसैन्याचें आयुष्य जाळणाऱ्या रा-मास. ६ विद्युत्संबंधीं अग्नि.

लावी बहु गुरुकटका त्यांचें नाशुनि बलायु धाक बळी ३३
त्याचेंहि शिर तसेंचि त्वत्तनयाच्या रथींच तो पाडी ॥
एका कर्णावांचुनि सर्वांचा शौर्य-धैर्य-मद झाडी ॥ ३४ ॥
प्रकटी बहुशत दुस्तर माया तो वीर्यमत्त मायावी ॥
कुरु ह्मणति यापुढें तों न मयश्री देवसत्तमा यावी ॥ ३५ ॥
शंबर शंभरहि उणे वाटे कांहींच न मय मायावी ॥
अत्युग्रता कधींहि न भीमाच्या सूनुसम यमा यावी ॥ ३६ ॥
कौरव कर्णासि ह्मणति राक्षस हा स्पष्ट कल्पनटशील ॥
किति भुज-बळें तराया दुस्तर-गर-सागरासि झटशील ३७
नेणे कांहींच असा माया-शस्त्रास्त्र-बळ-विलास मय ॥
बा शेवटील येणें आह्मां सर्वांसि कळविला समय ॥ ३८ ॥
बहु मारिले पहा हा मारिल उरल्या बळा समस्तातें ॥
केलों अशेष अंधचि आह्मी डोळसहि या तमस्तातें ॥ ३९ ॥
ती ईश्वरें जशी त्या महिपावरि योजिली महाशक्ती ॥
त्वां या घटोत्कचावरि योजावी वासवा महाशक्ती ॥ ४० ॥
भीम धनंजय करितिल काय न ते मानुपाद मायावी ॥
हा वीर वधिल जो त्या विजयश्री निश्चयेंचि बा यावी ॥ ४१ ॥
त्या भीताभयदाच्या हे भीत-प्रार्थना मना आली ॥
झाली कल्पलतेची सद्रीति करूनि कामना आली ॥ ४२ ॥
खचरशतघ्नीनें हय बांधिले होते तशांत सुचवीले ॥

१ बल आणि आयुष्य. २ कल्पांतीं नर्तन कर्त्या शिवा सारिखा. ३ दुस्तर विष मुद्रास. ४ राक्षस. ५ सर्वी. ६ राक्षस. ७ या शक्तीनें.

ते भगवत्संकल्पें कोपेंही तन्मनास रुचवीले ॥ ४३ ॥
कर्णें शक्तीस जसा सुरराजें घालितांचि कर पविला ॥
गिरिसा गुरु कठिनहि तो खचर त्रासें मनांत करपविला ॥
क्षिप्र पळे विंध्याकृति होय भेरे भीमें खचर तो खांतें ॥
तत्-हृदयीं शक्ति शिरे कौरव-बल-चित्तवृत्ति तोखांत ॥ ४५ ॥
राक्षस-वक्ष विदारुनि मागें नाहींच शक्ति ती फिरली ॥
ऊर्ध्वपथीं परमप्रिय तें स्वामीला कथावया शिरली ॥ ४६ ॥
मरतांहि पांडवप्रिय अद्भुत केलें घटोत्कचें परिसा ॥
सन्मस्तक डोलेसें पितृ-हित न करील पुत्र तो अरिसा ॥४७॥
पितृ-हित किमपि न घडलें धरुनि मनामाजि भाव हाचि रडे
करुनि बृहद्देह पडे तैं कुरुकटकैकदेश बा चिरडे ॥ ४८ ॥
गुरु-शँव-भारें कौरव- सेना अक्षौहिणीच तो खपवी ॥
तेजस्वी सुत जनका दे जेंवि हरिस न तेंवि तोख पवी ४९
शक्र जसा वृत्रवधीं सुर-सिद्ध-महर्षि-साध्य-धीरांहीं ॥
स्तविला घटोत्कच-वधीं कर्ण तसा कौरवादि-वीरांहीं ॥ ५० ॥
बसुनि नृपरथीं स्ववळीं गेला कांपवित कर्ण वसुधेतें ॥
साधुनि सुकीर्तितें सुर- पति जेंवि मथूनि अर्णव सुधेतें ५१
दुदुंभि-पणवप्रमुखें वाजविती जे प्रवीण ते वाद्यें ॥
श्रित हर्षविले कर्णें जैसे रामें समस्त देवाद्यें ॥ ५२ ॥

---

१ शिरे. २ भयंकर. ३ घटोत्कच. ४ आकाशांत. ५ हर्षांत.
६ इंद्राला. ७ विशाळ प्रेताच्या भारानें. ८ वज्र.

# अध्याय २०.

पांडव घटोत्कच-वधें अति-दुस्तर-शोक-सागरीं पडले ॥
अभिमन्यु-वधीं जैसे सोडुनि धृतिला तसेचि ते रडले ॥ १ ॥
भेटे जयासि हसतां दिसति नभीं जों मयूख दशनाचे ॥
हरिसा गर्जे होउनि आनंदाच्या भरासि वश नाचे ॥ २ ॥
निर्धन निधिच्या जैसा पावे अत्यंत हर्ष लाभानें ॥
वाटे तसाचि भगवान् सजिला अत्यंत हर्षला भानें ॥ ३ ॥
पार्थ ह्मणे गोविंदा कारण या कोण हर्ष-हास्याला ॥
धृतराष्ट्राच्या व्हावा अस्मच्छोकांत हर्ष हा स्याला ॥ ४ ॥
भगवान् वदे प्रियसख्या शक्ति अमोघा घटोत्कचीं पडली ॥
वा कधिंही न घडावी जी सुमहत्कार्य-सिद्धि ती घडली ॥ ५ ॥
वर-कवच-कुंडलार्पण करुनि महाशक्ति जोडिली होती ॥
अर्जुनजी न तुह्मांवरि अल्पाविषयींच सोडिली होती ॥ ६ ॥
याच्या अंगीं असतें कवच झळकतीं सुकुंडलें कानीं ॥
तरि हरिलें असतें धृत- राष्ट्राच्या अमृत-कुंड लेंकांनीं ॥ ७ ॥
कर्ण निमालाचि असें जाण सख्या निश्चयेंचि तूं जरि हा ॥
असता शक्तिकर दुजा अरिहा स्वामीच ह्मणविता तरि हा ॥ ८ ॥
शक्र यम वरुण धनपति जिंकुनि तत्कीर्ति कर्ण वारिता हो ॥
केला शिवप्रसादें हा घटजें जेंवि अर्णव रिता हो ॥ ९ ॥

---

१ अर्जुनास. २ किरण. ३ दंताचे. ४ स्मृतीनें. ५ आमच्या शोकांत. ६ शकुनीला. ७ अगस्तीनें.

असता सकवच-कुंडल तरि कर्ण सख्या जगत्त्रयीं अमर ॥
तूं गांडीवें मीहि न चक्रें शकतों करावया समर ॥ १० ॥
हृत-कवच-कुंडलासहि पाहुनि समरीं भ्रमेल वासवधी ॥
सत्य शपथ करितों तो न त्वदितर[१] जो सुवीर यास वधी ११॥
जेव्हां चक्र बुडेल ईवर्भ्री[२] बहु संकटीं वृष पडेल ॥
होइल असावध तुला याचा तेव्हांचि बा वध घडेल ॥ १२ ॥
मागध चैद्यहि वधिला म्या योगें[३] कीं न हो तुज विषाद ॥
व्यंगुष्ठ[४] करविला म्यां गुरुकरवीं एकलव्यहि निषाद ॥ १३ ॥
योगबळें म्याचि सख्या आजि अलायुध घटोत्कचाहि वधिले ॥
पूर्वीं हिडिंब-बक-मुख बहु हे गरशरचि काळिजामधिले ॥१४॥
दुर्योधनासि मिळते मगधपति-प्रमुखवीर-वर जरि ते ॥
धरिते बळ रण करिते अरितेज समस्त सर्वथा हरिते ॥ १५ ॥
काळें राहु[५] गिळाया योजावा वीर-सत्तमा रविला ॥
तेविं वृषावरि योजुनि म्यां राक्षस वीर मत्त माराविला ॥१६॥
कर्ण न वधिता तरि मज मारावा लागताचि हा चक्रें ॥
कीं ब्रह्ममख-द्वेष्टा वधिलाजाता न संगरीं शक्रें ॥ १७ ॥
आजिवरि तुह्मांकरितां म्यां हा राक्षस उपेक्षिलाहोता ॥
हो तारक या तुमचें दास्य[६] रणमखींहि जाहला होता[७] ॥ १८ ॥
धर्म-द्वेषि वधावा राक्षिलि नाहीं जरि प्रतिज्ञा ते ॥

१ तुजहून इतर. २ भूरंध्रीं ३ युक्तीनें. ४ अंगुष्ठहीन. ५ नामविशेष. ६ कोळी. ७ हवनकर्ता.

ध्यातिल गातिल नमितिल शमितिलक न मज हरिप्रति ज्ञाते॥
नधरीं विषाद वसविन नाकीं मेले सुयोध नव-धामीं[१]॥
कथिन उपाय वृष-वधा तुज भीमासहि सुयोधन-वधा मी॥२०॥
पर लब्धलक्ष झाले हे हरिसे गर्जताति सितवाहा[२] ॥
हां पळताति स्वबळें चाल ह्मणायास लाव कितवा हा[३] ॥२१॥
धृतराष्ट्र ह्मणे कोणी पुत्राला हित नसेचि सांगाया ॥
पार्थीं शक्ति-प्रेरण कथिलें नाहीं तुवांहि कां गा या ॥ २२ ॥
पाचारितां रण-मखीं जावें हें व्रत नव्हे वृथा ज्याचें ॥
प्रथमचि हटकुनि केलें कां न वृषें भस्म त्या पृथाजाचें ॥२३॥
साधाया स्वार्थातें करितो मानूनि जन कपट हितसें ॥
ईश्वर होउनि लोकीं आचरतो केविं कनकपटहि[४] तसें ॥ २४॥
श्व-वराह-रणीं जैसा श्वपचाला लाभ निश्चयें आहे ॥
कृष्ण तसा स्वार्थातें राक्षस-राधेय-संगरीं पाहे ॥ २५ ॥
संजय ह्मणे पृथेच्या वृष करिता भस्म आज तनयाला ॥
लोभी निधिला तैसा प्रभु करितो बहुत बा जतन याला[५]॥२६॥
पार्थीं शक्ति-विमोक्षण कथिलें नाहीं तुवांहि कां गा या॥
ह्मणतां तरि कर्णाला चुकलों नाहींच मीहि सांगाया॥ २७॥
कर्णासि रात्रि शिबिरीं दुःशासन शकुनि नृपहि विनवीती ॥
जी जयद्रथ-प्रतिज्ञा सांगावी काय नित्यहि नवी ती[७] ॥ २८ ॥
कर्ण ह्मणे वर देउनि मग मागें काय मी कवि सरेन ॥

---

१ नव्या गृहीं. २ हे अर्जुना. ३ हाय हाय. ४ कर्णास. ५ अर्जुनाचें. ६ कृष्णही. ७ अर्जुनवधाची प्रतिज्ञा.

शक्ति उद्यां पार्थावरि टाकीनचि निश्चयें न विसरेन ॥ २९ ॥
जय न वधावा कृष्णचि त्याविण ते सर्व काय पांगूळ ॥
होंचि बहु सरस अमृत त्यजुनि रसिक वरिल काय पां गूळ ३०
चक्रघात करिल अजितचि त्यास सखित्वें जयास वरिल हरी॥
तोचि अमर अमृताचा निधि सोडिल ज्या परासुवरि लहरी ३१
तस्मात् प्रातःकाळीं कृष्णचि सोडूनि शक्ति मारावा ॥
यूथप वधितां हरिच्या कैसें साहेल यूथ आरावा ॥ ३२ ॥
ऐसा दृढतर निश्चय शिबिरीं व्हावा जसा जप दिसवड ॥
न रणीं राहे पाहे पारावारा तसा सपदि सवड ॥ ३३ ॥
वध-बुद्धि युद्ध-काळीं मोहेचि न सावधान राहे ती ॥
कृष्ण हृषीकेश धरू देईल कसा वधा नरा हेती ॥ ३४ ॥
योजी इतर ह्मणे जय अरि-दृष्टिपुढें न सर्वथा राहो ॥
ऐसें सख्यास रक्षी प्रभुवर होऊनि सर्व थारा हो ॥ ३५ ॥
ऐसा श्रित-रक्षण-पटु जो ह्मणतो सेंद्रनाक थारा ज्या ॥
त्या चक्रधर-प्रभुच्या हननाची काय गा कथा राजा ॥ ३६ ॥
सात्यकि कृष्णासि ह्मणे प्रभुला विज्ञापना असी माजी ॥
पार्थी न टाकिली कां शक्ति वृषें धरि बळा असीमा जी ॥ ३७॥
कृष्ण ह्मणे शैनेया म्यां कर्ण भ्रमविला वृत्रासुरसा ॥
भक्ता मी बहु जपतो जपतों शतमख जसा सुधा-सुरसा ॥ ३८॥

---

१ अजिंक्यचि. २ मृतावरि. ३ गज. ४ गर्जनेला. ५ अर्जुन.
६ इंद्रासहवर्तमान जो स्वर्ग तो. ७ इंद्र.

पथकारिलें चालविलें आपण हें वतन या न राखावें ॥
सा उग्र-शक्तिनें या कुंतीच्या न तनया[1] नेरा खावें ॥ ३९ ॥
वसुदेव देवकी बल- देवादि तुह्मीं समस्त मत्प्राण ॥
जाण प्रिय पार्थ जसा न तसा कोणी खरें तुझी आण॥ ४० ॥
व्यसनीं रक्षिन बुडतां आधीं पार्था तसा न भवना मीं ॥
या मित्रीं मत्प्रेमा निश्चळ उपमन्यु जेंवि भवनामीं[2] ॥ ४१ ॥
झाला सजीव हा[3] व्यसु[4] होउनि लाभासि या नसे जोडा ॥
मज वाटे प्रद्युम्न- प्रत्यागमन-प्रहर्ष तो थोडा ॥ ४२ ॥
अर्जुन मूर्धा याच्या नाशें होईल आपुला घात ॥
बा तत्काल घटोत्कच हा म्यां केला परांपुढें हात ॥ ४३ ॥
यापरि सात्यकि-केशव- संवाद श्रवण करुनि समुदा[5] या ॥
सूतासि[6] बोल लावी नृप[7] निंदी सुत-मुखाप्त-समुदाया ॥ ४४॥
होतों कृतार्थ जरि ती गोविंदीं शक्ति सोडिली असती ॥
गेली कीं हातींची सर्वस्वें जेविं जोडिली असती[8] ॥ ४५ ॥
सूत ह्मणे स्वामीचें जें मत ऐसेंचि आमुचें परि तें ॥
झालें विफळ कपाळ प्रभुजी तुमचेंचि पात हें करितें ॥ ४६ ॥
भलत्या कृष्णीं टाकिन शक्ति असा वृषविचार करि पक्व ॥
नित्य ह्मणे सिंहोस्मि इब-स्त्वं-गंतासि कृष्णकारिप क्व[9]॥४७॥
योजावें तें समयीं आह्मां कोणा न आठवावें हो ॥

१ अर्जुनास. २ शिवनामीं. ३ अर्जुन. ४ गतप्राण. ५ सहर्ष ६ संजयासि. ७ धृतराष्ट्र. ८ जारिणी. ९ मी सिंह आहें—हे कृष्णरूप हस्तिश्रेष्ठ तूं उद्यां कोठें जाशील.

दैव प्रभु अष्टांऽगुल जें त्यासि ह्मणेल आठ-वावें हो ॥ ४८ ॥
गत-शोक कशास पुरे, होउनि सावध पुढील परिसा हो ॥
गुरुवध-वृत्त सुदुःसह बहु तुमचें हृदय मृदुल परि साहो ॥ ४९ ॥
भीमाला जय-मत्त-द्विपि- कटक-मर्दनासि पाठवुनी ॥
राजा रडे घटोत्कच- कृत-बहु-सेवोपकार आठवुनी ॥ ५० ॥
कृष्ण ह्मणे विकलत्वा अनुचित तूं धीर शुद्ध समयज्ञ ॥
सोडुनि शोक करावा समर नसे श्रेष्ठ युद्धसम यज्ञ ॥ ५१ ॥
धर्म ह्मणे बहु दुःसह सदपत्य-वियोग विषम हा देवा ॥
मज वाटे न गिळेलचि सदपत्य-वियोग-विष महादेवा ॥ ५२ ॥
वत्सें घटोत्कचें बहु केलें होउनि वनांत नत दास्य ॥
गुरुवत्सलांत खालीं झालें या त्रिभुवनांत न तदास्य ॥ ५३ ॥
जी सहदेवीं तीच प्रीति मुकुंदा घटोत्कचीं माजी ॥
वा जीवदान दिधलें विजयासि मरोनि शेवटीं आजी ॥ ५४ ॥
आह्मीं तुह्मींहि नव्हतों अरिनीं अभिमन्यु मारितां जवळ ॥
जिष्णु-समक्ष कसा हा झाला त्या शक्तिच्या मुखीं कवळ ॥ ५५ ॥
अभिमन्यु-घात-कारण ते मुख्य द्रोण कर्ण सोडून ॥
काय मिळविलें स्वल्पा ऽगस्कृत-सैंधव-शिरासि तोडून ॥ ५६ ॥
न बहु मम प्रिय केलें मारूनि जयद्रथा अधन्या या ॥
कर्णाचा कीं गुरुचा करितां तरि मानता वध न्याया ॥ ५७ ॥
ते हे प्रवर्तले वृप गुरु अहि शर-गर वसून भाजाया ॥

---

१ कृष्ण. २ धर्म. ३ तत्‌आस्य-त्याचें मुख. ४ शररूप विष.

कैसें साहों पाहों कीं[1] भर्त्ता मी चमू न भाजा या ॥ ५८ ॥
पाठविला भीम मथुनि बळ गुरुलाही रणीं मथिल आजी ॥
मी कर्णावरि जातों तो[2] मृत कां हा[3] तुह्मां काथिल आजी[4] ॥५९॥
ऐसें बोलुनि कोपें कर्णावरि नीट धांवला राजा ॥
मागुनि हरि हरि[5] हांकी तों झाला प्रकट त्यापुढें आजा[6] ॥६०॥
व्यास ह्मणे बा धर्मा क्रोध सिताश्वीं करूं नको परत ॥
सावध हो बा व्यसनीं पडतो साहस करून कोपरत[7] ॥ ६१ ॥
जरि कर्णार्जुन भिडते तरि समरीं सकल योजिते शस्त्रें ॥
परमास्त्रज्ञ धनंजय राधेयाचीं निवारिता अस्त्रें ॥ ६२ ॥
त्या शक्रशक्तितें जरि पार्थीं वृप टाकिता कसें होतें ॥
व्यसन तरंडक[8]भंगें होय समुद्रीं जसें तसें हो तें ॥ ६३ ॥
सर्वस्वांत चुकविला जेणें तो कां नको पलाशांत ॥
हें किति बा वा वधितां शंत[10]मिततोकां न कोपला शांत[11] ६४॥
काळें वधिला राक्षस ती शक्ति निमित्त-मात्र हें साचें ॥
भावंड बुद्बुदांचें[12] वपु अति-निःसार मित्र फेंसाचें ॥ ६५ ॥
त्रिकळत्वें यश पात्र- च्छिद्रें पीयूषसें न सांडावें ॥
भांडावें निज-धर्मा- ऽनुष्ठान तुवां असेंचि भांडावें ॥ ६६ ॥
पंचम-दिवसीं धर्मा होइल सकळाहि हे तुझी वसुधा ॥
लोकत्रयीं बहु-मता कीर्तिहि बहु तृप्तिहेतु जीवसुधा ॥ ६७ ॥

---

१ भार्या. २ घटोत्कच. ३ मी धर्म. ४ संग्राम. ५ घोडे. ६ व्यास. ७ क्रोधवश. ८ तरांडें ( जहाज ). ९ घटोत्कचाचा १० शंभर पुत्रांना. ११ वसिष्ठऋषि. १२ पाण्यावरील बुडबुड्यांचें

सांगुनि हित अंतर्हित झाला तो वेद-खग-नभ व्यास॥
ज्याच्या पद-रेणुपुढें पटु द्याया देवनग न भव्यास॥ ६८ ॥
मग सफळ हो पितृ-मनो- रथ पंचमवेद पाठ वीरा ज्या॥
ऐसें ह्मणोनि गुरुवरि धृष्टद्युम्नासि पाठवी राजा ॥ ६९ ॥
तैसेंचि परबळातें विजयाद्यऽखिलांसि पाठवी रगडी ॥
आह्मांकडीलहि सकळ देती न रिपूंसि पाठ वीर गडी॥७०॥
रात्रि परम दारुण तैं मेले बहुलक्ष योध यामाजी॥
झाली जरि त्रियामा तरि अति-घोरा सहस्र-यामा जी॥७१॥
झाले निद्रांध सकळ भट न वधिति शत्रु जवळ राहुनि जे ॥
अत्यद्भुत तें वाटे मिळतांहि सुधांशु-कवळ राहु निजे ॥ ७२॥
पार्थ स्वभटांसि ह्मणे स्वस्थ निजावें तुह्मीं न पेंगावें ॥
मग यश शशि-प्रकाशें जोडावें जें महातपें गावें ॥ ७३ ॥
त्या अभिमत-वरदानें पार्थासि स्व-पर सर्व मानवले ॥
दुष्काळीं क्षुधितांतें जाणों दिधले यथेष्ट कानवले ॥ ७४ ॥
अश्वीं रथीं गजीं जे जेथें होते तसेंचि ते निजले॥
क्षतजें जयसाधुत्व- प्राप्त-प्रेमाऽश्रु-जळ-भरें भिजले ॥ ७५ ॥
शोभे बल जेंवि लिही चित्रपटीं रंग अर्जुन चितारी॥
व्यसनीं स्वपरांसहि सम तो सश्रीरंग अर्जुनचि तारी॥७६॥
स्त्री-कुच-लीन तरुणसे क्षत्रिय गजकुंभ-लीन ते गमले॥
रमले मुहूर्त-परिमित निद्रेसीं सर्व जीव विश्रमले ॥ ७७ ॥

---

१ गुप्त. २ वेदरूपपक्ष्यांस आकाशरूप असा. ३ कल्पतरू. ४ कल्याणास. ५ धनुर्वेद. ६ यामध्यें. ७ मिळवून.

मग भगवान् विधु उगवे पळवी देऊनि कांप तिमिरासी ॥
खोट्याला तेजस्वी नांदों देईल कां पति मिरासी ॥ ७८ ॥
करिति पुन्हां सुखवाया शक्रमुखां स्वष्टिपां रणारंभा ॥
पावे पराक्रमि पुरुष पति पाहुनि दृष्टि-पारणा रंभा ॥ ७९ ॥
चंद्रोदय झाल्यावरि कुरुपति गुरुला ह्मणे बहु श्रमले ॥
पांडव पांचाळ रणीं होउनि निद्रांध केवळ भ्रमले ॥ ८० ॥
कैसे निजों दिले बा आले होतेचि आयते हातीं ॥
ह्मणतचि होतीं शस्त्रें भ्रमतां धरणार राय ते हा तीं ॥ ८१ ॥
गुरुजी प्रियार्थ तुमच्या हें आह्मीं साहिलें गरळ गिळिलें ॥
स्वापत्याचें नरडें व्याघ्रीनें मात्र ऐकतों पिळिलें ॥ ८२ ॥
शस्त्रास्त्रज्ञ त्रिजगीं स्पष्ट तुह्मांसम तुह्मी तदपि त्याचें ॥
लंघन सुखें सहातां कळलें कीं गुरुकडे पद पित्याचें ॥ ८३ ॥
ते मीहि शिष्य तुल्यचि परि तिकडे प्रेम न इकडे कां जी ॥
हत-भाग्या ये धांवुनि जातां पीयूषनईकडे कांजी ॥ ८४ ॥
ऐसें द्रोणाला बहु वदला जें काय राय तें नाकीं ॥
नहुषचरितसें दुःसह झालें कीं जेंवि रायतें नाकीं ॥ ८५ ॥
कोपें द्रोण ह्मणे मी वृद्ध तरि तरुण-सहस्त्र-सम झटतों ॥
मजसम कटकीं टिकता न दिसे भीष्माविना इतर भट तों ॥ ८६ ॥
शक्त्यधिक यत्न करितों जरि सर्व स्वपरबल मला गातें ॥
परि वृद्ध-मोरपीसा तूं एकचि मानिसी न लागातें ॥ ८७ ॥

१ मिरासदार ( वतनदार ). २ लोकपालांस. ३ मोठ्याकडे. ४ गोळाठातें. ५ अमृतनदीकडे.

धर्म असा मारावा अस्त्रें ज्या विदित अस्त्र तें जातें ॥
न विदित त्या न वधावें प्रगटूनि रणांत अस्त्र-तेजातें ॥ ८८ ॥
परि अस्त्रें मी परबळ जाळिन काढीन तरिच हें वर्म ॥
कर्म क्रूर करिन कीं लेशहि लुब्ध-श्रितीं नुरे धर्म ॥ ८९ ॥
हें युद्ध काय रुद्रें- हि न नारायण-सखा नर थकविला ॥
रविच्या रथाहुनि उणा तेजें याचा गमे न रथ कविला ९०॥
न हरि न निवातकवच न षष्टिसहस्रहि हिरण्य-पुर-वासी ॥
शकले ज्याच्या धनुच्या सोसाया संगरांत सुरवासी ॥ ९१ ॥
ऐसा बहु तेजस्वी नरमूर्ति न होय कामहा काल ॥
पळतांहि त्यापुढें हय मग कैसे हंतुकाम हाकाल ॥ ९२ ॥
गंधर्व-गर्व सर्वहि हरुनि हरी तुमचियाहि बंधातें ॥
श्रुत राहो अनुभूतहि न स्मरसी वीर्यसंपदंधा तें ॥ ९३ ॥
प्रत्यक्ष तव बल-क्षय करितो सर्वहि उदंड जरि झटतों ॥
भट तो विजयचि आह्मी जिंकाया ईश्वरापुढें नटतों ॥ ९४ ॥
कुपित नृप ह्मणे गुरुजी पार्थ-गुणाचें पुरे करा कथन ॥
करुनि द्विधा बळ करूं आह्मी चवघेचि जिष्णुचें मथन ॥९५॥
द्रोण ह्मणे स्वस्ति असो हरिला मारिन ह्मणेल कोण ससा ॥
तूं धन्य बा गरुडसा जय त्या खाईन ह्मणसि घोणससा ९६॥
वदसी भलतेंचि कसें जें हास्यावह वदोत बालिश तें ॥
एकें काय पराभव रामाचा न घडताचि वालिशतें ॥ ९७ ॥

---

१ कवच. २ सुवर्णपुरांत राहणारे. ३ उत्तम शब्दास. ४ कामहंता (शिव.) ५ श्रवण केलेलें. ६ सिंहाला, ७ सर्पविशेषसा.

प्राणाधिक बहु मत. जो श्रीकृष्णा गोपलोकपाळाला ॥
करिल मृषा अमरांच्या येतां क्षण कोप तो कपाळाला ॥९८॥
मूळ अनर्थाचें तूं कां क्षत्रिय निरपराध मारविसी ॥
जा विजय-शरें मरतां भेदुनि जासिल नराऽधमा रविसी ९९
दुःशासनाहि मारिल मारिल कर्णाहि साहि कितवा हा ॥
हित वाहा निकरसम सु- गतिदा देवा तसेंचि सितवाहा १००
मी दुःशासन तिसरा कर्ण तिघे पांडवांसि माराया ॥
आहों समर्थ युद्धचि व्हावें चिंता नसेचि बा राया ॥१०१॥
ऐसें त्या अंधाला सांगत होतासि सर्वदा साचें ॥
तें व्हावें तुज काम- क्रोध-कपट- लोभ-गर्व-दासाचें ॥ १०२ ॥
तो पार्थ विशंक पुढें आहे जा गांठि घाल बापा हूं ॥
कर्तव्य सर्व केलें कैसें करितोसि युद्ध बा पाहूं ॥ १०३ ॥
जिष्णुशरें तुज मरण श्लाघ्यचि शेवट नृपा करीं गोड ॥
सोड स्वजीविताला लोड करीं धैर्य शर गुणीं जोड ॥१०४॥
अद्भुत ऐश्वर्य बळें मेळविलें भोगिलें दिलें उरलें ॥
स्फुरलें वरें रणमरण तेज तुझें श्रेय सर्वही पुरलें ॥ १०५ ॥
ऐसें वदोनि गेला गुरु-हरि पर-गज-घटेकडे नीट ॥
धीट द्विधा करुनि बळ करिति समर धरुनि जीवितीं वीट ॥

---

१ दैवाला. २ टेकण. ३ थेट.

# अध्याय २१.

नसतांही शस्त्र करीं चवथ्या यामांत घात लात रणीं ॥
देवें स्व-पर-विवेचन जें या कामांत घातला तरणी ॥ १ ॥
वाटे स्वकरसहस्त्रें करुनि द्रव दिव्य कनक सारवितो ॥
शुचि करि हरुनि तमोमल होय जगदपत्य-जनकसा रवि तो २
संध्या-विधि संपादिति जपती जोडूनि अंजलीला हो ॥
भट धरिती क्षण वीक्षण करितां संफुल्ल-कंज-लीला हो ॥
करि जो परांसि विजयाऽ नुमतें तो देव सात्वतप सव्य ॥
करवी बळेंचि दूरुनि हाका मारूनि भीम अपसव्य ॥ ४ ॥
डावलिले भीमाच्या आज्ञेनें अर्जुनें वृषद्रोण ॥
न करिल समयीं सुज्ञें सूचविले धर्म धर्मपर कोण ॥ ५ ॥
दीप्त-द्वा जेंवि ससे शकले कोणी जया न वाराया ॥
खवळे अधिक विकळ करि शमनपरा ज्वर जसा नवा राया ॥६॥
दुर्योधन कर्ण शकुनि शस्त्रांच्या शीघ्र वर्षती त्रांतें ॥
तप्तस्नेहा जळसें त्या क्षोभवि शस्त्रवर्ष तीव्रा तें ॥ ७ ॥
त्या सर्वांसहि दशदश- बाणांहीं तो महातपा वेधी ॥
भीति-नदींत कुरूंची बहु मोहातें वहात पावे धी ॥ ८ ॥
पार्थ प्रलय-जलदसा दे वृष्टि करूनि हर्ष तिमिरासी ॥
पेर्चक पुनरपि जैसे बहु भरतां ग्राम हर्षति मिरासी ॥ ९ ॥

---

१ सूर्य. २ कृष्ण. ३ यादवपति. ४ औषधानें ज्वर शमन करणाऱ्यास. ५ तरुण. ६ समूहानें. ७ तापलेल्या तेलास. ८ घुबड.

अकुलीं श्रीविद्याशा समरीं शरवृष्टि वनरजोवृष्टी ॥
असतांहि करिति सहसा नाहींच तमें भरूनियां दृष्टी ॥१० ॥
तो व्यामोहक संगर संसारचि त्यांत सर्वही श्रमला ॥
श्रमला न गुरुचि दूर त्यागुनि गेला विरक्तसा गमला ॥११॥
उत्तर-देशीं होता द्रोण रणांतुनि निघोनि एकिकडे ॥
बा त्याकडे न पाहों शकले पर सर्प जेंवि केकिकडे ॥ १२ ॥
द्रुपद विराट तयावरि गेले तत्तेज परम राया तें ॥
द्रोण ह्मणे योग्य रणीं हे दोघे वृद्ध पर मरायातें ॥ १३ ॥
द्रुपदाचे पौत्र तिघे तीं-बाणानीं पळांत लोळविले ॥
स्वर्गासि चेदि कैकय सृंजय वीर क्षणांत बोळविले ॥ १४ ॥
वृद्ध तरुणसे झटले समयीं कर्तव्य किमपि न विसरले ॥
द्रोणें शिर हरितांहि न मागें ते एक पदहि कवि सरले ॥ १५॥
द्रुपदें धरितां प्रकुपित-सिंहाऽतिक्रमण-कर-करीश-पथ ॥
क्रोधें धृष्टद्युम्न द्रोण-वधाकारणें करी शपथ ॥ १६ ॥
मग खगपति-गति धांवे पांडव-पांचाळ-वीर-सहित रणीं ॥
तो धृष्टद्युम्न गमे साक्षात् महिराहु विप्र महितरणी ॥१७॥
कर्ण शकुनि दुर्योधन तदनुज जे मुख्य मुख्य ते ज्यातें ॥
रक्षित होते त्यांच्या कैसे पर साहतील तेजातें ॥ १८ ॥
वध केंचा न दुरूनहि पांचाळां गुरुकडे पहावेना ॥

१ दाट धुळीची वृष्टी. २ मोहकारक. ३ मयूरकडे. ४ द्रोणावर. ५ नातू. ६ कोपलेल्या सिंहाचें उल्लंघन करणारा जो करींद्र त्याचा मार्ग. ७ पृथ्वीवरचा राहु. ८ द्रोण. ९ पृथ्वीवरचा सूर्य.

ते पळती भीमाला हृदयींचें शल्यसें सहावेना ॥ १९ ॥
भीम ह्मणे रे धृष्ट-द्युम्ना कळलासि आज पोकळसा ॥
वचनासि कुलज न शिरा स्ववरासि न देवता जपो कळसा२०
पितृ-सुत-मारण जें तूं तेजस्वी शिखिसमान साहसि तें ॥
मरणाधिक दुःख तुझ्या होइल वांचोनि मानसा हासितें ॥२१॥
तूं मजकडे तरि पहा जरि तुज त्यां अरिंकडे पहावेना ॥
जातों मीच मला तो सोसूनि स्वजन-वध रहावेना ॥ २२ ॥
द्रोण-बळांत वृकोदर शिरला हो बळि-बळांत मघवासा ॥
तें त्या बहु भी हरि-पद- तुळसीच्या जेंवि सर्व अघ वासा२३॥
धृष्टद्युम्नहि देहीं ज्वरसा कुरु-गुरु-बलांत शिरला हो ॥
निकट भिडोनि ह्मणे असि माझा मत्तात-शत्रु-शिर लाहो२४॥
अपसव्य करुनि नकुळें तेव्हां कुरुपति रणीं विमुख केला ॥
सहदेवें दुःशासन- सूत न कळतां यमालया नेला ॥ २५ ॥
भीमाची कर्णानें शरनिकरें फिरविली गदा मागें ॥
ध्वज मथुनि सूत मूर्च्छित कारि कृत्या जेंवि मुरडली रागें २६
होउनि विरथ वृकोदर नकुल-रथावरि चढे कढे कोपें ॥
द्रोणाऽर्जुन-रणहि परिस ज्याचें कथनाहि नृपा नव्हे सोपें २७॥
गगनांत आमिषार्थ श्येनांचें युद्ध नरवरा होतें ॥
तेंवि ह्मणावें तरि हा दृष्टांतीं शुद्ध न रव राहो तें ॥ २८ ॥
करिवर हरि शरभहि पशु अशुचि निशाचर तसेच दानवही ॥

१ अग्नीसारखा. २ द्रोणाकडे. ३ बळीच्या सैन्यांत. ४ इंद्राप्रमाणें.
५ भीमा. ६ खड्ग. ७ मागें फिरली. ८ मांसार्थ.

यांसम हे यांच्या गुण- लिपिसि पुरेल न मही-समान वही २९
कौरव-पांडव-कटकें झालीं जैसीं पटाऽर्पितें चित्रें ॥
गुरुनें जैसीं केलीं कुतुकें तैसींच विष्णुच्या मित्रें ॥ ३० ॥
शिष्याला गुरु गुरुला शिष्यहि त्या रणमखांत आटेना ॥
दाटे नारद-कंठाहि युद्ध पुरेसें कदापि वाटेना ॥ ३१ ॥
शिष्यें निवारिलीं बहु ऐंद्र-प्रमुखेंहि वाडवेंशास्त्रें ॥
ह्मणती सच्छिष्या तों तिलमात्र उणें न पाडवे शास्त्रें ॥ ३२ ॥
पार्था-पुढें न चाले यत्न परि न सुगुरु तो असुख पावे ॥
झालों मी धन्य ह्मणे यासीं भिडतां रणीं असु खपावे ॥ ३३ ॥
स्वगुरुसि ह्मणे यशें तुज- सम सुचिर विभो टिकों परम हर्षें ॥
पितृमन लागुनि दे प्रिय- शिशुचा सुखकोटि कोंपर महर्षें ॥ ३४ ॥
जरि आपणासि आपण कल्पुनि रुद्र द्विधा करिल समर ॥
तरि उपमा होय असें ह्मणती शक्रादि सर्वही अमर ॥ ३५ ॥
सुर नर करीत होते मानुनि परमेश्वरा-सम स्तवन ॥
ते चंद्र सूर्य जाणों जलजांचें कटक तें समस्त वन ॥ ३६ ॥
मग भगवान् द्रोण करी ब्राह्मास्त्राचा प्रयोग वा राजा ॥
असमर्थ सहायाला वहु तेजस्वीहि अर्क बारा ज्या ॥ ३७ ॥
लोक गडवडे जैसा निरुदक-देशीं दवाऽनळीं सार्थें ॥
शमवी ब्रह्मास्त्रेंचि ब्रह्मास्त्रातें प्रबुद्धधी पार्थ ॥ ३८ ॥
तों दुःशासन धांवे वाराया द्रुपद-राज-तनयातें ॥
त्यास रणीं विमुख करी तो धर्मन्याय जेंवि अनयातें ॥ ३९ ॥

१ द्रोणाचीं अस्त्रें. २ युद्ध. ३ व्यापारी लोक.

कृतवर्मा एक तिघे तव सुत हे वीर कोपले चवघे ॥
दोघे नकुळें दोघे सहदेवें त्वरित वारिले अवघे ॥ ४० ॥
पाहुनि वात नगांनीं तैसे भट रोधिले निज यमांनीं ॥
धांवे दुर्योधन ये मध्यें साधावया विजय मानी ॥ ४१ ॥
हरिवरि हरिसा उठला कोपें सात्यकि सुयोधनावरि तो ॥
समयीं दाता हाता तातो त्राता सुयोध नावरितो ॥ ४२ ॥
सात्यकिला दुर्योधन पाहुनि हांसे ह्मणे सख्या सुकवी ॥
शुक वीतमोह चुकवी भोगा घटजचि पयोधिला सुकवी ३३॥
बाल्यापासुनि तुज मज सहवासें परम सुख कसें गा तें ॥
सख्य जिरालें क्षत्रा- चाराला सुकवि-सुख कसें गातें ॥ ४४ ॥
शर धरुनि यदु ह्मणे कुरु- गुरु-सदनीं सख्य आमुचें होतें ॥
तेथेंचि स्वस्थ असो आणावें संगरांत कां हो तें ॥ ४५ ॥
भूप ह्मणे कोठें ती कोठें ही प्राण-घातक क्रीडा ॥
दुरतिक्रम काळ उरे धनलोभें प्रीति नीति न व्रीडा ॥ ४६ ॥
सात्यकि ह्मणे कुरुवरा ऐसाचि क्षत्रधर्म हा क्रूर ॥
दूर स्नेह त्यागुनि हाणिति गुरुतेंहि संगरीं शूर ॥ ४७ ॥
जरि मी प्रिय तुज तरि तूं भेदाया शिर उर प्रहार करीं ॥
धरिल मज वराया गति बा त्वां धरितां क्षुरप्र हार करीं ४८
जरि वधिशिल या समरीं तरि मी पावेन सुकृत-लोकातें ॥
मजला न देखवे प्रिय- मित्र-स्वजन-प्रणाश-शोकातें ॥ ४९ ॥

---

१ नकुलसहदेवांनीं. २ हे धृतराष्ट्रा. ३ आवरीत नाहीं. ४ गतमोह. ५ सात्यकि. ६ लज्जा. ७ सुगति. ८ पुण्यलोकातें.

झालें प्रेमें भाषण मग त्यांसीं युद्ध परम कोपानें ॥
रचिती बहु शरपटलें जाणों ते स्वर्ग-मार्ग-सोपानें ॥ ५० ॥
सात्यकिचें धनु कुरुपति कुरुपतिचें धन्व सात्यकी छेदी ॥
भेदी मर्मं रविसा पाहोंही आपणाकडे नेदी ॥ ६१ ॥
भंगे भूप निघे मग सावध होउनि पुन्हांहि करि लगट ॥
तों तदवनार्थ धांवे कर्ण ह्मणे शत्रु यासि करिल गट ॥५२ ॥
त्यावरि भीम उठे तों कर्ण तयाच्या शरांसि तोडून ॥
छेदी धनु-सूतातें विकल करी विशिखं-जाल सोडून ॥ ५३ ॥
दुःसह गदाप्रहारें ध्वज-कार्मुक-सूत-कनकरथ-चक्रें ॥
मर्दुनि भीमें व्याकुळ केला क्षण कर्ण बल जसा शक्रें ॥५४॥
रथ एकचक्र रविचा जैसा शोभे तसाचि कर्णाचा ॥
स्वर्णाचा मद नुरवी होताचि असा प्रकर्ष-वर्णाचा ॥ ५५ ॥
तो धर्म भटांसि ह्मणे लिहिलें न चळेचि आयु धात्यानें ॥
जेणें हस्तीं धरिलें सफळ करावेंचि आयुधा त्यानें ॥ ५६ ॥
जें आमचें प्रिय परम सर्वस्व प्राण शिर अहो भट हो ॥
तें अडकलें अरि-बळीं धांवा रे काय पाहतां फट हो॥५७ ॥
मेलों कीर्ति-धनाचा जरि करितां सोस वेचुना नार्की ॥
सोसे कुलजा मृत्यु न अयशाचा सोसवे चुना नार्की ॥५८॥
या धर्माच्या बोधें गेले पांचाळ मत्स्य गुरुवरते ॥
कीं निज-धर्मापासुनि मिळती जे जे अभीष्ट गुरु वर ते ॥ ५९॥

---

१ आकाशमार्गाच्या पायऱ्या. २ धनुष्य. ३ त्याच्या रक्षणार्थ. ४ शरसमूह. ५ मार्ग. ६ होवो.

यमं भीम ह्मणति हाका मारुनि ये धांव अर्जुना क्षिप्र ॥
त्वां कुरु मर्दावे मग माराया सांपडेल हा विप्र ॥ ६० ॥
त्या समयीं द्रोणानें प्रकट करुनियां महास्त्र कोपानें ॥
केला बहु-शत्रु-बळ- क्षय पूर्वीं जेविं रुद्र-रोपानें ॥ ६१ ॥
गुर-शर-निकर-दवाऽनल सृंजय पांचाळ भासले शलभ ॥
बलभद्रानुजनि ह्मणे हा सिंहचि सर्व यापुढें कलभ ॥ ६२ ॥
अति तूर्ण जयाविषयीं योग करा त्यजुनि धर्म पांडव हो ॥
या विप्ररूप-दहनीं तुमचें न समग्र सैन्य खांडव हो ॥ ६३ ॥
जों आहे चाप करीं तों हा ब्राह्मण न आवरायाचा ॥
जाईल यापुढें बा त्या देवांच्याहि आव रायाचा ॥ ६४ ॥
होइल मनुष्य-वध्य द्विजवर जरि करिल आयुधन्यास ॥
या जेव्हां सोडिल धनु सोडिल तेव्हांचि आयु धन्यास ६५॥
जरि तो मरेल अश्व- त्थामा हा तरिच शस्त्र सोडील ॥
हें न घडतां शिरें या सर्वांचींही रणांत तोडील ॥ ६६ ॥
अश्वत्थामा मेला हें मिथ्या ह्मणुनि हाय सांगावें ॥
अनृत बहुमत व्यसनीं जाया प्रेतत्व वायसां गावें ॥ ६७ ॥
हाचि उपाय प्राण- व्यसनीं सर्वांसि आज तारील ॥
वारील शक्रहि न या सर्वांसहि संगरांत मारील ॥ ६८ ॥
बाल्यापासुनि बहु गुरु- वत्सल जो गुरुसि तो कसा मान्य ॥

१ नकुलसहदेव. २ टोळ. ३ बलभद्र-अनुजनि-कृष्ण. ४ गजाचे छावे. ५ होवू. ६ इंद्राचा. ७ शस्त्रत्याग. ८ अपत्यसा.

होइल अर्जुन तादृश- घातोपायासि तो कसा मान्य ॥ ६९ ॥
भीमादि सुखें वळले ह्मणति जयोपाय हा असामान्य ॥
हित-कर न जगीं कोणी आह्मां या कृष्णजीअसा मान्य॥७०॥
कष्टें धर्मा झाला बहु हिक्कार्तासि लशुनसा मान्य ॥
कीं त्रिजगद्गुरुवर-वच जो न करिल तोचि पशु न सामान्य ॥
शत्रु-प्रदीप ज्याच्या लीला-श्वासेंचि मालवे शतदा ॥
तो कदन करित होता पांडव-कटकांत मालवेश तदा ॥ ७२॥
तन्नाम इंद्रवर्मा अश्वत्थामा तदीय-नागाचें ॥
त्याचें भीमें केलें पक्षिवरें कदन जेविं नागाचें ॥ ७३ ॥
मेला अश्वत्थामा हें ऐकविलें गुरूसि मग राजा ॥
तो भी सुत-शोका कीं नच तरले दशरथादि मगरा ज्या ७४॥
श्रवणीं शिरतां प्रथमचि ती द्रोणा होय शोकदा वार्ता ॥
सुत-वीर्य-विचार-सखा- घन निववी शीघ्र शोकदावार्ता ७५॥
लटकी वार्ता ऐसा निश्चय चित्तीं करूनि जो जवळ ॥
भिडला होता द्रौपद त्याचा पाहे करावया कवळ ॥ ७६ ॥
ध्वज धनु खंडुनि मारी तो तत्काळ स्वमृत्युसूतातें ॥
त्या अहितातें न गणी हरि-सेवक जेविं काळदूतातें ॥ ७७ ॥
दुसरेंहि खंडिलें धनु जें हस्तीं शस्त्र शत्रुनें धरिलें ॥

१ उचकीनें पीडित झालेल्यास. २ मालवदेशाधिपती. ३ त्याच्या गजाचें. ४ सर्पाचें. ५ सुसरीला. ६ शोकरूप अरण्याग्नीनें पीडित अशा द्रोणास. ७ धृष्टद्युम्न. ८ स्वमृत्यु जो धृष्टद्युम्न त्याच्या सूतातें.

तें तें सर्व द्रोणें दुर्दैवें वस्तु-मात्रसें हरिलें ॥ ७८ ॥
धृष्टद्युम्न स्वहय द्रोण-हयांमाजि होय शिरकविता ॥
त्याची मिठी सकळ बळ कंपित करि जेविं तज्ज्ञ-शिर कविला
तत्काळ द्रोण प्रभु ईषा[१] रथचक्रबंधनें तोडी ॥
धृष्टद्युम्न तयावरि गरगर फिरवुनि महागदा सोडी ॥ ८० ॥
विप्र क्षिप्र गदेतें खंडी दंडी जसाचि आशेतें ॥
पसरिति त्याच्या विजया कटकें जैसीं घनासि आ शेतें ॥८१॥
मग खड्ग चर्म घेउनि यत्न करी श्येनसाचि झडपाया ॥
वाटे त्यास स्वतनु- प्रासादाचा नसेचि धड पाया ॥ ८२॥
रथ-शक्तिनें तुरगपद वधुनि करी स्वहय मोकळे विप्र ॥
विप्रें[२] तिमाद्रिषदासितें[३] खंडी वैतस्तिकेषुनीं[४] क्षिप्र ॥ ८३ ॥
विरथ विशस्त्र करुनि त्या द्रुपद-सुत-वधार्थ बाण जों सोडी
त्यातें दशविशिखांहीं शिनिपुंगव बहुपराक्रमें तोडी ॥ ८४॥
तें पाहुनि पार्थ ह्मणे पीतपटा परमपूरुषा पाहें ॥
कर्ण-द्रोण-कृपांत स्वस्थ कसा सात्यकी नवल बा हें ॥ ८५ ॥
सत्कवि निज वाचेला ह्मणतिल बहु मधुर वाणि-मैने[६] या ॥
रामा कृष्णा मग गा आधीं तूं तत्प्रियाचि शैनेया ॥ ८६ ॥
कर्ण-द्रोण-कृपांत द्विरदांत विशंक सिंहसा साजे ॥
लाजविले[७] ते धन्वी ह्मणवुनि घेते जगन्निवासा जे ॥ ८७ ॥

---

१ धूर. २ संन्यासी. ३ प्रतिमारहित जो शत्रूचा खड्ग त्यातें. ४ वीत वीत लांबीच्या बाणांनीं. ५ सात्यकि ६ हे वाणीरूपमैने. ७ सात्यकीला.

तेज न तव प्रसादें कोणांतहि सात्यकिस लया नेतें ॥
येणें दृष्टि-सुख दिलें द्यावें त्वत्पाद-किसलयानें तें ॥ ८८ ॥
इतुक्यांत सुयोधन-मुख तव सुत कृप कर्ण अन्यही योध ॥
क्रोध-मदांध चहुंकडुनि करिती शिनिसूनुचा रणीं रोध ॥८९॥
यम भीम धर्म समरीं बहुताचि शैनेय-रक्षणीं जपले ॥
तपले परि पर पशु ते यदुपति-पशुपतिपुढें प्रचुर खपले ९०॥
वदले सुर देवासुर- सम त्या आयोधना शपथ करुनी ॥
न तुह्मीं किमपि मिळविलें ऐसा हा योधनाश पथकरुनी॥९१॥
धर्म ह्मणे क्षत्रिय हो यत्न करा कुंभयोनिला वेढा॥
जाणों पार्षत-तेजें गिळिलाचि बुभुक्षितें जसा पेढा ॥ ९२ ॥
आज्ञा होतांचि सकळ पांचाळ-प्रमुख वीर बलजलधी ॥
बुडवाया धांवे परि तो घटज तसाचि हाहि निश्चल-धी ॥९३॥
गुरु परबळें बळकरग जेविं न करिजेल लग्न हळे दीनें ॥
पीतिंमंगुणें शचिकनक-रुचि कीं लज्जेंत मग्न हळदीनें ॥ ९४ ॥
धांवे रणार्थ गुरु तों तंद्वामाक्षि स्फुरे पडे उल्का ॥
समजुनि ह्मणे वरावी सुगति समर्पूनि जीविता शुल्कीं ॥ ९५॥
योजुनि तो ब्रह्मास्त्र क्षत्रिय विंशति-सहस्त्र बा मारी ॥
अन्य दशाऽयुत मर्दुनि ठाके निःशंक जेविं कामारी ॥ ९६॥

---

१ तुझ्या पादपल्लवानें. २ सात्यकीचा. ३ युद्धास. ४ द्रोणाला. ५ स्थिर बुद्धीचा. ६ शत्रूच्या सैन्यानें. ७ बळरामाच्या हातांतील. ८ जवळ. ९नांगर. १० निर्बळ पुरुषें ११ त्याचा डावा डोळा. १२ भोळा. १३ पिवळेपणामुळें.

सुविषण्ण विरथ पार्षत परमापद्ग्रस्त पाहिला भीमें ॥
धांवोनि स्व-रथीं तो बा जेविं स्कंद वाहिला भीमें ॥ ९७ ॥
त्या परिभव-विकळाला सुस्यंदन चाप धीर दे हातें ॥
थापटुनि पृष्ठ-देशीं कुरवाळुनि तो सुधीर देहातें ॥ ॥ ९८ ॥
अन्य-सुदुर्वह हा गुरु- वध-भार शिरीं तुझ्याचि आजि असे ॥
बाहु न तुटतां व्हावें निर्विण्ण न आदरूनि आजि असें॥९९॥
घेतां भीम-कृत असा उत्साह-विवृद्धि-हेतु बोध मनें ॥
होय अधिक तेजस्वी जाणों नररूप वन्हि तो धमनें ॥१००॥
द्रुपदसुत गुरुसि गांठुनि झांकी इषुनीं हुताश-विष-कटुनीं ॥
तद्रक्षक शिबि बाल्हिक कौरव-कटकें क्षणांत विसकटुनी॥१॥
काळें पाठविला द्विज मारावा हा निरोप ज्याला तें ॥
अरि-धनु खंडुनि गुरुनें त्याहि दिली हानि रोष-जालातें ॥ २॥
तेव्हां पांचालांहीं कांहीं मागें पुढें न पाहून ॥
गुरु गांठिलाचि जाणुनि रण-मरण अधिक जपा-तपाहून॥३॥
घन-जालें रवि गगनीं क्षण नाहींसाचि लोपला होतो ॥
गुरुहि तसाचि पर-शर-व्रातें मग फार कोपला हो तो ॥४॥
पर सर्व धैर्य-पर्वत गमला गुरु हरि तदीय विशिख पवी ॥
कीं सकळाला लीला- लेशें कुरवाळुनीहि मिशि खपवी ॥५॥
वधिले पांचाळ अयुत- युग सृंजय षट्सहस्त्र समरांत ॥
गज अयुत हय अयुत तें कर्म करी प्रकट कंप अमरांत ॥६॥

१ धृष्टद्युम्न. २ शिवानें. ३ राहे.. ४ बाहूचें विशेषण. ५ फुंकण्यानें. ६ बाण समूहातें. ७ इंद्र. ८ वज्र.

जे मत्स्य वीर मथिले गमले ते मर्त्य न रवि पन्नास ॥
प्रेमें कां गति-नवरी न वरील द्रोण-शर-विपन्नास ॥ ७ ॥
क्षत्र-विनाशीं द्रोण श्री-भार्गवसा प्रवर्तता क्षिप्र ॥
तेथें धांवुनि आले विश्वामित्रादि जे महाविप्र ॥ ८ ॥
भृगु अंगिरा मरीची पृश्नि सिकत वालखिल्य हे राया ॥
अग्नि पुढें करुनि वदति कीं शकति मुखाकडे न हेराया ॥९॥
बा हा तव निधनसमय चाल कसा ब्रह्मलोकवास करीं ॥
यावा नित्य कुशाचा या बाणाचा कधीं न वास करीं ११०
ये उत्तम-लोका या ह्मणती घात कवि लोक-वासासी ॥
विनविति नयनांतें कीं विप्र न घातक विलोकवा सासी ११
रवां ब्रह्मास्त्रें केले दग्ध अनस्त्रज्ञ नर न हा धर्म ॥
शर्म समस्तां जीवां जेणें उचित द्विजांसि तें कर्म ॥ १२ ॥
घडला अधर्म आतां शीघ्र करावाचि आयुध-न्यास ॥
जेणें भूतहित नव्हे न रुचे तें पळहि आयु धन्यास॥ १३ ॥
भीष्म मुनि-वचन परिसुनि पाहुनि वध-सिद्ध रिपु पुरोवर्ती ॥
द्रोण ह्मणे आयूची सरलीच पुरेल तों पुरो वर्ती ॥ १४ ॥
सुत मृत कीं न मृत असें जावें धर्मासि तरि पुसायास ॥
कीं एक सत्यवादी हा भासे रिपुहि न रिपुसा यास ॥ १५ ॥

१ गतिरूपनवरी. २ द्रोणशरांनीं विपन्न ( मृत ) जे त्यांस. ३ पहाण्यास. ४ हातीं. ५ मृत्युलोकवासास. ६ दाखवा. ७ स-असि-सखड्ग. ८ भयंकर. ९ समीपभागीं रहाणारा. १० वात. ११ धर्म. १२ द्रोणास.

मिळतां त्रिभुवन-राज्यहि अनृत न बोलेल धर्म-सुत लेश ॥
हा सत्य-संध जाणे जैसा तो सत्य-धर्म सुतलेश ॥ १६ ॥
ठावी मज प्रतिज्ञा वत्साची सत्यशी लहानपणीं ॥
बाळांत खेळतां तिळ- भारि चळला सत्यशील हा न पणीं ॥
गुरु होय असें योजुनि जों सिद्ध युधिष्ठिरा विचाराया ॥
जाणे त्रिजगत्साक्षी कृष्ण द्रोणाचिया विचारा या ॥ १८ ॥
अश्वत्थामा मेला कीं आहे गुरु असें पुसे धर्मा ॥
तों कृष्ण ह्मणे मेला ह्मण कवि अनृतेंहि जोडिती धर्मा १९
दिवसाऽर्ध होय तों जरि युद्ध करिल वधिल सकळही सैन्य
दैन्यद होइल कार्मुक- तेजें भूभृत्-कुळा जसा वैन्य ॥१२०॥
प्राणात्ययप्रसंगीं अनृत वदावें सुखें असें आहे ॥
तुज जीवनदा मेघा चातकसे सर्व पसरिती आ हे ॥ २१ ॥
आह्मां सर्वांतें गुरु- काळापासूनि आजि वांचीव ॥
बहु-लक्ष-जीव-जीवन- दानामित-सुकृत-सुवस्तु सांचीव ॥२२॥
भीम ह्मणे गुरु-वर-हरि- वचन अहो धर्मराज परिसा हो ॥
दुःसह विषसेंचि अनृत हरिसा युष्मत्प्रताप परि साहो॥२३॥
अश्वत्थामा मेला हें मारुनि मालवेंद्र-वर्म-करी ॥
म्यां कथिलें परि सत्य प्रत्यय मद्वचन तन्मनीं न करी २४
त्यजिल गुरु धैर्य धनुसह तुमचाचि असे तयास विश्वास ॥
कीं धर्म सत्यवादी हे आहे कीर्ति विदित विश्वास ॥ २५ ॥

---

१ यमपत्र ( युधिष्ठिर ). २ बळी. ३ पर्वतकुळास. ४ प्राणनाश-समयीं. ५ तुमचा प्रताप. ६ मालवेंद्रनामक राजाचा गज.

वळला प्रभु भीमोक्तें धर्महि कीं अचुक अर्थ तो भावी ॥
क्षुद्र-पदीं लोभ धरी यन्मति न स्वंःपदींहि लोभावी ॥ २६ ॥
तों धर्मराज होउनि अनृत-भय-जलधि-निमग्न जय-सक्त ॥
अश्वत्थामा मेला व्यक्त ह्मणे गज असेंहि अव्यक्त ॥ २७ ॥
रथ भूवरि चतुरंगुल उच्छ्रित त्या धर्मसूनुचा चाले ॥
झालें ऐसें वदतां भूस्पृक् प्राकृतपणासि हय आले ॥ २८ ॥
अश्वत्थामा मेला हें ऐकुनि धर्मवाक्य तो कानें ॥
जीवित-निराश झाला गुरु होउनि तप्त पुत्र-शोकानें ॥२९॥
पांडव साधु तयांचा आपण केवळ कृतघ्न अपराधी ॥
ऐशी त्या ऋषि-वाक्यें झाली नाहींच त्यास अपरा धी ॥
त्या धृष्टद्युम्नासहि पाहुनि उद्विग्न होय परम रणीं ॥
गेला सखाहि सोडुनि तो जो उत्साह-हेतु पर-मरणीं ॥ ३१ ॥
तों पार्षत दिव्य विशिख तक्षकसा जैत्र-कार्मुकीं योजी ॥
आपणचि गुरुविनाशीं कारण तुमच्या मनीं असें यो जी॥३२
त्याच्या निवारणीं करि यत्न परि न योग्य राहिलें शस्त्र ॥
त्या समयीं एकहि बा कुरु-गुरु-हृदयांत न स्फुरे अस्त्र ॥३३॥
चारि दिवस एक निशा पंचमदिवस त्रिभागपर्यंत ॥
पुरले शर सरले मग गुरुला कैसा घडेल अर्यंत ॥ ३४ ॥
द्रुपदसुतें सोडावा शर तों गुरुनिकट भीम ये राजा ॥

---

१ भीमाच्या बोलण्यानें. २ स्वर्गपदींहि. ३ लोभयुक्त व्हावी. ४ अस्पष्ट. ५ पृथ्वीस स्पर्श करणारे. ६ द्रोण. ७ अश्वत्थामा. ८ जयनशील अशा धनुर्ष्यी. ९ येवू. १० शत्रुनाश.

बोले उक्ति वद्वतिल न कधींहि तशासमीप पेरा[1] ज्या॥३५॥
गुरुजी क्षत्रक्षय कां होता जरि न करितां तुह्मी युद्ध ॥
शुद्ध स्वधर्म सोडुनि परधर्मी न प्रवर्तले शुद्ध ॥ ३६ ॥
धर्म अहिंसा त्याचें मूल ब्राह्मण तुह्मींच हें कथिलें ॥
रजतापुढें[2] कसें जी मिरवावें तेज आपुलें कथिलें[3] ॥ ३७ ॥
करितां काय ब्राह्मण- मुख्य तुह्मी ब्रह्मवित्तम[4] रणातें ॥
मेळवितां पुत्राच्या परिसूनि कशास वित्त मरणातें ॥ ३८ ॥
पर-धर्मस्थ तुह्मीं कां निज-धर्मस्था जनांसि बुडवीतां ॥
जे चरणा शरणागत साष्टांग-प्रणत त्यांसि तुडवीतां ॥३९॥
ज्या एका पुत्रास्तव अर्थ अनयही[5] करूनि जोडावा ॥
तो मेला फळ झालें आजुनि तरि हा अधर्म सोडावा ॥४०॥
कोणी सुतादि-नाश- व्यसनीं न करूनि अनय न बुडाला ॥
दाटुनि अमृतघटाच्या नुकरिल[6] भवदन्य[7] अनयनें बुडाला[8] ४१
ज्याच्या वचनीं धरिती बहु सर्वहि सुज्ञ लोक विश्वास ॥
अनृत वदेल कसा तो सोडीना व्यर्थ जो कवि श्वास ॥४२॥
त्या धर्माच्या वचनीं तुमचा नाहींच लेश विश्वास ॥
हेंहि अधर्माचें फळ पाहे स्वसमाचि खलेश[9] विश्वास[10] ॥ ४३ ॥
एवंविध भीम-वचन परिसुनि सुनिराश जीवितीं होय ॥
तो यज्ञसेन-सुत-भय[11] धनु सोडी जीवितासही तोयें[12] ॥ ४४ ॥

---

१ इतरास. २ रुप्यापुढें. ३ कथिलानें. ४ ब्रह्मज्ञश्रेष्ठ. ५ अन्याय. ६ न उकरील. ७ अंध. ८ अमृतघटाच्या तळाला. ९ दुष्टश्रेष्ठ. १० जगास. ११ धृष्टद्युम्नाचें भय. १२ पाणी.

गुरु मग ह्मणे अहो कृप नृप कर्ण समस्त वीर हो हा मी॥
शस्त्रास्त्रांतें त्यजितों विटलों अत्यंत जीवितीं धामीं ॥ ४५ ॥
पांडु-सुतांपासूनि स्वस्ति तुह्मांकारणें असो भट हो ॥
सत्वा मार्कंडेया दैव रणैकार्णवांतरीं वट हो ॥ ४६ ॥
करि हा अश्वत्थामन् सत्पुत्र असें ह्मणोनि आक्रोश ॥
त्या सुत-मृति व्रजा जसि मोडी क्षण तीं पडोनि सा क्रोश
करुनि परांतें योजुनि परमास्त्रविधी सभल्ल भस्म रणीं ॥
शस्त्रें सोडुनि झाला निरंत श्री-प्राण-वल्लभ-स्मरणीं ॥ ४८ ॥
तों धनु ठेवुनि पार्षत धांवे घेऊनि असि वधा त्याच्या ॥
आलें मनासि अरिच्या किंवा तें कर्म अशिव धात्याच्या ४९
कौरव-कटकीं हा हा पांडव-कटकींहि होय बहु हा हा ॥
हा हा दश-दिग्भागीं ह्मणति वध न योग्य रुक्मवाहा हा५०
निज-योग-धारणेनें द्रोणमुनि करी शरीर-संन्यास ॥
त्याचें त्याला किंवा तज्ज्ञाला तें कळे न अन्यास ॥ ५१ ॥
ज्योतिर्भूत द्रोण व्योमीं दुसरा द्युदीपसा गमला ॥
तो ब्रह्मलोक-गामी दुष्टां दुर्दर्श पार्षत भ्रमला ॥ ५२ ॥
अश्वत्थामा अर्जुन कृष्ण युधिष्ठिरहि तेज तें पाहे ॥
आहे प्रसाद मुनिंचा तद्दर्शन ह्मणुनि दास हीं लाहे ॥ ५३ ॥

१ रण हाच कोणीएक अर्णव ( समुद्र ) त्यांत. २ गोकुळाला. ३ पूतना. ४ सहा. ५ ब्रह्मास्त्रादिकांचें विधान. ६ लंपट. ७ श्री. कृष्णस्मरणीं. ८ निंद्य, अमंगळ. ९ द्रोणाला. १० तेजोरूपी. ११ आकाशदीपसा. १२ व्यासाचा. १३ संजय.

धांत्रे न्यस्तायुधशिर[1] कापाया धरुनि मति[2] कुडी लाजों[3] ॥
नेणे पार्षत गुरुच्या तो नव्हता स्पर्शला कुडीला जों॥ ५४॥
पार्थ रथावरुनि उडी टाकुनि धांवूनि शीघ्रतर वारी ॥
तरि लाविलीच दुष्टें कंठीं कच धरुनि शीघ्र तरवारी ॥५५॥
न वधावें न वधावें ऐसें ह्मणतांहि तो महापापी ॥
कापी गुरुचें मस्तक तच्छोक सुरांसही बहु व्यापी ॥ ५६ ॥
तें कौरवांकडे शिर बहु गर्जुनि पार्षतें उडविलें हो ॥
यश सर्व बुडविलें हो गमलें पंकज पदें तुडविलें हो ॥५७॥
भीम प्रळय-जलदसा गर्जे पार्षत-गळां मिठी घाली ॥
भ्याली बहु कुरुसेना शीघ्र पलायनं[4]-परायणा झाली ॥५८॥
भीम तसा जैसा हरि[5] हरिनें वधितांचि कनककशिपु[6] निवे ॥
पार्षतचमू ह्मणे निज- पतिंच[7] ह्मणासि हर्षजनक कशि पुनिवे
दुःशासन कर्ण शकुनि कृप कृतवर्मा सुयोधनहि मानी ॥
सर्वहि विरे नृपा ज्या- परि परितापें सुयोध न हिमानी १६०
न कळे पडे सकळ पडे व्यसनीं पाहे सुयोध न हित रणीं ॥
झाला गुरु-पात-महा- भय-राहु-मुखीं सुयोधनहि तरणी॥६१॥
सुटतां पळ बळ देउनि बा जो बळ जलधि आवरायाचा ॥
कुरुप-गुरुपतन होतां प्रथमचि त्यां जाय आव रायाचा॥ ६२
कौरव-बळ सकळ पळे त्यांत तुझा पुत्रही असामकर[11] ॥

---

१ शस्त्ररहित. २ दुष्टमति. ३ लज्जित व्हायास. ४ पलायन-तत्परा. ५ इंद्र. ६ हिरण्यकशिपु. ७ आपला स्वामी ( चंद्र ). ८ अत्यंत थंडी. ९ विश्रांति. १० दुर्योधनाचा. ११ संधि न करणारा.

तों ये अश्वत्थामा वीर स्रोतोभिमुख जसा मकर ॥ ६३ ॥
करुनि शिखंडि-प्रमुख- प्रबळ-भटांसीं महासमर सुटला ॥
स्फुट लाजवुनि परांला आला तों कुरुबळाब्धि हा फुटला ॥
कुरुपतिस पुसे कां हो पळतां पळसांचियाचि सांगातें ॥
ऐशा पलायनाचें जें काय निमित्त तूर्ण सांगा तें ॥ ६५ ॥
गुरु-शोकें गहिंवरला महिवर लाजे स्वयें कथायास ॥
पाहे कृपाकडे तो सांगे गुरु-हानिची कथा यांस ॥ ६६ ॥
वृत्त सविस्तर सर्व श्रवण करुनि परशुरामसा स्ववळे ॥
कीं मंतुकरा तक्षक सर्प कराया डसोनि राख वळे ॥ ६७ ॥

---

## अध्याय २२.

द्रौणि ह्मणे मदधिक जें केलें वात्सल्य नित्य मत्तातें ॥
रे धर्मा रे भीमा कैसा रे विसरलासि मत्ता तें ॥ १ ॥
गोपीजन ठकवावा खाया नवनीत साय कर्नकपटा ॥
चालों देइल माझा शिरतां अवनींत सायक न कपटा ॥ २ ॥
गुरुच्या सफळ कसा रे होइल तव राज्य- काम हा घातें ॥
हा मंदा संपादुनि इच्छावें राज्य कां महाघातें ॥ ३ ॥
शिव शिव कोण कुलज नर कपटें गुरुच्या करील अहितातें ॥
पांडव न शिष्य पाजुनि पय केले पुष्ट दुष्ट अहि तातें ॥ ४ ॥

---

१ उदकप्रवाहाकडे मुख करून. २ स्पष्ट. ३ भूपाते. ४ अश्वत्थाम्याला. ५ अपराधकर्त्यास. ६ हे कृष्णा.

परमास्त्ररहस्य नृपा आहे उपदेशिलें मला तातें ॥
पांडव काय भजे स्मर- हरनयना तेज जें अलाता तें ॥ ५ ॥
समुपेक्षिलें ठकविलें पृतनामहिमानका पित्या सहसा ॥
स्यां मारावे खळ ते कृतनामहि मान:कांपित्यासह सा॥ ६ ॥
नारायणाऽस्त्र योजुनि करितों अहितांसि आजि भस्म रहा ॥
कुतुक पहा ह्मणतिल सुर जग खातो काळ परम घस्मर हा॥
ऐसी महा प्रतिज्ञा परिसुनि कुरुकटक सर्वही परते ॥
गर्जे सिंह-रवें तों धर्मादि समस्त वचकले पर ते ॥ ८ ॥
धर्म पुसे विजयातें सर्व पळाले भिवोनि गुरुपातें ॥
गर्जति कां हे झाला बा कोण सहाय वीर कुरुपातें ॥ ९ ॥
हा रव कोणाचा गा दर दुंदुभि-सिंहनाद लोपवितो ॥
वाटे सहाय त्याला झाला धरितो सदैव जो पवि तो ॥१०॥
जिष्णु ह्मणे पळ पळ बळ- सागर जेणें गमे अर्नाद रिता ॥
हा गुरु-सुत-रव जैसा भास्कर तेजोंतरीं अनादरिता ॥ ११ ॥
कुपित गुरुसुत सकळ पर- दारांच्या आजि हरिल टिकल्याला
जें करि-वर-मद-हर तें साहजिक न तेज हरि लटिक त्याला
अनृत सुत-मरण सांगुनि गुरुकरवीं त्वां धनुष्य सोडविलें ॥
पार्षत-करें पितृशता- धिक-गुरुचें शिर रणांत तोडविलें॥१३॥
त्वां वधुनि घेतलें यश गति व्हाया कां न देशिकाकरवीं ॥

१ ज्वलितकाष्ठास. २ सेनेचा महिमा कळविण्याविषयीं नोबदी-सारिखा अशा. ३ भक्षक. ४ वज्र. ५ इंद्र. ६ नादरहित. ७ अ-न्य तेजास. ८सकलशत्रुस्त्रियांच्या.९कुंकुमतिळकाला.१०गुरूकडन.

जरि हंस काक सत्याऽनृत तरि तूं कान देशि काकरवीं १४
स्वर्गपद ब्रह्मपदहि किंबहुना मोक्षपदहि सोडावें ॥
श्रीगुरु-पदचि ह्मणति कवि सर्वस्वार्पण करूनि जोडावें॥१५॥
राज्यपद अनर्थास्पद केवळ त्याच्या धरूनि लोभातें ॥
गुरुपद गमाविलें कीं गेलें घेऊनि सत्य शोभा तें ॥ १६ ॥
वालि-वधीं रामाचें द्रोण-वधीं हें तुझें अयश राजा ॥
तो व्यर्थ असोनि सुखी सत्य नरा ज्या नसे अेय शरा ज्या
पक्षांत हळुच शिरला जेंवि भरतनायका पिलें शिरतें ॥
सद्गुरुचें निष्करुणें वाळुकसें होय कापिलें शिर तें ॥ १८ ॥
गुरुघातकासि आतां रक्षीं सामात्य तूं अजातारी ॥
नच पर नर-कुंजर जो त्या हरिपासूनियां अजा तारी ॥१९॥
बहु वय सरलें उरलें थोडें तों काय कर्म वोडवलें ॥
सिंधु बहु तरुनि शेषीं कैसें बा सत्व-उडुप फोडवलें॥२० ॥
हा हा उपेक्षिला गुरु या पापें पावलोंचि नरका मी ॥
बुडतो सर्व बुडवितो लोभी क्रोधी तसाचि नर कामी ॥२१॥
सर्वहि उगेचि होते ऐसा गुरुशोक अर्जुनें करितां ॥
वरितां उदासपण बहु चापलता त्यजुनि मृदुलता धरितां२२
भीम ह्मणे चालविला वर्षें संन्यासि-धर्म हा तेरा ॥
क्षत्रिय धरिति कराया समरीं ऐसेंचि कर्म हा तेरा ॥ २३ ॥
सर्वस्व हरुनि कपटें स्त्रीचीही सोडिली निरी हातें ॥

१ काकशब्दीं ( अनृतीं ). २ लोहाग्र. ३ सत्वरूप नौका.
४ शस्त्राम.

क्षमिलें खल कृत-धर्षण दुःसह कापिला अशा निरीहावें २४
समय न विलंबिला तरि जीवनाहि हरावया झगडतात ॥
सुज्ञहि ठगाचि आह्मां विपर्यी झाला खरा दगड तात ॥२५॥
त्वदनुमतें या हिततम- कृष्णानुमतेंचि धर्म वर्ततसे ॥
तरि खल आति-दुस्तर हे तिमिरीं पथ सर्पगर्भगर्त तसे ॥२६॥
सर्व यथाशक्ति रणीं झटतों विजयार्थ धरुनियां सदसी ॥
त्या आह्मां अतिदुःसह जेविं क्षार क्षतीं असें वदसी ॥२७ ॥
वर्णुनि गुरुसुत भिवविसि मज खल-बल-शत-भयावहा काय ॥
आहे गदा सहाय द्रौणिपुढें धरिल दर न हा काय ॥ २८ ॥
व्यसनीं मद्धृदयातें ऐसें बोलों नको विदाराया ॥
व्यसनीं दुखविसि निष्ठुर कैसें बोलोन कोविंदा राया॥२९ ॥
द्रौणि किती द्रोणाचल यो भस्मचि करिन तो गदाघातें ॥
भगवत्स्मरणें भगवद्- भक्त जसा नरकभोगदाघातें ॥ ३० ॥
त्यजुनि भय स्वस्थ रहा ह्मणवी धर्मादितासि हा न रवा ॥
हा नर-वासव देइल न सलोकप-मृत्युच्याहि मान रवा ॥३१॥
भ्यालासि कृष्ण सारथि असतां वद सत्य पांडवा खातो ॥
नरकीं नग पाहेलचि जरि गिळिलहि सत्यपांड वाखा तो३२॥
पार्षतहि ह्मणे होता षट्कर्मी निरत काय हा नियमें ॥
केली जेविं करावी वहु-जीवनिकाय-काय-हानि यमें ॥ ३३॥
त्यजुनि स्वधर्म झाला पर-धर्माऽश्रित अशांत जरि [illegible]॥

१ निरिच्छातें. २ सर्प आहेत ज्यांचे पोटीं असे ख- ३ उ-त्तमखड्ग. ४ व्रणांत. ५ भीति. ६ देह. ७ जाणत्य द्वैद्ध.

जरि हंस काक सत्याऽनृत तरि तूं कान देशि काकरवीं[1] १४
स्वर्गपद ब्रह्मपदहि किंबहुना मोक्षपदहि सोडावें ॥
श्रीगुरु-पदचि ह्मणति कवि सर्वस्वार्पण करूनि जोडावें॥१५॥
राज्यपद अनर्थास्पद केवळ त्याच्या धरूनि लोभातें ॥
गुरुपद गमाविलें कीं गेलें घेऊनि सत्य शोभा तें ॥ १६ ॥
वालि-वधीं रामाचें द्रोण-वधीं हें तुझें अयश राजा ॥
तो व्यर्थ असोनि सुखी सत्य नरा ज्या नसे अंय[2] शरा ज्या
पक्षांत हळुच शिरला जेंवि भरतनायका पिलें शिरतें ॥
मद्गुरुचें निष्करुणें वाळुकसें होय कापिलें शिर तें ॥ १८ ॥
गुरुघातकासि आतां रक्षीं सामात्य तूं अजातारी ॥
नच पर नर-कुंजर जो त्या हरिपासूनियां अजा तारी ॥१९॥
बहु वय सरलें उरलें थोडें तों काय कर्म वोडवलें ॥
सिंधु बहु तरुनि शेषीं कैसें बा सत्व-उडुप[3] फोडवलें ॥२०॥
हा हा उपेक्षिला गुरु या पापें पावलोंचि नरका मी ॥
बुडतो सर्व बुडवितो लोभी क्रोधी तसाचि नर कामी ॥२१॥
सर्वहि उगेचि होते ऐसा गुरुशोक अर्जुनें करितां ॥
वरितां उदासपण बहु चापलता त्यजुनि मृदुलता धरितां २२
भीम ह्मणे चालविला वर्षे संन्यासि-धर्म हा तेरा ॥
क्षत्रिय धरिति कराया समरीं ऐसेंचि कर्म हा[4] तेरा ॥ २३ ॥
सर्वस्व हरुनि कपटें स्त्रीचीही सोडिली निरी हातें ॥

१ काकशब्दीं ( अनृतीं ). २ लोहाग्र. ३ सत्वरूप नौका.
४ शस्त्राम.

क्षमिलें खल कृत-धर्षण दुःसह कापिला अशा निरीहावें[1] २४
समय न विलंबिला तरि जीवनहि हरावया झगडतात ॥
सुज्ञहि उगाचि आह्मां विपर्यी झाला खरा दगड तात ॥२५॥
त्वदनुमतें या हिततम- कृष्णानुमतेंचि धर्म वर्ततसे ॥
तरि खल अति-दुस्तर हे तिमिरीं पथ सर्पगर्भगर्त[2] तसे ॥२६॥
सर्व यथाशक्ति रणीं झटतों विजयार्थ धरुनियां सदसी[3] ॥
त्या आह्मां अतिदुःसह जेविं क्षार क्षतीं[4] असें वदसी ॥२७॥
वर्णुनि गुरुसुत भिवविसि मज खल-बल-शत-भयावहा काय ॥
आहे गदा सहाय द्रौणिपुढें धरिल दर[5] न हा काय[6] ॥ २८ ॥
व्यसनीं मद्धृदयातें ऐसें बोलों नको विदाराया ॥
व्यसनीं दुखविसि निष्ठुर कैसें बोलोन कोविदा[7] राया॥२९॥
द्रौणि किती द्रोणाचल यो भस्मचि करिन तो गदाघातें ॥
भगवत्स्मरणें भगवद्- भक्त जसा नरकभोगदाघातें ॥ ३० ॥
त्यजुनि भय स्वस्थ रहा ह्मणवी धर्मादितासि हा न रवा ॥
हा नर-वासव देइल न सलोकप-मृत्युच्याहि मान रवा ॥३१॥
भ्यालासि कृष्ण सारथि असतां वद सत्य पांडवा खातो ॥
नरकीं नग पाहेलचि जरि गिळिलहि सत्यपांड वाखा तो ३२॥
पार्षतहि ह्मणे होता षट्कर्मी निरत काय हा नियमें ॥
केली जेविं करावी वहु-जीवनिकाय-काय-हानि यमें ॥ ३३ ॥
त्यजुनि स्वधर्म झाला पर-धर्माऽश्रित अशांत जरि पिंकला॥

१ निरिच्छातें. २ सर्प आहेत ज्यांचे पोटीं असे खळगे. ३ उत्तमखड्ग. ४ व्रणांत. ५ भीति. ६ देह. ७ जाणत्या. ८ वृद्ध.

हा ब्राह्मणं-ब्रुवा भुव धन घेउनि कौरवा स्वयें विकला॥ ३४॥
क्षत्रिय-धर्मींहि उत्तम परि त्यातें नीट चालवीना कीं॥
यन्निष्ठापुरुषातें स्वर्गश्री नित्य पालवी नाकीं॥ ३५॥
मद्बांधववचि खपविले इतरांसि नसेचि अवधि लेखाया॥
या अधमापरि वाटे त्या घटकर्णींहि न वधिले खाया॥ ३६॥
यावा कनककशिपुचा जैसा तैसाचि हा वध मनातें॥
कैंचा द्विज कैंचा गुरु दुरित करुनि बुडवितो अधम नातें ३७॥
अर्जुनजी सुकृत नव्हे अरि अति दारुण असा वधाना तें॥
खल सावधान न मरे तरि मारावें असावधानातें॥ ३८॥
केला त्वत्तातेंही खाया तांबूल-कवळ आ ज्यास॥
शर-शयनीं न निजविलें काय तुवां त्या तशाहि आज्यास ३९
बापाचा परम सखा जो नृप भगदत्त बापसा मान्य॥
पातीं पाडुनि कपटें वधिला तें काय पाप सामान्य॥ ४०॥
गेलें काय तुझें म्यां जरि पितृघातक हरूनि मद वधिला॥
खल जो प्रवर्तला जन सकळ वधाया करूनि मंदवधिला ४१॥
भगिनी-भाचा-करितां आवरुनीं चाप रोपं हा साहे॥
द्रुपदसुत-भुज स्तवना योग्य न नीचा परोपहासा हे॥ ४२॥
रामें रावणसा हा म्यांचि वधावा रणीं असें होतें॥
याजोपयाज-मुनि-कृत होइल लटिकें तुह्मां कसें हो तें॥ ४३॥

१ ब्राह्मण ह्मणविणारा. २ पांडूनेंही. ३ भीष्मास. ४ पापण्या. ५ मत्-अवधि-माझ्या मर्यादेला. ६ बाणविशेष. ७ शत्रूंनीं केल्या निंदेम. ८ नामविशेष ( ऋषि ) त्यांची कृती.

धर्मांकडे मजकडे नाहींच अधर्म-लेश हा कांहीं ॥
शिष्यद्रोहें मेला गेला परतेल काय हाकांहीं ॥ ४४ ॥
पार्षत-कृत-गुरु-दूषण बहुतचि मज सर्व वर्णवेना तें ॥
धिक्धिक् सकळहि ह्मणती त्यासम जे सर्व वर्ण वेनातें ॥४५॥
अश्रु-परिप्लुत-नयनें धृष्टद्युम्नाकडे विजय पाहे ॥
राहे धर्म अधोमुख भीमहि कोणासही न तें साहे ॥ ४६ ॥
शैनेय[1] ह्मणे कैसें वदतो जाणों नव्हेचि पापीसा ॥
नाहीं कोणी येथें याची जिव्हा समूळ कापीसा ॥ ४७ ॥
सत्य रसज्ञा[2] ह्मणतों गुरुनिंदा बोलतां तडकलीला ॥
करितील दर्शनार्थ प्रियसख हे बोल तांतड कलीला ॥ ४८॥
जीभ चिरावी शतधा शिरहि उलावें खळा भुज गळावे ॥
श्वपच-गृहाला[3] पथिक द्विजसे सोडुनि तुला असु पळावे ४९ ॥
हितशत्रु काममुख हे नरकीं ह्मणती अपत्रपा[4] पड सा[5] ॥
पाप डसाया लाविल अहि वृश्चिक भाजशील पापडसा॥५०॥
त्वां सप्त अवर[6] पर जे त्यांतें नरकांत घातलें कानें ॥
परिसुनि ह्मणेल पार्षत केला द्रोणें न घात लेंकानें ॥ ५१ ॥
भीष्में महानुभावें आदरिला तो तसा स्वयें स्वांत[7] ॥
तूं जेविं कृतघ्न तसें मानी शुद्धासही तुझें स्वांत[8] ॥ ५२ ॥

---

१ सात्यकि. २ जिव्हा. ३ चांडाळगृहाला. ४ निर्लज्जा. ५ सहा. ६ अलिकडचे. ७ आपलें मरण. ८ अंतःकरण.

भीष्म-वधींहि शिखंडी कारण उत्पादिला[1] तुझ्या बापें ॥
कोण तुह्मां द्रुपद-सुतां- वांचुनि जोडील हीं महापापें ॥ ५३ ॥
ब्रह्मघ्ना जन पाहे तुज सहसा आजि पाहुनि रवीला ॥
द्विज-राजघ्ना[2] बहुधा विधिनें तुजलाचि राहु निरवीला ॥ ५४ ॥
सरलें आयुष्य तरिच निंदिसि तूं मत्समक्ष गुरुगुरुतें[3] ॥
मांजर वांचेल कसें करिल व्याघ्रा-समीप गुरुगुरु तें ॥ ५५ ॥
नाहीं उपयोग तुझा कटकीं पळमात्रही नसावास ॥
श्वेतें[4]-तुरग मृग-मदसा तूं अस्तुति-पात्र हीनसा वास ॥ ५६ ॥
साहेन तुझे शत मी एकचि माझा गदाप्रहार सहा ॥
पापा पळों नको घे अमृतरस असा नसे महारस हा ॥ ५७ ॥
पार्षत ह्मणे वदेल न दुर्वचनें मत्त अशुभ जन कां हीं ॥
नेणे क्षमा-रतांचें त्वत्तुल्य मनुष्य-पशु भजन कांहीं ॥ ५८ ॥
हृदयीं क्षमा असावी सर्वत्र सदा असों नये पण ती ॥
ह्मणती क्षमितां दुर्वळ न क्षमितां करिति दुर्जन प्रणती ५९ ॥
गिळिलासि महादुरितें दुष्टा करिशील काय वध मांजा[5] ॥
पाहों नये तुजकडे माझ्या दृष्टी-पुढोनि अधमा जा ॥ ६० ॥
जो घोळशी तुज जसा सुरतीं अतिकामरस कलत्रास[6] ॥
पाहोनि पावले ज्या नरसिंहा सामर[7] सकल त्रास ॥ ६१ ॥
भूरिश्रवा सिताश्व- च्छिन्नभुजं प्रायगत महातेजा ॥

१ उत्पन्न केला. २ हे द्रोणास मारणाऱ्या, पक्षीं-चंद्रास ग्रासणाऱ्या. ३ अर्जुनगुरूतें. ४ अर्जुन. ५ माझा. ६ स्त्रियेस. ७ देवांसहवर्तमान.

बहु धन्य ह्मणत होते अमरसम रसिक बुध पहाते ज्या ॥
त्यातें वधुनि न लाजसि नरकफळा वरुनि वीरहानीच्या ॥
मिरविशि पुरुषार्थ ह्मणसि लोकीं आपणचि वीर हा नीच्या
केवळ चांडाळचि तूं झालासि प्रायगत-सुजन-घातें ॥
पाप्या तुलाचि घडलें कर्म तसें नच घडेल अनघातें ॥ ६४ ॥
ज्यां नसतां छिन्न-भुज प्राय-गत द्रोण मारिला मदरी ॥
वदरी निवेल विप्रा ऽधम-शमनें सर्व-शांत-धाम-दरी ॥ ६५ ॥
द्रोण-शिर कापिलें तें नाक तुझें काय जेंवि घटकर्ण ॥
तैसाचि रणीं मर तूं येणेंचि फिटेल आप्त-कटकर्ण ॥ ६६ ॥
दुर्वाक्य पुन्हा वदतां द्रोण-शिर तसें तुझेंहि कापीन ॥
न मथितिल खळा तरि हे भुज केले व्यर्थ काय गा पीनँ ६७
मूढा केवळ धर्में राज्य-व्यवहार चालतो काय ॥
न करी अधर्म ऐसा जो एक तुह्मीं रचाल तो कांय ॥ ६८ ॥
दुर्योधनें अधर्में द्यूत-क्रीडेंत वंचिला पार्थ ॥
लुटिला कुटिलानें हा चोर-समूहें वनीं जसा सार्थ ॥ ६९ ॥
छळिली सती अधर्में होता फेडीत पापजन वासा ॥
पाठविले वल्कल-धर करुनि अधर्मेंचि सर्व वनवासा ॥ ७० ॥
धांवोनि येत होता जो मद्रप एक भट कळवळून ॥

---

१ खेदार्थी अव्यय. २ पातकरहितातें. ३ माझा शत्रु (द्रोण). ४ बदरिकाश्रम. ५ सर्व सात्विक तपस्व्यांचें स्थान. ६ आप्त आणि कटक ह्यांचें ऋण. ७ पुष्ट ८ देह. ९ द्रव्य.ातू १० वस्त्रांस.

नेला पुजुनि अधर्में व्हाया यांचेंचि फटकळ वळून ॥ ७१ ॥
वधिला बाळ[2] अधर्में कोंडुनि विपिनीं जसा शशक सारे ॥
झटले वृकसे नाहीं- तरि होता त्यांसि तो वश कसा रे ७२
भीष्म-प्रभुच्या पातें घडलाचि अधर्म धवलतुरगाही[3] ॥
पूस खरें कीं खोटें देतिल देवर्षि सिद्ध सुर गाही[4] ॥ ७३ ॥
भूरिश्रवा अधर्में संहरिला त्वांहि पंडितंमन्यें[5] ॥
देवद्रुम[6] दुर्दैवें जेंवि मदांऽधें करीश्वरें वन्यें[7] ॥ ७४ ॥
त्यांहीं तसाचि यांहीं[8] केला आहे अधर्म हा कांहीं ॥
हा कांहीं ह्मणति बेळें होईल तुझ्याहि काय हाकांहीं ॥७५॥
जें धर्माऽधर्माचें तत्व कळेनाच बालिशमना तें ॥
मातें नेणुनि निंदिशि तूं पामर जेंवि वालि-शंमनातें[10] ॥ ७६ ॥
पूस परांचे पथ तूं पांचाळांच्याचि सांड गावांचे ॥
अज[11]-शश-मृगांतचि बळी पळहि हरिपुढें न लांडगा वांचे७७
कोपें सात्यकि ठेवुनि शर कार्मुक घे महा-भुज गदे तो ॥
वाटे गरुडासि शिव्या बहु चक्षुर्विष महाभुजग देतो ॥ ७८ ॥
त्यावरि सात्यकि धांवे पार्षत टाकी उडी रथावरुनी ॥
गमले ते अंतकसे अन्योन्य-क्षय-करा पथा वरुनी ॥ ७९ ॥
प्रभु-वचनें द्रुत[12] धांवे भीम बळें माधवासि[13] कवटाळी ॥

१ विपरीत. २ अभिमन्यु. ३ अर्जुनालाही. ४ साक्ष. ५ आपल्यास पंडित असें मानणाऱ्यानें. ६ कल्पतरु. ७ अरण्यसंबंधीं अशा. ८ पांडवांनीं. ९ सैन्यें. १० रामातें. ११ मेंढा. १२ सत्वर. १३ सात्यकीस.

यमुना-ह्रद गरुडाची वृष्णि-वराची तसीच कंव टाळी ॥८०॥
आवरितां आटोपी त्यासि पदीं भीमसेन तो साऽ्या ॥
त्यातें सहदेव ह्मणे आह्मांकरितां दुरुक्ति सोसाऽ्या ॥ ८१ ॥
पांचाल्य ह्मणे सोडा सोडा धरितां कशास भावोजी ॥
खल-दमनें हर्षोंघ्या देत्ये राघवयशा सभा वो जी ॥ ८२ ॥
येऊं द्या हो मजवरि हा सात्यकि सत्य वात पर्वत मी ॥
तुरवीन या वराकीं तुरवी रवि जेंवि तिळहि गर्व तमीं ॥८३॥
हे कौरव आले कीं यांचेंही मथन हें महाकार्य ॥
आह्मीं मुदित करावा सर्वांनीं मथुनि अँहित हा आर्य ॥८४॥
अथवा याचा कांहीं नाहीं पार्था महातपा लेंखा ॥
ह्मणतो काळा दावुनि अरि जेंवि गजा महात पाले खा ८५
जो छिन्न-बाहु वधिला कौरव्य मला तयापरि समजला ॥
वाटे अधिक शतगुणें तेजस्वि अलात यापरिस मजला ८६
तेजस्वी धरवेना कळलासि स्पष्ट तूंचि फुसका रे ॥
हें परिसुनि मारुति-भुज- धृत सात्यकि सर्पसाचि फुसकारे ॥
भीम भुजांतुनि निसटे संसारांतुनि जसाचि संसारी ॥
त्यातें धांवुनि यत्नें समजाविति धर्मराज कंसारी ॥ ८८ ॥
कोपी ऐकुनि कुरुवर यांवरि ते शीघ्र नरवरा गेले ॥
तैसे हरि परिसुनियां मत्त गजांचाहि न रव रागेले ॥ ८९ ॥

---

१ सात्यकीची. २ झडप. ३ सहाऽ्या. ४ शत्रु. ५ धर्मराज. ६ गणना. ७ भूरिश्रवा. ८ कोळीत. ९ भीमाच्या भुजांनीं धरलेला. १० कौरवांवर.

क्रुद्ध व्याघ्रचि सात्वत पार्षत ते भौमसोदराक्ष[1] ससे ॥
पर गमले तदिषुहि अस्त्र-गास्वादन-लब्ध-मोद राक्षससे ९०

## अध्याय २३.

पडले गळांचे धांवुनि सेवुनि बहु रुट्[2]-सुरा सुरथ डकले ॥
अभिमान-टिकें न सुटति कुरु पांडु जसे सुराऽसुर थडकले १
नारायणाऽस्त्र योजी गुरुपुत्र पराऽबला[3]-विलापार्थ ॥
वाटे त्या असुरांच्या दुर्दैवें तो बलाविला पार्थ ॥ २ ॥
वृष्टि विविध-शस्त्रांची बहु होऊं लागली असुसहा[4] ती ॥
कलि-लीलेला बुधसे नच वीरांचे तिला असु सहाती ॥ ३ ॥
जाळी पर-कटकातें ग्रीष्मीं दव-दहन जेंवि कक्षांतें ॥
कोणाचीही चालों नेदी नारायणाऽस्त्र कक्षा[6] तें ॥ ४ ॥
पेटे अधिकचि जों जों वाराया करिति यत्न ते जन गा ॥
तावी परा जसें रवि- कांताच्या[7] दिवसरत्न-[8] तेज नगा ॥ ५ ॥
धर्म ह्मणे क्षत्रिय हो करितां काशास काय-होमातें ॥
मी मंद-भाग्य केवळ पापी ताराल काय हो मातें ॥ ६ ॥
धृष्टद्युम्ना उरलें बळ रक्षावें वृथा न भाजावें ॥
बा विहगांहीं[9] सोडुनि दव-परिवृत-पादपां[10] नभा जावें ॥ ७ ॥

---

१ मंगळांचे बंधु असे नेत्र ज्यांचे (रक्ताक्ष असा भाव). २ क्रोधरूप मद्य. ३ शत्रुस्त्रियांच्या विलापार्थ. ४ दुःसहा. ५ गवतातें. ६ कोटी. ७ सूर्यकांताच्या. ८ सूर्यतेज. ९. पक्ष्यांनीं. १० दावानलानें वेष्टित अशा वृक्षा.

जा शैनेया माझे मामातें सांग नमन मामीतें ॥
जें केलें साह्य तुवां शत-जन्में आठवीन मा मी तें ॥ ८ ॥
आहे सुज्ञ समर्थ स्व-श्रेय करील हा यदुपदेश[1] ॥
विपदब्धि-सेतु[2] होउनि लोकांला तारितो यदुपदेश[3] ॥ ९ ॥
सानुज मी या अस्त्र- ज्वलनीं शिरतों अरे अहीन-कुला[4] ॥
सहदेवा मेलाही तो धन्यचि जो न भी अहीं नकुला ॥१०॥
जननीस शोक बाधे पुत्राचा वेचतां वृथा काय[5] ॥
रणमरणें हर्षेल प्राकृत-माता तसी पृथा[6] काय ॥ ११ ॥
भीष्म-द्रोण-समुद्रीं तरलों या द्रौणि-गोष्पदीं बुडतों ॥
अचल प्रकंपना[7] जे ते व्यजनें[8] तुच्छ तूळसे[9] उडतों ॥ १२ ॥
जिष्णु-मनीं गुरुपुत्रें पांडव पांचाल शेष आहेत ॥
हे मारुनि पुरवावा गुरुचा वधिले न सर्व हा हेत ॥ १३ ॥
अभिमन्यु बाळ जेणें कथुनि वधाचा उपाय माराविला ॥
लाजविलें उग्रत्वें दुष्प्रेक्षत्वें गुणें यमा रविला ॥ १४ ॥
ससुतें जेणें पुसतां धर्म-द्यूतांत वदन वासून[10] ॥
कृष्णा उपेक्षिली दे हर्ष नमुनि नित्य पद नवा सून ॥१५॥
जेणें जयद्रथातें त्या व्यसनमहार्णवांत ताराया ॥
लेववुनि कवच केला क्षम[11] कुरुपति अर्जुनासि माराया ॥१६॥
पांचाळ सत्यजिन्मुख जे होते मज्जयार्थ[12] झटत रणीं ॥

---

१ कृष्ण. २ विपत्तिरूपसमुद्राविषयीं सेतु. ३ ज्याचा उपदेश. ४ मुंगसाला. ५ देह. ६ कुंती. ७ महावातास. ८ विंजण्यानें. ९ कापसाप्रमाणें. १० पसरून. ११ समर्थ. १२ माझ्या जयासाठीं.

ब्रह्माऽस्त्र-राहुकरवीं जेणें ते गिळविले सुभट-तरणी ॥ १७ ॥
द्याया आह्मां सर्वां स्वर्ग निवास प्रवर्तला होता ॥
कल्याण-वृत्त गुरु ज्यां मारविला युद्ध-मन्युचा होता ॥ १८ ॥
अस्त्रांऽग्नींत जळावें हें प्रायश्चित्त सर्वथा युक्त ॥
उक्त प्रकार जे जे त्यांत वरा शीघ्र करिल हा मुक्त ॥ १९ ॥
प्रभु भुज उभारुनि ह्मणे सैनिक हो शीघ्र आयुधें सोडा ॥
यानावरूनि उतरा कर या अस्त्रासि सर्वही जोडा ॥ २० ॥
भस्म करिल योध-जना बहुतां शरणागताविना शम हा ॥
न धरिल उरविल कोणा न हुताश रणागता विनाश महा॥२१
तों भीम ह्मणे कथितों हा हितहि तमालनील परि सारे ॥
मानधन कुलज-जन हो मन हो न त्रस्त वाक्य परिसा रे २२
सोडावें कुलजांहीं जीवित समरीं न शस्त्र सोडावें ॥
मोडावें आप्त-वचन अयश शरीरार्थ केंवि जोडावें ॥ २३ ॥
धरितों मी या अस्त्रीं न उराया तिळहि उर गदा हातें ॥
रे गरुड-संश्रिताच्या विष-दहनें करिल उरग दाहातें ॥ २४ ॥
पावेल मजपुढें हा घेउनियां हरि विप्र तापातें ॥
भेटुनि रघुरामा भृगु- राम कसा हारवि प्रतापातें ॥ २५ ॥
रे जिष्णो त्वां समरीं भिउनि परां सत्व बळ न सोडावें ॥
करपद्म तुझें उजवें विशर विगांडीव पळ नसो डावें ॥२६॥
जिष्णु ह्मणे आर्या मी न करिन अन्यत्र कार्मुक-न्यास ॥

१ हवनकर्ता. २ ब्रह्मास्त्रानल. ३ श्रीकृष्ण. ४ जिंकपणा. ५ अर्जुना. ६ करकमळ. ७ बाणरहित.

नारायणाऽस्त्र-गो-द्विज- तेजा धावा न मान अन्यास ॥२७॥
तें जय-वर्च परिसुनि तो अत्यद्भुत- मान-सत्व रागेला ॥
घनसाचि द्रौणिवरि स्वीकारुनि मान सत्वरा गेला ॥ २८ ॥
हास्य करुनि गुरु-नंदन ताडी अस्त्राऽभिमंत्रित-शरांनीं ॥
वाटे दाव-ग्रस्तीं शिरला तो द्विरद काल-वश रानीं ॥ २९ ॥
भीमाऽचलावरिच बा अस्त्र-जलद-पटल तें सकळ वळलें ॥
कटक कळवळे बहु परि हृदय पवन-सूनुचें न कळवळलें ॥३०॥
क्षितिवरि उतरुनि सर्वहि करिती तत्काळ आयुधं-न्यास ॥
ह्मणती सुर नरहि असो देवा या विपुल आयु धन्यास॥३१॥
जय आच्छादी भीमा अस्त्र-ज्वलनांत वारुणें अस्त्रें ॥
केशव-कृपाचि झांकी त्या बाळा त्या महातपीं वस्त्रें ॥३२॥
दहनीं मिळोनि कळवी कीं दहन-समान वेगळा मी न ॥
मजहि गमे तो अस्त्रा प्रथम जसा मानवे गळा मीन ॥ ३३ ॥
वारुण-परिवृत ह्मणवुनि भस्म न करि दहन-राशि शिरल्याला
सुखदचि पर-प्रतापाऽतप त्या जो हरि दयाशिशिर ल्याला॥
भीमावनार्थ धांवे ब्रह्म करी जें चिरायु धात्यातें ॥
पदं-धावन बहु यश दे विस्त्रस्तपटा निरायुधा त्या तें ॥३५॥
दीप्ताऽलयांत शिरवी जेंवि कृपण-धनिक-मानवास वही ॥

---

१ अर्जुनवचन. २ भीमरूपपर्वतावर. ३ भीमाचें. ४ शस्त्र-त्याग. ५ अर्जुन. ६ पर्जन्यास्त्रानें. ७ मासा. ८ शत्रुप्रतापरूप सूर्य. ९ शीतल. १० दीर्घायु. ११ ब्रह्मदेवातें. १२ पायांनीं धांवणें. १३ गेलें आहे वस्त्र ज्याचें असा. १४ कृष्णास. १५ उधाराची वही.

प्रभुसि तसा अश्वीं तो पावेना भक्त-मान-वासवही ॥ ३६ ॥
दोघे नर-नारायण गांठिति भीमासि धरुनि सुरयातें ॥
जरि हा असा दुराग्रह वदले बहु धन्य वरुनि सुर यातें ३७
झोंबाति ते भीमाच्या जैसे याचक करास दात्याच्या ॥
वंदन दुराग्रहा स्व-दु- राग्रह जाया करा सदा त्याच्या ३८
घे धनु धनंजय नृपा शौरि शरातें बळेंचि झोंबोनी ॥
ओढिति रथावरुनि मग घालूनि मिठी भुजांसि लोंबोनी ३९
तों तों गर्जे भीम प्रभु जों जों वल करूनि आकर्षी ॥
नारायणाऽस्त्र खवळे भ्याले बहु नारदादि नाकर्षी ॥४०॥
कृष्ण ह्मणे हें काय त्यज आग्रह बा न उचित हठ कांविला
उतर रथावरुनि क्षण अभिमानें कोण कोण न ठकाविला ॥४१॥
युद्धें निवारितें तरि कां आह्मी सर्व न करितों युद्ध ॥
क्रुद्ध नको होऊं बा या अस्त्र-शमीं उपाय हा शुद्ध ॥ ४२ ॥
अस्त्र-न्यास करुनि हे वीर तुझे उतरले पहा सारे ॥
या रेवती-धवाऽनुज-वचना दे मान मानदा बा रे ॥ ४३ ॥
दुर्योधन-दुर्दैवें प्रभुकरवीं तो बळेंचि उतरविला ॥
कीं देणार पवन-सुत शोक तुळां जेंवि शक्र-सुत रविला ४४
ज्या स्मरतां कामाद्यरि- षट्काऽहंकार सर्व हरपावे ॥
भीम वळें बहु-कष्टें पूर्वी त्या प्रभुसि जेंवि हर पावे ॥ ४५ ॥

---

१. उत्तम वेगातें. २ स्वर्गस्थ ऋषि. ३ आग्रह. ४ अस्त्रशांतीविषयीं. ५ कृष्णवचना. ६ धृतराष्ट्राला. ७ अर्जुन.

भीम-प्रेम-बळेंचि न पाहुनि नारायणाऽस्त्रं-दर वळला ॥
त्या सुयशें जेंवि तसा सुर-तरु-कुसुमें न नाक दरवळला ४३
नारायाणाऽस्त्र शमलें जेंव्हां तो वायुचा तनय शमला ॥
प्रभुचेंसें प्रभुच्यांचें सांगों दे दुसरि मात न यश मला॥४७॥
पुनरपि पर प्रमुदित प्रेक्षुनि पौरवपती असुख पावे ॥
त्यांसि ह्मणे उरल्यांचे याचि महाऽस्त्राऽनळें असु खपावे ४८
द्रौणि ह्मणे मृत्युपरिस भंग अधिक शत-गुणें असें आहे ॥
मृत-मारण नीचोचित होते पसरीत कीं पदर आ हे ॥ ४९ ॥
अस्त्र-प्रदीप ह्मणसी उजळीं नुरवावयासि परं-तेल ॥
योजूं नये पुन्हा हें योजिन तरि मजवरीच परतेल ॥ ५० ॥
मज- हरिपुढें उरावें न पळभरिहि शत्रुकटक-काळिंविटें ॥
केला दिव्यास्त्रप्रति- घात खरा गोपदार-बाळिंविटें ॥ ५१ ॥
भूप ह्मणे न जयश्री देशिल तूं बा परंतु कामातें ॥
देतो सुबंधू साधुनि यत्नें प्रभु बाप रंतुंकामातें ॥ ५२ ॥
त्र्यंबक अस्त्रीं कीं तूं न पळों देसील पदहि सुत्रांम्या ॥
तुजवरि गुरुघ्न-वध हा भार दिला फार न गुरुपुत्रा म्या ॥
नृप गुरु-सुता स्तवें पटु जेंवि हया तापवी प्रतोदानें ॥

१ नारायणास्त्राचें भय. २ सुवासित झाला. ३ भक्तांचें. ४ शत्रु. ५ दुर्योधन. ६ अश्वत्थाम्यास. ७ मेलेल्यास मारणें. ८ नीचाला योग्य. ९ शत्रुरूप तेल. १० शत्रुसैन्यरूप हरिणानें ११ कृष्णानें. १२ उत्तम स्त्री. १३ क्रीडा करणाऱ्यातें. १४ इंद्रास. १५ स्तुतीनें. १६ चाबुकानें.

धांवे परासि द्याया चिंतुनि तें पाप विप्र तो दानें ॥ ५४ ॥
शरभ जसा सिंहातें गांठुनि करि भग्न पार्षता राया ॥
सात्यकि भेटे व्यसनीं त्या श्रोत्या जेंवि आर्ष[1] ताराया ५५
द्रौणि ह्मणे शैनेया रक्षिसिल न आपणाहि आपण जा ॥
रक्षिल न शक्र याचा जरि बा आजाहि करिल आ पणजा
पांचाळ सर्व वधिल्या- वांचुनि पावेल कोप उपशम[2] न ॥
वेंचुनि वाढविसिल तूं ज्वलनाचें करिल काय तुप शमन ५७
ऐसें गर्जुन अर्जुन- सम जो समजोनि करुनि पाठ कवी ॥
पाठक विख्यात जगीं तैशासहि तो महातपा ठकवी ॥५८॥
एकेंचि शरें भेदुनि कवच उर क्षतज[3] ओकवी राया ॥
सात्यकिला लोळवितां भ्याले बहु सर्व लोक वीरा या[4] ॥ ५९ ॥
गमला झाला तो गुण- सद्रत्नाचा डबा परेत रणीं ॥
वदला असेलचि धरुनि तेजाची चाड बा परे[6] तरणी ॥६०॥
सूतें शीघ्र पळविला सात्यकि तो त्यजुनि समर[7]-महि मागें ॥
ज्या शुचिगुणा ह्मणावें स्व-शिरीं तूं शंभुसम रम हिमर्मागें ६१
पाडी द्रुपद-सुता शर हाणुनि जैं विप्र भोंवयांमाजी ॥
पाहे दृष्टि परां रवि- भीतां जेंवि प्रभो वयां[9] मांजी[10] ॥ ६२ ॥
पांचाळ-चमू खवळे स्वर्गाप्रति शीघ्र वोळवी तीतें ॥
रण-मृत्यु नच रुचे जरि बहु हित तरि जेंवि बोळ वीतीतें[11] ६३

१ वाल्मीकिरामायण. २ शांति. ३ रक्त. ४ अश्वत्थाम्याम.
५ मृत. ६ मृतोद्यापनमंत्रविशेष. ७ युद्धभूमि. ८ हिमाचलानें.
९ पक्ष्यांस ( घुबडांस ). १० माझी. ११ पाळंतिणीतें.

भीम धनंजय मालव पौरव युवराजनाम चेदिपती ॥
हे पांच धांवले ज्यां डोळे पाहोनि आमचे दिपती ॥ ६४ ॥
वधिला युवराज पळें पौरवहि पळें पळेंचि मालव तो ॥
त्या गुरुसुतापुढें पर वायुपुढें जेंवि दीप मालवतो ॥ ६५ ॥
नंदावरि हरि[1] बुडवुनि निजमख करितां जसा पर-मख वळे ॥
शर-वृष्टि गुरु-सुतावरि भीम तसा बहु करी परम खवळे॥६६॥
तेज पर-हृदय-कंपद राम तसें द्रौणिही किमपि त्याला ॥
उचितचि जरि हरिणींच्या येइल वृक-दर्शनें हिमें[2] पिल्याला॥
एक जगत्प्राणात्मज[3] एक महाऽचार्यराज-कायज[4] गा ॥
ते क्रुद्ध युद्ध करितां कल्पांत-भ्रम न होय काय जगा॥६८॥
समर-मखीं कोपविला प्रथमाचि आचार्य-पुत्र तो धनुतें ॥
खंडुनि मुहूर्त मूर्छित केला भीमें समस्त-योध-नुतें ॥ ६९ ॥
नभ त्याच्या शर-जाळें कोंदे वाहों शके न वात रणीं ॥
एक कुपित रुद्र गमे एक प्रळयीं जसा नवा तरणी ॥ ७० ॥
भीमाचेंहि द्रौणि च्छेदी कोदंड दोनदा देवा ॥
वाटे गजा महागज भंग महानदचि तो नदा दे वा[5] ॥ ७१ ॥
सूतासि अलिक[6] भेदुनि पाडी प्रकटूनि अस्त्र-मायेतें[7] ॥
जैसें देणें[8] धृतितें[9] गुरु-पुत्रीं नुरवि शस्त्र मायेतें ॥ ७२ ॥
अश्व स्वैर उधळले मूर्च्छित होतांचि रश्मि आवरिता[10] ॥
पडला भीम गुरु-सुत-क्षोभें समयीं असोनि आव रिता॥७३॥

---

१ इंद्र. २ हिंव. ३ वायुपुत्र. ४ द्रोणपुत्र. ५ अथवा. ६ ललाट. ७ अस्त्ररूप कृत्यतें. ८ ऋण. ९ धैर्यातें. १० साराथि.

जैसा करिता झाला दैत्यांसीं धरुनि शक्र संगर[1] जी[2] ॥
तैसा गुरु-सुत पांडव- पांचालांसीं असीम-संगर जी ॥ ७४॥
गेली द्रुपद-सुताला पांचाल-चमू तिलाहि सोडुन भौं[3] ॥
तपन-प्रताप-समयीं न ह्मणति कोणीहि सेंदु[4] सोडु[5] नभा ७५
द्रौणि-पर- चमू मर्दी देऊनि भय-व्यथा पिटी कांहीं ॥
मूळ[6]-महत्त्व न हरिलें मोठ्या झाल्या तथापि टीकांहीं[7] ॥ ७६ ॥
केले भग्न बहुत परि न मनीं तो अजित-सारथि वरमला ॥
त्या कटकांत न कोणी आढळला अजि तसा रथि-वर मला
होउनि गुरु-सूनुपुढें श्वेताश्व ह्मणे त्यजूनि भीड अरे ॥
उद्वृत्ता[9] अबळांतें[10] कां वधिसी मजसवेंचि भीडें[11] अरे[12] ॥ ७८ ॥
हरितों मी तव दर्पा त्याही ज्या माजलासि भांडवलें[13] ॥
यामागें बहु निष्ठुर होउनि तुजसीं मला न भांडवलें ॥ ७९
आह्मांवरि जो द्वेष प्रीति तुझी जी सुयोधनावरि ती ॥
शक्तिही दावीं समयीं निज-तेजातें सुयोध नावरिती॥ ८० ॥
नाशिल सर्व तुझा हा मद तोचि द्रोण-पांतकर[14] हातें ॥
सोडुनि साहंकारा अन्य-जनीं कोण पातक रहातें ॥ ८१ ॥
पुससि कसें अति अप्रिय गुरु-सुत-कोपार्थ अर्जुन वदे हें ॥
कापुरुषत्व असें जरि अर्जिल[15] तो पार्थ अर्जु नव देहें ॥८२ ॥

१ प्रतिज्ञा. २ अजी. ३ कान्ति. ४ स-इंदु-चंद्रान्वित. ५ स-उडु-नक्षत्रयुक्त. ६ मूळग्रंथाचें महत्त्व. ७ व्याख्यांहीं. ८ संबोधनार्थ अव्यय. ९ दांडग्या. १० निर्बळांतें. ११ युद्ध कर. १२ शत्रो. १३ द्रव्यानें. १४ धृष्टद्युम्न. १५ संपादील.

तरि परुष¹-भाषणांचीं कथितों तुज कारणें नृपा² परिस ॥
बहु गुरु-पुत्रीं पार्थ- प्रेमा गुरुपरिस त्या कृपापरिस ॥ ८३ ॥
पार्थाचा विनय कृपीं द्रोणीं भीष्मीं युधिष्ठिरीं विदुरीं ॥
तोचि गुरु-सुतीं लोभाहि बहुतचि बा जेंवि जिष्णुचा³ भिदुरीं⁴
परि भवदनयें पडला विघड तशाही सख्यांत हा राजा ॥
अहित अहि तसा झाला उचित गळ⁵-विहार रत्न-हारा ज्या ॥
वधिले मालव पौरव युवराज सुकीर्ति-भाजन तिघे ते ॥
सास्वत पार्षत मारुति दमिले जे वीरराज नति⁶ घेते ॥ ८६॥
पडले होते हृदया धर्मोक्तें धिरडियासि जेंवि घरे ॥
कीं उदकें ढेंकुळसें परुषें वचनें पळांत जें विघरे ॥ ८७ ॥
दैवें पार्षत सात्यकि यांत कली⁷ भेद घातला खोटा ॥
तो उकलिला मनें जो करिता धृति-दृष्टि-घात लाखोटा ॥
यास्तव अभूत⁸-पूर्व क्रोध श्वेताऽश्व-मानसीं पेटे ॥
कक्षीं⁹ जेंवि दवाऽनल बळ ज्याला द्यावया सखा भेटे ॥ ८९ ॥
झाला गुरु- सुत- हृदयीं तो बहु कटु परुष-वाद शर भाला ॥
निद्रेंत लाविला मृग- राजानें काय पाद शरभाला ॥ ९० ॥
कोपे बहु तो वाटे उन्मूलिल कृष्ण-युग्म रोपं¹⁰ करी¹¹ ॥
हरसा दृश्याऽदृश्याऽहित-गण-दाहार्थ सिद्ध रोपें¹² करी ॥९१॥

१ कठोर भाषणांचीं. २ हे धृतराष्ट्रा. ३ इंद्राचा. ४ वज्रावर. ५ कंठाच्या ठायीं क्रीडा. ६ नमस्कार. ७ कलह. ८ पूर्वीं झालेला. ९ गवतांत १० तालवृक्ष. ११ गज. १२ बाण.

परमाग्न्यस्त्रें सकळहि शत्रु कराया परासु[1] रोपास्या[2] ॥
करुनि प्रदीप्त सोडीं तृण मानुनि त्या परां[3] सुरोपास्या[4]॥९२॥
अस्त्र प्रकटी ज्वाळा- मालाकुल शर अनंत राया तें ॥
कारि सांतराय[5] योगी- श्वर योगातें अनंतरायातें[6] ॥ ९३ ॥
त्यजिती जलाशया गुरु- गंभीराही नदीनदा यादें ॥
गुरुच्या परबळ केलें क्षणमात्रें हीन दीन दायादें[7] ॥ ९४ ॥
अहि बाहेर निघाले सोडुनि बहु तापतां महि बिळाला ॥
कोणासहि अभयप्रद आश्रय त्या संकटांत न मिळाला॥९५॥
त्या [8]अग्न्यस्त्रें सहसा सेना अक्षौहिणी-मित जळाली ॥
बहुत न हुत होणारी जी तीच सुटोनि तेथुनि पळाली॥९६॥
ऐसा करिता झाला एकचि सोडूनि बाण विप्र लया ॥
रुद्राधिक गमला तो कीं नसतां समय जाणवि प्रलया॥९७॥
धरि परचमू धृति जसी श्रुत-सिंह-रवा दवावृता न गजी ॥
पार्थें सर्वास्त्र-प्रति-पक्ष ब्रह्मास्त्र योजिलें मग जी ॥ ९८ ॥
घनशस्त्रवर्ष शमले शमतां अग्न्यस्त्र सर्व तमहीं तें ॥
सुर ह्मणति मुख्य कृष्णचि हे धारिति न शेष पर्वत महीतें ॥
मेलेचि कृष्ण ऐसें बा सर्वांनींहि मानिलें होतें ॥
अक्षत[9] शस्त्र-प्रशमीं[10] पाहुनि वहु तेज मानिलें हो तें ॥ १०० ॥
घन-पटल-मुक्त-रवि-शशि- निभ कृष्णांहीं स्वशंख वाजविले ॥

---

१ मृत. २ बाणमुखास. ३ कृष्णास. ४ देवांनीं सेव्य अशा. ५ विघ्नयुक्त. ६ विघ्नरहित अशाला. ७ पुत्रानें. ८ कृष्णार्जुन. ९ नाशरहित. १० शस्त्र शांत झाल्यावर.

गाजविले लोक सकळ तावक कुरुनंदनादि लाजविले ॥ १ ॥
शोक-ध्यान-परायण अश्वत्थामा करांगुळी मोडी ॥
जोडी हस्त श्रुतिला दीर्घोष्ण श्वास चापही सोडी ॥ २ ॥
तो धिग्धिक्[1] सर्वमिदं मिथ्या[2] ऐसें ह्मणे, रथावरुनी ॥
टाकुनि उडी पळे हो शीघ्र तपो-योग्य वन-पथा वरुनी ॥ ३ ॥
तों ज्याच्या उपदेशें बहु जनि-मरणाद्यनर्थ[3] चुकतात ॥
तो भेटे भर्ग-प्रभ भगवान् भव्य-प्रभाव शुक-तात ॥ ४ ॥
व्हावें धन्य जयाचें तीर्थांचें तीर्थ पद नमुनि पतितें ॥
त्या वंदी तो चिंता- शोक-परिम्लान-वदन मुनि-पतितें॥ ५ ॥
सविनय पुसे अहो क्यां आग्नेयास्त्र-प्रयोग हा केला ॥
रुद्रेंहि न पावावें यद्गीत-गुहाचि[4]र्यांहि हाकेला ॥ ६ ॥
सर्व चमू न जळाली कृष्णार्जुन वांचले कसे वा हे ॥
जे हरचक्षुपित्यांची प्याले कीं आंच लेकसे बाहे ॥ ७ ॥
हे माया कीं काळें केलें विपरीत पूर्व कीं चुकलों ॥
सांगा कां गायत्री- जपपर मी मंत्रसिद्धिला मुकलों ॥ ८ ॥
व्यास ह्मणे नारायण होउनि कार्यार्थ धर्मसुत पाला ॥
जळहि न सेवुनि पूर्वीं करि मैनाकीं[5] अखिन्न सुतपाला ॥ ९ ॥
सासष्टसहस्त्र समा[6] धृतयमनियमासि सर्वदा जपला ॥
तितुकेंचि पुन्हा तप तो ऊर्ध्वभुज स्थाणु वातभुक् तपला ॥ १०

१ या सर्वांस धिक्कार असो. २ खोटें. ३ जन्ममरणादि. ४ कार्तिकस्वामीच्या. ५ एतन्नामक पर्वत. ६ वर्षें.

तो ब्रह्मभूत जेव्हां प्रभुची तेव्हांचि पूर्ण होय दया ॥
मग दर्शन भगवान् दे भव-हर सेवक-मयूर-तोयद या॥ ११ ॥
प्रेमें स्मितीं निववितो शशिशतमददलन देव देवरद ॥
नमिती शिरीं कर स्तुति करितां श्रुति चित्त दे वदे वरद१२॥
मद्भक्त मत्प्रसादें हो तूं मत्तुल्य मदधिकहि समरीं ॥
त्वदधिक तेज यश नसो कोणाही योगिमुनिजनीं अमरीं॥१३॥
त्या तारिसील वधिसिल ह्मणसिल ज्या ज्यासि तारिन वधीन
शस्त्रास्त्रापासुनि भय तुज किमपि नसो असो जय अधीन १४
विश्वेश असे पुष्कळ होउनि परम प्रसन्न दे वर जा ॥
तो हा यदुपति याच्या नमिति पदाच्या समस्त देव रजा १५
याच्याचि तपापासुनि झाला यासमचि नर महातेजा ॥
तो हा अर्जुन नारायणचि ह्मणति कवि बरे पहाते जा ॥१६ ॥
रक्षिति युगीं युगीं हे साधूंतें आदरें अवतरून ॥
यांचा पद-पद्म-रजः- कणहि न होइल शचीधवतरून ॥१७॥
श्रीकृष्ण रुद्रसंभव पूजितसे शंकरासि हा लिंगीं ॥
अहि चंदना तसा तूं मनिं तरि कृष्णद्वयासि आलिंगीं॥१८॥
तूंही रौद्र तपस्वी तेजस्वी रुद्रभक्त पूर्वींचा ॥
ईश्वरवरप्रसादें झालासि त्रासक रविपूर्वींचा ॥ १९ ॥
इत्यादि तत्व ऐकुनि तो कुरुगुरुचा कुमार बहु मानी ॥
श्रीशंभुकारणें नति करुनि श्रीकेशवासि बहु मानी ॥ २० ॥

१ पादधूली. २ कल्पवृक्षाहून. ३ कृष्णार्जुनास. ४ रुद्रांश. ५ अभिमानी.

हृष्टात्मा व्यासातें वंदुनि अवहारं शीघ्र तो करवी ॥
आवरि वीरां स्वकरां निववाया जेंवि सर्वलोक रवी ॥२१॥

## अध्याय २४.

अर्जुन निजविजयावह मोठें आश्चर्य किमपि पाहोनी ॥
वाहोनि विस्मयभर ध्यानीं होता तटस्थ राहोनी ॥ १ ॥
तो व्यासातें पाहे नमुनि ह्मणे करुनि आ तपस्वी मी ॥
प्रसतों सांगा न तुह्मी डरवाल तमासि आतप स्वामी ॥ २ ॥
जेव्हां जेव्हां करितों जिकडे जिकडे शिरोनि परम रणा ॥
तिकडे तिकडे दिसतो दिव्य पुरुष तोचि हेतु पर-मरणा॥३॥
वर्णें कृष्ण भयंकर बहु चालतसे त्यजूनि तो धरणी ॥
मरती तच्छूलोत्थित शूलसहस्रेंचि सर्व योध रणीं ॥ ४ ॥
दीपपुरोवर्ति तिमिर वायुपुरोवर्ति घन-पटल फाटे ॥
तैसें तयापुढें पर- बल तें पाहुनि मला नवल वाटे ॥ ५॥
मागुनि मी आधीं रवि-शत-संप्रभ बलसमुद्र अनवधि तो ॥
शूलविनिःसृत-शूल-प्रकरें मच्छत्रु-योधजन वधितो ॥ ६ ॥
जन मानितसे वधितो पार्थ परांचीं शरोत्करें कटकें ॥
मृतमारणचि मज रणीं घडलें दिसतें जनास तें लटकें॥ ७ ॥

---

१ युद्ध बंद करणें. २ तपोधन. ३ ऊन. ४ शंभर सूर्यासा रखा तेजस्वी. ५ शूलापासून निघालेल्या शूलसमूहें. ६ बाणसमूहें.

स्वामी तो पुरुषोत्तम कोण बरें हें तुह्मीच सांगाल ॥
आपण सर्वज्ञ ह्मणुनि पर गर्वें फुगविनात कां गाल ॥ ८ ॥
व्यास ह्मणे ज्या साहे न शशी न हुताश न रवि शंकर तो॥
प्रभु-भाव असा स्वपदीं होउनि असपत्न[1] नर त्रिशंक रतो॥९॥
सैंधव-वध-पण-समयीं कृष्णें स्वप्नांत दाविला परवां ॥
झालासि हेतु वंदुनि ज्या असुरीच्या तदा विलाप-रवां॥१०॥
प्रचुर प्रसाद तुजवरि ह्मणुनि प्रभु चालतो पुढें पार्था ॥
बहु जपतो भक्त-जना भगवान् सार्थप जसा सदा सार्था ११
जा त्यासि शरण चरण-स्मरणचि रण-मरण-संकटीं तारी ॥
मारी तोचि खळातें दासासि पडों न देचि जड भारी ॥१२॥
कृप-नृप-गुरुसुत-रक्षित सेनेतें वक्र दृष्टिनें पाहे ॥
बा हेतिधर[2] असा या प्रभुवांचुनि अन्य कोण गा आहे॥१३॥
नमन त्रिकाल करिती स्वर्गीं शक्रादि सुर तरिच वसती ॥
दाखविती झाली या प्रभुचरिताची जना बरि चव सती[3] १४
प्रभुवर दक्षा जेंवि स- दर्पा सर्पाधमा सुपर्ण कुटी ॥
याचा प्रसाद इच्छुनि वरिली कविनीं वनीं सु-पर्णकुटी[4]॥१५॥
जें खेचर[5] लोह-रजत- कनकमय त्रिपुर पांडवा तें गा ॥
एकेंचि शरें केलें भस्म उडविलेंहि कांडवातें[6] गा ॥ १६ ॥
एके समयीं अंकीं घेउनियां खेळवी कुमार मणी ॥
देवांला सांगा हा कोण ह्मणे शंभुची उमा रमणी ॥ १७ ॥

---

१ शत्रुरहित. २ शस्त्र धरणारा. ३ पार्वती. ४ पर्णशाला, ५ आकाशगामी. ६ बाणवायूनें.

तेजस्वी शिशु दिसतो हा मत्पद वाढतां हरिल याला ॥
न उपेक्षावें चिंतुनि हें धांवे न्यावया अरि लयाला ॥ १८ ॥
तत्काळ सवज्र भुज स्तंभित झाला अगा धवळ-बाहा ॥
भ्रमले सर्व न कळला कोणालाही अगाध-बळ वा हा ॥१९॥
सामर शक्र विधिकडे जाय पळत बहु भुजास कळ लागे ॥
स्वमनीं उमा ह्मणे गुरु- मति तुजही मूढ हा न कळला गे२०
परिसुनि वृत्त विधि ह्मणे रे शक्रा देवदेव अज तो कीं ॥
हरिहरि हर-परिभव-बळ तुज आढळलें असेल अज-तोकीं ॥
प्रेमें तसीच भजली शुचि-गुण-मणि-सुखनिधी उमा पतितें ॥
देतां नाना सुख बहु- रूप प्रभु सुखनिधी उमाप तितें ॥२२॥
येतों चला भ्रमाया संसारीं चाकवंत चुकाना कीं ॥
कैंचें अमृत मिळेल न चाखाया चाकवत चुका नाकीं ॥ २३॥
आला धांवुनि सामर विधि विनवाया प्रभूसि कैलासीं ॥
काळाचेंहि न चाले बळ ज्याच्या द्वारपाळ-वैलासी ॥ २४ ॥
पसरी विधि करुनि सुरां- सह नमन स्तवन दीनपा पदर ॥
प्रभु-पद-युगली निववी कां हरिल विबुध न दीन-पाप-दर२५
प्रभुनें न शूल धरिला न असि न नाशावया मद पिनाक ॥
नाकभ्रष्ट न व्हावा वज्री धांसी पुढें तदपि नाक ॥ २६ ॥
ऐसा प्रताप ऐसी लीला ऐसें दयाळुपण समज ॥
बापा पहा प्रभुबळें केलें केवळ पळांत पणस मज ॥ २७ ॥
मातेची सरियेना उपमातेला अगा धवळ-बाहा ॥

१ अर्जुना. २ चक्रा[illegible]माणें. ३ रोमांचित.

काय तुपाची साजे उपमा तेला अगाध-बळ बा हा ॥ २८ ॥
हरिहर सहाय झाले तेव्हां तत्तुल्य तूंहि अजित रणीं ॥
काय इतर तेजस्वी वत्सा तुजला ह्मणेल अजि तरणी॥२९॥
माधव-मित्र-मयूरा मुनि-मुदिर मुदित करूनियां गेला ॥
केला धन्य जय असा शिबिरा शिबिराज-नुत-पदें नेला ३०
श्रीगुरुरामपदाब्जीं भावें हें द्रोणपर्व वाहून ॥
झालों प्रसाद-भाजन सर्वहि होतिल असेचि पाहून ॥ ३१ ॥

---

१ मेघ. २ पात्र.

मुंबईत.
'बाबाजी अनंत तेंडुलकर' यांनीं आपल्या
"श्रीहरिरवर्दीप्रिंटिंगप्रेस" मध्यें छापिलें.